. ग्रं. सं. ठाणे
क्र.



REFBK-0013133

# हिमालय दर्शन

संपादक- श्री. वेंकटेशशास्त्री जोशी.

३७६८०
स. २।।-.
६.२.६५
१५५१
निधि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३७६८० वि: निबंध
क्रमांक १५५१ नों दि

वैदिक व्याख्यानमाला वर्ष १९ वें

REFBK-0013133

# …मालय दर्शन

संपादक:

पं. वेंकटेशशास्त्री जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 93332
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मूल्य अडीच रुपये

प्रकाशक :
श्री. गं. शि. आडकर वकील,
अध्यक्ष, दे. ऋ. ब्रा. शिक्षोणोत्तेजक संस्था,
५२४ बुधवार, पुणें २

सहाय्यक :
के. पां. जोशी, वकील
अ. पु. रासने ( संपादन-सहकार्य )
रा. बा. देव ( कार्यवाह )

प्रथमावृत्ती : २१–१२–१९६३

मुखपृष्ठ :
वसंत सहस्रबुद्धे

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय,
४६१/४ सदाशिव, पुणें २

# अ नु क्र म


| | | | |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | वेंकटेशशास्त्री जोशी | ५ |
| २ | प्रस्तावना | के. पां. जोशी | ९ |
| ३ | हिमालय : अध्यात्माची जम्नोत्री | धुंडिराजशास्त्री विनोद | ११ |
| १ | उद्‌घाटनाचें भाषण | पां. ज. चिन्मुळगुंद | १ |
| २ | विषय–प्रवेश | वेंकटेशशास्त्री जोशी | ३ |
| ३ | हिमालयांतील तीर्थ-क्षेत्रें | पांडुरंगशास्त्री गोस्वामी | ७ |
| ४ | प्राचीन वाङ्मयांतील हिमालय | व. ग. राहूरकर | २३ |
| ५ | भारताचा संरक्षक हिमालय | शंकरराव चाफेकर | २७ |
| ६ | सद्यःकालीन हिमालय | पु. ग. सहस्रबुद्धे | ३० |
| ७ | हिमालयांतील मानववंश व कांहीं जमाती | य. भा. दामले | ३४ |
| ८ | हिमालयांतील वनस्पति, औषधि व खनिज संपत्ति | वि. आ. बेडेकर | ३७ |
| ९ | हिमालय आणि अध्यात्म | पु. श्री. भट | ४२ |
| १० | हिमालयांतील भाषा: एक दृष्टिकोण | ना. गो. कालेलकर | ४६ |
| ११ | नेफा विभागांतील संस्कृति | म. मं. पाटकर | ५२ |
| १२ | हिमालयांतील परतंत्र देश : तिबेट | त्र्यं. र. देवगिरीकर | ७१ |
| १३ | हिमालयाची भौगोलिक मांडणी | सिद्धेश्वरशास्त्री चित्राव | ८४ |
| १४ | हिमाचल प्रदेश : आर्थिक जीवन और समस्या | मंत्रिणी प्रसाद | ८७ |
| १५ | जनतेंतील एकात्मभाव : संरक्षणाचा एक आधार | ह. मो. जोशी | ९२ |
| १६ | हिमालयांतील सौंदर्यभूमि : काश्मीर | अ. पु. रासने | ९६ |
| १७ | देवतात्मा हिमालयः | वसन्त अ. गाडगीळ | १०५ |
| १८ | हिमालय, उत्तरकुरू आणि भारताची उत्तरसीमा | वेंकटेशशास्त्री जोशी | १०९ |
| १९ | समारोप | गं. शि. आडकर | १२६ |
| २० | परिशिष्ट १ : चीनशी विशेष पत्रव्यवहार | | १२९ |
| २१ | परिशिष्ट २ : तीर्थक्षेत्रांतील संकल्पविधि | | १४६ |
| २२ | समरगीत : जयजय भारत देश | वेंकटेशशास्त्री जोशी | १४८ |

नकाशे :


| | | |
|---|---|---|
| १ | हिंदची उत्तर | सुरुवातीचा |
| २ | काश्मीरचा नकाशा | ९७ |
| ३ | भारत व सीमेवरचीं राष्ट्रें | ११२ |
| ४ | भारताची उत्तर सीमा | ११६ |
| ५ | नेफा विभाग | १२९ |
| ६ | नेफा विभाग व उत्तर सीमा | १३० |
| ७ | नेफाचा चीननें व्यापलेला भाग | १३१ |
| ८ | उत्तर सीमेवरील शत्रूचीं आक्रमणें | शेवटीं |

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३७६८० वि: .......
क्रमांक १५५१ नोंद दि ६-२-६५

# संपादकीय

वैदिकव्याख्यानमालेला पुण्यांत एक स्वतंत्र प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. गेलीं अठरा वर्षें अखण्डपणें व्याख्यानमाला चालवून पुण्यांतील सांस्कृतिक जीवनांत वैदिक व्याख्यानमालेनें आपलें असें एक स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केलें आहे. आजवर ऋग्वेद, महाभारत, भगवद्‌गीता, ज्ञानेश्वरी, षड्‌दर्शनें अशा विषयांवर मोठ्या विद्वान् वक्त्यांनीं वैदिक व्याख्यानमालेंत आपली वाङ्मयपुष्पें गुंफलीं आहेत.

**न रत्नमन्विष्यति मृग्यते हि तत् :**

अशा या व्याख्यानमालेंत ' हिमालय दर्शन ' हा विषय कितपत यशस्वी होतो याची सर्वांनाच प्रथम शंका होती. एकतर या विषयाची माहिती फारच थोडी उपलब्ध आहे व दुसरें असें कीं ती माहिती अधिकारवाणीनें सांगणारे व्याख्याते मिळणें हें त्याहून कठीण. पण पुण्यांत अनेक विद्वान् मंडळी अगदी शांतपणें आपला विद्याव्यासंग, आपलें संशोधन कार्य करीत असून ती अगदी प्रसिद्धिपराङ्मुख असतात. त्यामुळे हीं मंडळी इतकी बाजूला असतात कीं त्यांची माहिती मिळवून त्यांच्याजवळ जाणें हेंहि एक संशोधनाचेंच कार्य ठरतें. आणि कित्येक वेळां अशी विद्वान् मंडळी आपल्या परिसरांतच असूनहि त्यांचा खळखळाट फार नसल्यानें आपणांस त्यांचा पत्ता लागत नाहीं. म्हणून आम्ही वक्त्यांचा अगदी कसून शोध करण्याकरितां निघालों. प्रत्यक्ष गाठीभेटी घेतांना मात्र आम्हांला अनुभव निराळा आला. ज्या ज्या विद्वानांना आम्ही भेटलों त्या सर्वांनीं ताबडतोब सहकार्याच्या भावनेनें आणि त्याहून अधिक म्हणजे कर्तव्यभावनेनें होकार दिला. हिमालयाच्या संबंधांतील ही वाङ्मयसेवा म्हणजे आपले एक राष्ट्रीय कर्तव्यच आहे अशीच सर्वांची भावना दिसून आली. डेक्कन कॉलेजमधूनच सहा सात विद्वान् मंडळीं या ज्ञानसत्रांत ऋत्विग्वरणार्थ लाभली. त्या सर्वांना हार्दिक धन्यवाद.

सर्वांनीं आपल्या विषयांची माहिती मोठ्या प्रयासानें निरनिराळ्या ठिकाणाहून मिळवून आपले विचार सर्वसामान्य श्रोत्यांना समजतील अशा भाषेंत मोठ्या आकर्षक पद्धतीनें लोकांच्या पुढें मांडले. त्यामुळें हिमालयासारख्या गंभीर विषयालासुद्धा प्रतिदिनीं श्रोतृवर्ग वाढत होता व वैदिक व्याख्यानमालेची अठरा वर्षांची प्रतिष्ठाहि वाढत होती. विद्वान् व्याख्यात्यांनीं जी नवीन माहिती अभ्यासपूर्वक सांगितली, त्याविषयीं श्रोत्यांनीं आपली पसंती दर्शविली व समाधान व्यक्त केलें. व्याख्यानांचें पुस्तकांत रूपांतर करण्याची योजना दृढ करण्यांत आली. कारण कालिदास म्हणतो : 'आपरितोषाद् विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम्'.

ज्या विषयावर व्याख्यानें ठेवण्याची इच्छा असूनहि कालाच्या बंधनामुळें किंवा त्या वेळीं वक्ते न मिळाल्याने व्याख्यानें ठेवतां आलीं नाहींत ते विषय या ठिकाणीं लेखरूपानें घेतले आहेत. मध्यंतरीं गणेशोत्सवांत दोन व्याख्यानें हिमालयाशींच संबंधित विषयावर झालीं. श्री. मंत्रिणी प्रसाद यांनीं हिमाचल प्रदेशांतील आर्थिक समस्यांवर आपले विचार सांगितले व श्री. ह. मो. जोशी यांनीं भारतीय एकात्मभाव या विषयावर विचारप्रवर्तक माहिती सांगितली. त्यामुळें त्यांचाहि येथें समावेश केला आहे. न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद यांचा लेख त्यांची प्रकृति ठीक नसतांहि त्यांनीं दिला या बद्दल त्यांचे जेवढे आभार मानावेत तेवढे थोडे आहेत. त्यांचा लेख म्हणजे या ग्रंथाचं वैशिष्ट्यच मानावं लागेल. त्यामुळें तो सुरवातीसच दिला आहे. श्री. रासने यांनीं संपादनकार्यांत मदत तर केलीच पण आम्हीं त्यांना सुचविल्याप्रमाणें त्यांनीं काश्मीरच्या सौंदर्यावर एक लेख लिहून दिला या बद्दल त्यांचेहि आभार.

व्याख्यानें दिल्यानंतर कांहीं व्याख्यात्यांनीं आपल्या विषयांत उचित अशी भर घालून स्वतः लेखरूपानें तीं लिहून दिलीं. त्यामुळें आमचें कार्य फारच सुकर झालें. ज्यांचीं व्याख्यानें टेपरेकॉर्डवरूनच लेखांत रूपांतरित करावीं लागलीं तीं व्याख्यानें आकारानें लहान असलीं तरी गुणवत्तेत यत्किंचित्ही कमी नाहींत.

व्याख्यानांचा क्रम न बदलता ज्या अनुक्रमानें व्याख्यानें झालीं तोच अनुक्रम येथील लेखांतहि ठेविला आहे. फक्त अपवाद एक दोन लेखांचेच आहेत. कांहीं अपरिहार्य परिस्थितींत तो क्रम बदलावा लागला. विषयांचे वर्गीकरण करून त्या रीतीनें हा विषय हाताळणें येथें कठीण होतें. कारण तशा पद्धतीनें अगदी तर्ककर्कश शास्त्रीय दृष्टिकोनांतून या विषयाची मांडणी करावी अशी प्रारंभापासूनच कल्पना नव्हती. बहुश्रुत श्रोत्यांना नवीन माहिती पुरवावी, थोडें अनुरंजन करावें व थोडें संशोधनहि असावें असा एकंदरींत मध्यम मार्ग आम्ही सुरवातीपासून अवलंबिला होता. 'स पुरस्कृतमध्यमक्रमः' हा आमचा दृष्टिकोन होता. स्वभावतःच गंभीर असणाऱ्या हिमालयाला अधिक गंभीर बनवावयाचे नव्हतें कीं प्रकृत्या गंभीर विषयाला उथळहि करावयाचें नव्हतें.

लोकांमध्यें हिमालयाविषयी एकप्रकारची आत्मीयता व भक्ति आहे. हिमालयाची भारताशीं अविभाज्यता आहे, अशीहि दृढ श्रद्धा आहे. तिला चीनच्या आक्रमणानें पहिला पण जबरदस्त धक्का दिला. सर्व हिमालयावर आपला हक्कच नाहीं असा बुद्धिभेद करण्यांत येऊं लागला. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं मध्यंतरीच्या काळांत भारतांतील कांहीं बुद्धिमान् वर्गहि त्याला बळी पडतो आहे असें दृश्य दिसूं लागलें. अशा वेळीं परकी शत्रूपेक्षां स्वकीयांची श्रद्धा विचलित होणें याची मोठी भीति असते. आपलीं श्रद्धाकेंद्रें व मानबिंदु दृढ असल्याशिवाय त्यासाठीं अहमहमिकेनें प्राणार्पण करण्यासाठी बुद्धिमान् तरुण वर्ग पुढें येणें कठीण असते. याकरितां राष्ट्रांतील सामान्य जनता व तरुण वर्ग यांची नैतिक बैठक भक्कम करणें आवश्यक असतें. त्यांच्या मनांत अगदी थोडी सुद्धां आपल्या ध्येयाविषयीं असलेली शंका दूर करण्याचें कार्य अशा व्याख्यानमालांनीं करावयाचें असतें.

## क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्तेः

तें कार्य अंशतः जरी झालें तरी या व्याख्यानमालेचा हेतु सिद्धीस गेला असें म्हणण्यास हरकत नाहीं. व्याख्यानांना कितीहि लोक आले तरी ते पुस्तकाच्या वाचकांच्या मानानें कमीच असणार ! म्हणून हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें ठरविलें व त्यासाठीं पुष्कळ कष्ट घेतले याबद्दल दे. ऋ. ब्रा. शिक्षणसंस्थेच्या विश्वस्तांचे व कार्यकर्त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडे आहेत. विशेषतः संस्थेचे अध्यक्ष श्री. गं. शि. आडकर, श्री. के. पां. जोशी व श्री. रा. बा. देव यांनीं पुष्कळ श्रम घेतले म्हणूनच हें पुस्तक बाहेर येत आहे. हें पुस्तक बाहेर पडलेलें पाहून त्यांना आपल्या श्रमांचं सार्थक झालं असं वाटल्यावाचून रहाणार नाहीं.

हिमालयासंबंधी आणखी एक गोष्ट येथें लक्षांत घेण्यासारखी आहे. असें म्हणतात कीं :

द्वाविमौ पुरुषौ लोके सूर्यमण्डलभेदिनौ ।
परिव्राट् योगयुक्तश्च रणे चाभिमुखो हतः ।।

योगसामर्थ्यसंपन्न परिव्राजक-संन्यासी व युद्धामध्यें मारला गेलेला सैनिक हे दोघेच मरणोत्तर सूर्यमंडल भेदून पलीकडे जाऊं शकतात.

हिमालयांतील संस्कृति या दोन परंपरांनी भरलेली आहे. गेल्या पांच हजार वर्षांतील हिमालयाचा इतिहास म्हणजे ऋषिमुनींचे अध्यात्म व पराक्रमी योद्धयांचें शौर्य यांचा इतिहास होय. मूर्तिमंत शांतरस आणि वीररस यांचें हिमालय हें प्रतीक आहे. प्रत्यक्ष ब्रह्मदेव, वसिष्ठ, वाल्मीकि, व्यास यांची तपोभूमि हिमालयच ोती

तर भगवान् शंकर, भरत, दुष्यन्त, अर्जुन यांनीं रणभूमीसाठीं हिमालयाचीच निवड केली होती. गहन अध्यात्मज्ञान आणि अत्युत्कट पराक्रम या मूलतः विरोधी प्रवृत्तींचें हृदयंगम मीलन हिमालयाच्या उन्नत शिखरांवर, खोल दऱ्यांतून आणि विशाल गुहांतून घडतें.

अशा भव्य हिमालयाविषयीं माहिती देणाऱ्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठीं **माननीय ले. ज. एस्. पी. थोरात** यांच्यासारखा भारताचा भूतपूर्व सेनापति लाभावा ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. विशेषतः हिमालयाच्या आजच्या परिस्थितींत **हिमालय दर्शन** हें पुस्तक एका महान् योद्ध्याच्या हातून प्रकाशित होत आहे ही एक मोठी औचित्यपूर्ण घटना आहे. हिमालयांत जे असंख्य भारतीय सैनिक सर्वस्वाचा त्याग करून प्राणपणानें लढत आहेत त्यांचे प्रतिनिधि भूतपूर्व सेनानी **मा. ले. ज. थोरात, हिमालय दर्शन** प्रकाशित करीत आहेत यापरतें भाग्य कोणतें ? तें भाग्य आम्हांस लाभत आहे याबद्दल आम्ही आपणांस धन्य समजतो.

२१–१२–१९६३.

*वेंकटेशशास्त्री जोशी*

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३५६६०... वि: ...
क्रमांक ...२५५२... नों दि ...

# प्रस्तावना

## स्थावरणां हिमालयः

दे. ऋ. ब्रा. शिक्षणोत्तजक संस्थेच्या वतीनें श्रावण शुद्ध पंचमी ते श्रावणी पौर्णिमा या काळांत दर वर्षी दहा दिवस वैदिक व्याख्यानमाला चालविली जाते. ही परंपरा गेली अठरा वर्षें अखंड चालू आहे. आजपर्यंत ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, महाभारत, रामायण, उपनिषदे, भगवद्गीता, ज्ञानेश्वरी इत्यादि विषयांवर व्याख्यानमाला आयोजित करण्यांत आल्या होत्या. यंदा सुरुवातीला महाभारतांतील राजनीति या विषयावर व्याख्यानें योजण्यांत यावींत व त्यांचें संचालकत्व श्री. वेंकटेश शास्त्री जोशी यांनींच स्वीकारावें अशी त्यांना विनंती केली होती. परंतु प्रचलित परिस्थितींत, हिमालय या विषयाचें महत्त्व जाणून त्यांनीं या विषयावर व्याख्यानमाला अतिशय उत्तमप्रकारें घडवून आणली व सर्व रीतीने यशस्वीपणें तडीस नेली. व्याख्यानमालेस प्रतिदिनी श्रोतृवर्ग बहुसंख्येनें उपस्थित असेच. कित्येक वेळा जागा अपुरी पडल्यामुळें बाहेर उभे राहूनहि लोक व्याख्यानें ऐकत असत. त्यामुळें या विषयाकडे लोकांचें आकर्षण किती आहे, हें आमच्या लक्षांत आलें; आणि आम्ही व्याख्यानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याची पूर्वींचीच योजना निश्चयानें अंमलांत आणण्याचें ठरविलें.

प्रारंभीं व्याख्यानांचा गोषवारा संक्षेप रूपानें प्रसिद्ध करावा, अशी आमची कल्पना होती. पण विषयाचें महत्व व व्याख्यात्यांनीं मांडलेली अगदी नवीन व विविध प्रकारची माहिती विस्तृत प्रमाणांत लोकांच्या पुढे पुस्तकरूपानें ठेविणें अधिक उपयुक्त ठरेल, असें वाटूं लागलें. त्याप्रमाणें मूळची पुस्तकाची कल्पना मर्यादित स्वरूपांत न ठेवितां ती पुष्कळच विस्तार पावलेली या ठिकाणीं दिसून येईल.

वैदिक व्याख्यानमालेतील व्याख्यात्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानलेच पाहिजेत, पण त्याचबरोबर गणेशोत्सवातील व्याख्यात्यांनी देखील हिमा-

ल्यासंबंधितच आपला विषय घेऊन जी माहिती दिली, त्याबद्दल त्यांचे व श्री रासने यांनी काश्मीरमधील सृष्टिसौंदर्यावर लिहिलेल्या लेखाबद्दल त्यांचेहि आभार मानणे आवश्यक आहे. न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद यांच्या लेखाबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार तर मानतोंच, पण त्याचबरोबर या लेखाच्या रूपानें एक गूढ विद्या प्राकृत लोकांच्या पुढें अगदी सरळ सोप्या भाषेंत विशद करून सांगितली, याबद्दल सर्व मराठी भाषिक त्यांच्याशीं कृतज्ञच राहील, एवढेंच मी या ठिकाणीं नम्रपणें व्यक्त करूं इच्छितो.

ज्या वैदिक व्याख्यानमालेच्या समितीच्या वतीनें प्रारंभीं ही व्याख्यानमाला घडवून आणली त्या समितींत खालील लोक होते.

श्री. रा. वि. चंद्रचूड, श्री. रा. ह. उदास, डॉ. बापूराव बीडकर, श्री. बा. ग. तुळजापूरकर व श्री. रा. बा. देव (सरचिटणीस). सर्वांनी केलेल्या अविश्रांत श्रमाबद्दल धन्यवाद.

कल्पना मुद्रणालयाचे चालक श्री. चिं. स. लाटकर यांनी या पुस्तकाची छपाई अत्यल्प अवधींत फार उत्कृष्ट रीतीनें व निरपेक्षबुद्धीनें करून दिली याबद्दल त्यांचे व त्यांच्या सहकारी मंडळींचे आभार मानणें कर्तव्य आहे. या पुस्तकातील कांहीं नकाशांचे ब्लॉक्स 'सकाळ' कार्यालयांतून वापरण्यास मिळाल्यामुळें आमच्या कार्यात सुकरतां उत्पन्न झाली, म्हणून त्यांचेहि आभार मानणें आवश्यक आहे. मुखपृष्ठावरील उत्कृष्ट चित्र अगदी थोड्या अवधीत तत्परतेने करून दिले याबद्दल श्री. वसंत सहस्रबुद्धे यांचे आभार मानतो. शेवटीं या पुस्तकाचे संपादक पं. वेंकटेशशास्त्री जोशी यांनीं संस्थेच्या विनंतीस मान देऊन संपादनाचें कार्य उत्तम प्रकारें केलें याबद्दल त्यांचे आभार मानतो.

संस्थेनें या पुस्तकाची किंमत अत्यल्प ठेविली आहे. कारण हिमालयाविषयीची माहिती सर्वांना सुलभ रीतीने उपलब्ध व्हावी व समाजामध्यें त्याविषयीं पुरातन कालापासून असलेली आत्मीयता दृढ व्हावी हाच एक उद्देश व्याख्यानमालेच्या प्रारंभापासून होता. जनता या पुस्तकाचे स्वागत करून तो हेतु सिद्धीस नेईल याची आम्हांस खात्री आहे. विद्वानांना कालिदासाच्या शब्दांत एवढीच विनंति कीं :

तं सन्तः श्रोतुमर्हन्ति सदसद्व्यक्तिहेतवः ।
हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकापि वा ।

अध्यात्म भुवन,
डेक्कन जिमखाना, पुणें ४.

**के. पां. जोशी**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३९३२

# हिमालय : अध्यात्माची जन्मोत्री

## डॉ. धुं. गो. विनोद

[ पृथ्वी पर्यटण करून आलेले, हिमालयांतील बहुतेक क्षेत्रांत व अनेक गुहांमध्ये तसेंच तिबेटमध्येंही मन्त्रसाधना,तन्त्र-प्रयोग व यन्त्र-सिद्धि यांचा अनुभव असलेले महर्षि न्यायरत्न डॉ. धुं. गो. विनोद यांचा हा लेख लाभणें हें प्रस्तुत ग्रंथाचें एक वैशिष्ट्य आहे.


हिमालयांत ( हृषीकेशच्या पलीकडे ) १९३८ च्या डिसेंबरमध्यें भरलेल्या प्रचंड साधकपरिषदेचें अध्यक्षपद महर्षि विनोद यानीं भूषविलें होतें. ( केसरी, दि. १७ जानेवारी १९३९, Times of India, Illustrated Weekly–26 Feb. 1939 ) वर्षानुवर्षें हिमालयाशीं घनिष्ठ आध्यात्मिक संबंध असलेल्या, व साक्षात्कारी तत्त्वज्ञ म्हणून जागतिक कीर्ति असलेल्या, विद्वानांचे या ग्रंथासाठीं मिळालेले तात्त्विक विचार म्हणजे मराठी वाङ्मयाला एक नवी देणगीच होय.

—संपादक ]

१

हिमालयांतल्या बद्रीनाथाच्या पलीकडे असलेल्या 'वसु-धारा' या जल-प्रपाताजवळ उभा असतांना कांहीं वेळ माझें देहभान हरपलें, मला एक विलक्षण अनुभव आला होता. त्या भव्य-दिव्य क्षणाचें स्मरण मला नेहमीं होत असतें. अशा

वेळीं मनांत एक विचार उद्भवतो. हिमालयांतल्या वसु-धारेचा हा प्र-पात अद्भुत-रम्य आहे हें खरेंच. पण हिमालयानें भारताला व जगाला दिलेल्या सहस्रावधि 'विद्याधारांचें' दृश्य वसु-धारेहून कितीतरी पटीनें अधिक रम्य, आकर्षक व अधिक अर्थपूर्ण नाहीं काय !



हिमालयानें भारताला सर्व, सर्व कांहीं दिलें आहे. आर्य, वैदिक, व भारतीय या संस्कृती हिमालयांतून अवतरलेल्या पयःश्रीनें परिपुष्ट झाल्या आहेत. या तीन संस्कृतींना व एकंदर सर्व मानवी संस्कृतींना आधारभूत असणाऱ्या प्राथमिक प्रेरणा हिमाल्यां-तील द्रष्ट्यांनीं व विचारवंतांनीं प्रथम प्रकट केल्या.

कांहीं वैदिक ऋचांचें 'दर्शन' प्राचीन ऋषींना उत्तर ध्रुवाचें परिसरांत झालें असेल; तथापि, आधुनिक युगाला 'धर्म-मूल' असे जीं ऋग्वेदांतील ३ मंडळें, यजुर्वेद, व अथर्ववेद, ह्या वेद-भागांचा साक्षात्कार हिमालयामधल्याच मन्त्रद्रष्ट्या ऋषींना झाला, हें ऐतिहासिक सत्य आहे.

असित, वसिष्ठ, वाल्मीकि, कण्व इत्यादि बहुतेक सर्व ऋषींचे आश्रम हिमालयाच्या परिसरांत होते. असित ऋषींचा निवास जम्नोत्री जवळ होता. कण्व ऋषि हिमालयांतल्या मालिनी नदीच्या कांठीं रहात असत, वाल्मीकि ऋषींचा आश्रम हिमालयांतल्या तमसा नदीवर असे. महर्षि वसिष्ठांचा आश्रम हिमालयाच्या दक्षिण कक्षेमध्यें होता. वेदकालीन मन्त्रद्रष्टे ऋषि, त्यांचे यज्ञ, त्यांचें आध्यात्मिक संशोधन, ब्राह्मणग्रंथ, आरण्यकें व बहुतेक उपनिषद् ग्रंथ यांचा हिमालयाशीं अतिशय घनिष्ठ संबंध होता हें स्वयंस्पष्ट सत्य आहे. आयुर्वेदाचा उगमही हिमालयांतच अहे. "पार्श्वे हिमवतः शुभे" ( चरक ). ऋग्वेदांतल्या दहाव्या मंडलांत हिमालयाचा हिमवंत असा निर्देश आहे. अथर्ववेद, तैत्तिरीय संहिता, वाजसनेयी संहिता, ऐतरेय ब्राह्मण या वैदिक वाङ्मयांत हिमालयवाचक असे सु-स्पष्ट उल्लेख आहेत.

योगिनी तन्त्रांतही हिमवानाचा उल्लेख आहे. महाभारत, भागवत, विष्णुपुराण, वायुपुराण यांत हिमालयाबद्दल निःसंदिग्ध निर्देश आढळतात. या सर्व ग्रंथांतून हिमा-

लयाच्या आध्यात्मिक वैभवाची स्पष्ट अथवा सूचक वर्णनें आढळतात. दिलीप राजानें कामधेनूची सेवा हिमालयांतच केली. अर्जुनानें पाशुपतास्त्र मिळविण्यासाठीं शिवाची आराधना हिमालयांत केली. पांडवांचें महानिर्वाण हिमालयांत झालें; भगीरथाचें स्थापत्यकौशल्य हिमालयांतच प्रकट झालें. कालिदासानें तर कुमारसंभवांत हिमालयाची एक भव्य पूजा बांधली आहे. या नगाधिराजाला कालिदासानें 'देवतात्मा' म्हटलें आहे. हिमालयाची आध्यात्मिक संपन्नता कालिदासाच्या या भव्य विशेषणानें उत्कृष्ट-पणें प्रकट केली आहे. हिमालय हा स्वतः **ब्रह्मर्षि** आहे; स्वतः आदिमातेनें त्याला ब्रह्मोपदेश केला होता. देवी भागवतांतल्या सातव्या स्कंधांत हिमालय हा जगदंबेचा शिष्य म्हणून उपस्थित आहे, व 'प्रणिपातेन, परिप्रश्नेन, व सेवया' जगन्मातेला, मोक्ष-मार्ग, ब्रह्मविद्येतील गूढ रहस्यें विचारीत आहे. देवीनें, 'हैमवती' पार्वतीचे रूपानें हिमालयाच्या पोटीं जन्म घेण्यापूर्वी, सर्व रहस्यें हिमालयाला उपदेशिली आहेत. हिमालयाला तिनें आपलें विराट स्वरूप दाखविलें; त्याचेंही चित्तवेधक वर्णन देवी भागवतांत आहे. ज्ञानमार्ग, ध्यानमार्ग, भक्तिमार्ग, तसेंच व्रत-वैकल्यें, पूजाविधी-फलश्रुति यांचेंही दिग्दर्शन देवीनें हिमालयाला केलें आहे.

स्वतः जगदंबा, आदिशक्ति, ब्रह्म-विद्येच्या रूपानें हिमालयांत राहिली आहे. तिचा अत्युच्च कोटीचा, व गूढतम असा आविष्कार म्हणजे बीजाक्षर विद्या होय.

## २

बीजाक्षर विद्या ही परा-विद्या होय. वेद-चतुष्टय हे देखील अपरा विद्येंत गणलें जातें.

परा विद्या ही शब्द व त्यांचे अर्थ, किंबहुना सर्व बुद्धिगम्य व इन्द्रियगम्य विश्व यांच्या पलीकडील कक्षा आहे. यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ।

या विद्येंत शब्द नाहीं, शब्दजन्य अर्थ नाहीं. ती केवळ अ-क्षर म्हणजे अविनाशी, त्रिकालातीत व केवळ स्व-स्वरुपपय अशी विशुद्ध **शक्ती** आहे. ती अशी असल्यामुळें सर्व सृष्टीला विश्वाला, विश्वेदेवांना व एकंदर अति मानव श्रेणीला देखील अधिष्टानभूत आहे.

तिचे स्वरूप व लक्षणें यांचें विवेचन, अपरा विद्येंत अन्तर्भूत होणाऱ्या वेदांना देखील संपूर्णपणें करतां आलें नाहीं.

तंत्र शास्त्रांतला एक महान संकेत येथें ध्यानांत घेणें अवश्य आहे. दृष्टाला अदृष्ट, व ज्ञेयाला अज्ञेय हें नेहमींच आधारभूत व अधिष्टानभूत असतें.

दृश्य वृक्षाला आधारभूत असणारीं मुळें-पाळें नेहमीं अदृश्यच असतात. तीं दृश्य झालीं तर त्या वृक्षाचें उन्मूलन होईल तो जीवन्तच रहाणार नाहीं.

बीज-शक्ती ही अशीच नेहमीं अदृश्य असते, अज्ञेय असते. कारण ती सर्वाधार स्वरुपच आहे.

परा-विद्येचे, अ-क्षर अशा ब्रह्मविद्येचे, ( अक्षरं ब्रह्म । ) स्वरूप विशद करण्यासाठींच, चतुर्वेदांचा, चौदा विद्यांचा व चौसष्ट कलांचा अविष्कार झाला आहे.

अ-क्षर तत्त्व काय आहे हें जाणणें म्हणजेच क्षर सृष्टीचें मूलतत्त्व अर्थात् ‘ बीज ’ जाणणें होय.

‘ बीजाक्षर ’ हा शब्द कर्मधारय व षष्ठितत्पुरुष या दोन्ही प्रकारच्या समासांनीं स्पष्ट करणे शक्य आहे. ‘ बीज हेंच अक्षर ’ हा कर्मधारय; व बीज हें ज्या मन्त्राचें अ-क्षर तत्त्व आहे, असा बीज मन्त्र किंवा अशी विद्या, म्हणजे बीजाक्षर विद्या.

बीजाक्षर-मन्त्र व बीजाक्षर-विद्या हे शब्द अध्यात्म-शास्त्रांत सुप्रसिद्ध व सुप्रतिष्ठित आहेत. ‘ श्री ’ हें आद्य अक्षर आहे. ‘ श्री ’-विद्या ही विख्यात मन्त्र-विद्या आहे. तीच अक्षर-विद्या, बीजाक्षर विद्या.

बीजांतून वृक्ष, वृक्षांतून बीज ही सं-तति, ही पुनरावृत्ति अ-खंड व अविरत सुरू आहे, हेंच बीजाचें, बीजशक्तीचें अमरत्व आहे.

यन्त्र-मन्त्र-तंत्र या तीन विद्या, सर्व गूढ व अतीन्द्रिय विद्या यांचें मूलाधार चक्र म्हणजे बीजविद्या होय. कलकत्त्याचे एक माजी चीफ जस्टिस सर जॉन वुड्रॉफ हे तन्त्र मन्त्रविद्येचे महान् संशोधक होते. त्यांनीं बीजाक्षर विद्येवर Garland of Letters हा एक लहानसा पण महत्व-पूर्ण, व गूढ-गभीर अर्थ विशद करणारा, ग्रन्थ लिहिला आहे.

बीजाक्षर विद्येतील बीजें कोणती ?

ॐ कार किंवा प्रणव व अ-उ-म हे त्याचे अवयव हीं (एक व तीन अशी चार बीजें) ‘शान्त’ किंवा अशब्द बीजें म्हणून प्रसिद्ध आहेत. ॐ हा उच्चार स्वयंपूर्ण आहे. तो एकादा स्वर-व्यंजनात्मक ‘शब्द’ होऊं शकत नाहीं. त्याची घटना व रचना उच्चार व विनियोग हें सर्व कांही व्याकरणातीत व विवेचनातीत आहे.

शब्दसृष्टीला ही बीजें आधारभूत आहेत.

मानवमात्राची श्वसनक्रिया हीच प्रस्तुत प्रणवबीजाचा, या ॐ काराचा स्वभावतश्च अखंड उच्चार करीत आहे. ॐ कार हा सृष्टींतला स्वयंसिद्ध उच्चार आहे. त्या ॐ कारामुळेंच श्वसनक्रियेची सिद्धि होते. श्वसनक्रियेंत तो ऐकूंही येतो. गंगोत्री व जम्नोत्री या दोन्हीं ठिकाणीं, पहिल्या प्र-पातांत ॐ कार ध्वनि स्पष्ट ऐकूं येतो, असा प्राचीन ऋषि मुनींचा, कांहीं आधुनिक यात्रिकांचा, व **माझा स्वतःचाही प्रत्यक्ष अनुभव आहे. हें स्थान गंगोत्रीच्याही मागें आहे.**

प्रणव किंवा ॐ कार ही मानवाला मिळालेलीं ब्रह्मर्षि हिमालयाची महनीय

देणगी होय. भारतीय संस्कृतीनें व तत्त्वशास्त्रानें हें तत्त्वरत्न आपल्या पंच प्राणांच्या मंजूषेंत परम आदरानें जपून ठेवलें आहे.

देवतांच्या 'प्राणप्रतिष्ठा' मन्त्रांत षोडष बीजें आहेत. तीं बीजें मृण्मय मूर्तींचें ठिकाणीं प्राण-स्पंद उत्पन्न करूं शकतात. असा वैदिक दैवतकांडाचा एक गूढ संकेत आहे. या संकेतावरच देव-देवतांचें अर्चन व संपूर्ण दैवत-विद्या आधारलेली आहे.

केदारनाथ येथील एका जीवन्मुक्तानें मला कांहीं तन्त्र-रहस्यें व मन्त्र-विधानें शिकविली होती. इ. स. १९१७ सालापासून माझा व त्यांचा गाढ-गूढ संबंध सुरू आहे. बीजाक्षार विद्येंत त्यांनींच मला गति दिली; व माझी प्रगति केली. पुष्कळ गोष्टी व्यक्तविण्यास मला त्यांची आज्ञा मिळाली नाहीं. सर्व गूढ विद्येंत ही एक मेख असतेच. ॐ हे एक बीज, अ, उ, म, हीं अवयव-बीजें व १९ प्राणन बीजें, याहून निराळी अशी २८ बीजें मला त्या **जीवन्मुक्तानें** सांगितलीं. प्रत्येक व्यक्तीच्या अनामिकेखालील सूर्य-शैलाचा स्पंद घेऊन, त्या त्या व्यक्तींचीं स्वतःचीं बीजें कशी ओळखावी हें हीं त्यांनीं मला शिकविलें आहे. पण हीं रहस्यें प्रकटविण्याची आज्ञा मला अजून मिळाली नाहीं.

स्पंद-शास्त्र हें भविष्यकालीन विज्ञानाचा विषय आहे. Seience of Vibrations हें अद्यापि शैशव नव्हे, गर्भावस्थेंतच आहे.

प्रत्यभिज्ञा दर्शनाचे निर्माते अभिनवगुप्त यांनीं लिहिलेल्या "तत्त्वसार" व "स्पंद" इत्यादि तन्त्रग्रन्थांत या विषयांचें थोडें, पण सूचक व मौलिक विवेचन आढळून येतें. तें अत्यंत त्रुटित व सूत्रमय, असून मार्गदर्शक तज्ज्ञाशिवाय त्याचा स्पष्टतया अर्थबोध होत नाहीं.

'स्पंद' शब्दाचा शास्त्रीय अर्थ अत्यन्त गभीर व गंभीर आहे. प्राणतत्त्वाचें स्वरूप स्पंदमय आहे. प्र + अन् हे दोन, प्राण या शब्दाचे घटक होत.

अन् शब्दाचा अर्थ वायु, श्वास, श्वास घेणें, असा आहे. प्र म्हणजे 'प्रकर्षानें' विशिष्ट तऱ्हेनें.

विशिष्ट तऱ्हेनें वायूचें चलन होणें, गति निर्माण होणें हा 'प्राण' शब्दाचा मूलार्थ आहे.

प्राण शब्दानें जीवचैतन्याचें बहिरंग प्रकट होतें. श्री. अरविंद घोष हे 'प्राण' शब्दाचे Vital force असें भाषांतर करतात. 'प्राण' हा Spiritual force नव्हे. प्राण-तत्त्व जड आहे. चैतन्य हें सर्व-इन्द्रिय-अतीत, अनाद्यन्त असें तत्त्व आहे. वायु-तत्त्वाशीं संपर्क आल्यामुळें जीव चैतन्याला श्वसन-गति प्राप्त होते.

आत्मतत्त्वापासून आकाश, आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून आपस व आपस्तत्वापासून पृथ्वी, हा सृष्टिचा वैदिक उत्पत्तिक्रम आहे.

आत्मनो आकाश:। आकाशात् वायु:। वायो: अग्नि:। अग्ने: आप:। अद्भय: पृथिवी ॥

स्पंद म्हणजे Vibration. स्पंदामध्यें, स्थिति, गति, पुनःस्थिति व पुनर्गति अशा चार अवस्था अन्तर्भूत होतात. या दृष्टीनें स्पंद हें अनादि व अनन्त असें तत्त्व आहे.

मन्त्र-तन्त्र व यन्त्र या तीनही शास्त्रांत 'स्पंद' हें तत्त्व अतीव महत्वाचें व अधिष्ठानभूत आहे. प्रत्येक वस्तु ही विशिष्ट स्पंद संख्येचा आविष्कार आहे.

प्रो. व्हाईटहेड यांनीं आपल्या Process and Reality या ग्रंथांत अगदीं अशाच तऱ्हेची उपपत्ति विशद व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

Reality ही एक अनादि व अनंत अशा स्पंदांचा प्रवाह आहे. Reality हें एक जड, चिरस्थिर, Finished Product किंवा सिद्ध वस्तु नव्हे. Reality ही नवनवोन्मेष प्रकट करणारी एक 'स्पंद-सरिता' आहे.

सर्व विश्व स्पंदमय Vibrational असल्यामुळें सर्व वस्तुजात, प्रत्येक स्थल–कालनिष्ठ व्यक्ति व वस्तु हा एक स्पंद-समूह आहे.

प्रत्येक वस्तूला व व्यक्तीला एक विशिष्ट स्पंद संख्या आहे; आणि एक विशेष स्पंद-गुण आहे.

व्यक्तिमात्राच्या हातून होणाऱ्या कर्मांचें स्वरूप या स्पंद-संख्येवर व स्पंद-गुणावर अवलंबून असतें.

कर्मबीजं मनस्पंद: । —योगवासिष्ठ

योग-वासिष्ठांत वसिष्ठानीही स्पंदशास्त्राबद्दल अनेक निर्देश केले आहेत. चामना स्पंद हें कर्मांचें बीज आहे, असें वसिष्ट सांगतात. येथें मनस्तत्त्वाचा निर्देश असला तरी केवळ 'मन' एवढाच अर्थ, अभिप्रेत नाहीं. एकंदर अंतःकरण-चतुष्टय हें, मन या शब्दानें तेथें निर्दिष्ट आहे. वात्स्यायन हा महान् नैय्यायिक 'जीवन' या शब्दावर असें व्याख्यान करतो :

देहिनश्च आत्मनो मनसा संयोग: विपच्यमान कर्माशय सहित: ।

विपच्यमान अशा कर्माशयासहित देहधारणा केलेल्या आत्मतत्त्वाचा मनाशीं संयोग होणें व होत रहाणें हें 'जीवन' शब्दाच्या अर्थाचें स्वरूप आहे. वात्स्यायनानें केलेली ही जीवन तत्त्वाची व्याख्या स्वयंपूर्ण व सर्वस्वीं तर्कशुद्ध आहे.

कर्माशय हा केवळ एका जन्मानें सिद्ध होत नाहीं. अनेकानेक, अनंतानंत पूर्वजन्मींच्या कर्म स्पंदांचा व स्पंद कर्मांचा परिपाक म्हणजे कर्माशय होय. आत्मा तत्त्वानें देहधारणा केल्यावर तेथील अंतःकरणाशीं, किंवा मनस्तत्वाशीं हा कर्माशय, संयुक्त होतो; व हा संयोग झाल्यावर जीवनाची सिद्धि होते.

अनेकानेक पूर्वजन्मातून कर्माशयाबरोबर आलेलें स्पंद-वैशिष्टय हें व्यक्तिमात्राच्या ठिकाणीं सदैव सिद्ध असतें. हे स्पंद-वैशिष्टय करंगळीजवळील बोटाच्या अनामिकेच्या खालीं असलेल्या सूर्य-शैलावर, सदैव ध्वनित होत असतें. तें स्पंद ओळखण्याची एक पद्धति आहे, एक प्रक्रिया आहे. ती एक प्रकारची सिद्धि आहे असें म्हणतां येईल. विशिष्ट स्पंद संख्या, व विशिष्ट स्पंद-गुण यांचे सहाय्यानें अतीत जन्म, विद्यमान जन्म व अनागत जन्म या जन्मत्रयीबद्दलची वस्तु-स्थिति व परि-स्थिति अचूकपणें सांगतां येते. प्रत्येक व्यक्तीच्या अनामिके खालील सूर्य-शैलावर त्या व्यक्तीचे स्पंद-वलय निनादित होत असतें—तोच त्याचा बीज-मंत्र किंवा आत्ममंत्र होय.

## ३

हिमालयांत सर्वच भारतीय विद्यांचा आद्य-आविष्कार झाला आहे. पण ज्या विद्येच्या उदयामुळें व उत्कर्षामुळें भारतीय संस्कृतीला एक व्यावर्तक वैलक्षण्य, एक आगळें महत्त्व प्राप्त झालें आहे ती अध्यात्मविद्या हिमालयांतच **प्रथम** अवतीर्ण झाली.

अध्यात्म हें केवळ भारताचाच सर्वाधिकार असलेलें शास्त्र नव्हे. जगांतल्या प्रत्येक प्रदेशांत व प्रत्येक मानवसमूहाला अध्यात्म-विद्या उपलब्ध झालेली आहे.

अनेकानेक ऐतिहासिक व निश्चयात्मक प्रमाणांवरून, हिमालयांत उद्‌भवलेल्या बहुतेक भारतीय विद्या, इतर पूर्व-पश्चिमेकडील देशांत नंतर प्रसृत झाल्या हें एक विवादातीत सत्य आहे.

ऐतिहासिकदृष्टया केवळ अगोदर अथवा भारतांत किंवा हिमालयांत या विद्यांचा उद्‌भव झाला म्हणून आपणांस आंधळा अभिनिवेश किंवा वेडा अहंकार वाटणें हें केवळ अज्ञतेचें द्योतक ठरेल.

अनेक परकीय राष्ट्रांनीं प्रथम भारतांत जन्मलेल्या कांहीं वैज्ञानिक विद्यांचा आश्चर्यकारक विकास करून दाखविला असून, ( उदा. वैद्यक, रसायन, पदार्थ-विज्ञान, ख-ज्योतिष इत्यादि ) भारतवर्ष हा आजतरी, त्या देशांच्या पुष्कळच मागें आहे, असें म्हणावें लागेल.

अध्यात्म-विद्येंत मात्र भारताच्या पुढें गेलेला अन्य देश किंवा लोक-समूह या जगतीतलावर आढळणें आज देखील शक्य वाटत नाहीं.

अध्यात्म म्हणजे अन्तर्मुखता, आत्म-सन्मुखता, तसेंच अतीन्द्रिय कक्षा, नियम व अनुभूति यांचेबद्दल आदरयुक्त जिज्ञासा ही अध्यात्म विद्येचीं लक्षणें आहेत. भारतीय जनतेंत आज देखील या आध्यात्मिक धारणा सर्वोत्कृष्ट प्रमाणांत आहेत.

अध्यात्म-विद्या म्हणजे नीतिशास्त्र असें समीकरण करणें तर्कशुद्ध होणार नाहीं. आजचा भारत व भारतीय लोक नैतिक दृष्टया इतर राष्ट्रांच्या साधारणपणें बरोबरीचे

आहेत असें म्हणणें वस्तुस्थितीला धरून होणार नाहीं. विशुद्ध नैतिकदृष्ट्या विचार केल्यास आजचा भारत, कांहीं राष्ट्रांच्या मागेच आहे, असें म्हणणें प्राप्त आहे. पण अध्यात्मांत तो अग्रेसरच आहे. आज देखील भारतांतला बहुजनसमाज अध्यात्मनिष्ठ अध्यात्म सन्मुख आहे. मी स्वतः अनेक राष्ट्रांतलें नेते, विचारवन्त व बहुजनसमाज अवलोकिले आहेत. दीर्घकालीन परकीय सत्ता, तज्जन्य दारिद्य, दारिद्यजन्य लाचारी या कारण-कार्य शृंखलेमुळें, भारतीय जनतेंत एक प्रकारची नैतिक शिथिलता आली आहे. सामाजिक नीति, राजकीय नीति आज अधःपतित झालेली असली, तरी भारतीय जनतेची अध्यात्मनिष्ठा अढळ आहे. अध्यात्म-निष्ठा स्थिर असेल तर सामाजिक नीति सहज सुधारूं शकते.

हिमालय हें भारतीय व जागतिक अध्यात्माचें धवलतम प्रतीक आहे, भारतानें व अखिल मानवतेनें हिमालयाकडे वळल्याशिवाय, अध्यात्मनिष्ठ झाल्याशिवाय मानवी संस्कृतीला व जीवनालाही दुसरा मार्ग उरला नाहीं.

'न अन्यः पन्थाः विद्यते अयनाय ।

नीतिशास्त्र हें मानवा-मानवामधील संबंध निश्चित करतें. अध्यात्मशास्त्र हें मानव व परमेश्वर यामधील संबंध स्पष्टवितें. हा संबंध तादात्म्य-संबंध आहे असें हिमालयाचे अर्थात् अध्यात्मशास्त्राचें मूल तत्व आहे. हिमालय-विद्या म्हणजेच अध्यात्म विद्या हें समीकरण सर्वथैव समुचित आहे.

अध्यात्म-शास्त्र हें धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, समाजशास्त्र यांहून अगदीं निराळें आहे. इतर सर्व शास्त्रांचा अध्यात्मांशीं अल्पाधिक संबंध आहेच आहे. पण त्या शास्त्रांच्या Postulates वर, म्हणजे मूल-गृहीत कृत्यांवर व अन्तिम निष्कर्षावर अध्यात्म विद्या यत्किंचित देखील अवलंबून नाहीं.

अध्यात्म हें एक स्वयंपूर्ण शास्त्र आहे. 'आत्मानं अधिकृत्य यत् शास्त्रं प्रवर्तते, तत् अध्यात्मम् । आत्मतत्त्वाला अधिकरण म्हणजे मुख्य विषय समजून जें विश्व-शास्त्राचा व शास्त्र-विश्वाचा परामर्श घेतें ते अध्यात्म-शास्त्र.

मानव-मात्राचें ऐश्वर्य, म्हणजे ईश्वरभाव हा अध्यात्माचा आद्य सिद्धान्त होय.

आधुनिक पाश्चात्य विचारवन्त ज्याला Philosophy म्हणतात, त्याला अध्यात्मशास्त्र समजणें हें कांहीं मर्यादेत पण, योग्य ठरेल. तत्त्वज्ञान किंवा तत्त्वशास्त्र हे दोन्हीं मराठी शब्द Philosophy चें मर्म व्यक्तवीत नाहींत. Philosophy म्हणजे ज्ञानाबद्दल प्रेम. Philos = Love, Sophia = wisdom. Philosophy या शब्दाचा तत्त्वज्ञान, तत्त्वशास्त्र या दोन्हीं शब्दाशी केवळ दूरान्वित संबंध आहे. 'फिलॉसफी' शब्द अध्यात्म या शब्दाला अधिक जवळ आहे. पण अध्यात्माची व्याप्ति त्याहूनही विशाल आहे. आत्म-तत्त्व ज्ञानरुप आहे व प्रेमरूप आहे. वल्लभ संप्रदायांत प्रेम व ज्ञान हे दोन्हीं शब्द एकाच किंवा समान अर्थानें वापरलेले आहेत.

आद्य शंकराचार्यांनींही आत्मतत्त्वालाच ‘ परम प्रेमास्पदता ’ दिली आहे. आत्मन् या शब्दांत ज्ञान व प्रेम यांचा सहजसिद्ध सहभाव आहे. या मुद्याचें संपूर्ण विवेचन करण्याचा हा प्रसंग नव्हे पण फिलॉसॉफी व अध्यात्म हे शब्द समानार्थक मानणें पुष्कळ अंशी योग्य ठरेल.

आत्मविद्या ही आत्म-तत्त्वाचें स्वरूप प्रकटविणारी, आत्मा हाच परमात्मा हें मूल अद्वैत दर्शविणारी विद्या होय.

४

हिमालय हें सर्व तत्त्व-जिज्ञासूंचें व मुमुक्षूंचें ‘ शरण्य ’ आहे. वैदिक ऋषींची ‘ मन्त्र-दर्शनें ’ याच ‘ गौरीगुरूच्या ’, या हिमालयाच्या, गिरि-गव्हरांत झालीं. चार वेद, दशोपनिषदें, आरण्यकें, ब्राह्मणग्रंथ, मन्त्राविद्या, तन्त्रविद्या, व यन्त्रविद्या ही ‘ त्राण ’-त्रयी, सर्व धर्मपंथ, उपासना-भेद दर्शन ग्रंथ या सर्वांचा संबंध ‘ हिमवंत ’ शिखरांशीं उगमस्थान, अभ्यास-स्थान किंवा अनुभूति-स्थान म्हणून अवश्यमेव पोचतों.

मानवाच्या परमोच्च प्रगतीची विशाल-तम क्षितिजें, हिमवंताच्या शिखरावरूनच न्याहाळली गेलीं. कोट्यवधि योजनांचा बहिरवकाश Outer Space आजच्या मानवी विज्ञानानें उल्लंघून दाखविला आहे.

महामहिम मन्त्रद्रष्ट्या महर्षींनी आंतर अवकाश ( Inner Space ) पांच हजार वर्षांपूर्वीच संशोधून ठेवला आहे. आंतर-अवकाश अन्-अंत आहे. बाह्य अवकाशही विशाल, अति विशाल असला तरी त्याला अंत आहे. आईनस्टाईनचे शब्द वापरावयाचे तर ‘ Immense but not Infinite. ’ सकृत् दर्शनीं असीम, अनंत वाटणाऱ्या गोष्टी खरोखर स-सीम व स-अंत असतात.

अनंत-ता ही, स्थल-कालातील कक्षा Dimension आहे. वास्तविक अनंततेला ‘ कक्षा ’ म्हणणें हाही प्रमादच आहे. स्वतःपुरती स्वतंत्र जाति ( Sui Generis ) निर्माण करणाऱ्या कांहीं ‘ व्यक्ति ’ भारतीय व ग्रीक न्यायदर्शनांत मानल्या गेल्या आहेत. अनंत-ता ही कल्पना अशाच स्वरूपाची आहे. दोन अनंतता असूंच शकत नाहींत; दोन वस्तूही अनंत असूं शकत नाहींत. अनंत असणाऱ्या सर्व वस्तूही एकच होतात.

हिमालयांत स्फुरलेली पूर्णत्वाची कल्पनाः

पूर्णमदः, पूर्णमिदं, पूर्णात् पूर्णम् उदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

—अशी आहे.

पूर्णता हें अनंततेचें एक प्रतीक आहे.

येथें आइन्स्टाईननें सांगितलेल्या एका सिद्धांताचें स्मरण होत आहे : " True Perfection has to be Infinite and True Infinite alone can be a self-complete perfection. " या वाक्यांत विरोधाभास आहे हें खरें, पण तो विरोधाभास परिहार्य आहे.

पूर्णत्व हें स-अंत, सांत, असेल तर तें अपूर्णच होय. व अनंतत्वालाही अपूर्णता हा एक अंत ठरेल, अशी आइन्स्टाइन्‌ची भूमिका आहे.

सत्यम्, ज्ञानम्, अनंतम् ॥

अशी वेदांनी अंतिम सत्तेची लक्षणा केली आहे. ब्रह्मर्षि हिमालयानें केलेली ही लक्षणा सर्व थैव यथार्थ व स्वयंपूर्ण आहे. अस्ति-त्व, चैतन्य व असीमत्व ही लक्षणत्रयी स्वयंसिद्ध, स्वयंपूर्ण, व स्वयंप्रकाश अशा स्वसंवेद्य सत्तेलाच नियुक्त करतां येतें.

**धुं. गो. विनोद**

नगर वाचन मंदिर ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५६८० वि: १मी वांद्
क्रमांक १५५१ नों दि: ६-१-८५

वैदिक व्याख्यान माला वर्ष १९ वें

# हिमालय दर्शन

CHAIRMAN
**MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION**
BOMBAY-1

हिमालय भारतीय प्रदेशांत असूनही आपल्यापैकीं फारच थोड्या लोकांना त्या भागाविषयीं, तेथील लोकांविषयीं अथवा त्यांच्या समस्यासंबंधी असावी तितकी माहिती आहे. विशेषतः चीनच्या आक्रमणानंतर त्या प्रदेशाविषयीं प्रत्येकास माहिती असणें अत्यंत आवश्यक झालें आहे. मला आनंद वाटतो कीं, हिमालय दर्शनानें ह्या बाबतींत उल्लेखनीय कार्य केलें आहे. हें पुस्तक वाचकांच्या हातांत दिल्याबद्दल मी दे. ऋ. ब्रा. शिक्षणोत्तेजक संस्थेचें अभिनंदन करतो.

१९ डिसेंबर १९६३ | शं. पां. पा. थोरात

१

# व्याख्यानमालेच्या उद्‌घाटनाचें भाषण

**श्री. पाण्डुरंग जयराव चिन्मुळगुंद**

हिमालय-दर्शन हा विषय आजच्या परिस्थितींत मला विशेष महत्त्वाचा वाटतो. सांस्कृतिक दृष्टीनेंही त्याचें एक निराळेंच महत्त्व आहे. विसाव्या शतकांतही राजकीय व भौगोलिक दृष्ट्या हिमालयाचें महत्त्व सर्वमान्य आहे. त्याचें सौंदर्य, त्यांतील भव्यता, त्याच्या सभोंवतालच्या परिसरांत पूर्वापार चालत आलेल्या संस्कृती, तेथील धार्मिक स्थानें, तेथील भिन्न भिन्न भाषा यांचा तुलनात्मक अभ्यास होणें आवश्यक आहे.

हिमालय हा जगांतील सर्वांत उंच व मोठा पर्वत असूनही वयानें तो सर्वांत लहान आहे. निलगिरी व त्याचे दक्षिणेकडील डोंगर हे त्याच्याही पूर्वीच्या काळापासून उभे आहेत. शास्त्रज्ञ म्हणतात, "आज हिमालय सर्वांत उंच असूनही तो अगदीं तरुण आहे. व त्याची वाढ अद्याप खुंटली नाहीं." आसाममध्यें झालेल्या भूकंपाचे उगमस्थान हिमालयाच्या उदरांतच आहे, हे विसरून चालणार नाही.

अशा या हिमालयाचें प्रत्यक्ष दर्शन घेतल्याखेरीज त्यांतील खरें सौंदर्य व भव्यता यांचें खऱ्या अर्थानें आपणांस आकलन होणार नाहीं. तेथील प्रत्येक गोष्ट

अभ्यसनीय आहे. तिबेट आणि हिमालय यांच्यांतील संबंध घनिष्ठ आहेत. अलीकडील इतिहासांतून तिबेट व हिमालय यांचे संबंध स्पष्टपणें दाखविले जात नाहींत. या संबंधांत विश्वासार्ह अशी माहिती फारच कमी मिळते, ही अडचण आहे. वस्तुस्थिती अशी आहे कीं, हिमालय, तिबेट व त्याच्या दऱ्याखोऱ्या आपल्यापेक्षां ब्रिटिशांना अधिक परिचयाच्या आहेत. कारण आपण त्यांचा परिचय करून घेण्याचा प्रयत्न कधीं केलाच नाहीं.

पौराणिक काळांत मेरु पर्वतास अधिक महत्त्व दिलें जात होतें. वायव्येकडून आलेल्या लोकांनीं त्यास अधिक महत्त्व प्राप्त करून दिलें. तिबेटचा कांहीं भाग हाच मेरु पर्वत असून तो देवांचा पर्वत आहे असें त्यांचें म्हणणें होतें. त्यांचे म्हणण्या-प्रमाणें मेरु हा देवांचा पर्वत असेल तर हिमालय हा माणसांचा पर्वत आहे. म्हणू-नच मेरु हा काल्पनिक पर्वत मानला जातो. आपल्या दैनंदिन जीवनाशीं हिमालयाचा जितका घनिष्ठ संबंध आला व आजही येत आहे तेवढा मेरु पर्वताशीं केव्हांच आला नाहीं. कारण मुळांतच तो एक काल्पनिक पर्वत आहे.

वायव्य सरहद्दीकडून आलेल्या आर्य लोकांना जी माहिती उपलब्ध झाली ती फारच उशिरा झाली होती. आणि तेव्हांपासून हिमालयाचा अधिकाधिक भाग जसा परिचित होत गेला त्याप्रमाणें तेथील सविस्तर माहिती प्रकाशित होऊं लागली. क्रमा-क्रमानें प्रकाशांत येणारी ही संपूर्ण माहिती भारतीय जीवनाशीं पूर्णपणें परिचित होण्यास व एकरूपता प्राप्त होण्यास दोन ते अडीचहजार वर्षांचा अवधी लागला. म्हणूनच वाङ्मयांत ज्या ज्या ठिकाणीं आपणांस हिमालयाचें दर्शन घडतें त्या त्या ठिकाणीं त्याचेविषयीं तपशिलवार वर्णन मिळत नाहीं. उत्तरेकडील भाग वाहतुकीस व दळणवळणास जितका सोइस्कर आहे तितका ईशान्येकडील भाग नाहीं. त्यामुळें ईशान्य सरहद्द भागाचें भौगोलिक वर्णन सविस्तर आढळत नाहीं. असो.

आज तरुणांनीं हिमालय दर्शनाचें हें सर्वांगीण स्वरूप जाणून घेऊन चीननें भारतास दिलेल्या आव्हानास तोंड देण्यास सज्ज झालें पाहिजे.

२

# विषय-प्रवेश

**श्री. वेंकटेशशास्त्री जोशी**

'हिमालय-दर्शन' या शब्दाचा हिमालयाचें सर्वांगीण सम्यक् ज्ञान असा अर्थ येथें विवक्षित आहे. किंवा न्याय-दर्शन, मीमांसा-दर्शन इत्यादि शब्दांप्रमाणें हिमालयासंबंधीं सर्व साधक बाधक माहिती पुरविणारें व निरनिराळ्या शाखोपशाखांनीं विस्तार पावलेलें एक स्वतंत्र शास्त्र असाहि त्याचा अर्थ होऊं शकतो. तेवढी भव्यता व विशालता हिमालयामध्यें असून विविध विषयांचें संशोधन करण्यासाठीं लागणारी साहित्य-सामग्री पुरविण्याचें हिमालयाचें सामर्थ्य कल्पनातीत आहे हें आपण वेदकाळापासून पहात आलों आहोंत. भारताचें सर्वांगीण जीवन समृद्ध करण्यांत हिमालयाचा फार मोठा वाटा आहे. हवा, पाणी या बाबतींतहि आपण हिमालयावर अवलंबून आहोंत. वेदकालापासून भारतीयांची तपःसाधना हिमालयाच्या परिसरांतच सिद्धावस्थेस पोहोंचली. भारतीयांचें असाधारण जीवन-तत्त्वज्ञान हिमालयाच्या कुशींतूनच उद्बुद्ध झालें. आणि म्हणूनच वैदिक व्याख्यान मालेसारख्या प्रतिष्ठा आणि मान्यता पावलेल्या व अठरा वर्षांची चांगली परंपरा असलेल्या या व्याख्यानमालेंत हिमालयदर्शन हा विषय घेण्यांत सर्व-

तोपरि औचित्यच आहे असें आम्हांस वाटतें. आज केवळ परिस्थिति-विवश होऊन हा विषय स्वीकारलेला नसून तें एक काळाचें आव्हान आहे आणि शक्यतेनुसार आपापल्या मगदुराप्रमाणें तें आव्हान स्वीकारणें हें आपलें पवित्र राष्ट्रीय कर्तव्य आहे या भूमिकेंतून आम्ही या ठिकाणीं प्रस्तुत विषयाची निवड केलेली आहे.

वस्तुस्थिति अशीं आहे कीं, हिमालयासंबंधानें आपणांस फारच थोडी माहिती आहे. अलीकडच्या काळांत प्रथम ख्रिश्चन मिशनऱ्यांनीं आपणांस हिमालयासंबंधीं माहिती पुरविली. त्यानंतर मिलिटरींतील अधिकाऱ्यांनीं हिमालयाची विविध माहिती देणारे लेख लिहिले, अनेकविध नकाशांनीं व निरनिराळ्या प्रकारच्या चित्रांनीं त्या प्रदेशाची सम्यक् कल्पना देणारे मोठमोठे ग्रंथ निर्माण केलें आणि भारतासमोर व जगतासमोर एक उपेक्षिलेलें दालन उघडें केलें आणि एक विलक्षण उत्सुकता निर्माण केली. त्यानंतरच जगाच्या सर्व भागांतून हिमालयांत गिर्यारोहक गेले, संशोधक गेले, आणि ख्रिश्चन धर्मप्रसारकही अधिक वेगानें कामास लागले. याच काळांत अनेक संबंधित देशांतील राजकारणी लोकांनीं हिमालयांतील जमीन किती भुसभुशीत आहे हें पहाण्यासाठीं आपल्या राज्यांतील चाणक्याचें शिष्यहि त्या ठिकाणीं पाठविलेले आढळून येतात.

पण......भारतानें मात्र प्रत्यक्ष चीनचें आक्रमण होईतों आपला धीर गंभीर स्वभाव व प्राचीनकालापासून प्रसिद्धि पावलेलें आपलें औदर्य यांत यत्किञ्चित्‌ही न्यूनता भासूं दिली नाहीं. उलटपक्षीं आपल्या परंपरागत औदर्यांत कोठें उणें पडतां कामा नये यासाठीं भारत सतत दक्ष होता. आणि समाधानाची व आनंदाची गोष्ट कीं, भारतानें आपली औदार्याची परंपरा फार चांगल्या रीतीनें जतन केली, इतकेंच नव्हे तर ती पुष्कळ रीतीनें वृद्धिंगत केली ! प्रत्यक्ष राजा शिबि, महाराज धर्मराज, सम्राट् पृथ्वीराज यांनाहीं मागें टाकतील असे कांहीं नवे आंतरराष्ट्रीय संकेतहि निर्माण केले !

तीर्थयात्रा करणाऱ्या भोळ्या बापड्या यात्रिकांनीं व तपःसाधना करण्यासाठीं हिमालयांतच वास्तव्य केलेल्या अंधश्रद्ध साधकांनीं जी माहिती हिमालयासंबंधीं पुरविली आहे त्याहून अन्य अधिकृत स्वतः मिळविलेली विश्वसनीय माहिती भारताजवळ फारच थोडी होती. बिचारे आपले यात्रेकरू भोळे खरेच ! त्यांनीं माथेरान, पांचगणी, महाबळेश्वर, पन्हाळा या थंड हवेच्या ठिकाणीं आपल्या तीर्थयात्रा करून मनःशान्तीबरोबरच अनायासें शरीरस्वास्थ्यही कां संपादूं नये ! बिचारे आपले तपश्चर्या करणारे साधकही किती चमत्कारिक ! त्यांनीं आपले आश्रम कलकत्ता, मद्रास यांच्या आसंमतात उभारून आपली व आपल्या शान्तिकार्याची प्रसिद्धी जगभर मिळविण्याचे सोडून देऊन हा एकान्ती विजनवास कां पत्करावा ! नीरस, रूक्ष, खडतर व अज्ञात जीवन कां जगावे !

याचीं कारणें कांहीं असोत. एक गोष्ट खरी कीं आजपर्यंत हिमालयाच्या संबंधांत या यात्रेकरूंनीं व साधकांनीं जी माहिती उपलब्ध करून दिली आहे त्याबद्दल भारत त्यांचा अनंत काल ऋणी राहील. प्राचीन भारतांतील समाजशास्त्रज्ञांनीं व राष्ट्रधुरीणांनीं जवळपासच्याच आसमन्तातील टेकड्यांवर थंड हवेचीं ठिकाणें निर्माण न करतां समाजमानसांतील श्रद्धेचा आधार घेऊन त्यावर हरद्वार, हृषीकेश, केदारनाथ, मानस-सरोवर अशी पवित्र तीर्थ-क्षेत्रें निर्माण केली; त्यांच्या दर्शनाशिवाय ऐहिक जीवनाची परिपूर्ति नाहीं, परलोकीं सद्गति नाहीं व अन्तीं मुक्तिहि नाही असा धार्मिक सिद्धांत प्रस्थापित केला. आर्ष चक्षूनें अनन्त भविष्य काळ पहाणाऱ्या त्या ऋषीमुनींना, राष्ट्रधुरीणांना आणि श्रद्धाशील अन्तःकरणानें त्यांचा आदेश आचरणाऱ्या पांचहजार वर्षांतील असंख्य यात्रेकरूंना व तपस्विजनांना सहस्रशः प्रणाम !!

विषयांचें वर्गीकरण आणि त्यांची सुसंगत पद्धतीनें मांडणी हा आजच्या शास्त्रीय संशोधनाचा मूळ पाया आहे. ही संशोधन पद्धति भारताला फार प्राचीन काळापासून ज्ञात होती. महर्षि व्यासांनीं संकीर्ण स्वरुपांत असलेल्या वेदांचे चार भाग केले आणि आपल्या शिष्यांकरवीं भिन्न भिन्न शाखा व सूत्र-पद्धति निर्माण करून ही परंपरा अखंड राखण्याचें अत्यंत दूरदर्शि व तितकेंच प्रभावी नियोजन केलेलें दिसून येतें.

हिमालयासंबंधीं जे निरनिराळे विषय घेऊन येथें ज्ञानसत्र चालू ठेविलें जाणार आहे त्यांत सर्वच प्रमुख विषयांचा समावेश करण्याचा शक्य तो प्रयत्न केलेला आहे. ( १ ) अध्यात्म, धर्मस्थानें व तीर्थक्षेत्रें, ( २ ) संस्कृति व समाज रचना, ( ३ ) भाषा व साहित्य, ( ४ ) राजकारण व भूगोल, आणि ( ५ ) संरक्षण. या वर्गीकरणाखालीं येथील व्याख्यानें आपणांस ऐकावयास मिळतील. याशिवाय ( १ ) हिमालयांतील संभाव्य उद्योगधंगदे, व्यापार, ( २ ) हिमालयांतील आर्थिक व्यवस्था इत्यादि विषयांवरही व्याख्यानें होणें आवश्यक होते. परंतु पुष्कळ प्रयत्न करूनहि या संबंधांत अधिकारी व्यक्तींकडून आम्ही सहकार्य मिळवूं शकलों नाहीं याबद्दल खेद होतो.

या व्याख्यानमालेंतील निरनिराळ्या विषयांतील वक्ते केवळ महाराष्ट्रांतच नव्हे तर अखिल भारतांत मान्यता पावलेले आहेत. अधिकारवाणीनें त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीनें आपल्या हिमालयासंबंधींच्या ज्ञानांत महत्त्वाची भर पडेल आणि आजच्या आपल्या राष्ट्रापुढील निरनिराळ्या समस्यांची सम्यक् कल्पना प्राप्त होईल या विषयीं आम्हांस शंका वाटत नाहीं. आपल्यापुढील प्रश्नांचें योग्य तें स्वरूप समजावून घेऊन आपणहि आपल्या राष्ट्रीय कार्यास हातभार लावावा अशी इच्छा श्रोत्यांच्या व वाचकांच्या मनांत उत्पन्न व्हावी हा या व्याख्यानमालेचा मूळ उद्देश आहे. विचारप्रवर्तक व अगदीं अद्यावत् नवी माहिती महाप्रयासानें अनेक संदर्भ-ग्रंथांतून मिळवून ती आपल्यापुढें ठेविली गेली असल्यामुळें मूळ उद्देश सिद्धीस जाईल याविषयीं संदेह वाटत नाहीं.

उद्घाटनाचें भाषण करतांना श्री. चिन्मुळगुंद यांनीं ' हिमालय पर्वत सर्व पर्वतांत उंच असूनहि तरुण म्हणजे वयानें लहान आहे ' असें आधुनिक विज्ञानशास्त्राच्या आधारें प्रतिपादन केलें. आजच्या प्रगत विज्ञानयुगांत सुद्धां हें वर्णन ऐकतांना आपणांस साश्चर्य आनंद होतो. पण खरी आश्चर्याची गोष्ट ही कीं इसवी सनाच्या तिसऱ्या चौथ्या शतकांमध्यें महाकवि कालिदासानें हीच गोष्ट स्पष्टपणें प्रतिपादन केली आहे. कालिदास म्हणतो :

यं सर्वशैलाः परिकल्प्य वत्सम्
मेरौ स्थिते दोग्धरि दोहदक्षे ।
भास्वन्ति रत्नानि महौषधीश्च
पृथूपदिष्टां दुदुहुर्धरित्रीम् ॥ कुमार. १·३.

या श्लोकांतील वर्णनांत रूपकानें असें प्रतिपादन केलें आहे कीं :— ' मेरुपर्वत हा सर्व पर्वतांत वृद्ध असून हिमालय पर्वत हा सर्व पर्वतांत तरुण पर्वत आहे. '

त्या काळांत कविकुलगुरूला हें ज्ञान प्राप्त कसें झालें असावें हें सांगणें कठीण आहे. पण यावरून एक गोष्ट निश्चितपणें आपण लक्षांत घेतली पाहिजे कीं, — वेद, पुराणें, शास्त्रें, काव्य-महाकाव्य, स्मृति इत्यादि ग्रंथांतून निरनिराळ्या शास्त्रांतील जे सिद्धान्त मांडलें जातात त्यांकडे तुच्छतेनें, अनादरानें किंवा पूर्वग्रहदूषित बुद्धीनें पहाणें योग्य नाहीं. या ठिकाणीं होणाऱ्या व्याख्यानांकडे, त्यांत मांडल्या जाणाऱ्या आधारभूत वचनांकडे आणि त्यांवरून प्रस्थापित केल्या जाणाऱ्या सिद्धान्तांकडे आपण समतोल बुद्धीनें पहाल अशी आम्हांस खात्री आहे.

टीप : पुस्तक छापण्यास सुरवात केल्यानंतर श्री. मंत्रिणीप्रसाद यांचा हिमाचल प्रदेशांतील आर्थिक समस्यांवर लेख मिळाला.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८६८० वि: ...
क्रमांक १५५१ नों. दि. ...

३

# हिमालयांतील तीर्थ-क्षेत्रें

**म. म. पांडुरंगशास्त्री गोस्वामी**

अखिलाज्ञानविध्वंसि नित्यानंदप्रदायकम् ।
हिमालयस्थं तीर्थात्म परब्रह्म नमाम्यहम् ॥
क्षेत्रेषु तीर्थेषु वसन्ति देवास्तथैव तत्रैव वसन्ति साधवः ।
ज्ञानं सवैराग्यमनन्यभक्तिस्ततो भवेच्चेतसि शान्तिरिष्टा ॥

आमचा हिमालय हा अनंत तीर्थांचें उगमस्थान आहे. तसाच तो असंख्य क्षेत्रांचें अधिष्ठानहि आहे. अखिल विश्वाला आत्मशांतीचा संदेश देणाऱ्या वैदिक संस्कृतीचें उगमस्थान आहे. म्हणून वैदिक आर्यांची कर्मभूमी या शब्दानें ओळखल्या जाणाऱ्या भारताचा हिमालयाशीं अविभाज्य संबंध प्रस्थापित झाला आहे. " स्थावराणां हिमालयः " या वचनानें हिमालय हा प्रत्यक्ष भगवत्स्वरूप असल्याचें स्वतः श्रीकृष्णानेंच सांगितलें आहे. कविकुलगुरु कालिदासानेंहि " देवतात्मा " या शब्दानें हिमालयाचा गौरव केला असून त्याला नगाधिराज अशी बहुमानाची पण यथार्थ पदवी दिली आहे.

प्राचीन भूगोलामध्यें हिमालय हा भारताचा मर्यादापर्वत म्हणून वर्णिलेला

असून त्याची लांबी पूर्वसागरापासून पश्चिमसागरापर्यंत सांगितली आहे. त्याची रुंदी सुमारें दोनशें ते अडीचशें मैल आहे. संपूर्ण हिमालय हाच मुळांत तीर्थ-क्षेत्र स्वरूप आहे. "तरति पापादिकं अस्मादिति तीर्थम्" ज्याच्यामुळें मानवाला पापांपासून तरता येते, त्याला तीर्थ असें म्हणतात. त्याचप्रमाणें "क्षीयन्ते पापानि अत्र इति क्षेत्रम्" ज्या ठिकाणीं स्नानसंध्या, पूजाअर्चा, दानधर्म आणि वास्तव्य वगैरे गोष्टी केल्या असतां मानवाचीं पापें क्षीण होतात, त्याला क्षेत्र असें म्हणतात. या दृष्टीनें पाहिलें असतां हिमालयांतील प्रत्येक स्थान तीर्थ-क्षेत्र असल्याचें दिसून येईल. ब्रह्मदेवापासून सर्वांनीं म्हणजे प्राचीन ऋषि-मुनीपासून अर्वाचीन विरक्त तत्ववेत्त्यांपर्यंत सर्वांनीं हिमालयाचा आश्रय घेऊन स्वतःला कृतार्थ करून घेतलेले आहे, आजहि घेत आहेत. जगाला पावन करणाऱ्या गंगेबरोबरच ज्ञान-गंगेचाही मूळ उगम हिमालयांतून झालेला आहे.

वेळेच्या व प्रवासाच्या दृष्टीनें हिमालयांतील यात्रेचे चार विभाग करावे लागतात. एका भागांत पंजाबमधील कांहीं प्रमुख क्षेत्रें व काश्मीर प्रदेश मोडतो. कांगडा मंदिर, महामायामंदिर, वैजनाथ पपरोला, ज्वालामुखीदेवी, चिंतापूर्णीदेवी, मणिकर्ण सरोवर, श्री परशुराम यांनीं स्थापन केलेली नृमुण्ड अंबिकादेवी, इत्यादि पावन तीर्थें व क्षेत्रें यांचे दर्शन घेत घेत काश्मीरमधील सुप्रसिद्ध अमरनाथाची यात्रा करावी लागते. प्रत्यक्ष श्रीनगर हे दर्शनीय असून त्याच्याभोंवतीं कित्येक तीर्थक्षेत्रें आहेत. श्रीनगरला लागून असलेल्या एका प्रचंड पर्वताला "श्री शंकराचार्य पर्वत" हें नांव देण्यांत आलें आहे. येथें एक शिवमंदिरहि आहे. त्या मंदिरांतील मूर्ती आद्य शंकराचार्य यांनीं स्थापन केलेली आहे. त्या भव्य मूर्तीचें दर्शन घेतांच प्रचंड चढ चढून आल्याचें श्रम पार नाहींसे होतात. जम्मूहून श्रीनगरला जातांना वाटेंत एक वैष्णवी देवीचें स्थान लागतें. अश्विनी नवरात्रांत येथें मोठी जत्रा भरते. याच वेळीं या देवीचें दर्शन घेणें इष्ट ठरतें. कारण रस्ता निर्जन व जंगलांचा असल्यामुळें एरवीं यात्रा करणें अशक्य असते. क्षीरभवानी, अनंतनाग, आणि मार्तंडमंदिर इत्यादि स्थळांचें दर्शन घेऊन अमरनाथचे मार्गाला लागावें लागते.

प्रथम पहलगांव लागते. येथून अमरनाथ २७ मैल राहते. अमरनाथ हें ठिकाण सोळाहजार फूट उंच असल्यानें तें सतत बर्फाच्छादित असतें. हें स्वयंभू स्थान मानलें जातें. अमरनाथची लांब, रुंद व उंच असलेली भव्य गुंफा बर्फाच्या पर्वतांतील कोरीव लेण्याप्रमाणें मोठी सुंदर दिसते. गुहेंतील शिवलिंग व शाळुंका बर्फाचीच असून अत्यंत भव्य आहे. तिच्या दर्शनानें मनाला मोठें समाधान लाभते.

हिमालयांतील दुसरी प्रमुख यात्रा म्हणजे कैलास आणि मानस सरोवर ही होय. ही यात्रा अत्यंत अवघड मानली जाते. हा भाग हल्लीं परकीयांनीं पादाक्रांत केलेला असल्यामुळें हीं तीर्थक्षेत्रें आपल्या हातची गेल्यासारखींच झालीं आहेत.

कैलास व मानस सरोवरांत प्रत्यक्ष ब्रह्मदेवानेंच तपश्चर्या केली आहे. तर कैलास पर्वत हा योगयोगीश्वर जगद्गुरु भगवान शंकर याची वासभूमि असल्याचे पौराणिक दाखले सांपडतात.

हिमालयांतील तिसरी यात्रा म्हणजे श्री पशुपतिनाथ, मुक्तिनाथ, दामोदरकुंड आणि गण्डकीगंगा. येथेंच पुलहाश्रम होता. ऋषभ देवाचा पुत्र राजाभरत यानें येथेंच तपश्चर्या केली होती. हें ठिकाणही वर्फाच्छादित गिरिशिखरांनीं युक्त असून पंधरा-सोळा हजार फूट उंचीवर आहे.

हिमालयांतील चौथी यात्रा म्हणजे श्रीजम्नोत्री, श्रीगंगोत्री, श्रीकेदारनाथ आणि श्रीबद्रीनाथ. या यात्रेंत प्रथमच हरिद्वार हें अत्यंत रमणीय क्षेत्र लागतें. तें जसें रमणीय आहे तसेंच मोठें पावन तीर्थ आहे. येथूनच श्रीहरीच्या नरनारायण स्वरूप असलेल्या बद्रीनाथाचें दर्शनास जावें लागते. श्रीहरीचें—बद्रीनाथाचें—तें द्वार आहे म्हणूनच त्याला 'हरिद्वार' नांव पडलें. कांहीं लोक त्याला हरद्वार असेंही म्हणतात. हर म्हणजे केदारनाथ. श्रीकेदारनाथाच्या दर्शनालाहि याच द्वारानें जावें लागतें. याच द्वारांतून गंगा भारतांत प्रवेश करते. म्हणून पौराणिक वाङ्मयांत या क्षेत्राचा गंगाद्वार असाही उल्लेख केलेला आढळतो.

> " स्वर्गद्वारेण तत्तुल्यं गंगाद्वारं न संशयः ।
> तत्रैकरात्रिवासेन गोसहस्रफलं लभेत् ॥ "

हरिद्वार जणुं स्वर्गद्वारच आहे. भक्तियुक्त अंतःकरणानें संकल्पपूर्वक येथें एक रात्र मुक्काम केला तर एक हजार गायी दान केल्याचें पुण्य लाभतें. " अयोध्या मथुरा माया " या श्लोकांतील सात पुरींपैकीं मायापुरी म्हणजे हरिद्वार क्षेत्रच होय. प्रत्येक बारा वर्षांनीं सूर्य आणि चंद्र मेष राशीला आणि गुरु कुंभ राशीला आला असतां या ठिकाणीं कुंभमेळ्याची फार मोठी यात्रा भरते. यावेळीं गंगेच्या स्नानाकरितां चाळीस-पन्नास लाख लोकांचा समुदाय येतो. याच क्षेत्रांत सनकसनन्दादिकांपासून नारदऋषींनीं श्रीमद्भागवत सप्ताह श्रवण केला. येथेंच मैत्रेय महामुनींनीं विदुराला भागवत सांगितलें. हरिद्वारच्या वरच्या बाजूला सप्तस्रोत म्हणून प्रसिद्ध ठिकाण आहे. येथें कश्यपादि सप्तऋषींनीं तपश्चर्या केली. या ठिकाणीं देवी अहिल्याबाई होळकर यांचा वाडा व घाट आहे. प्रवाशांना उतरण्यासाठीं येथें धर्मशाळेंतून चांगली सोय करण्यांत आली आहे. या ठिकाणीं बरीच महाराष्ट्रीय मंडळी वास्तव्य करून राहिलेली दिसून येतात. येथील कुशावर्त घाट फार प्रसिद्ध आहे. श्रीदत्तात्रेय अवधूत यांनीं या ठिकाणीं तपश्चर्या केली आहे. या विषयींची दंतकथा अशी आहे कीं, एकदां दत्तात्रेयांचे दर्भ गंगेच्या प्रवाहांत सांपडले. त्यामुळें दत्तात्रेय रागावले. गंगा घाबरली. तिनें भोंवरा निर्माण केला. दत्तात्रेयांचे दर्भ भोंवऱ्यांत सांपडल्यामुळें ते वाहून न जातां

तेथेंच राहिलें. कुश म्हणजे दर्भ. आवर्त म्हणजे भोंवरा. याच दंतकथेवरून या ठिकाणास कुशावर्त हें नांव पडले असावें. येथील स्नानाचा व पिंडदानाचा महिमा फार मोठा आहे.

" गंगाद्वारे, कुशावर्ते बिल्वके नीलपर्वते ।
स्नात्वा कनखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते ॥ "

हीं सर्व तीर्थें हरिद्वार क्षेत्रांतच आढळतात. गंगेच्या दक्षिणोत्तर बसलेलें हरिद्वार शहर मोठें टुमदार दिसतें. येथील " हरिकी पैडी " या ठिकाणीं संध्याकाळचें वेळीं मन तास दोन तास सहज रमून जातें. ' पैडी ' म्हणजे पायरी. येथील दशाश्वमेध घाट बराच मोठा असून तो संध्याकाळचे वेळी माणसांनीं अगदीं गजबजलेला असतो. कानडी, बंगाली, मद्रासी, गुजराथी, पंजाबी, सिंधी, महाराष्ट्रीय तसेंच उत्तर हिंदुस्थानी असें अनेक प्रांतांतील लोक येथें पहावयास सांपडतात. येथें गंगेच्या प्रवाहांत एक कुंड असून त्याला ब्रह्मकुंड असें नांव आहे. या ब्रह्मकुंडालाच कोटीतीर्थ असेंही म्हणतात. राजा विक्रमादित्याचे बंधु श्रीभर्तृहरी यांनीं येथेंच तपश्चर्या केली व आपल्या जन्माचें सार्थक करून घेतलें. त्याचें स्मारक म्हणून विक्रमादित्यानें येथें घाट बांधला. पायऱ्या बांधल्या म्हणून या घाटाला " हरीकी पैडी " हें नांव पडलें असें म्हणतात. गंगेचा प्रवाह घाटाला लागूनच वाहतो. घाटावर एक श्रीहरीचें मंदिर आहे. त्याचें शेजारीं अनेक देवांचीं लहानमोठीं मंदिरें आहेत. सर्व देवतांची रोज सूर्यास्ताचे वेळीं प्रदोषपूजा होते. घाटावर दिव्यांचा लखलखाट असतो. त्या सर्व दिव्यांची प्रतिबिंबें गंगेच्या पाण्यांत पडतात. असंख्य माता, भगिनी गंगेची पूजा करतात. हळदीकुंकू, अक्षता व फुलें वाहून गंगेमध्यें दीप सोडण्याची येथें प्रथा आहे. असंख्य भाविकांकडून सोडले गेलेले, कागदाप्रमाणें पातळ आणि हलक्या पणत्यांतून सोडलेले, हे दीप सांजवात केल्याप्रमाणें दिसतात. हे दिवे, गंगेच्या प्रवाहांतील त्यांची प्रतिबिंबें आणि श्रीहरीच्या आरतीकरितां हातभर उंच, दीपमाळेप्रमाणें लावलेली पंचारती हे सर्व पाहून मनाला अवर्णनीय आनंद होतो. आरतीच्या वेळीं होणारे लहान मोठ्या घंटांचे नाद, शंखाचा ब्रह्मनाद, व भक्तजनांनीं केलेला जयजयकार यांनीं सर्व परिसर दुमदुमून जातो! हें सर्व दृश्य पाहून आपणही आनंदानें तन्मय होऊन जातो. मनाला धन्यता वाटतें, आनंदाश्रूंनीं डोळे भरून येतात. कंठ सद्गदित होतो. या मंगल वातावरणांत नास्तिकही आस्तिक बनतात.

हरिद्वारला गुरुकुल व ऋषिकुल या दोन शिक्षणसंस्था पाहण्यासारख्या आहेत. विश्वविद्यालयासारखा यांच्या कार्याचा व्याप असून त्यांनीं ज्ञानदानाचें कार्य उत्तम तऱ्हेनें चालविलें आहे. हरिद्वारला बाहेर उन्हाळा चांगलाच जाणवतो तर गंगेचा प्रवाह बर्फासारखा थंडगार असतो. पिंढऱ्याइतक्या पाण्यांत दोन मिनिटें सुद्धां उभे

राहण्याची शक्यता नसते. पायाला लगलीच मुंग्या येऊन पाय गारठून जातात. प्रवाह इतक्या वेगानें वहात असतो कीं, घाटावर बसविलेल्या साखळदंडांचा आधार घेतल्याशिवाय गुडघ्या एवढया पाण्यांतही उभे राहतां येत नाहीं. गंगेचें पाणी मात्र इतकें स्वच्छ असतें कीं, जणूं कांहीं तळाचें वाळूचे कणही मोजावेत ! हिमालयांतील हिमजलाचाच हिमप्रवाह तो !

हरिद्वार क्षेत्र म्हणजे हिमालयाच्या पायथ्याचा आरंभच. शहराला लागूनच एका बाजूला मनसा देवीचा डोंगर; तर दुसऱ्या बाजूला गंगेच्या विशाल पात्राच्या पलिकडे नीलपर्वत दिसतो. तेथें नीलेश्वर अथवा नीलकंठ महादेवाचें मंदिर आहे. याच पर्वतावर कालीदेवीचें व चंडीदेवीचें मंदिर आहे. हें जागृत स्थान आहे. रोज रात्रीं चंडीदेवीच्या दर्शनास सिंह येतो, असें म्हणतात. रात्रीं येथें मनुष्यवस्ती नसते. हरिद्वार, ज्वालापूर व कनखल हीं क्षेत्रें आतां जवळजवळ एकमेकांना लागून असल्या-सारखींच झालीं आहेत. कनखल क्षेत्राचा महिमा फार मोठा आहे. येथें दक्ष प्रजापतीनें यज्ञ केला होता. तें ठिकाण, कुंड वगैरे अद्यापहि पहावयास सांपडतात. असें सांगतात कीं, दक्ष प्रजापतीनें यज्ञाचे वेळीं सर्व देवतांना बोलावले. परंतु शंकराला मात्र आमंत्रण दिलें नाहीं. त्यामुळें शंकराची पत्नी व दक्ष प्रजापतीची कन्या ' सती ' ही आपल्या पित्यावर रुष्ट झाली. व हा आपल्या पतीचा अपमान आहे असें समजून तिनें आपला देह योगाग्नीनें दग्ध करून टाकला. या यज्ञकुंडाजवळ महादेवाचें मंदिर असून त्याला दक्षेश्वर असें म्हणतात. येथून वहात असलेल्या गंगेच्या प्रवाहाला नीलधार असें नांव आहे. हाच गंगेचा स्वाभाविक प्रवाह आहे. कनखलची यात्रा करून परत हरिद्वारला यावें लागते.

हरिद्वारहून आपण हृषिकेशला निघालें असतां जवळच भीमगोडा नांवाचें प्रसिद्ध स्थान लागते. हरिद्वारला लागून असलेल्या पर्वताच्या पायथ्यापासूनच हृषिकेशला रस्ता गेलेला आहे. या पर्वताच्या कुशींत एक छोटें मंदिर आहे. त्याच्या जवळ असलेल्या ओढ्यावर एक कुंड असून, पर्वतांतून येणारें पाणी त्यांत पडतें. असें सांगतात कीं, भीमानें या ठिकाणीं आपला गुडघा टेकून तप केलें म्हणून या स्थानाला ' भीमगोडा ' असें नांव पडलें. भीमगोड्यापासून एक मैल अंतरावर परमेश्वराच्या चोवीस अवतारांच्या मूर्तीचें मंदिर दिसतें. सुमारें एक मैल चालून गेल्यावर सप्तस्रोत नांवाचें तीर्थस्थान दृष्टीस पडते. येथें गंगामैयानें आपला प्रवाह सातधारांत विभागून घेतला आहे. असें सांगतात कीं, येथें सप्तर्षि वास्तव्य करीत. त्यांच्याच सोयीसाठीं गंगा सात प्रवाहानें वाहूं लागली. उजव्या हातास गंगेचा प्रवाह व डाव्या हातास हिरवेंगार जंगल आहे. या जंगलांत सत्यनारायणाचें मंदिर आहे. साताराच्या पंचपाळें हौदाप्रमाणें मंदिराच्या सर्व बाजूंनीं पाण्याचीं कुंडे असून मंदिरांतील नारायणाची मूर्ती अत्यंत सुंदर आहे. सुमारें पांच मैल चालून आल्यावर

आपल्याला श्री वीरभद्रेश्वराचें दर्शन घेतां येते. येथून पुढें गेलें कीं आपण हृषिकेशला पोहोंचतो.

हृषिकेश हे क्षेत्र गंगेच्या उजव्या काठांवर वसलेलें असून आकारानें छोटें पण महान् पवित्र आहे. हृषिकेश हें महाविष्णूचेंच नांव होय. हृषिक म्हणजे इंद्रियें. त्यांचा ईश म्हणजे अधिष्ठाता, प्रेरक, परिपूर्ण, परमात्मा, परब्रह्म, अथवा 'ऋषिकेश' असाहि शब्दप्रयोग आहे. एके काळीं असंख्य ऋषि येथें तपश्चर्या करीत होते. त्यांना जेव्हां राक्षसांचा त्रास होऊं लागला तेव्हां करुणाघन श्रीहरी त्यांच्या कष्टांनीं द्रवले. व त्यांनीं या राक्षसांचा नायनाट करून हें स्थान ऋषिजनांना तपश्चर्या करण्याकरितां निर्वेध करून दिलें. तेव्हांपासून या क्षेत्राला 'ऋषिकेश' नांव पडलें अशी दंतकथा आहे. येथील त्रिवेणी घाट प्रसिद्ध आहे. येथेंच बहुतेक यात्रेकरू स्नान करतात. येथील मुख्य मंदिर म्हणजे भरताचें होय. भरत हे प्रभुरामचंद्राचे बंधु व अनन्य भक्त. भरताचें स्वतंत्र दुसरें मंदिर भारतांत दुसरें कोठें दिसत नाहीं. त्याजबरोबर रामाचें मंदिर, वराहाचे मंदिर, चंद्रेश्वराचें मंदिर, मारुतीचें मंदिर, अशीं इतरहि मंदिरें या ठिकाणीं आहेत.

या ठिकाणीं काळी कमळीवाले बाबा यांची प्रख्यात धर्मशाळा आहे. प्रवाशांचे तें एकमेव आश्रयस्थान आहे. बाबा हे एक महान् अधिकारी व परोपकारी संत होऊन गेले. कंबरेला लंगोटी व खांद्यावर काळी घोंगडी हाच त्यांचा वेष. घोंगडीला हिंदी भाषेंत कंबल किंवा कंबळी असें म्हणतात यावरूनच बाबांना काळी कंबळीवाले बाबा म्हणण्याचा प्रघात पडला. यांचा हिमालयांत अव्याहत संचार असे. यात्रेचें कष्ट लक्षांत घेऊन त्यांनीं ठिकठिकाणीं हिमालयांत धर्मशाळा बांधून यात्रेकरूंची फार मोठी सोय केलेली आहे. जम्नोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ या यात्रेंतील प्रत्येक मुक्कामावर कमळीवाले बाबांची धर्मशाळा लागते. प्रत्येक धर्मशाळेंत व्यवस्थापक व कामाठी असतोच. त्याचप्रमाणें यात्रेकरूंना लागणारें अंथरूण पांघरुण, भांडीकुंडीं, शिधा याची पण व्यवस्था असते.

लक्ष्मणजी आपल्या ज्येष्ठबंधूंना – प्रभुरामचंद्रांना – कधीं सोडून राहिलेंच नाहींत. आपल्या बंधूंची सेवा हीच त्यांची तपश्चर्या. श्रीरामासह लक्ष्मणानें या भागांत कांहीं वास्तव्य केलें होतें असें मानावयास हरकत नाहीं. त्यांच्याच नावानें या ठिकाणीं गंगेवर असलेल्या पुलास "लक्ष्मण झूला" असें नांव पडलें असावें. एके काळीं हा पूल फारच हालताझुलता होता, म्हणून त्यास झूल हें नांव सार्थ ठरतें. आजहि तो पूल लोखंडी साखळदंडानें बांधलेला असल्यानें थोडासा हलतो. पुलाची लांबी तीनशें फूट आहे. दोन्ही बाजूंनीं साखळ दंडाला गुंतवून खालीं गज सोडलेले आहेत व त्या गजांच्या आधारें फळ्या बसवून हा पूल तयार केला आहे. याला खालच्या बाजूनें कमानीचा आधार नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. पूर्वी जाड दोराला शिंकें

बांधून त्याचे आधारानें पैलतीराला जाण्याची प्रथा होती. याप्रमाणें गंगा पार करणें हें एक त्या काळीं मोठें दिव्य मानलें जाई. हा पूल तयार झाल्यामुळें गंगा पार करणें फारच सोपें झालें आहे. असें समजतें कीं, ह्या पुलाला दहा लाख रुपये खर्च आला व तो कलकत्त्याच्या एका व्यापाऱ्यानें एकट्यानें केला. गंगेच्या पलीकडे स्वर्गाश्रम आहे. त्या रम्य आश्रमांतील शांत, निवांत आणि पवित्र वातावरण पाहून आपणही येथेंच रहावें व तपश्चर्या करावी अशी इच्छा उत्पन्न होते. येथून जवळच, कल्याण मासिकाचे संपादन करणाऱ्या गीताप्रेस, गोरखपुर या संस्थेची 'गीताभवन' नांवाची भव्य इमारत आहे. पारमार्थिक दृष्ट्या येथील वातावरण अवर्णनीय आहे. साधुसंत, महात्मे, विरक्त व ज्ञानी लोक आणि भक्त अशा लोकांचा मेळावा आपणांस येथें पहावयास मिळतो. येथील भिंती आपणांस गीतेचें दर्शन घडवितात. साधुसंतांची अगणित पण निवडक वचनें संगमरवरी दगडावर खोदलेलीं पहावयास सांपडतात.

"पायीं तीर्थयात्रा घडो, देह संतांपायीं पडो"

हिमालयांत प्रवास करतांना या संतवचनाची आठवण होते. पायी तीर्थयात्रा करणें हें पुण्यकारक तर आहेच, पण हिमालयांतील आवारांत तीर्थक्षेत्रांच्या दर्शनाचा व अप्रतिम सृष्टिसौंदर्याचा अवर्णनीय आनंद पायीं प्रवास केल्यानेंच अधिक लाभतो. ज्यांना पायीं चालणें अशक्य असेल त्यांच्यासाठीं कंडी किंवा दंडी या वाहनाची व्यवस्था केलेली असते. ही दोन्ही वाहनें माणसांनाच वहावीं लागतात. कंडीमध्यें एकच माणूस बसूं शकतो तर दंडीमध्यें एकदम चार माणसांची बसण्याची व्यवस्था केलेली असते. कंडी हें वाहन वेताच्या खुर्चीसारखें असते. वाहून नेणाऱ्या माणसाचे तोंड ज्या दिशेला असेल त्याच्या विरुद्ध दिशेला तोंड करून बसणाऱ्या माणसाला बसावें लागते. दंडी हे वाहन लहानशा नांवेच्या आकाराचें असून त्याची दोन्ही बाजूंचीं टोकें निमुळतीं असतात. पुढें व मागें आडवे दांडे बसवून वाहणारे लोक ते दांडे आपल्या खांद्यावर घेतात. दंडी, कंडी आणि आपल्या बरोबरचे सामान वाहणारे ओझेवाले [या सर्वांची नोंद हृषिकेश व लक्ष्मणझूला येथील 'मुनीकी रेती' या ठिकाणीं केली जाते.

**टिहरी** ही पूर्वीच्या गढवाल संस्थानची जुनी राजधानी. नव्या राजानें ही राजधानी वसविली असून ती मोठी टुमदार आहे. फकोट, नागणी, चमुआ ही छोटीं छोटीं गांवें वाटेंत लागतात. नंतर टिहरी हें गांव लागतें. हें गांव गंगेच्या कांठीं वसलेलें असून सुंदर स्थान आहे. या ठिकाणीं गंगेला भिलंगना [ भृग्वंगना-भृगुगंगा ] ही नदी मिळते. गंगा व भिलंगना यांचा संगम येथें असल्यानें या ठिकाणाला गणेश प्रयाग असें म्हणतात. पुढें विष्णुप्रयाग, नंदप्रयाग, कर्णप्रयाग, देवप्रयाग इत्यादि क्षेत्रें लागतात. तीं सर्व संगमस्थानेंच आहेत. गंगा आणि यमुना यांचा संगम सर्व-

श्रेष्ठ समजला जातो, म्हणून त्या क्षेत्राला प्रयागराज असें नांव पडलें आहे. टिहरी या ठिकाणीं बद्रीनाथ व केदारनाथ यांची सुंदर मंदिरें आहेत. दोन्ही मंदिरांचें अंगण एकच असून तें प्रशस्त आहे. मंदिराच्या पाठीमागें गंगेंत उतरण्यासाठीं दगडी भक्कम पायऱ्या आहेत. त्या पायऱ्या चढतां चढतां मांड्या भरून येतात इतका गंगेचा प्रवाह खोल आहे. प्रवाहाला वेगही तितकाच जोराचा असतो. येथील दृश्य अत्यंत नयनरम्य आहे.

पायीं प्रवासाचें खरें कष्ट येथून पुढेंच जाणवूं लागतात. तथापि ' सुखं हि दुःखान्यनुभूय शोभते " या उक्तिप्रमाणें हिमालयाच्या अंतरीच्या वैभवाचे खरेखुरें दर्शन जसजसें आपल्याला होत जातें, आणि परमपवित्र तीर्थ-क्षेत्रांचें व देवतांचें दर्शन घडत जातें तसतसें, आपल्याला लाभणारा आनंद व समाधान यापुढें, आपल्याला पडणारे कष्ट आपण विसरून जातो. शिवाय हिमालयाचें वैभव असें कांहीं अलौकिक आहे कीं, चालून चालून आपण कितीही थकलेले असलों तरी पांच दहा मिनिटें एखाद्या ठिकाणीं निश्चिंत बसून सभोंवार दृष्टी टाकली कीं आपण पुन्हां ताजेतवाने बनतों. गंगोत्री व जम्नोत्री या बाजूचा प्रवास थोडा विकट असला तरी तेथील सृष्टीसौंदर्य अन्यत्र क्वचितच दिसेल.

जम्नोत्री म्हणजे यमुनेचें उगमस्थान. जम्नोत्री, गंगोत्री, केदारनाथ व बद्रीनाथ ही यात्रेंतील ध्येयभूत क्षेत्रें असून तीं सर्व ठिकाणीं समुद्रसपाटीपासून अंदाजें दहा ते बारा हजार फूट उंचीवर आहेत. आपण सात-आठ हजार फूट उंचीवर पोहोंचलों म्हणजे बर्फाचीं उत्तुंग शिखरें दृग्गोचर होऊं लागतात. एरव्हीं चार दोन आणे खिशांतून बाहेर काढल्याशिवाय बर्फाचा खडा दृष्टीस पडावयाचा नाही. पण नैसर्गिक बर्फानें झांकलेली, पांढरीशुभ्र, चांदीप्रमाणें चकाकणारी, गगनाला जाऊन भिडणारी हिमालयाचीं शिखरें पाहिलीं म्हणजे मनाला जो आनंद होतो तो लेखणीनें लिहितां येत नाहीं, वाणीनें वर्णन करतां येत नाहीं. वाटेंत जें यात्रेकरू भेटतात त्यांच्या मुखांतून " जय जम्नोत्री की जय ! " हाच जल्लोष निघत असतो. भेटणाऱ्या इसमास ते याच महामंत्रानें नमस्कार करतात व आपल्या मार्गाला लागतात. कोणत्याहि वैभवाची निर्मिति निर्माण कर्त्याशिवाय होऊंच शकत नाहीं. मानव-निर्मित वैभवाचा अहंभाव, अहंकार मानवानें मिरवावा हवा तर ! पण ज्या वैभवाचें कर्तृत्व मानवाकडे येऊंच शकत नाहीं त्या वैभवाचा कर्ता-करविता कोण ? असा प्रश्न सहजच मनांत उद्भवतो. जहाजावरील कबुतरांनीं आकाशांत दूरवर कितीही भराऱ्या मारल्या तरी शेवटीं त्यांना जहाजाच्याच आश्रयाला यावें लागतें. त्याच प्रमाणें मानवी मन कितीही इकडे तिकडे भटकलें, बागडलें तरी अखेर शेवटीं त्याला परमेश्वराचाच आश्रय घ्यावा लागतो. व तेथेंच त्याला हवी असलेली खरी विश्रांती, खरें समाधान व खऱ्या आनंदाची अनुभूति मिळते.

टिहरीपासून घरासूपर्यंत २५-२६ मैलांचा प्रवास करतांना आपल्याला पिपल्चट्टी, भल्डियाना, धाम आणि नगुपान अशी गांवें लागतात. हीं गांवें अगदीं लहान लहान आहेत. घरासूपर्यंत आपण गंगेच्या कांठानेंच पुढेंपुढें जात असतो. घरासूपासून पुढें गंगेचा कांठ सुटतो व यमुनेचा कांठ लागतो. घरासू ते जन्मोत्री हें ४५ मैलांचें अंतर आहे. **कल्याणी, बाटमलवाला, सिलक्याटी, राडीगंगाणी, यमुनाचट्टी, हनुमानचट्टी** या मार्गानें प्रवास करीत करीत खरसालीला येऊन पोहोंचतो. वाटेंत चीड वृक्षांची घनदाट जंगलें लागतात. या वृक्षाचे वरचे शेंडे पहावयाचे झाल्यास आपल्याला माथ्यावरील आकाशाकडे पहावे लागते. इतकीं हीं झाडें उंच असतात. आडव्या फांद्या फारशा नसतात. छोट्या छोट्या फांद्या, झुपकेदार डहाळ्या, दाभणाप्रमाणें हिरवींगार पानें, छोट्या अननसाप्रमाणें चिडुकलीं मिटुकलीं फळें असा या झाडांचा थाट असतो. हीं झाडें बुडाशीं खूप मोठीं असतात. यांच्या फळ्या देवदारासारख्या दिसतात. याची वाळकी लांकडें दिवटीप्रमाणें जळतात व त्यांतून एक प्रकारचा सुगंध दरवळत असतो. अशा या गगनचुंबी वृक्ष-वनांतून चालत असतांना मनाला मोठा आनंद होतो. **गंगाणी** येथें यमुनेच्या कांठीं एक मोठें कुंड आहे. त्यांतील पाणी अत्यंत निर्मळ असून त्यांत स्वैरपणें खेळत असलेले मासे पाहून व भोंवतालची वृक्षराजी, चोहोंबाजूला दिसणारी पर्वत शिखरें पाहून या कुंडावरून हलूं नये असें वाटतें. येथें अनेक ऋषींनीं तपश्चर्या केलेली आहे. या कुंडांत ऋषींसाठीं प्रत्यक्ष गंगामाता अवतीर्ण झाली असें सांगतात. याच कुंडामुळें येथील वस्तीला गंगाणी किंवा गंगणानी असें नांव पडलें असावें. यापुढें आपणांस **यमुनाचट्टी** लागते. येथें मार्कंडेय मुनींनीं तपश्चर्या केली होती. येथून जवळच एक गरम पाण्याचा झरा आहे. हवेंत मनस्वी गारठा असल्यामुळें हें उष्णोदकाचें कुंड सुखावह वाटतें. पुढें लागणारें **हनुमानचट्टी** हें स्थान सुंदर आहे. येथील दरींतून एक भला मोठा प्रवाह वहात येऊन यमुनेस मिळतो. या प्रवाहास ‘ हनुमानगंगा ’ असें नांव आहे. येथून चारपांच मैलावर खरसाली ही दुसरी चट्टी लागते. येथें जम्नोत्रीच्या पंडे लोकांची वस्ती आहे. चारी बाजूंनीं वहात येणारें लहानमोठें पाण्याचें प्रवाह येथें यमुनेला येऊन मिळतात. त्यांना ओलांडणें देखील अवघड जातें. प्रवाहावर २५–३० हात लांबीचे दोन सोट टाकलेले आहेत. त्यावर आडव्या फांद्या टाकून त्या दोरखंडानें कशाबशा आवळलेल्या आहेत. त्यावरूनच यात्रेकरूंना हलकें पाऊल टाकीत पलीकडे जावें लागतें. येथून पुढें चार पांच मैलाची खडी चढण आहे. त्यांस **भैर व घती** असें नांव आहे. मध्येंच भैसाचें एक मंदिर आहे. हवेंत गारठा खूप असतो पण चालण्याच्या नादांत त्याची फारशी जाणीव रहात नाहीं. जसजसें वर जावें तसतसा हिमालय आपलें सौंदर्य तुमच्यापुढें उघडें करून ठेवीत असतो. दहा-बारा हजार फूट उंच असलेल्या जम्नोत्री या ठिकाणीं यमुनेचा प्रवाह धाड् धाड् उड्या मारीत प्रचंड वेगानें धांवत असतो; तर डाव्या बाजूला आपल्या डोक्यावर प्रचंड पर्वतांची शिखरें

उभी असतात. उजव्या डाव्याबाजूंचे पर्वत यमुनेच्या उगमस्थानीं एकत्र आल्यानें या ठिकाणची जागा अगदीं चिंचोळी झाली आहे. पर्वतांच्या कडांवर वाफांचे लोटच्या लोट उठत असतात. या वाफा म्हणजे कड्यांतून स्रवत असलेल्या प्रवाहांत निर्माण होणाऱ्या वाफा होत. या चिंचोळ्या जागेंतच यमुनेचे छोटेसें मंदिर व लहानशी धर्मशाळा आहे. उजव्या बाजूकडील पर्वताचा कडा व डाव्या हातचा कडा हे दोन कडे एकमेकांच्या इतके जवळ आलेले आहेत, कीं दोहोंमध्यें फक्त १०-१५ फूट अंतर उरते. ही सर्व दरी बर्फानें भरलेली आहे. या दरींतून, जेथून यमुना बाहेर पडते तेथें निसर्गतःच बर्फाची कमान झालेली आहे. त्या कमानींतून यमुना धों धों करीत वेगानें खालीं पडत असतें. हा यमुनेचा प्रवाह मुळांत आहे तरी केवढा आणि प्रत्यक्ष अवतीर्ण तरी कोठून होतो हें जाणून घेण्याची उत्कंठा निर्माण होते.

ज्या पर्वतांतून यमुना उगम पावते त्यास कालिंदी पर्वत असें नांव आहे. या या ठिकाणीं राज्य करणाऱ्या राजाचें नांव 'कलिंद' असें होतें. या नांवावरून यमुनेला कालिंदी असें दुसरें नांव पडलें. या ठिकाणीं तिचा प्रवाह अत्यंत थंड आहे. पण त्या प्रवाहाच्या शेजारीं दहा-पांच हातावर कढत पाण्याचीं कुंडें आहेत. त्यांतील एका कुंडांत तर इतकें गरम पाणी आहे कीं, त्यांत तांदूळ किंवा बटाटे बांधून सोडले तर तें पांच मिनिटांचे आंत शिजून निघतात. त्या पाण्याचा थेंब अंगावर पडला तर फोड येतात. एका कुंडाशेजारीं चार पांच फूट परिघाचा व दोन अडीच फूट उंचीचा छोटासा खडक असून त्याला अनेक छिद्रें आहेत. त्यांतून उष्ण पाण्याचें लहानमोठे थेंब सारखे पांच पांच, सहा सहा फूट उंच उडत असतात. त्यांतून मजेदार आवाजहि निघत असतो. ज्या कड्यांतून कढत पाणी पाझरत असते तो कडा तर वाफेनें झांकून गेलेला असतो. एका बाजूस दरी बर्फानें खच्चून भरलेली, पर्वतांची शिखरें बर्फानें आच्छादलेलीं, तर दुसऱ्या बाजूस हे विलक्षण उष्णोदकाचे झरे आणि कुंड दृष्टीस पडते. "असितो देवलो व्यासः" असा ज्यांच्या नांवाचा व्यासांच्या बरोबरीनें उल्लेख होतो. ते असितऋषि या ठिकाणींच रहात असत. त्यांनीं येथेंच विश्वकल्याणाकरितां चिंतन व तपश्चर्या केली. असें सांगतात कीं, वृद्धापकाळीं गंगेच्या स्नानाला जाणें अशक्य झालें तेव्हां गंगामातेनें त्यांच्यासाठीं या ठिकाणीं आगमन केलें. ऋषींच्या आश्रमाजवळील तो प्रवाह आजहि आपणास पहावयास सांपडतो.

उत्तर काशी हे उत्तर खंडांतील महत्त्वाचें क्षेत्र आहे. येथें अनेक प्राचीन मंदिरें आहेत. विश्वनाथ मंदिर, एकादश रुद्राचें मंदिर, गोपेश्वर, परशुराम, दत्तात्रेय, भैरव, अन्नपूर्णा इत्यादि अनेक देवतांचीं मंदिरें आहेत. येथें जडभरताचेंहि मंदिर आहे. कांहीं अंतरावर असलेलें श्रीशंकराचार्यांचें मंदिर अत्यंत रमणीय व शांत आहे. गंगेकांठीं ठिकठिकाणीं आश्रम ( पर्णकुटी ) असून तेथें संन्याशांची वस्ती असते. या

संन्याशांची संख्या शेपन्नास नसून हजारांनीं मोजण्यासारखी आहे. या क्षेत्राच्या एका बाजूला वारणावत नांवाचा पर्वत असून **वारणागंगा** ही भागीरथीस येऊन मिळते. व दुसऱ्या बाजूस असि नांवाची गंगा मिळते. वारणा आणि असि या दोहोंच्यामध्यें हे क्षेत्र वसलेलें आहे म्हणून त्यास 'वाराणसी' असें दुसरें नांव आहे. सुप्रसिद्ध काशी हें क्षेत्रहि वरणा व असि या दोन प्रवाहांच्यामध्येंच वसलेलें असल्यानें त्यालाहि वाराणसीच नांव आहे. वाराणसीचा पुढें अपभ्रंश होऊन **बनारस** हें नांव रूढ झालें. **उत्तरकाशी**जवळ असलेल्या पर्वताला गंधमादन पर्वत हें नांव आहे. डाव्या-बाजूला उंच पर्वत-श्रेणींत **डोडिताल** नांवाचें प्रसिद्ध सरोवर आहे. हे पाहिल्यानें अंशतः मानस सरोवराची कल्पना येते. मानस सरोवर सोळा हजार फूट उंच आहे.

**मणेरीचट्टीचा** मुक्काम संपवून **मल्लाहीला** आल्यानंतर येथून पुढें बूढाकेदार व केदारनाथकडे जाणारा रस्ता लागतो. तो सोडून गंगोत्रीच्या रस्त्याला लागावें लागतें. त्या रस्त्यानें पुढें **भटवाडी** हें ठिकाण लागतें. येथें वानगंगेचा प्रवाह भागीरथीस मिळतो. येथें एक भास्करेश्वराचें मंदिर आहे. या ठिकाणास भास्कर प्रयाग असें म्हणतात. एके काळीं येथें विद्वानांची भली थोरली वस्ती होती यावरून त्या ठिकाणास **भटवारी** ( भटवाडी ) असें नांव पडलेलें दिसतें. पुढें आपण **धराली** व **हरसील** येथें येऊन पोंहोचतों. फार रम्य आहेत हीं ठिकाणें ! अक्रोड, सफरचंद, जर्दाळू यांचीं झाडें येथें दिसतात. हरसील येथें श्यामगंगा, गुप्तगंगा, इत्यादि अनेक प्रवाह भागीरथीस येऊन मिळतात. येथें क्वचित् बुद्ध-भिक्षुहि भेटतात. त्यांच्या हातांत एक भिरभिरें असतें. त्यांत त्यांच्या उपास्य देवतेचा मंत्र—"ॐ मणि पद्मेहुम"—वगैरे लिहिलेला असतो. ते साधु एका हातानें भिरभिरें फिरवीत असतात. व आपल्याशीं बोलतहि असतात. तेवढ्या अवधींत त्या फिरणाऱ्या भिरभिऱ्यांत मंत्राक्षरांच्या जितक्या प्रदक्षिणा झाल्या असतील. तितक्या संख्येनें आपला मंत्र झाला. अशी त्यांची श्रद्धा आहे. या भागांत गंगेचा एक प्रवाह वहात आलेला आहे. त्यास **जाह्नवी** किंवा जह्नुगंगा असें नांव आहे. तिकडच्या भाषेंत त्यास जाडगंगा असेंहि नांव आहे. जह्नुऋषींचा येथेंच आश्रम होता व येथेंच त्यांनीं आपली तपःसाधना केली असल्याचें सांगतात.

गंगेच्या दक्षिण तीरावर गंगेचें छोटेसें मंदिर आहे. तशीच धर्मशाळा पण आहे. सर्वजण स्नानसंध्या, पूजाअर्चा येथेंच उरकून घेतात. येथें अज्ञात साधु आहेत. त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न कांहींजण करतात. गंगेचें उगमस्थान येथून १८ मैलांवर राहतें. तें गोमुख या नांवानें प्रसिद्ध आहे. तेथें पोहोंचणें अवघड व धोक्याचें आहे. त्यामुळें येथूनच त्याची पूजा करतात. शुद्धगंगाहि येथूनच बरोबर घेतात. या ठिकाणाहून मागें फिरतांना सर्वांच्या तोंडांतून "बोलो गंगा मैय्या की जय"! हाच एक मंत्र बाहेर पडत असतो. ४० मैल खालीं उतरून आल्यावर केदारनाथाचा मार्ग लागतो. या ठिकाणाहून 'जय केदारनाथ की जय'! हाच जयघोष ऐकूं येत

असतो. बूढा-केदारला जातांना खूप जंगल लागतें. त्यांतील तमालवृक्षाची नीलवर्ण छबी व गर्दछाया मनाला आनंद देते. एरवीं पैसे खर्च केल्याशिवाय तमालपत्री दिसणार नाहीं. पण या ठिकाणीं आपण ती अक्षरशः तुडवीत जातो. येथें धर्मगंगा व बालगंगा यांचा संगम आहे. या संगमावर स्नान करून बूढा-केदारचें मंदिरांत प्रवेश करावा. ते लिंग दिसण्यांत ओबडधोबड व अत्यंत पुरातन असें शिवलिंग आहे. केदारनाथाचें हें पुरातन स्थान आहे म्हणून त्यास बूढाकेदार हें नांव पडलें. येथून पवालीकांठ्यावरून त्रियुगीनारायणला जावयाचें असतें. पवालीकांटा हा रस्ता अत्यंत अवघड आहे. कित्येक वेळेस तो बर्फामुळें बुजून जातो. उजवीकडे अत्यंत खोल दरी, डावीकडेही तशीच खोल दरी. हातांतला तांब्या चुकून पडला तर कायमचा गेला म्हणून समजावें. पुढें **मग्गूकीमंडी** लागतें. येथून पांच मैलांवर त्रियुगीनारायण हें यात्रेंतील महत्त्वाचें क्षेत्र लागतें. हें अत्यंत सुंदर आणि टुमदार क्षेत्र आहे. येथें आदिनारायणाचें मंदिर आहे. त्याच्या उजव्या-डाव्या अंगाला श्री भूदेवी व श्री लक्ष्मी यांच्या मूर्ति आहेत. या मूर्ति अष्टधातूंच्या असल्याचें समजतें. देवळाला लागूनच ब्रह्मा, विष्णु, महेश अशी तीन पाण्याची अत्यंत स्वच्छ अशी कुंडें आहेत. देवासमोरील अंगणांत चारीबाजूंनीं कमानी असतात. वर आच्छादन असलेल्या एका ओट्यावर अग्नि तेवत असतो. हा अग्नि श्रीशंकर आणि पार्वती यांचा येथें विवाह झाला, तेव्हांपासून अविच्छिन्न परंपरेनें चालत आलेला आहे, असें म्हणतात. यात्रेकरू यांत लांकडाचे ओंडके आणि तीळ, सातू यांसारखे पदार्थ टाकतात.

जम्नोत्री-गंगोत्रीकडे न जातां केवळ केदारनाथ व बद्रीनाथाची यात्रा करणारेच बरेचसे यात्रेकरू भेटतात. केदारनाथाकडून येणारी **मंदाकिनी** आणि डाव्या बाजूनें वासुकी सरोवरांतून येणारी **वासुकीगंगा** यांचा येथें सुरेख संगम असून या ठिकाणाला सोमप्रयाग असें नांव आहे. **वासुकीसरोवर** ( वासुकी ताल ) केदार-नाथापासून दहा मैलांवर असून फार रम्य आहे. सोमप्रयागहून पुढें निघालों म्हणजे मुंडकटा गणपतीचें दर्शन घेऊन आपण गौरीकुंड या ठिकाणीं येऊन पोहोंचतो. येथें कांहीं दुकानें व धर्मशाळा आहेत. येथें एक गरम व एक थंडपाण्याचें कुंड आहे. कढत पाण्याच्या कुंडांत स्नान केल्यानें, आलेला थकवा व शीण नाहींसा होतो. थंड पाण्याच्या कुंडाला अमृतकुंड असें नांव आहे. पार्वतीचा जन्म येथेंच झाला असें सांगतात. येथून केदारनाथपर्यंत नऊ मैलांचा खडा चढ आहे. वाटेंत बर्फानें भरलेल्या दऱ्या ओलांडाव्या लागतात.

बद्रीकेदार या ठिकाणीं यात्रेच्या काळांत लोकांची वस्ती असते. या ठिकाणीं धर्म-शाळा पण आहेत. कांहीं संस्थानिकांचे छोटे छोटे बंगले आहेत. येथें भर उन्हाळ्यांतहि हिंवाळ्याला लाजविणारा गारठा असतो. सर्व बाजूंनीं उभे असलेले प्रचंड पर्वत व

त्यांचीं शिखरें बर्फानें आच्छादलेलीं असतात. घटकेंत ऊन, घटकेंत पाऊस, घटकेंत दाट धुकें असा सृष्टीदेवतेचा लपंडावाचा खेळ चालू असतो. पर्वतांच्या शिखरांवर सूर्याचीं किरणें पडलीं म्हणजे तीं हिमाच्छादित शिखरें कधीं सोन्यासारखी, कधीं कधीं चांदीसारखी, कधीं भगवी छाटी पांघरलेल्या संन्याशासारखीं तर कधीं धूपछांव रंगाचा शालू परिधान केलेल्या नववधूसारखी शोभत असतात. कांठीचा आधार घेऊन त्या शिखरांकडे एकटक पहात रहावेसें वाटतें. **मंदाकिनीच्या** डाव्या कांठावर उभ्या असलेल्या पर्वतास कुवेरभांडार असें नांव आहे. परम शिवभक्त यक्षराज कुवेर यांचें ते भंडार सतत पाण्याखालीं डुंबत असलेल्या शेताला–क्षेत्राला–केदार असें नांव आहे. याच्या चारी बाजूंना उभ्या असलेल्या पर्वतांच्या पायथ्याशीं कांहींसा लंबवर्तुळाकार सपाट प्रदेश आहे. त्याच्या सर्व भागांत पाणी खेळत असते. हा भाग दलदलीचा आहे. केदारक्षेत्राची अधिष्ठात्री देवता म्हणजे केदारनाथ किंवा केदारेश्वर. एका लांबरुंद अशा खूप मोठ्या दगडी चौथऱ्यावर केदारनाथाचें भव्य मंदिर उभें आहे. सभा-मंडपांतून गाभाऱ्यांत गेल्यानंतर एक पर्वतीय शिलेचें नैसर्गिक शिवलिंग दृष्टीस पडतें. हें द्वादश-ज्योतिर्लिंगांपैकीं एक असून त्याच्या दर्शनाचा महिमा फार मोठा आहे. येथें अन्न शिजूं शकत नाहीं म्हणून सुक्या मेव्याचा नैवेद्य दाखवितात. मंदिरांत पांच पांडव सती द्रौपदी आणि भगवान् श्रीकृष्ण यांच्या मूर्ति आहेत. गाभाऱ्यांत एक दगडी दिवा असून त्यांत तुपाची वात सतत तेवत असते. दिव्याच्या वरच्या बाजूला एक मोठी टाकी तुपानें भरलेली असते. कार्तिकी पौर्णिमेपासून अक्षय्यतृतीयेपर्यंत जेव्हां मंदिर बंद असतें व हा भाग बर्फाच्छादित असतो तेव्हां या दिव्याच्या उष्णतेनें या टाकींतले तूप थोडें थोडें द्रवत राहते व दिवा अखंड तेवत राहतो. अक्षय्यतृतीयेस बर्फ वितळून मंदिराचें द्वार खुलें होतें, व आंत तेवत असलेला दिवा दिसतो. मंदिराभोंवती अमृतकुंड, देवकुंड, ऋषिकुंड, हंसकुंड इत्यादि अनेक कुंडें आहेत.

" बोलो, जय बद्रीविशाललाल की जय ! " असा जयघोष कानांवर येऊं लागला म्हणजे समजावें कीं आपण बद्रीनाथचे मार्गावर आलों आहोंत. आल्या मार्गानें आपण सोमप्रयागपर्यंत परत फिरल्यावर **गुप्तकाशीच्या** मार्गानें चालत असतो. गुप्तकाशी हें अत्यंत रमणीय व पवित्र क्षेत्र आहे. येथें श्री विश्वेश्वराचें मंदिर आहे. शंकराच्या पिंडीजवळ पार्वतीची मूर्ति आहे. मंदिराच्या पूर्वेस अर्धनारीनटेश्वराचें मंदिर आहे. कर्पूरवर्णाची गौरमूर्ति फारच सुरेख दिसते. मंदिरावर सोन्याचा कळस आहे. मंदिरांत मनकर्णिकेचें कुंड आहे. त्यांत एका बाजूनें गोमुखांतून यमुनेची व सिंहमुखांतून गंगेची संततधार पडत असते. गुप्तकाशी सोडल्यानंतर 'उखीमठ' लागतो. हें राजधानीचें ठिकाण असल्यासारखें दिसतें. केदारनाथचें रावळ येथेंच राहतात. केदारनाथचें पवित्र ठिकाण ज्या काळांत बर्फाखालीं असतें त्या काळांत केदारनाथची पूजा येथेंच करतात. येथें एक विद्यापीठहि आहे. पोस्ट ऑफिस, तार ऑफिस यांची पण येथें सोय आहे.

ही पूर्वकालीन बाणासुराची राजधानी असल्याचें सांगतात. बाणासुराची कन्या उषादेवी हिनें स्वप्नांत प्रद्युम्नाचा मुलगा श्रीकृष्णाचा नातू अनिरुद्ध यास वरले होते. तिची मैत्रीण चित्रलेखा हिनें युक्तीनें तिला अनिरुद्धाचा लाभ करून दिला. उषा व अनिरुद्ध यांचा विवाह बाणासुराला रुचला नाहीं. यामुळें घनघोर युद्ध झालें. बाणासुराच्या बाजूनें श्री शंकर व अनिरुद्धाच्या बाजूनें भगवान् श्रीकृष्ण लढले. बाणासुर शंकराचा भक्त होता म्हणून शंकरानें मध्यस्थी केली व युद्ध थांबविलें. बाणासुरानें आपलें राज्य उषा-अनिरुद्ध यांना अर्पण केलें. या सर्व इतिहासाचें मूर्तिमंत स्मारक म्हणून हा उखीमठ उभा आहे. अशा आख्यायिका अस्तित्वांत आहे· येथें उषा व अनिरुद्ध यांचीं मंदिरें आहेत.

तुंगनाथाचा पर्वत चढून गेल्यावर डाव्या हाताला पर्वताच्या कड्यांतून ( सोंडेसारखी ) स्वच्छ जलधारा ३०–३५ फूट खोल उडी घेत असलेली दिसते. हिला आकाशगंगा असें म्हणतात. ती पाताळांत जात असल्यानें पाताळगंगा असेंही म्हणतात. आणखी थोडें वर चढून गेलें कीं श्रीतुंगनाथाचे, पुरातन बांधणी असलेलें, दगडी मंदिर दिसतें. मंदिराचें दार अगदींच लहान आहे. वांकूनच आंत प्रवेश करावा लागतो. भोंवतालीं पाहिलें म्हणजे आतांपर्यंत उंच वाटणारीं पर्वत शिखरें आपल्याला ठेंगणीं वाटूं लागतात. तीं सर्व आपल्यापेक्षां खालीं असून आपणच त्यांच्यापेक्षां वर आहोंत असें वाटूं लागते व मनस्वी आनंद होतो. येथील सर्व चमत्कार पाहून तुंगनाथ हें नांव अगदीं यथार्थ आहे असेंच आपल्याला वाटतें. येथून पूर्वेकडे दृष्टि टाकली कीं, नंदादेवी, पंचचूली, द्रोणाचल इत्यादि शिखरें दिसतात. उत्तरेकडे दृष्टि टाकली कीं, गंगोत्री, जम्नोत्री, केदारनाथ, बद्रिनाथ, चतुःस्तंभ इत्यादि शिखरें दृष्टिस पडतात. दक्षिणेकडे दृष्टि टाका, सुरखंडा देवीचें शिखर चंद्रवदनी पर्वत, इत्यादि शिखरें दिसतात. कारण या ठिकाणीं आपण समुद्रसपाटीपासून तेरा हजार फूट उंचीवर उभे असतों. मेघमंडळ हें आपल्या खालीं असून सभोवतालीं सर्व सृष्टि मेघांनीं झांकून घेतली आहे व आपण वरती सूर्यप्रकाशांत आहोंत असाही आपणांस अनुभव येतो. प्रादेशिक उंचीबरोबर मनांतील विचारही उंचावतात. वातावरणांतील पावित्र्याबरोबर मनाचें पावित्र्यही वाढूं लागतें. संसाराची असारता आणि परमेश्वराची अद्वितीयता प्रचीतीस येतें. मंडलचट्टीवर स्नान-संध्या वगैरे आटोपून गोपेश्वराला यावें, श्रीगोपेश्वर महादेवाचें दर्शन घ्यावें. तेथें केदारनाथाची यात्रा संपते. याच ठिकाणीं महादेवानें कामदेवास जाळून भस्म केल्याचें सांगतात. अलकनंदेच्या कांठाचा टुमदार, नव्या थाटाचा बाजार, पोस्ट व तार ऑफिस इत्यादि सर्वसोयींनीं युक्त असलेले **चमोली** ह्या गांवीं विश्रांति घेऊन पुढें निघावें. **पिपलीकोटी** येथें मृगाजीन, व्याघ्राजीन, कृष्णाजीन लहान मोठ्या चवऱ्या, शिलाजीत, कस्तुरी वगैरे वस्तूंचा येथें मोठा बाजार आहे. उजव्या बाजूच्या दरींतून स्वच्छ **गरुडगंगेतील** प्रवाह

झेंपावत असतो. तेथें भगवान् गरुड देवाचें देऊळ आहे. **गरुडगंगेतील** लहान मोठ्या आकाराचें त्रिकोणी, चौकोनी, दीर्घवर्तुळाकार असें गमतीचें दगड दिसतात; तेथून आपण **जोशीमठाला** येऊन पोहोंचतो. हे आपल्या टप्प्यांतील फारच महत्त्वाचें ठिकाण समजलें जातें. तेथें श्रीनृसिंहनाथाचें प्रसिद्ध मंदिर आहे. हिमवृष्टिमुळें बद्रिनारायणाचे मंदिर बंद असतांना याच ठिकाणाहून त्याची पूजा करतात. जोशीमठास ज्यातिर्मठ असेंही दुसरें नांव आहे. तेथें जगद्‌गुरु आद्य शंकराचार्य यांनीं बराच काळ तपश्चर्या केली होती. त्यांच्या वास्तव्याची गुहा व ज्या वृक्षाखालीं ते बसत त्या वृक्षाची परंपरा अद्यापही तेथें दिसून येतें. अलीकडे तेथें श्रीशंकराचार्यांचा नव्या पद्धतीचा चांगला मठही बांधलेला आहे. तीन मैलांचा उतार उतरून गेल्यावर आपण **विष्णु-प्रयागला** येतो. एकीकडून **अलकगंगा** व दुसरीकडून **विष्णुगंगा** वहात येऊन तेथें त्या एकमेकीस भेटतात. येथून बद्रिनारायणापर्यंत सारखा चढच लागतो. पुढें पंडुकेश्वर हें क्षेत्र लागतें. हें पांडवांचें तपश्चर्येचें ठिकाण असल्याचें सागतात. हनुमान चट्टी ओलांडली कीं आपण **बद्रिनाथला** येऊन पोहोंचतों. अलकनंदेच्या कांठीं वसलेला छोटासा गांव आहे. येथें पंड्यांची वसती आहे. धर्मशाळा व बाजार यांची येथें व्यवस्था आहे. पुरातन काळीं या नगरीचें **विशाला** असें नांव होतें. म्हणून बद्रिनारायणाला विशाललाल असें म्हणत. अलकनंदेच्या कांठीं एक मोठा खडक आहे. त्यास **ब्रह्मकपाल** असें नांव आहे. या ठिकाणीं पिंडदान केल्यावर श्राद्ध करण्याची जरूर पडत नाहीं. येथें पाण्याचीं कुंडे असून सूर्यकुंड, नारकुंड अशीं त्यांचीं नांवें आहेत. रात्रीच्या वेळीं बद्रिनारायणाची आरती होत असतांना श्रीनारायणाचें मुखकमळ त्या दीपज्योतीच्या प्रकाशांत इतके तेजस्वी वाटतें कीं मनाला धन्यता वाटते. ते दृश्य पाहून डोळ्यांतून आनंदाश्रूंचीं टिपें ओघळूं लागतात, अंगावर रोमांच उभे राहतात. जन्माचें सार्थक झाल्याचें समाधान लाभतें. येथें अलकनंदेच्या दोन्ही किनाऱ्यावर उभ्या असलेल्या पर्वत श्रेष्ठींना नरनारायण ही संज्ञा आहे. ते नरनारायणाचे अवतार आहेत. आदर्श वैराग्य आणि तपश्चर्या यांचे मूर्तिमंत दर्शन तेथें मिळतें. तेथून सात-आठ मैलांवर बसुधारा हें तीर्थ आहे. हें उंच अशा अवघड ठिकाणीं असून बहुधा यात्रेकरू येथें जाण्यास कंटाळतात. **सरस्वती** नदी उजवीकडून वहात येऊन खालीं **अलकनंदेला** जाऊन मिळते. उजव्या हाताला व्यास गुहा आहे. व्यासांनीं येथेंच बसून ' प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः '. संस्कृत पौराणिक वाङ्मयानें जें कार्य केलें त्याला जगांत तोड नाहीं. सुमारें चारशें फूट तुटलेला कडा व त्या कड्यावरून हत्तीसारखा प्रचंड प्रवाह धो धो करीत खालीं उडी घेत असतो. चारशें सत्तरफूट खोल दरींत उडी घेतांना त्या प्रवाहाचें तुषारांत रूपांतर होते. हे तुषार अंगावर आले कीं सर्व पातकांची राख व्हावी, इतका जबरदस्त गुण त्या तुषारांत आहे. रुद्रप्रयाग येथें **मंदाकिनी** व **अलकनंदा** यांचा पर्वत आहे. येथील घाट खूप उंच आहे. श्रीशंकराचें भव्य मंदिर येथें असून श्रीदेवर्षि नारदमहामुनींनीं प्रत्यक्ष शंकराकडून

संगीत विद्या घेतलेली आहे. येथून आपण पुढें **देवप्रयागला** येतो. तेथें **भागीरथी** व **अलकनंदा** यांचा मनोहर असा संगम आहे. या ठिकाणीं अवगाहन अर्थात स्नान करून सर्व देव देखील कृतार्थ झालेले आहेत, म्हणूनच याला **देवप्रयाग** असें नांव पडलें आहे. हिमालयांतील खरा प्रवास याच ठिकाणीं संपतो. नंतर आपापल्या सोईप्रमाणें परत हृषीकेशला यावें व तेथून हरिद्वार व पुढें दिल्ली !

---

**टीप** : तीर्थक्षेत्रांमध्यें केल्या जाणाऱ्या धार्मिक विधींसाठीं निरनिराळे संकल्प असतात. ते आम्ही मोठ्या प्रयासानं मिळविले आहेत. वाचकांनी परिशिष्टांत ते जरूर पहावेत. —संपादक.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 3८६८० वि: निबंध
क्रमांक १५५१ नों वि: ६५६६

४

# प्राचीन वाङ्मयांतील हिमालय

डॉ. व. ग. राहुरकर

ऋग्वेदांतील १०·१२१·४ या सूक्तांत हिमालयासंबंधीं "हिमवन्तः" असा उल्लेख आला आहे.

यस्येमे हिमवन्तो महित्वा यस्य समुद्रं रसया सहाहुः ।
यस्येमाः प्रदिशो यस्य बाहू कस्मै देवाय हविषा विधेम ॥

तसेंच अथर्ववेद १२·१·११ येथेंही : 'गिरयस्ते पर्वता हिमवन्तोऽरण्यं ते स्योनमस्तु ।' असा निर्देश आला आहे. त्याच वेदांत ६·९५·३ येथें "गर्भो अस्योषधीनां गर्भो हिमवतामुत" आणि ६·२४·१ "हिमवतः प्रस्रवन्ति सिन्धौ समह संगमः । आपो ह मह्यं तद्देवीर्ददन् हृद्योतभेषजम् ॥" तसेंच ४·९·९ येथें "यदाञ्जनं त्रैककुदं जातें हिमवतस्परि ।" आणि ५·४·८ "उदङ् जातो हिमवतः" असे जे उल्लेख आहेत त्यावरून अनेक वनस्पतींचें आगर म्हणून तो प्रसिद्ध होता असें दिसतें.

त्याचप्रमाणें ऐतरेय ब्राह्मण ८·१४·३, वाजसनेयी संहिता २४·३०; २५·१२. आणि तैत्तिरीय संहिता ५·५·११–११ येथेंही असेंच उल्लेख आढळतात. महाभारतांतील वनपर्वांत २५३ व्या अध्यायांत हिमवत् प्रदेश नेपाळच्या पश्चिमेस आहे

असें म्हटलें आहे. महाभारतांत या प्रदेशाला कुलिंद विषय असें म्हटलें आहे. गंगा, यमुना आणि सतलज या नद्या हिमवत् प्रदेशांतून वाहतात, असें वर्णन आढळतें. यावरून हिमाचल प्रदेश व डेहराडूनचा कांहीं भाग हिमवत् या नांवानें त्या काळीं ओळखला जात असावा असें दिसतें.

महाभारतांत अर्जुनाची यात्रा, बलरामाची यात्रा, भीम व दुर्योधन यांचें द्वैपायनह्रद येथें झालेलें द्वंद्वयुद्ध, पाण्डवांचें शेवटचें पर्याण या सर्व घटना हिमालयांत घडल्या असल्याचें वर्णिलें आहे. 'स्थावराणां हिमालयः' हा गीतेंतील उल्लेख वनपर्वांतील कुलिंद विषयास उद्देशून असावा.

भागवत पुराण आणि कूर्म पुराण यामध्येंही हिमवत् असाच स्पष्ट उल्लेख आहे. योगिनीतंत्र १·१६ येथेंही हिमवत् याचा निर्देश आहे. कालिका पुराणांत (१४·१, १४·५१) हिमवत् हा पर्वतांचा राजा आहे, असें म्हटलें आहे.

महाकाव्यें व पुराणें यामध्यें हिमवत् पर्वत हा वर्षपर्वत किंवा मर्यादापर्वत आहे असें म्हटलें आहे. मार्कंडेय पुराणकर्ता म्हणतो, "हा पर्वत पूर्व व पश्चिम समुद्रापर्यंत धनुष्यांच्या खेचलेल्या दोरीसारखा दिसतो. (कार्मुकस्य यथा गुणः ५४·२४; ५७·५९) महाभारत ६·६·३ व कुमारसंभव १·१ येथेंही थोडेफार असेंच वर्णन आहे. पूर्वेकडे आसाम मणिपूरपर्यंत पसरलेला हिमालयाचा भाग जंबूद्विपांतील हैमवत् विभाग होय. अशोकाच्या तेराव्या शिलालेखांत याचा उल्लेख आढळतो. हा प्रदेश पालीवाङ्मयांत 'हिमवन्त पदेस' म्हणून प्रसिद्ध आहे. हा प्रदेश सुमेरुपर्यंत (पाली 'सिनेरु') पसरलेला आहे. या हैमवत् प्रदेशाची दक्षिणेकडील मर्यादा अशोकाच्या निग्लीव व लुंबिनी येथील एका पाषाणी शिलालेखांतून उल्लेखिलेल्या आहेत. विष्णुपुराणांतील "उत्तरं यत् समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम् । वर्षं तद् भारतं नाम भारती यत्र संततिः ॥" व वायुपुराणांतील "योजनानां सहस्रं तु द्वीपोऽयं दक्षिणोत्तरम् । आयतो ह्याकुमारिक्यादागङ्गाप्रभवाच्च वै ।" हे उल्लेख राष्ट्राच्या सीमांच्या दृष्टीनें महत्त्वाचे आहेत.

प्राचीन भूगोलज्ञांच्या मतें पश्चिम पंजाब सीमेपासून आसाममधील आराकान पर्वतांच्या रांगेपर्यंतची भारताची उत्तर सीमा म्हणजे हिमवत् पर्वत होय. कैलास पर्वत हा हिमालयाचाच एक भाग आहे. मार्कंडेय पुराणाच्या मतें तो एक स्वतंत्र पर्वत आहे. अल्बेरुनीच्या मतें मेरु आणि निषध हे पर्वत हिमालयाच्या रांगांशीं संलग्न होते. टॉलेमी म्हणतो, 'इमाओस' (हिमालय) हे गंगा व सिंधू या नद्यांचें उगमस्थान आहे.

अपदान ग्रंथांत हिमवत् पर्वताला पर्वतराज म्हटलें असून जवळच्या इतर पर्वतांचाही त्यांत उल्लेख आहे. कदम्ब, कुक्कुर, भूतगण, कोसिक, गोतम, पदुम, करिक, लम्बक, वसभ, समंग, सोभित इत्यादि पर्वतांचा त्यात अंतर्भाव होतो. देवपाल

राजाचे मोंधीर येथें सांपडलेलें दानपत्र केदार हें ठिकाण हिमालयांत असल्याचें सांगतें. शिव व पार्वती हें दोघेंही हिमालयांतील महाकौशिकी नदीच्या धबधब्याजवळ गेल्याचें कालिका पुराणावरून ( १४·३१ ) समजतें.

मेन्होफर या पण्डितानें ' गेडांकेन झुम् नामेन हिमालय ' या आपल्या लेखांत हि + मलै ( = तामिळ भाषेंत ' पर्वत ' ) अशी हिमालय या शब्दाची उत्पत्ति देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेंच पिनो या पण्डितानें ' उण्हेरसुखुंगेन झु डेन आल्टिंडिशेन वेर्गनामेन ' या लेखांत असाच प्रयत्न केला आहे. डिरॉय या फ्रेंच पण्डिताचा या विषयावर ' ले नोम् द ल हिमालय ' असा एक हस्तलिखित प्रबंध आहे. परंतु या सर्व व्युत्पत्ति अवास्तव वाटतात.

महाकवि कालिदासाच्या प्रतिभेला हिमालयानें विशेष मोहिनी घातली आहे. ऋतुसंहार आणि मालविकाग्निमित्र या दोन साहित्यकृति सोडल्यास इतर सर्व कालिदासाच्या वाङ्मयांत हिमालय वर्णनाला प्राधान्य आहे. कुमारसंभवाचा आरंभ हिमालयाच्या उत्कृष्ट वर्णनानें झाला आहे. शिव-पार्वतीच्या संचारानें पवित्र झालेल्या हिमालयांतील अनेक स्थळांचा उल्लेख येथें आढळतो. रघुवंशाच्या चौथ्या सर्गांत इतर देशांच्या वर्णनापेक्षां हिमालय वर्णनांत कालिदास अधिक रंगून जातो. हिमालय वर्णनांत निसर्गसौंदर्यानें, वनश्रीनें व खनिज संपत्तीनें कालिदासावर मोहिनी घातली असावी असें वाटतें.

कालिदासाला हिमालय हा एक सामान्य पर्वत वाटत नसून एक पवित्र स्थळ आहे असें वाटतें. डॉ. मिराशी म्हणतात कीं, ' हिमालय, हिमवान्, नगाधिराज या सर्व नांवापेक्षां ' गौरीगुरु ' हें नांव त्याला अतिशय आवडलें आहे. '

( १ ) गौरीगुरोर्गह्वरमाविवेश । रघु : २·२६

( २ ) ततो गौरीगुरुम्...... । रघु : ४·१२

( ३ ) पादास्तामभितो निषण्णहरिणा गौरीगुरोः पावनाः । शाकुन्तल : ६·१७

हिमालयाला नगाधिराजत्व पद कसें प्राप्त झालें याचें वर्णन करीत असतांना कविकुलगुरु कालिदास म्हणतो, ' सोमवल्ली व इतर यज्ञोपयोगी साहित्य हिमालयावरच मिळतें. संपूर्ण जगाला स्थैर्य आणण्याचें कार्य हिमालयच करतो. म्हणूनच ब्रह्मदेवानें स्वतः हिमालयास शैलाधिपत्य दिलें. ' सर्व ऋषींचे आश्रम हिमालयावरच असल्याचें कालिदास सांगतो. वसिष्ठ ऋषींचा आश्रम हिमालयाच्या पायथ्याशीं होता. राजा दिलीप कामधेनूची सेवा याच ठिकाणीं करीत होता. वाल्मीकीचा आश्रम गंगानदीची उपनदी तमसा हिच्या कांठावर होता. कण्वऋषींचा आश्रम येथेंच मालिनी नदीच्या तीरावर होता. मारीच ऋषींचा आश्रम हेमकूट पर्वतावर होता. मेघदूतांत हिमालयांतील कनखल तीर्थाचा उल्लेख आहे. कैलास शिखराप्रमाणेंच

गौरीशिखर ( गौरीशंकर ) याचाही उल्लेख कुमारसंभवांत आहे. महाकोषीप्रपाताचाहि उल्लेख येथें मिळतो. हिमालयाची राजधानी ओषधीग्रस्थ या नगरीचें सुंदर वर्णन कालिदासानें कुमारसंभवांत केलें आहे. 'राशीभूतः त्र्यम्बकस्याट्टहासः' किंवा 'त्रिदशवनितादर्पणः' या शब्दांनीं महाकवीनें त्यांचें सौंदर्य व पावित्र्य वर्णन केलें आहे. हिमालयाचें अनेक रीतीनें अत्यंत प्रभावी वर्णन करूनही आपली प्रतिभाशक्ती अपुरी पडतें व हिमालयाच्या खऱ्या स्वरूपाचा आपण योग्य रीतीनें आविष्कार करूं शकत नाहीं ही जाणीव कालिदासास झाल्यावर हिमालयाला अगदीं अगतिकतेनें शरण जावून कालिदास म्हणतो :

स्थाने त्वां स्थावरात्मानम् विष्णुमाहुस्तथाहि ते ।
चराचराणां भूतानाम् कुक्षिराधारतां गता ॥ कुमार·६·६०

५

# भारताचा संरक्षक हिमालय

कॅ. शंकरराव चापेकर

आजवर उत्तरेकडून आलेल्या संकटापासून हिमालयानें भारताचें संरक्षण केलेलें आहे. अर्थात् अजूनही तो संरक्षण करण्यास तयार आहे. पण वस्तुस्थिति मात्र अशी आहे कीं, आजच्या विज्ञान युगांत त्या हिमालयाचें संरक्षण करण्याचीच जबाबदारी आपल्यावर येऊन पडली आहे. हिमालय कितीही बलाढ्य असला कितीही उंच असला आणि कितीही दुर्गम असला तरीही मानवानें निर्माण केलेल्या विज्ञानापुढें आज हिमालयाची ही अस्त्रें कमकुवतच ठरतील.

पंधरा हजार फूट उंचीवर गेलें असतां वातावरणांतील हवा विरळ होऊं लागतें व तेथें श्वासोच्छ्वास करणेंही मुष्कील होवून जातें. अशा वातावरणांत, इतक्या उंचीवर जावून पूर्वींचा मानव राहूं शकत नव्हता. तेथील भयंकर थंडीशीं तो तोंड देवूं शकत नव्हता. ह्या थंडीच्या भयंकर कडाक्यानें हातापायाचीं बोटें झडून एखाद्या महारोग्यासारखी माणसाची तऱ्हा बनण्यासारखी असतें. पण अशा थंडीवरही आजच्या विज्ञानानें मात केली आहे.

हिमालयासारखा अजस्र पर्वत ओलांडून हिंदुस्थानावर उत्तरेकडून कोणीही स्वारी करूं शकला नाहीं. सुलेमान, काराकोरम, यासारख्या दूरवर पसरलेल्या पर्वतांच्या रांगा पसरलेल्या आहेत. या भारताच्या उत्तर सरहद्दीचें संरक्षण करण्यास समर्थ आहेत. आजवर झालेल्या छोट्यामोठ्या स्वारींच्या इतिहासांत ज्या नोंदी सांपडतात त्या प्रायः वायव्य सरहद्दीकडून झालेल्या आहेत. पण १९६२ सालीं मात्र चिनी लोकांनीं उत्तरेकडून तिबेटमार्गें आक्रमण करून ऐतिहासिक आक्रमणांत एक नवीन भर टाकली आहे. पूर्वी दिल्लीच्या एका बादशहानें याच मार्गानें ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यांतून चीनवर स्वारी करण्याचा प्रयत्न केला होता. पण त्याचे सैन्य शत्रूच्या सैन्याशीं झुंज देण्यापूर्वीच थंडीशीं झुंज देत देतच धारातीर्थी पतन पावले. त्याचप्रमाणें गेल्या शतकांत ब्रह्मदेशाच्या सेनापतीनें मणीपूरच्या बाजूनें चीनवर स्वारी केल्याची नोंद सापडतें. पण तोही प्रयत्न फसला होता.

आतां वायव्य सरहद्दीकडे आपण पाहूं.

बाबर हा अफगाणिस्थानचा राजा होता. तरी तो हिंदुस्थानच्या बादशहा बनला. त्याचें कारणही तसेंच होतें. त्यानें अफगाणिस्थानसारख्या सरहद्दीवर व मोक्याचें ठिकाणावर बळकट व्यवस्था ठेवून तीं टाणीं आपल्या ताब्यांत ठेवलीं होतीं. इंग्रजांनींही याच धोरणाचा पाठपुरावा केला. त्यांनीं सरहद्दीकडे कधींही दुर्लक्ष होवूं दिलें नाहीं. रशियाचा दोनशें वर्षांचा इतिहास आक्रमक स्वरूपाचा आहे हें ब्रिटीशांना चांगलें ठावूक होते, आणि म्हणूनच ब्रिटीशांनीं तुर्कस्थानवरही स्वारी करून तो देश आपल्या ताब्यांत ठेवला. आजचा तुर्कस्थान पूर्वी अफगणिस्थानच्या उत्तरेस होता. अफगणिस्थान हें हिंदुस्थानचें प्रवेशद्वार आहे. तेव्हां प्रवेशद्वाराचा द्वारपाल सशस्त्र असणें व चालून आलेल्या प्रसंगास तोंड देण्यास समर्थ बनविण्यास त्या वेळीं आवश्यक वाटत होतें.

पूर्वेस ब्रह्मदेश हा १९३४ सालापर्यंत हिंदुस्थानचाच एक भाग होता. सयाम हे अगदीं छोटेसें राष्ट्र आहे. कोणाशींही दोन हात करण्याची त्याची शक्ती नाहीं. त्यानें ब्रिटिश व फ्रेंच राज्यकर्त्यांशीं हातमिळवणी केली व स्वतःचें संरक्षण करून घेतलें. हॉलंड व इंडोनेशिया ब्रिटिशांचा मित्र होता आणि अतिपूर्वेकडील जपान साडे-तीन हजार मैल अंतर तोडून स्वारी करील हें स्वप्नांतही खरें वाटण्यासारखें नव्हतें.

आतां नेफाच्या सरहद्दीचे दृष्टीनें विचार करतां माउंट एव्हरेस्ट शिखर हें तिबेट व नेफा यांची सरहद्द म्हणून समजण्यांत येते. त्यापुढें पर्वताच्या एकापुढें एक अशा अनेक रांगा उभ्या आहेत. सातपुडा पर्वताच्या जशा रांगा आहेत तशीच तेथील स्थिति आहे. प्राचीन काळांतल्या लोकांनीं हिमालयाचें खरें महत्व ओळखलें होतें. त्यावर असलेल्या पवित्र देवस्थानांची त्यांना नीट कल्पना होती. आजचा तिबेट हा पूर्वीचा देवलोक असावा असें पुराणमतवादी लोक मानतात. कारण ज्या वेळीं

हिंदुस्थानवर स्वाऱ्या होऊं लागल्या व शस्त्रास्त्रांच्या शर्यतीवरच स्वामित्वाची कल्पना सिद्ध होऊं लागली, त्या वेळीं देव तेथून निघून तिबेटच्या उतारावर जाऊन राहिले. नेफा आणि आसाममध्यें मात्र अनेक संमिश्र वंश व जमाती आढळून येतात. तेथील राज्यकर्ती जमातही सतरा पगडजातीची आहे. परंतु नव्वद टक्के लोकांची संस्कृति मात्र हिंदु आहे. मध्यंतरीचें नेपाळ हें राज्य मात्र बफर स्टेट प्रमाणें असून नेपाळवर संकट आल्यास व त्यानें हाक मारल्यास त्याचे मदतीस धावून जाण्यासाठीं हिंदुस्थाननें स्वतःला बांधून घेतलें आहे. हे लोक निसर्गाशीं अधिक समरस होतात. चोरी, लबाडी, लुच्चेगिरी त्यांना ठावूक नाहीं.

नागा जमातीसंबंधीं विचार करतां त्यांची वसाहत डोंगर पायथ्याशीं अधिक आढळते. त्यांच्यांतील बहुतेक तरुण पिढी ख्रिश्चन असून त्यांचे आई-बाप मात्र हिंदू आहेत. या जमातींत साठ ते पासष्ट टक्के नागा साक्षर आहेत. मधूनमधून बंड करण्याचे त्यांना झटके येतात. अशा रीतीनें हिमालयामध्यें व हिमालयाचे आसमंतात् पायथ्याशीं अनेक रानटी टोळ्या, जाति, जमाती विखुरलेल्या आहेत. हिमालयाचें संरक्षण करण्याकरितां पहिली गोष्ट करणें आवश्यक आहे कीं या टोळीवाल्यांशीं आपण मैत्री-संबंध जमविले पाहिजेत. त्यांना आपलेंसें करून घेतलें पाहिजे. त्यांच्यांत आपणा-विषयीं विश्वास निर्माण केला पाहिजे. हिमालयाच्या संरक्षणांतील हें पहिलें पाऊल होय. कारण हे टोळीवाले आपले मित्र बनले, भारताशीं समरस झाले, तर हिमालया-पलिकडून येणाऱ्या कोणत्याही आक्रमणाला तोंड देण्यास ते स्वतःच सिद्ध होऊन राहतील.

मॅकमोहन रेषा ही भूतानच्या नॉर्थ ईस्ट कॉर्नर पासून आसामचे नॉर्थ ईस्ट कॉर्नरपर्यंत आहे. परंतु या रेषेच्या आंत तिबेटची वस्ती येते. व तो तिबेटच्या मालकीचा प्रदेश आहे. असा दावा चीन आतां मांडू लागला आहे. अलिकडे तिबेट चीनचे अधिराज्याखालीं आल्यानें तो तिबेटचा भाग म्हणजेच आपला भाग असें चीननें पर्यायानें म्हणणें मांडलें आहे. हा प्रदेश लहानसहान नसून त्याचें क्षेत्रफळ बारा हजार चौरस मैल आहे. १९२१ साली कम्युनिझम चीनमध्यें शिरला व १९४९ सालीं त्यानें आपले अक्राळ विक्राळ स्वरुप जगाला दाखविण्यास सुरुवात केली. लडाख समुद्रसपाटीपासून सतरा ते साडेसतरा हजार फूट उंच आहे व नेफा विभाग सरासरी चौदा ते साडेचौदा हजार फूट उंच आहे. अर्थातच नैसर्गिक दृष्ट्या तेथें सतत सैन्य ठेवणें अशक्यच आहे. तथापि आपल्या जवानांनीं गेल्या वर्षी शत्रूशीं ज्या हिरिरीनें लढा दिला त्याच हिरिरीनें यापुढें येणाऱ्या कुठल्याही आणि केवढ्याही बलाढ्य शत्रूशीं सामना देऊन आजवरच्या आपल्या संरक्षक हिमालयाचें कृतज्ञता बुद्धीनें संरक्षण करणें हें आपलें परमपवित्र कर्तव्य आहे.

६

# सद्यःकालीन हिमालय

## डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे

फार प्राचीन काळापासून हिमालयाला यज्ञभूमि, ऋषिमुनि, गंधर्व, देवदेवता यांची भूमि म्हणून आपण ओळखत आलों आहोंत. पण आज. मात्र मानवजातीच्या शत्रूनें व्यापलेल्या भूमीवर ज्या कथा घडत आहेत त्या शोककथा आहेत. जी हिडीस कृत्यें चालू आहेत ती अमानुष, राक्षसी कृत्यें आहेत. प्रत्येक राष्ट्रांत दंडसत्ता अधिक प्रधान मानली जाते. वैयक्तिक व्यवहारांना, परस्परांतील व्यापाराला, मैत्रीच्या देवाणा-घेवाणीला मर्यादित स्थान असतें. आपापल्या स्वभावास, प्रकृतीस व अभिरुचीस अनुसरून प्रत्येक जण व्यवहार करीत असतो. यालाच रूढ, जुन्या भाषेंत धर्म म्हणतात. नवीन भाषेंत तत्त्वज्ञान या नांवानें याचा व्यवहार होतो. हें तत्त्वज्ञान बरेंचसें त्या त्या राजकीय परिस्थितीवर अवलंबून असते.

१९४७ सालीं आपण स्वतंत्र झालों. पण लागलीच दोन महिन्यांनीं काश्मीरची समस्या आपल्यापुढें निर्माण झाली. या समस्येवर लॉर्ड माउंट बॅटन यानें आपलें स्पष्ट मत व्यक्त केलें होतें कीं, काश्मीर हा हिंदुस्थानचा व पाकिस्तानचा अंतर्गत

प्रश्न आहे, तो त्यांनीं आपापसांतच सोडवावा. प्रजा जरी बहुसंख्य मुसलमान असली तरी, महाराजा हिंदुच होता. काश्मीर हा भारताचाच भाग आहे व तो भारतातच सामील करा अशा प्रकारच्या सामीलनाम्यावर महाराजांनीं सही देखील केली होती. पण भारताचे अनिश्चित धोरण ह्या सामीलनाम्यास भोंवले. हा सामीलनामा तात्पुरता असून त्यावर नंतर सार्वमत घेतलें जाईल, अशी भूमिका आपल्या राज्यकर्त्यांनीं घेतली आणि त्याच्या समर्थनार्थ ' हिंदुस्थानची निष्ठा ही लोकशाहीची निष्ठा आहे आणि म्हणूनच आपण ही सार्वमताचीं घोषणा केली. ' असें सांगण्यांत आलें.

पाकिस्ताननें काश्मीरवर सैन्य धाडलें. तेथें त्यांनीं नाना अत्याचार केले. हिंदूंचा छळ केला आणि कोणत्याही संस्कृतीला न शोभणारी हिडीस कृत्यें केलीं. त्यावर आपण काय प्रतिक्रिया केली ? फक्त निषेध खलिते पाठविले. कारण हें एकच अस्त्र आपल्यापाशीं आहे. पण आजच्या जगांत या बिनधारी अस्त्राचा कांहीं एक उपयोग नाहीं. आपली लोकशाहीची निष्ठा, शांतता-वाद, निषेध खलिता पाठविण्याचें धोरण हे सर्व आपले आपल्यालाच घातक ठरूं लागलेलें आहे. वास्तविक काश्मीर प्रकरणांत हस्तक्षेप करण्याचा युनोचा कांहींच अधिकार नव्हता.

१ जानेवारी १९४९ रोजीं हिंदुस्थान व पाकिस्तान यामधील युद्धतहकुबी रेषा आंखली गेली. तेव्हांपासून या वाटाघाटी, फेऱ्या, बैठकी आणि चर्चा सतत चालू आहेत. कारण आपल्या ठिकाणीं जी राजकीय निष्ठा घर करून बसली आहे ती जागतिक शांततेची निष्ठा आहे. त्यांत आपल्या राष्ट्राविषयीची, स्वार्थाची निष्ठा मात्र कोठेंही दिसत नाहीं. एवढी एकच निष्ठा सोडली तर आपल्यामध्यें बाकीच्या सर्व निष्ठा मात्र विपुल आहेत. आणि याच पार्श्वभूमीवर आपणास चीन व भारत यांच्या सद्यःकालीन संबंधावर कांहीं प्रकाश पाडता आला तर तसा प्रयत्न येथें करवयाचा आहे.

१९४९ सालीं चीन स्वतंत्र झाला व त्यानें तिबेटवर स्वारी केली. आणि सहजगत्या तो हस्तगतही केला व त्या वेळेपासून भारत आणि चीन यांमध्यें एक कायमची घोर समस्या निर्माण झाली. पूर्वी ब्रिटीश अमदानींत ल्हासा या ठिकाणीं भारताचा प्रतिनिधि ठेवण्यास भारताला मोकळीक असे. अर्थात् हा हक्क ब्रिटीशांनीं चायना व तिबेट यांचेकडून मिळविला होता. ल्हासा येथें आपल्या प्रतीनिधीबरोबर आपले सैन्य, आपले स्वतःचें पोस्ट व तार ऑफीस हेही ठेवण्याची मुभा होती. हिंदुस्थान सोडून जातांना ब्रिटिशांनीं सांगून ठेविलें होतें कीं भारतानें आपले उपरिनिर्दिष्ट हक्क केव्हांही सोडूं नयेत. नाहींतर चीन भारतावर आक्रमण करील. पण आपणाजवळ—भारतीयांच्याजवळ राष्ट्रीय स्वार्थ नसल्यामुळें इंग्रजांचें हें म्हणणें भारताला समजलें नाहीं व उमगलेंही नाहीं. पुढें पंचशील तत्त्वावर आरूढ होऊन त्या गोष्टींची जाणून बुजून उपेक्षा केली गेली. या प्रकरणींदेखील आपण युनोची मदत

घ्यावी असें आपल्या राजकर्त्यांना वाटलें. 'आम्हीं सार्वभौम आहोंत आम्हांला स्वतंत्र राष्ट्र म्हणून यूनोनें मान्यता द्यावी.' असा टाहो फोडण्यास तिबेटनें यूनोमध्यें सुरुवात केली. पण हा ठराव भारतानेंच हाणून पाडला. पूर्वी ब्रिटीशांनीं सर्व हक्क मान्य करून घेतलें असतांना आणि ते उपभोगिले असतांना चीनशीं मैत्री करण्याच्या उद्देशानें इंग्रजांनीं संपादिलेल्या सर्व हक्कांवर १९५४ सालीं आम्हीं उदक सोडलें. आपण तत्त्वांचे भोक्ते असल्यानें, लोकशाही प्रणालींना न शोभणाऱ्या सूचना अगर हक्क अंमलांत आणणें आपल्या स्वभावांत बसत नाहीं. केवळ भारतानें आपले हक्क गमावल्यानें व ब्रिटीशांनीं केलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष केल्यामुळें तिबेटवासीयांना परतंत्र व्हावें लागलें असें म्हटल्यास यत्किंचित्‌ही अतिशयोक्ति नाहीं. तिबेट परतंत्र झाल्याबरोबर दलाईलामास आपल्या आश्रयास यावें लागलें. व चीनसारखा एक बलाढ्य शत्रू आपणहून आपल्यावर ओढवून घेतला.

१९५४ सालीं पंचशील तत्त्वानुसार पहिला करार करण्यांत आला. या करारान्वयें कोणत्याही राष्ट्रानें दुसऱ्यावर आक्रमण करावयाचें नाहीं. नेपाळ हा स्वतंत्र होता. आणि सिक्किम व भूतान हे स्वायत्त होते. सुरवातीच्या काळांत चीननें मित्रत्त्वाचा बुरखा चांगला पांघरला होता. भारताला त्यानें पूर्ण विश्वासांत घेतलें व हळूहळू तो आप पायले पसरूं लागला. त्यानें पहिली उडी घेतली ती माऊंट एव्हरेस्टवर. त्याही गोष्टीकडे आपण दुर्लक्ष केलें. कारण आपणाला चीनची मैत्री संपादन करावयाची होती. उलटपक्षीं चीननें मात्र मैत्रीच्या धूळफेकीनें भारत डोळे मिटून बसला आहे हें पाहून १२,००० चौरस मैलापर्यंत आंत मुसंडी मारली. तेव्हां कुठें आपण जागे झालों. चीनचें हें कारस्थान पाहून ज्याचें मस्तकांत संताप येत नाहीं, ते राज्यकर्ते सामर्थ्यवान् नाहींत आणि मुत्सद्दीही नाहींत. भारवीनें म्हटलें आहे—

"अवंन्ध्यकोपस्य विहन्तुरापदां भवन्ति वश्याः स्वयमेव देहिनः ।
अमर्षशून्येन जनस्य जन्तुना न जातहार्देन न विद्विषाऽदरः ।"

नेफामार्गें आक्रमण होणार नाहीं असें म्हणणाऱ्या आमच्या संरक्षण प्रमुखांना रामदेवरावांची उपमा द्यावीशी वाटते. रामदेवरावाजवळ खजिना संपूर्ण भरलेला होता. तो त्याचा त्यालाच माहीत नव्हता. पण त्याचेपासून ७०० मैलांवर राहणाऱ्या अल्लाउद्दीन खिलजीला मात्र पूर्णपणें त्याचा सुगावा लागला होता. एक दिवस रामदेवराव नदीवर स्नानास चालले असतांना घोड्याचे टापांचा आवाज ऐकूं येऊं लागला आणि हां हां म्हणतां शत्रू त्याचेंसमोर येऊन उभा राहिला. नेमकी अशीच गत आमची आज झाली आहे. आपल्याला एखादा माणूस शत्रू वाटतो ना? मग त्याचेशीं आपण मैत्री करतां कामा नये. त्याच्यावर बिलकूल विश्वास ठेवतां कामा नये. महाभारत म्हणते, "अविश्वास हेंच खऱ्या राजनीतीचें सार." राजाला किंवा राज्यकर्त्याला आई, बाप, मुलें, मित्र कोणीही असत नाहीं. प्रजा हेंच त्याचें एकमेव

सर्वस्व. पण या उलट भारत मात्र जगन्मित्र आणि अजातशत्रू धर्मराज युधिष्ठिराच्या रथाच्या मार्गानें जात असून आपण सर्व भारतीय निःशंक मनानें त्यांतून संचार करीत आहोंत. या अतिरेकी विश्वासाचा चीननें मात्र पूर्णपणें फायदा उठवला.

' कम्युनिस्ट राष्ट्रें व साम्यवादी तत्त्वानें चालणारीं राष्ट्रें दुसऱ्या राष्ट्रांवर आक्रमण करीत नसतात आणि म्हणूनच साम्यवादी चीनराष्ट्र देखील भारतावर आक्रमण करणार नाहीं. ' या मूलभूत भ्रांत कल्पनेमुळें आपला पुढें सर्व सत्यानाश झालेला दिसून येतो. आपण या तत्त्वाची पुरी छाननी केली नाहीं, किंवा त्या तत्त्वानुसार व्यवहारांत प्रत्यक्ष घडतें काय हेंही पाहिलें नाहीं. दूर दृष्टीचा अभाव व पूर्णपणें व्यवहारी जीवनापासून दूर अशा स्वप्नाळू व कल्पनासृष्टींत आपण वावरत असल्याचें आपणांस अनेक वेळां प्रत्ययास आलें आहे.

वस्तुस्थिति अशी आहे कीं, स्वतंत्र झाल्यापासून चीननें आक्रमण आणि स्वारी यांशिवाय दुसरें कांहींच केलें नाहीं. चीननें भारतावर १९५५ सालीं प्रथम आक्रमण केलें. पण भारताचे डोळे उघडले मात्र १९६२ सालीं. म्हणजे पुरी सात वर्षें शत्रूचें आक्रमण दिसण्याकरितां आपणांस घालवावीं लागलीं ! आपलें अज्ञान, उपेक्षा, दुर्लक्ष आणि आत्यंतिक औदार्य हेंच भारताचें खरे शत्रू आहेत. राष्ट्रीय स्वार्थ जाणणें हा राजनीतीचा खरा अर्थ व मंत्र. राष्ट्रनिष्ठा असावी आणि तीही आपल्या राष्ट्रापुरतीच मर्यादित असावी. इतर राष्ट्रांशीं व्यवहार करतांना तिचा कांहींही उपयोग होत नाहीं. इतर राष्ट्रांबरोबर वागावयाचें म्हणजे कडवेपणा घेऊन वागलें पाहिजे. आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर चीन दोन वर्षांनीं स्वतंत्र झाला पण त्यानें आपल्याही पुढची मजल गांठली आहे. आज तो आपल्यापेक्षांही सामर्थ्यवान् आहे. कारण दण्डसत्ता हाच खऱ्या राजनीतीचा आधारमंत्र आहे आणि तो चीननें पूर्णपणें आत्मसात् केला आहे.

**युद्धाचें नैतिक अधिष्ठान :**

पूर्वी धारातीर्थ ही युद्धाला संज्ञा होती. पण त्या धारातीर्थाची सामाजिक प्रतिष्ठा मात्र आज नष्ट झाली आहे. युद्ध म्हणजे कसाईखाना. युद्ध करणें हा दुबळ्यांचा धर्म आहे वगैरे अतिरेकी व आत्यंतिक तत्त्वांचा आपण अंगीकार केला. त्यामुळें युद्धाचे नैतिक अधिष्ठान आपण गमाऊन बसलों. मानसिक दृष्ट्या आज आपण इतके कमकुवत बनलों आहोंत कीं युद्धाला पूर्वीची धारातीर्थाची प्रतिष्ठा परत प्राप्त करून देण्यास बराच कालावधी लागेल.

सद्यःस्थितींत हिमालयाचें संरक्षण करावयाचें झालें तर व्यासानें व श्रीकृष्णानें महाभारतांत सांगितलेल्या तत्त्वज्ञानाचें अवलंबन केलें पाहिजे. कारण धर्म स्वतः समर्थ नसतो. वेली जशी झाडाच्या आश्रयानें रहात असतें तसाच धर्म हाही बलाचें आश्रयानें रहात असतो. हें तत्त्वज्ञान बिंबऊन घेण्याची आज वेळ आली आहे.

७

# हिमालयातील मानववंश व कांहीं जमाती

डॉ. य. भा. दामले

हिमालयावर रहाणारा मानव-वंश मिश्र धर्माचा, मिश्र जातीचा व मिश्र संस्कृतीचा बनलेला आहे. त्याला मुख्यत्वें कारण त्या त्या भागांतील भौगोलिक परिस्थिति आहे. महासागरास ज्याप्रमाणें अनेक लहान नद्या येऊन मिळतात, त्याप्रमाणें हिमालयाच्या पायथ्याशीं दऱ्याखोऱ्यांतूनहि मानव जातीचें अनेक वंश या ठिकाणीं येऊन राहिलेले दिसतात. परंतु आतां मात्र त्यांना स्वतःचें अस्तित्व राहिलेलें दिसत नाहीं. अनेक शतकें नित्य संबंध येत गेल्यामुळें त्यांच्यातील समाज रचनेवर, आर्थिक व्यवहारावर, कुटुंब पद्धतीवर आणि नित्याच्या चालीरीतीमध्यें आतां पुष्कळसा सारखेपणा दिसून येतो.

हिमालयावर राहणाऱ्या लोकांत प्रामुख्यानें दोन वंश दिसून येतांत. (१) ओरिएंटल, ज्यास आपण पौर्वात्य म्हणतो व (२) तिबेटी–मंगोलियन हे ते वंश होत. पण या दोहोंपैकीं आतां कोणीहि वंशशुद्धि सांगू लागला तर तें हास्यास्पदच ठरेल. संकरामुळें आणि अनेक आघात प्रत्याघातांनीं दोन्हीहि वंश एकमेकांत अगदीं मिसळून गेले आहेत. संस्कृति, आचार, रूढी या तर केव्हांच समान झाल्या. पण

प्रत्यक्ष वंशशास्त्राप्रमाणेंहि आकार, वर्ण इत्यादि ठळक आनुवंशिकतेच्या खुणाहि अगदीं सरमिसळ होऊन त्यांनीं तेथें एक स्वतंत्रच असा आपला नवीन आकार निर्माण केला आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. या नवीन समाजाचे आचार-विचार व संस्कृति हिंदु संस्कृतीस अधिक जवळच्या आहेत. तथापि तेथील बहुसंख्य लोक मात्र आपल्याकडील कांहीं लोक ज्याप्रमाणें अद्यापि आपण खुद्द रामचंद्राच्या वंशाचे आहोंत आणि त्याहि पलीकडे जावून प्रत्यक्ष चंद्रकुल किंवा सूर्यकुल आपलें असून आपला वंश अद्यापि शुद्ध रक्ताचा आहे असें मानतात, त्याप्रमाणें तेथील कांही समाजही आपण अद्यापि मंगोलियन वंशाचे आहोंत असें मानतात. याचें उदाहरण म्हणून आपणास नागा लोकांचे देतां येईल. वस्तुस्थिति मात्र तशी नाहीं.

येथील समाजांत पितृसत्ताक कुटुंबपद्धतीप्रमाणें कांहीं ठिकाणीं मातृसत्ताक कुटुंब-पद्धतीही दिसून येतें. पितृसत्ताक कुटुंबपद्धति असलेल्या समाजांत स्त्रियासुद्धां विकत घेतल्या जातात. प्रत्यक्ष स्वतःची बायकोही विकली जाते. पण कांहीं गोष्टींत तिला पुरुषाइतकेंच महत्त्व आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

खासा ही जमात हिमालयांतील सर्व जमातीमध्यें महत्त्वाची समजली जाते. पण त्यांची देवळाविषयी कल्पना मात्र विलक्षण आहे. काठीला झेंडा लावून ती रोवली कीं त्याचें देऊळ तयार होतें. इतर जमातीप्रमाणें ही देखील भटकी जमातच आहे. डेहराडून जिल्ह्यांत त्यांची मुख्य वस्ती आहे. शेतीच्या बाबतींत यांच्यांत पुष्कळ सुधारणा झालेली दिसून येते. त्यामुळें यांचे जीवनास थोडेसें स्थैर्य प्राप्त झालेलें आहे. त्यांच्यातील बहुपतित्वाची परंपरा पांडवांपासून आली आहे व म्हणून आपण पांडववंशीय आहोंत असा त्यांचा समज आहे. त्यांच्याही ब्राह्मण व क्षत्रीय अशा दोन जाती आहेत. पण इतरांप्रमाणेंच येथेंही वंशशुद्धि नाहींच. रोटी व बेटी व्यवहार सर्वांचा होतो. पण बोग ही जमात मात्र अस्पृश्य समजली जाते. त्यांना अगदीं खालचा दर्जा देण्यांत येतो. खरें म्हणजे ते गुलामच होत. यांच्यात अनेक स्त्रियांशीं विवाह करणें हें सर्रास रूढ आहे. कांहीं ठिकाणीं मोठ्या बायकोला श्रेष्ठ स्थान देण्यांत येतें पण वारसा हक्क पुरुषांना किंवा मुलांनाच मिळतो. तो हक्क स्त्रीला नाहीं. या जमातीमध्यें सामाजिक नीति-नियमांचें फारसें प्रस्थ नाहीं. स्त्री-पुरुषांचें संबंधांतहि कडक निर्बंध नाहींत.

भोटिया ही जातसुद्धां या भागांत महत्त्वाची समजली जाते. आलमोडा जिल्ह्यांतहि यांची वसाहत दिसून येते. पण हिमालयांत राहणारे भोटिया व आलमोडांत राहणारे भोटिया यांत बराच फरक आहे. यांच्यांत स्त्रियांविषयीं आदर दिसून येतो. जमात भटकी असली तरी उंच भागांत राहण्याकडे त्यांचा अधिक कल आहे. उंच भागावर राहणाऱ्या स्त्री-पुरुषांच्यामध्यें व्यक्तिस्वातंत्र्य पूर्णपणें दिसून येते. पण सखल प्रदेशांत रहाणाऱ्या लोकांत स्त्रियांवर निर्बंध लादण्याचा कटाक्ष दिसून येतो. भोटिया

७

# हिमालयातील मानववंश व कांहीं जमाती

डॉ. य. भा. दामले

हिमालयावर रहाणारा मानव-वंश मिश्र धर्मांचा, मिश्र जातीचा व मिश्र संस्कृतीचा बनलेला आहे. त्याला मुख्यत्वें कारण त्या त्या भागांतील भौगोलिक परिस्थिति आहे. महासागरास ज्याप्रमाणें अनेक लहान नद्या येऊन मिळतात, त्याप्रमाणें हिमालयाच्या पायथ्याशीं दऱ्याखोऱ्यांतूनहि मानव जातीचें अनेक वंश या ठिकाणीं येऊन राहिलेले दिसतात. परंतु आतां मात्र त्यांना स्वतःचें अस्तित्व राहिलेलें दिसत नाहीं. अनेक शतकें नित्य संबंध येत गेल्यामुळें त्यांच्यातील समाज रचनेवर, आर्थिक व्यवहारावर, कुटुंब पद्धतीवर आणि नित्याच्या चालीरीतीमध्यें आतां पुष्कळसा सारखेपणा दिसून येतो.

हिमालयावर राहणाऱ्या लोकांत प्रामुख्यानें दोन वंश दिसून येतात. (१) ओरिएंटल, ज्यास आपण पौर्वात्य म्हणतो व (२) तिबेटी–मंगोलियन हे ते वंश होत. पण या दोहोंपैकीं आतां कोणीहि वंशशुद्धि सांगूं लागला तर तें हास्यास्पदच ठरेल. संकरामुळें आणि अनेक आघात प्रत्याघातांनीं दोन्हीहि वंश एकमेकांत अगदीं मिसळून गेले आहेत. संस्कृति, आचार, रूढी या तर केव्हांच समान झाल्या. पण

प्रत्यक्ष वंशशास्त्राप्रमाणेंहि आकार, वर्ण इत्यादि ठळक आनुवंशिकतेच्या खुणाहि अगदीं सरमिसळ होऊन त्यांनीं तेथें एक स्वतंत्रच असा आपला नवीन आकार निर्माण केला आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. या नवीन समाजाचे आचार-विचार व संस्कृति हिंदु संस्कृतीस अधिक जवळच्या आहेत. तथापि तेथील बहुसंख्य लोक मात्र आपल्याकडील कांहीं लोक ज्याप्रमाणें अद्यापि आपण खुद्द रामचंद्राच्या वंशाचे आहोंत आणि त्याहि पलीकडे जावून प्रत्यक्ष चंद्रकुल किंवा सूर्यकुल आपलें असून आपला वंश अद्यापि शुद्ध रक्ताचा आहे असें मानतात, त्याप्रमाणें तेथील कांही समाजही आपण अद्यापि मंगोलियन वंशाचे आहोंत असें मानतात. याचें उदाहरण म्हणून आपणास नागा लोकांचे देतां येईल. वस्तुस्थिति मात्र तशी नाहीं.

येथील समाजांत पितृसत्ताक कुटुंबपद्धतीप्रमाणें कांहीं ठिकाणीं मातृसत्ताक कुटुंब-पद्धतीही दिसून येतें. पितृसत्ताक कुटुंबपद्धति असलेल्या समाजांत स्त्रियासुद्धां विकत घेतल्या जातात. प्रत्यक्ष स्वतःची बायकोही विकली जाते. पण कांहीं गोष्टींत तिला पुरुषाइतकेंच महत्त्व आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

खासा ही जमात हिमालयांतील सर्व जमातीमध्यें महत्त्वाची समजली जाते. पण त्यांची देवळाविषयी कल्पना मात्र विलक्षण आहे. काठीला झेंडा लावून ती रोवली कीं त्याचें देऊळ तयार होतें. इतर जमातीप्रमाणें ही देखील भटकी जमातच आहे. डेहराडून जिल्ह्यांत त्यांची मुख्य वस्ती आहे. शेतीच्या बाबतींत यांच्यांत पुष्कळ सुधारणा झालेली दिसून येते. त्यामुळें यांचे जीवनास थोडेसें स्थैर्य प्राप्त झालेलें आहे. त्यांच्यातील बहुपतित्वाची परंपरा पांडवांपासून आली आहे व म्हणून आपण पांडववंशीय आहोंत असा त्यांचा समज आहे. त्यांच्याही ब्राह्मण व क्षत्रीय अशा दोन जाती आहेत. पण इतरांप्रमाणेंच येथेंही वंशशुद्धि नाहींच. रोटी व बेटी व्यवहार सर्वांचा होतो. पण बोग ही जमात मात्र अपृश्य समजली जाते. त्यांना अगदीं खालचा दर्जा देण्यांत येतो. खरें म्हणजे ते गुलामच होत. यांच्यात अनेक स्त्रियांशीं विवाह करणें हें सर्रास रूढ आहे. कांहीं ठिकाणीं मोठ्या बायकोला श्रेष्ठ स्थान देण्यांत येतें पण वारसा हक्क पुरुषांना किंवा मुलांनाच मिळतो. तो हक्क स्त्रीला नाहीं. या जमातीमध्यें सामाजिक नीति-नियमांचें फारसें प्रस्थ नाहीं. स्त्री-पुरुषांचें संबंधांतहि कडक निर्बंध नाहींत.

भोटिया ही जातसुद्धां या भागांत महत्त्वाची समजली जाते. आलमोडा जिल्ह्यांतहि यांची वसाहत दिसून येते. पण हिमालयांत राहणारे भोटिया व आलमोडांत राहणारे भोटिया यांत बराच फरक आहे. यांच्यांत स्त्रियांविषयीं आदर दिसून येतो. जमात भटकी असली तरी उंच भागांत राहण्याकडे त्यांचा अधिक कल आहे. उंच भागावर राहणाऱ्या स्त्री-पुरुषांच्यामध्यें व्यक्तिस्वातंत्र्य पूर्णपणें दिसून येतें. पण सखल प्रदेशांत रहाणाऱ्या लोकांत स्त्रियांवर निर्बंध लादण्याचा कटाक्ष दिसून येतो. भोटिया

जमातीत एकदां बायको विकत घेतल्यानंतर तिला स्वातंत्र्य देण्यांत येत नाहीं. या समाजांत स्त्रीला अगदी निकृष्ट दर्जाचें स्थान देण्यांत येते. इतर जमातींच्या मानानें भोटिया लोकांचा तिबेटशीं निकटचा संबंध आला. यांचा देव महादेव व कैलास हें पवित्र तीर्थस्थान आहे. शंकर-पार्वतीची पूजा जमातींत फार रूढ आहे. पण त्यांतहि गंमत अशी कीं पूजा-अर्चा स्त्रीनें करावयाची. पण समाजांत मात्र तिला दासीचें स्थान. पुरुषाबरोबरीनें ती समाजांत वावरूं शकत नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 36880 वि: निबंध
क्रमांक 9551 नों दि 8/2/55

# हिमालयांतील वनस्पती, औषधी व खनिज संपत्ती

( कांहीं प्रमुख पिकें, प्राणी व पक्षी )

**डॉ. वि. आ. बेडेकर**

इतर विषयांप्रमाणेंच आयुर्वेदाच्या दृष्टीनेंहि हिमालयाचें फारच महत्त्व आहे. ज्या प्राचीन ऋषी-मुनींनीं लोककल्याणासाठीं आयुर्वेद शास्त्राची प्रथम चर्चा केली ते हिमालयांतच रहात होते. जमदग्नि, वसिष्ठ, कश्यप, भृगु, अत्रि, गौतम, भरद्वाज इत्यादि विचारवंत ऋषींनीं एकत्र येऊन या आयुर्वेद शास्त्राची प्रथम चर्चा हिमालयाच्या परिसरांतच केली व असें ठरविलें कीं सर्व ऋषींचे प्रतिनिधि म्हणून भरद्वाज ऋषींनीं इंद्राकडे जावें व आयुर्वेद शास्त्रांतील मूलभूत सिद्धान्त समजून घेऊन ते आपणा सर्वांस सांगावेत. सर्व ऋषींच्या विनंतीप्रमाणें महर्षि भरद्वाज इंद्राकडे गेले व सर्व आयुर्वेदाचें अध्ययन करून त्यांनीं आपल्या शिष्यांना तो शिकविला. भरद्वाज ऋषींच्या सर्व शिष्यांनीं आपण स्वतः प्रयोग करून स्वतंत्र स्वतंत्र अशा आयुर्वेद संहिता रचल्या. त्याच संहिता आज भृगु-संहिता, अत्रि-संहिता, जमदग्नि-संहिता, गौतम-संहिता इत्यादि नांवांनीं

प्रसिद्ध आहेत. विशेष असा कीं त्या सर्व संहिता हिमालयाच्या परिसरांतच रचल्या गेल्या असें आपण परंपरेप्रमाणें मानतो. हिमालयांतील औषधी, वनस्पती इत्यादींचे गुणधर्म व उपाययोजना या संहितांतून स्पष्टपणें सांगितल्या आहेत. या सदर्भात असा एक सिद्धांत मांडला जातो कीं —

हिमवद्‌विन्ध्यशैलाभ्याम्
प्रायो व्याप्ता वसुंधरा ।
सौम्यं पथ्यं च तत्राद्यम्
आग्नेयं वैन्ध्यमौषधम् ॥

अर्थ :—ही सर्व पृथ्वी ( भारत वर्ष ) हिमालय व विन्ध्य पर्वतानें व्यापलेली आहे. हिमालय पर्वतांतील औषधी, सेवनास सौम्य, शीतवीर्य व पथ्यकारक असतात. तर विन्ध्याद्रीवरील औषधी गुणानें उष्णवीर्य व अग्निप्रदीपक असतात.

या दृष्टीनें विचार करतां हिमालयांतील औषधींच्या संबंधांत आपल्याकडे फार प्राचीन काळापासून अति सूक्ष्म दृष्टीनें विचार झालेला दिसून येतो. आज त्यांची माहिती आपणांस परंपरेनें, ग्रंथांतरांतून किंवा गुरुमुखानें जेवढी उपलब्ध होऊं शकते तेवढीच आपणाजवळ खरी आहे. शक्य ती माहिती खाली देत आहे.

या ठिकाणीं वनस्पती, औषधी व खनिज संपत्ती यांची माहिती देतांना त्याच्या अनुषंगानेंच हिमालयांत वहाणाऱ्या प्रमुख नद्या, कांहीं प्रमुख पिकें, प्राणी, पशुपक्षीं यांचीहि अगदीं स्थूल मानानें माहिती दिलेली आहे. तीहि महत्त्वाची वाटल्यावाचून रहाणार नाहीं.

**वनस्पती व औषधी** : ( कंसांतील नांवें स्थळांचीं. )

| | | | |
|---|---|---|---|
| अडुळसा | अतिविष | अरणी | आक्रोड |
| आघाडा | आम्रवृक्ष-वन ( चिडा, गोरन्या ) | आवळा | इसबगोल |
| ऊस ( आरकोट ) | ऋषभक | एलवालुक | ओक ( मायावती ) |
| ओवा ( मायावती ) | कचोरा | कढीलिंब | कस्तुरी |
| काकडशिंगी | काकोली | कायफळ | कांचन |
| किरमाणी ओवा | किराईत | कुटकी | कुमारी |
| कुष्ठ | केळीं ( जंगली ) ( गोरन्या ) | कोरांटी | कंदळ |

| | | | |
|---|---|---|---|
| क्षीरकाकोली | खुरसानी ओवा ( मायावती, पिठोरागड ) | | गुलाब–गुलाबी ( जंगली ) |
| गुलाब–तांबडा ( जंगली ) | गुलाब–पांढरा ( जंगली ) | गुलाब–पिवळा ( जंगली ) | गुळवेल |
| गोरोचन | ग्रंथीपर्णी | चाकवत | चित्र |
| चिरफळ | चिलारी ( भोट ) | चीड ( धारी, पिठोरागड ) | चुका |
| जटामांसी | जीवक | टाकळा ( भोट ) | टेंडू |
| तगर | तमालपत्र | तालिसपत्र ( पिठोरागड ) | तेजबळ |
| दारुहळद | देवदार ( देवीधुरा, धुनाघाट व मायावती ) | धमासा ( देवीधुरा ) | धायटी |
| नखला | नागपुष्पी | नागरमोथा ( मायावती ) | निम्ब |
| निलगिरी | निरगुंडी ( भोट ) | निवडुंग ( देवीधुरा ) | पाईन ( धारी, मायावती व छीडा ) |
| पाडळ | पारिजात | पांगारा | पित्तपापड |
| पिंपळ | पीतचंद | पुदिना | पुनर्नवा |
| पोखरमुळ | बचनाग | बावची | बाहवा ( पिटोरगड ) |
| बांबू | वेल | बोर ( देवीधुरा ) | ब्रह्मदंडी |
| ब्राह्मी | भारंगमूळ | भांग | भूर्जपत्र |
| मखई | महानिम्ब | महामेदा | मुंढवा धान्य ( पिटोरगड ) |
| मुसळी | मोदा | मोरशिखा | रास्ना |
| रोडंडम ( मायावती ) | लोध्रा | वटवृक्ष | वावडिंग |
| वाळा ( मायावती ) | विदरीकंद | विंचवाचें झाड | विषविषाण |
| वेखंड | शतावरी | शालवृक्ष ( भोट ) | शिककाई |

| | | | |
|---|---|---|---|
| शिलाजीत | शिवण | शेवाळे | सरळ |
| साग | सागवान | सातवीण | सोमवल्ली |
| ( धुनाघाट, मायावती ) | | | |
| हपुवा. | | | |

**[1]खनिज संपत्ति :**

| | | | |
|---|---|---|---|
| अभ्रक | गेरु | टाकणखार | चुना |
| सैन्धव | सोनें | | |

**काहीं पिकें :**

| | | | |
|---|---|---|---|
| ऊस | कोद्रा | गहूं | जव ( सातू ) |
| तांदूळ | नाचणी | फापरा | मकई |
| मुंढवा | राजगिरा | | |

**कांहीं पक्षी :**

| | | | |
|---|---|---|---|
| कावळा | कावळ्यासारखा पक्षी | काळा पीलक | काळ्या चिमण्या |
| कृष्ण बलाक | कंपनकर | खडकी गप्पीदास | गिधाड |
| चास | चांदकोर | टीट | दयाळ पक्षी |
| पाकोळी | पाणकावळा | पावशा | पोपट |
| बुलबुल | शिंगचोच्या | हंस पक्षी | |

**जंगली प्राणी :**

| | | | |
|---|---|---|---|
| अस्वल | उंदीर ( रानटी ) | कुत्रें | खेंचर |
| खोंड ( बैल ) | गाढव | गाय | घोडा ( रानटी ) |

१. आधुनिक भौतिक विद्यांचा प्रसार हिमालय प्रदेशांत फार कमी असल्यानें व पुष्कळ ठिकाणीं हिमालय अतिशय ठिसूळ असल्यानें खनिज पदार्थांची माहिती व त्यांचें उत्पादन याकडे विद्वानांचें फार थोडें लक्ष गेलेलें दिसतें. संशोधनानंतर वरील खनिज संपत्ती अधिक प्रमाणांत निश्चित सापडेल व नवीन खनिजेंहि सांपडण्याचा पुष्कळ संभव वाटतो. —संपादक.

| | | | |
|---|---|---|---|
| झुबु | तट्टे | नीलवानर | फिया |
| मसे | माकड | म्हैस | याक |
| वनगाय | वाघ | शेळ्या-मेंढ्या | हत्ती ( जंगली ) |
| हरीण ( कस्तूरी मृग ) | हरीण ( भुंकणारे ) | हरीण तिबेटी | हिमचित्ता |

**कांहीं प्रमुख नद्याः**

कनीली　　　　कमलाबाल्न　　　　कोसी

गंगेचे प्रवाह

[ अलकनंदा; कालीगंगा; गंगा; गोरी गंगा; मंदाकीनी, शरयुगंगा. ]

| | | | |
|---|---|---|---|
| गंडक | घोग्रा | जयन्ती | तिंकर |
| पानाड | बागमती | ब्रह्मपुत्रा | यमुना |
| शोण | सतलज | सिंधु | |

[ **टीप :** प्रत्यक्ष हिमालयांत जाऊन स्वतः वनस्पती शोधून त्यावर प्रयोग किंवा संशोधन करून आपणापुढें ते मांडण्याचें कार्य फारसें कोणी केलेलें नाहीं. किंबहुना तो एक दुर्लक्षिलेला व उपेक्षेचा विषय झालेला आहे, यांत शंका नाहीं. तथापि या सदर्भात जी जी माहिती ज्या ज्या मार्गानें आजपर्यंत आपणाकडे आली व यथावत् श्रद्धेनें जतन करून आपल्या पूर्वजांनीं जी आपणांस सांगितली वा लिहून ठेवली ती माहिती किमानपक्षीं आपण लोकांच्यापुढें ठेवावी याच उद्देशानें डॉ. वेडेकर यानीं वरील माहिती संकलित केली आहे.

आजच्या परिस्थितींत निरनिराळ्या बाजूंनीं हिमालयाचें अंतरंग व बहिरंग शोधीत असतांना व भारताचे हिमालयाशीं फार प्राचीन काळापासूनचे सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक संबंध जोडत असतांना या सर्व संबंधांची एकात्मता दाखविण्यासाठीं आयुर्वेद शास्त्राची हिमालयांतील परंपरा आपणांस फार उपकारक ठरणार आहे. दिलेली सर्व माहिती स्वतः संशोधन करून किंवा प्रत्यक्ष पहाणी करून मांडलेली नसल्यानें त्यांत क्वचित् प्रसंगीं कांहीं बाबतींत मतभेद होण्याचाहि संभव होणार नाहीं, असें नाहीं. तथापि अधिकारी लेखक व प्रमाणभूत ग्रंथ यांच्या आधारें ही माहिती लेखकांनी दिली असल्यामुळें सर्वसामान्यपणें त्या बाबतींत मतभेदास जागा रहाणार नाहीं असें वाटतें.—संपादक. ]

१

# हिमालय आणि अध्यात्म

डॉ. पु. श्री. भट

नास्तिक मनुष्य देवाला नमस्कार करीलच असें नाहीं. पण हिमालयाचें विशाल, भव्य आणि विलोभनीय स्वरूप पाहून मात्र प्रत्येक प्राणिमात्राचें—मग तो आस्तिक असो अगर नास्तिक असो—हात जोडले जातीलच. नगाधिराज हिमालय जातीला स्थान देत नाहीं, धर्माला ओळखत नाहीं, पंथ-संप्रदाय जाणत नाहीं. कोणाहि आबालवृद्धांनीं, गरीबश्रीमंतांनीं हिमालयाच्या कुशीचा आश्रय घ्यावा आणि त्याच्या अवाढव्य शरीरावर हजारों वर्षांपासून कोरून ठेवलेलें जीवन-दर्शन वाचावें, त्याच्या गिरीकुहरांतून हजारों वर्षें निनादत असलेलें ॐकारध्वनि ऐकावेत आणि आपलें ऐहिक जीवन कृतकृत्य झाल्याचें समाधान मिळवावें. पण ज्या भक्ताची दृष्टि अन्तर्मुख असेल त्यालाच तें माहात्म्य दिसूं शकेल, ते ध्वनी ऐकूं येतील. सूक्ष्म, अन्तर्मुख, आत्मनिष्ठ दृष्टीशिवाय विशाल सम्पन्न सृष्टीचें अथांग दर्शन घडत नाहीं.

पांढरीं शुभ्र हिमशिखरें हिमालयाचे मुकुटमणिच होत. नितान्त रमणीय, पवित्र व गगनचुंबीं असंख्य शिखरें हजारों वर्षें ऋषि-मुनींचें आश्रम झाले आहेत. त्यांचें

स्मरण होतांच हजारों वर्षांची ऋषि-मुनींची, संत-महंतांची, असंख्य साधकांची अखण्ड परंपरा आपल्या डोळ्यांपुढें उभी रहाते. पवित्र वातावरण आसमंतांत घुमूं लागतें आणि खऱ्या अन्तरंगाच्या दर्शनाची ओढ अधिकच वाढते. हिमालयाचें बहिरंग कितीहि आकर्षक, निसर्गसौंदर्यानें भरलेलें असलें आणि प्रत्यक्ष तीनहि जगतांतील सौंदर्य एकवटून दाखविण्याचें सामर्थ्य त्याच्यांत असलें तरी तें बहिरंगच होय. हिमालयाचें अंतरंग जाणून घेतल्याशिवाय हिमालयाचा खरा साक्षात्कार व ऋषि-मुनींच्या आत्म्याचें यथार्थ दर्शन घडणार नाहीं.

फार प्राचीन काळापासून हिमालयांत तपस्विजनांची परंपरा अव्याहतपणें चालू आहे. ब्रह्मदेवाच्या पुत्रानें येथेंच तपश्चर्या केली. ज्याला आपण आद्य मानव मानतों त्या मनूनें प्रलयकाल प्राप्त झाला असतां याच नगाधिराजाचा आश्रय घेऊन तपः-साधना केली. पुराणकाळांतील राम-कृष्ण किंवा अगदीं आधुनिक स्वामी रामतीर्थ, स्वामी विवेकानंद, समर्थ रामदास स्वामी इत्यादींच्या तपःसाधनेची देखील हीच भूमि होती. या हिमालयाच्या पवित्र भूमीवर पाऊल पडतांच तेथील वातावरणाचा मनावर मंगलमय प्रभाव पडतो. सुरवातीसच त्यानें मन अगदीं प्रफुल्ल व टवटवीत बनतें. साधक त्याच्या सामर्थ्यावर मार्गांत येणाऱ्या असंख्य अडचणींना न जुमानतां अंतरंगांतच प्रवेश करीत पुढें जात असतो. अंतरंग हें जितकें कठीण व जितकें जटिल आहे तितकेंच बाह्यांग देखील, समजण्यास, ओळखण्यास कठीण आहे. पण अंधळ्यालाहि दृष्टि प्राप्त करून देण्याची ज्याची शक्ति आहे, त्याच्या अगाध शक्तीनें आपण तो कठीण भाग देखील सहज आकलन करूं शकतो. अध्यात्मानें जो निरुपम आनंद व जें शाश्वत सुख प्राप्त होतें, तें इतर अन्य गोष्टींनीं प्राप्त होऊं शकणार नाहीं. आपले सर्व प्रयत्न, आपली सर्व धडपड, सुखासाठींच असते; व त्यासाठीं सर्व जगताचें परिभ्रमण करण्यासही आपण तयार असतों. पण खरें सुख मात्र आपल्या-मध्येंच सामावलेलें आहे, हें लक्षांत येत नाहीं. " तुझे आहे तुजपाशीं, परि जागा चुकलाशी " अशी फसगत दुर्दैवानें मानवाची झालेली आहे.

" सर्व सोडोनी शोधा मजला " असें देवानेंच प्रत्यक्ष सांगितलें आहे. देवाची आज्ञा आपण ऐकली असती तर आपल्याला खऱ्या सुखाचा लाभ झाला असता. एखादी बाह्य वस्तु मिळाल्यानें होणारा आनंद किती काळ टिकतो ? तो आनंद अगदींच क्षणभंगुर असतो. दुसऱ्याच क्षणीं आपल्याला त्याचा वियोग जाणवतो. मग ज्याचा वियोग होणार नाहीं अशी वस्तु आहे का ? अध्यात्म म्हणते आहे. आणि ती वस्तु म्हणजे 'मी'. आपल्याला आपला वियोग कधीं झाला आहे कां ? किंवा होईल कां ? आपल्याला साक्षात्कार झाल्यामुळें दुःखाची प्रचीति येईल का ? नाहीं. त्यापासून आनंदाचाच लाभ होईल. आणि तो आनंद अक्षय्य असेल ! चराचर सृष्टींत भरून जाणारा तो आनंद असेल ! ! आपण जगांतली प्रत्येक वस्तुही कदाचित् मिळवूं शकूं. पण आपण आपणालाच मिळविलें नाहीं तर पुष्कळ मिळविलेल्या मूल्यवान्

वस्तूंचीहि किंमत शून्यच ठरेल. आपले ऋषि-मुनी अनंत काळ हेंच सांगत आले आहेत.

आपण दगडांत परमेश्वराचें स्वरूप पहातो. पण असा फत्तरहि निर्गुण ब्रह्माची वाट दाखवितो. सगुणांतून निर्गुणाकडे आणि मूर्तीच्या द्वारें अमूर्ताकडे जाण्याची आपल्या ऋषि-मुनींची शिकवण आहे. साप, वाघ, सिंह आदि हिंस्र पशुमध्येंहि सगुण ब्रह्माचें रूप पहावयास हिमालय शिकवितो. आणि त्यांच्यावर प्रेम करीत करीतच साधकांना अनंतांत, शाश्वतांत नेऊन सोडण्याचें कार्य आजवर हिमालयानें केलेलें आहे. अशा हिमालयांतील तपोभूमि कशी आहे हें आपण पाहूं.

बाणासुराची मुलगी उषा हिनें तप केल्यावरून आज प्रचलित असलेलें उखिमठ हें नामाभिधान प्राप्त झालेलें तपोवन याच हिमालयाच्या कुशींत आहे. इक्षाकु कुलांतील मांधाता राजा यानें येथेंच तपःसाधना केली. एका दिवसांत पृथ्वी पादाक्रांत करणारा राजा म्हणून मांधात्याची ख्याति आहे. तुंगनाथ हा घनदाट झाडीचा प्रदेश होय. पण वर वर चढत जातांना झाडी अगदीं विरळ होत जाते. तपःसाधनेला ही जागा अतिशय योग्य अशी वाटते. या भागांत पंचाहत्तर – ऐंशी फूट उंच असलेले वृक्ष दृष्टीस पडतात. अनेक हिंस्र पशु व श्वापदेंही तेथें आहेत. पण त्यांच्यापैकीं एकही जण इजा करीत नाहीं. सर्वत्र गंभीर व शांत असें वातावरण आहे. हिरवेंगार वैभव सर्वत्र पसरलेलें दिसतें. झाडांचे बुंधे आणि फांद्या देखील हिरव्यागार दिसाव्यात म्हणून परमेश्वरानें त्यांना शेवाळ्यानें झाकून टाकलें आहे. शेवाळ्याच्या पारंब्या कांहीं ठिकाणीं लोंबत असल्याचें दिसून येतें. याच्याच वरच्या बाजूस गोपेश्वर स्थान आहे. शंकरानें मदनाला येथेंच जाळलें. व्यासानीं अष्टादश पुराणें येथेंच सांगितलीं. तीं पुराणें व्यासांनीं ज्या लतेखालीं बसून लिहिली तिचें नांव कल्पलता. येथें गणेशाचें देऊळ आहे. गुरुगोविंदसिंगानें ज्या ठिकाणीं तपश्चर्या केली, तें हेमकुंड सरोवर याच परिसरांत आहे. अशा ठिकाणीं नास्तिकांतल्या नास्तिकालासुद्धां तपःसाधना करून आत्मसाक्षात्कार करून घ्यावा किंवा मोक्षप्राप्ति करून घ्यावी असें वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

आतां बद्रिनाथाचें तीर्थ पाहूं. पवित्र गंगामातेचा उगम येथेंच आहे. तें उगमस्थान पाहून मन कृतकृत्य होतें. दोन पर्वत एकमेकास चिकटून उभे असून त्यांतून गंगामाईचा उगम आहे. त्या दोन पर्वतांना नर व नारायणी अशी नांवें आहेत. हीं नांवें देखील दोन ऋषींचींच आहेत. याच परिसरांत भगवान् रामचंद्रांनीं बांधलेलें वीरमारुतीचें देवालय आहे असें श्रद्धावंत लोक मानतात. सीमेवरील माना गांव हे याच्याच परिसरांत आहे. त्यापुढें व्यास-गुंफा असून या गुंफेंत बसूनच व्यासमहर्षींनीं महाभारत लिहिलें असें मानतात. या वातावरणांत व या परिसरांत तपःसाधना करण्याची बुद्धि कोणास बरें होणार नाहीं ?

या तपःसाधनेंतील कांहीं वैशिष्ट्यें मात्र आपण लक्षांत घेतलीं पाहिजेत. कर्मेंद्रियावर ताबा ठेवला असतां तपःसाधना लवकर सफल होते. मनःसंयम किंवा कर्मेंद्रियावरील ताबा ही गोष्ट कठीण खरी ! पण हिमालयाच्या कुशींत शिरल्यानंतर मात्र वातावरणाच्या प्रभावानें, ऋषिमुनींच्या तपश्चर्येच्या सामर्थ्यानें आणि अज्ञेय अशा शक्तीच्या आधारानें ही गोष्ट सुलभ होते. आपली अवखळ इंद्रियें हिमालयाचे परिसरांत आपोआपच संतृप्त झाल्याप्रमाणें शांत होतात. फार प्राचीन काळच्या देवदेवतांच्या कथा किंवा ऋषि-मुनींच्या तपःसाधना यांनीं तर हिमालय अनंत काल दुमदुमून गेलाच आहे. परंतु आजहि शेकडों नव्हे हजारोंच्या संख्येनें अनेक संत, महंत, साधु, बैरागी, संन्यासी, परिव्राजक, भिक्षु आणि अर्हत पन्नास-पन्नास वर्षें तपश्चर्या करीत, परमेश्वराच्या प्राप्तीसाठीं, आत्मसाक्षात्कारासाठीं किंवा अज्ञेयाच्या ज्ञानासाठीं किंवा शाश्वत तत्त्वांत विलीन होण्यासाठीं, हिमालयाच्या या पवित्र भूमीवर प्रखर तपःसाधना करीत असलेले दिसून येतात. त्यांच्या सहवासांत आयुष्यांतला एक तरी मंगल क्षण घालविण्याचें भाग्य मिळावें असें वाटल्यावाचून रहात नाहीं.

१०

# हिमालयांतील भाषा : एक दृष्टिकोन

**डॉ. ना. गो. कालेलकर**

हिमालयांतील भाषांबद्दल बोलण्यापूर्वी भारताला अखंड प्रवाही अशा सरितांची देणगी देणाऱ्या, उत्तरेकडील मानवी आणि नैसर्गिक आपत्तींपासून त्याचें आजपर्यंत रक्षण करणाऱ्या आणि अनेक प्रकारच्या निसर्ग संपत्तींनीं त्याला समृद्ध बनवणाऱ्या या पर्वतराजींचा व्याप आहे तरी केवढा, अशी जिज्ञासा मनांत उत्पन्न होते. हिमालय ही भारताची उत्तर सीमा आहे. ती एक अभेद्य तटबंदी आहे असें आपण मानत होतों, पण विज्ञानयुगाच्या या काळांत आपला भ्रमनिरास झाला आहे. उत्तरेकडे एक नगाधिराज पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत पसरलेले आहेत. या पलीकडे भारतीयांना त्याच्याबाबत फारसें ज्ञान नसावें. कालीदासानें त्याचें " पूर्वापरौ तोयनिधी वगाह्य स्थितः " आणि " पृथिव्या मानदंड : " असें काव्यमय वर्णन केलें. वर्गांत शिकवायला बरें आहे, पण राजकारणांत निरुपयोगी आहे. कारण राज्यकर्त्यांना दोन गोष्टींची सर्वांत अधिक आवश्यकता असते : एक बलशक्ती आणि दुसरी विनिमयशक्ती.

बलशक्ती म्हणजे स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठीं लागणारें भौतिक सामर्थ्य—सैन्य,

विमानदल, नौदल इत्यादी आधुनिक साधनांनीं सज्ज असलेली रक्षणयंत्रणा आणि शस्त्रास्त्रें निर्माण करणारे कारखाने व अधिक प्रभावी अस्त्रांच्या निर्मितीचें संशोधन करणाऱ्या प्रयोगशाळा. पण कोणताहि देश कांही सदैव युद्धांत गुंतलेला नसतो. तसेंच ज्या वेळीं गुंतलेला असेल त्या वेळीं आघाडी शिवायच्या इतर भागांत दैनंदिन व्यवहार नित्याप्रमाणेंच चालू असतात. मात्र आघाडीवरील लोकांचे काम सुरळीत व्हावें, त्यांचीं मनें उत्साही आणि कर्तव्यतत्पर रहावींत, आपल्याबद्दल काळजी करणारे आणि आपल्याला कांहींही कमी पडूं नये यासाठीं झटणारे सबंध राष्ट्र आपल्या पाठीशीं आहे हा विश्वास त्यांना असावा म्हणून बिन-लष्करी जनतेला एकजुटीनें काम करणें भाग असते. ही एकजूट घडवून आणणारें मुख्य साधन विनिमयशक्ती हें होय. लोकांना त्यांचे हक्क, कर्तव्यें, सामर्थ्य, त्यांचे हिताहित यांची जाणीव करून देण्यासाठीं ही शक्ती वापरतां येते. सिनेमा, रेडिओ, व्याख्यानें, प्रचाराचे कार्यक्रम ही या शक्तीची व्यक्त रूपें होत; पण या सर्व व्यक्त रूपांनाही एका माध्यमाची जरूर असते. तें माध्यम म्हणजे ज्या लोकांना आपण एकत्र आणूं इच्छितों त्या लोकांना समजणारी भाषा.

आज सुरु असलेल्या भाषिक वादाच्या कोलाहलांत ही गोष्ट आपण मुद्दाम लक्षांत घेतली पाहिजे. लोकांशीं संपर्क साधायचा असेल तर त्यांच्या भाषेंतूनच साधतां येईल. सर्वांनीं राष्ट्रभाषा शिकावी अशी सदिच्छा व्यक्त करून हें काम होणार नाहीं. ज्याची भाषा समजत नाहीं त्याच्याकडे दुर्लक्षच करायचें, त्याला म्लेंच्छ म्हणायचे, या आत्मघातकी धोरणामुळें अनेक आदिवासी समाज आपल्यापासून दूर गेले आणि परधर्मीयांच्या प्रचाराला बळी पडले. सुराज्य म्हणजे आपल्याला मानमरातब आणि मुलाला मोठ्या पगाराची नोकरी असें मानणारे आणि धर्मरक्षण म्हणजे आपली शेंडी आणि जानवे शाबूत राखणे असा अर्थ करणारे लोक आपणच. या आत्मकेंद्री वृत्तीचा परिणाम सर्व क्षेत्रांत दिसून येतो. उदाहणार्थ, राष्ट्रभाषेचाच प्रश्न घ्या. राष्ट्राची सर्वमान्य अशी एक व्यवहार भाषा असावी हें ध्येय कांहीं वाईट नाहीं. पण तें मूर्त स्वरूपाला येईपर्यंत आपल्या या विशाल देशांत जितक्या भाषा बोलल्या जातात त्या सर्वांची माहिती करून घेणें, प्रत्येक प्रदेशांत तेथील भाषा, मग ती कितीही अपरिचित असो, कितीही थोड्या लोकांकडून बोलली जात असो, बोलणारे अधिकारी आणि कर्मचारी नेमणें, हें देशहिताच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे.

या बाबतींतली आपली वृत्ती अगदी बेपर्वाईची आहे. एखादी गोष्ट आटोक्या-बाहेर जाईपर्यंत आपल्याला तिची दादही नसते आणि आपली चूक कळून येईपर्यंत परिस्थिति इतकी बिघडलेली असते कीं ती सुधारणें शक्य नसतें. उदाहरणार्थ, नागा प्रदेशाचीच गोष्ठ घ्या. या प्रदेशांत कोण लोक राहतात, त्यांच्या चालिरीती आणि भाषा कोणती आहे. यांच्या गरजा काय आहेत, त्यांच्यासाठीं काय केलें म्हणजे

त्यांना स्वतःच्या भारतीयत्वाची जाणीव होईल याचा विचार आपण कधीही केला नाहीं. दलितांच्या उद्धाराचें व्रत घेतलेले खिस्ती मिशनरी तेथें जाऊन त्यांनीं तेथल्या जनतेची इतक्या अनेक प्रकारें सेवा केली कीं त्यांचें वर्चस्व तेथें प्रस्थापित झाले. ही सेवा करतां यावी म्हणून ते तेथली भाषा शिकले, तेथल्या भाषेला लिपी दिली, बायबलचे त्यांच्या उपयोगी पडेल असें भाषांतर केलें.

या गोष्टी आपल्यालाही करतां आल्या असत्या. पण आपण त्या केल्या नाहींत. अशा गोष्टी दोनदां करतां येत नाहींत. खिस्ती धर्मोपदेशकांच्या मागें जाण्यांत देशाचें अकल्याण आहे हें सांगून आतां कोणी ऐकणार नाहीं. सरहद्द प्रांतांत उद्भवलेल्या बिकट परिस्थितीला तोंड द्यायला आपली विनिमयशक्ती अपुरी पडलेली आहे. लोकसंपर्क, प्रचार आणि संघटना यांच्यासाठीं सर्वांत आधीं तिचीच जरूरी आहे.

या देशांत भाषिक विविधता किती आहे याची माहिती Linguistic Survey of India या ग्रंथाच्या खंडांतून आपल्याला दिसून येतें. पण त्या माहितीचा उपयोग फारच थोड्या लोकांनीं आणि तोही पुस्तकी दृष्टीनें केला. सामाजिक किंवा राजकीय कार्यकर्त्यांना त्याचें महत्त्व कळलें नाहीं आणि त्यांनीं तेथें ढुंकूनही पाहिलें नाहीं. उलट या देशांत असंख्य भाषा आहेत त्यामुळें त्याचें ऐक्य होणें शक्य नाहीं आणि तो स्वतंत्र व्हायला पात्र नाहीं असें दाखवण्याचा हेतु त्यामागें आहे असें प्रतिपादन कांहीं जणांनीं केलें. ऐक्यविरोधक गोष्टींचा अभ्यास देशाला अत्यंत हितकारक ठरतो ही गोष्ट आमच्या त्या वेळीं ध्यानांत आली नाहीं. अजूनही आलेली नाहीं. उदाहरणार्थ, खानेसुमारीच्या अहवालांत जातिविषयक माहिती दिली जात नाहीं. कारण काय, तर जातिभेद हा अनिष्ट असून त्याला अनुल्लेखानें मारलें पाहिजे असें राज्यकर्त्यांना वाटतें. हा हेतू कितपत साध्य झाला आहे तें आपण सर्व जाणताच.

लोकांपुढें ध्येयें ठेऊन सुधारणा होत नाहीं, लोकांशीं संपर्क साधल्यानेंच ती होते आणि त्या त्या ठिकाणची भाषा हें लोकसंपर्काचें सर्वश्रेष्ठ साधन आहे.

म्हणून कुठें कोणती भाषा बोलली जाते आणि ते शिकण्यासाठीं काय केलें पाहिजे याकडे लक्ष पुरवणें आतां निकडीचें झालें आहे. प्रत्येक भाषेचें आणि महत्त्वाच्या बोलीचें व्याकरण आणि शब्दकोश तयार झाले पाहिजेत आणि स्थानिक अधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना आणि समाजसेवकांना ती आली पाहिजे.

दुसऱ्या महायुद्धांत 'भाषेच्या द्वारे लोकसंपर्क' हे ब्रीदवाक्य समोर ठेऊन अमेरिकन सरकारनें भाषेच्या अध्ययनाला आपल्या युद्धविषयक धोरणांत महत्त्वाचें स्थान दिलें. हिंदुस्तानचा परिचय केवळ हिंदी शिकून किंवा घटनेंत नमूद केलेल्या चौदा भाषा शिकून होईल अशी विचारसरणी अमेरिकन संशोधकांची नाहीं आणि ब्रिटिशांनंतर आतां आपल्या देशाच्या ज्ञानाचें ऋण आपल्याला अमेरिकनांकडून

पत्करावें लागणार असें दिसत आहे. स्वतःच्या विद्वानांना संशोधनासाठीं येथें पाठवून आणि येथल्या विद्वानांना आणि संस्थांना सढळ हातानें द्रव्यदान करून अमेरिकन विद्यापीठें आणि अनुदानमंडळें हे कार्य साधत आहेत.

पण मी आधींच म्हटल्याप्रमाणें यापूर्वी हें काम ख्रिस्ती धर्मप्रसारकांनीं आणि एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं व विसाव्याशतकाच्या सुरवातीला सर जॉर्ज ग्रिअर्सन यांनीं केलें.

या देशांत ज्ञात असलेल्या भाषांची विभागणी त्यांच्या परस्परसंबंधानुसार चार कुटुंबांत करण्यात येते. आर्य, द्राविड, ऑस्ट्रिक, सिनो-तिबेटन. भारतीय घटनेंत आसामी, बंगाली, गुजराती, हिंदी, काश्मीरी, मराठी, ओडिया, पंजाबी व उर्दू या नऊ आर्यभाषा, कन्नड, मल्याळम, तामीळ व तेलगू या चार द्राविड भाषा आणि संस्कृत अशा चौदा भाषांचा उल्लेख आहे. या उलट ग्रिअर्सनच्या सर्व्हेप्रमाणें त्यानें पाहणी केलेल्या क्षेत्रांत १७९ भाषा होत्या आणि त्यांतल्या ११६ भाषा उत्तर आणि आग्नेय भागांतील आदिवासींच्या, म्हणजे सिनोतिबेटन भाषा होत्या. आसामच्या उत्तरेकडील डोंगरी प्रदेशाकडून काश्मीरच्या प्रदेशापर्यंतचा सर्व भाग हा हिमालयाच्या लगतचा किंवा हिमालयाचा भाग आहे. आणि या एकशेंसोळा भाषा या भागांत बोलल्या जातात. अर्थात केवळ एवढ्याच भाषा या प्रदेशांत बोलल्या जातात असें नाहीं. या भाषांना जोडून दक्षिणेलाच एक आर्यभाषिक पट्टा आहे. या पट्ट्यांत बोलल्या जाणाऱ्या भाषांना 'पहाडी भाषा' अशी संज्ञा आहे. या पहाडी भाषांचें पूर्व पहाडी, मध्य पहाडी आणि पश्चिम पहाडी असे वर्ग आहेत. यापैकीं पूर्व पहाडी ही आपल्या सर्वांच्या परिचयाच्या गुरखे लोकांची भाषा आहे. या भाषेचें नांव खसकुरा किंवा नेपाळी. या भाषेचें राजस्थानी भाषेशीं बरेंच साम्य आहे. त्याचें कारण असें सांगतात कीं मुसलमानी आक्रमणाने त्रस्त झालेल्या कांहीं राजवंशीयांनीं नेपाळमध्यें येऊन राज्य स्थापन केलें आणि नेपाळी ही या रजपूत लोकांच्या भाषेचें उत्क्रांत स्वरूप आहे. या भाषेची एक महत्वाची बोली पाल्या या नांवानें ओळखली जाते. मध्य पहाडीच्या दोन महत्त्वाच्या बोली कुमाउनी आणि गढवाली या आहेत आणि पश्चिम पहाडीचे आठ पोटभाग असून त्यांत एकंदर तीस बोली आहेत. याशिवाय हिमालयांतील फिरत्या जमातींची गुजुरी नांवाची भाषा असून तिच्या आठ बोली आहेत.

या सर्व भाषा आर्य म्हणजे संस्कृत किंवा संस्कृतसारख्या इतर भाषांपासून उत्पन्न झाल्या आहेत. यांतच काश्मीरी या अगदीं टोकाच्या भाषेची भर घातली म्हणजे हिमालयाच्या परिसरतील आर्य कुटुंबीय भाषांची गणती पुरी होईल.

सिनोतिबेटन भाषांचें उगमस्थान चीनचा वायव्य भाग. तेथून निघालेली भाषिक लाट आधीं तिबेटवर आदळली, नंतर आसामच्या नेफा वगैरे भागांत आणि ब्रह्मदेशांत पसरली आणि तेथून पश्चिमेकडे सरकली. यापैकीं तिबेटी आणि ब्रह्मी या

भाषा विकास पावल्या आणि त्यांत वाङ्मय निर्मितीही झाली. याच भाषांत मणिपुरी, लुशेइ आणि गारो यांचा समावेश होतो.

या भाषा बोलणारे लोक भारतीय नागरिक आहेत. पण बहुसंख्य भारतीयांच्या भाषांपेक्षां त्यांच्या भाषा इतक्या वेगळ्या आहेत कीं मुद्दाम अभ्यास केल्यावाचून आणि तेथल्या लोकांत मिसळल्यावाचून त्या समजणें शक्य नाहीं. एखादी भाषा बोलणारा समाज कितीही लहान असला तरी त्याची जोपासना करणें आणि त्याच्या विनिमयाचें साधन जी भाषा तिच्या विकासाला मदत करणें हे कोणत्याही राष्ट्राचें आद्यकर्तव्य आहे. अशा परिस्थितींत केवळ आम्हीं त्यांच्या व्यवहारांत ढवळाढवळ करत नाहीं असें म्हणून भागणार नाहीं, तर त्यांच्या सांस्कृतिक अंगांचा नीट अभ्यास करून त्याच्या रक्षणाला मदत केल्यानेंच त्यांना आपुलकी वाटणें शक्य आहे. रशियासारख्या हुकुमशाहीप्रधान राष्ट्रांतही प्रत्येक अल्पसंख्य समाजाची संस्कृती आणि भाषा टिकावी आणि विकास पावावी यासाठीं सर्व प्रयत्न करण्यांत येतात. योग्य धोरण अनुसरलें तर विविधत्व ऐक्याला बाधक होत नाहीं हे त्यांनीं जगाला दाखवून दिलें आहे. विविधत्वांत ऐक्य, सहिष्णुता, वगैरे घोषणा आपल्याही आहेत. पण विविधत्वाची वैशिष्ट्यें कायम राखून एकत्र रहाण्यांतच आपलें हित आहे. ही जाणीव उत्पन्न करण्यासाठीं डोळस आणि खंबीर धोरणाची गरज आहे.

हिमालयांतल्या सर्व लहानमोठ्या भाषांचा अभ्यास होऊन परभाषिक लोकांना त्या शिकतां येतील आणि वापरतां येतील अशा तऱ्हेचीं व्याकरणें आणि कोश तयार झाले पाहिजेत. तेथें काम करणाऱ्या सर्व सरकारी नोकरांना, सैनिकांना आणि कार्यकर्त्यांना तेथल्या लोकांत मोकळेपणानें मिसळतां येईल इतकें स्थानिक भाषांचें शिक्षण दिलें गेलें पाहिजे. स्थानिक प्रजेंत त्यांच्याच भाषेच्या मार्फत शिक्षणाचा प्रसार होईल अशी व्यवस्था केली पाहिजे. आज हिमालयांत आणि भारताच्या इतर भागांत आदिवासी भाषा बोलणारे २–२॥ कोटी लोक आहेत. त्या सर्वांचा संपर्क साधण्याइतके त्यांच्याजवळ आपल्याला गेलें पाहिजे.

हिमालयाला लागलेली आग विझवावयाची असेल तर लडाख, नेफा वगैरे भागांतील लोकांत योग्य तो प्रचार आपण केला पाहिजे. काश्मीर हातचा जाऊं नये यासाठीं आपण जितक्या अगत्यानें तेथल्या लोकांची आणि पुढाऱ्यांची जपणूक करूं तितकी जपणूक आपण भौगोलिक, भाषिक आणि सांस्कृतिक कारणांनीं आपल्यापासून दुरावलेल्या बांधवांची केली पाहिजे.

अगदीं प्राचीन काळांत वैदिक साहित्यांत आणि महाभारतांत हिमालयांतील मानव वंशांच्या आणि त्यांच्या विशिष्ट संस्कृतींचा उल्लेख आलेला आहे. द्रौपदीचे बहुपतिकत्व एका विशिष्ट संस्कृतीचे द्योतक असावें याबद्दल फारसा वाद असण्याचें कारण नाहीं. हिमालयांतील जमातींना सिनोतिबेटन हे इंग्रजी नांव असलें तरी प्राचीन

साहित्याच्या आधारे त्यांना 'किरात' ही संज्ञा योग्य प्रकारें लागू पडते असें सुनीतिकुमार चतर्जी यांचें मत आहे. हिमालयाचा प्रदेश हा कधीं युद्धभूमी होईल असें वाटलें नव्हते आणि या भरवशावर विसंबून आपले तिकडे पूर्ण दुर्लक्ष झालें होतें.

आतां ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं तेथलें आपलें कार्य यशस्वी होण्यासाठीं तेथल्या जनतेशीं आपण नवे संबंध प्रस्थापित केले पाहिजेत आणि हे संबंध वाढविण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. हें काम हिंदी प्रचारकांची तुकडी तेथे पाठवून होणार नाहीं. तुम्ही भारतीय आहांत, तेव्हां आमच्या बाजूला असलेच पाहिजे अशी दमदाटी करूनही होणार नाहीं. आपण भारतीय आहोत आणि भारताच्या विकासा-वर आणि विजयावरच आपली प्रगती अवलंबून आहे अशी तेथल्या लोकांची खात्री पटली तरच तें होईल.

ही गोष्ट सोपी नाहीं हें नागा प्रदेशांतील घडामोडीवरून आणि नेपाळशीं बिघडलेल्या आपल्या राजनैतिक संबंधावरून दिसून येईल. सत्य माझ्या बाजूला आहे तेव्हां जय माझाच होईल अशा विश्वासानें बसून राहणें आत्मघातकीपणाचे आहे. आजचें युग हें प्रचारयुग आहे. जो अधिक बोलेल, पुन्हा पुन्हा आपली बाजू मांडेल त्याचें म्हणणें इतरांच्या कानावर तरी जाईल. त्यांतूनच योग्य वेळीं तें इतरांना पटेल.

राजनैतिक संबंध प्रभावी करण्यासाठीं इतर राष्ट्रांच्या भाषा शिकल्या पाहिजेत. दुभाषाच्या मदतीनें प्रचार होऊं शकत नाहीं. पण आपल्याकडे तर आपल्या देशांतील भाषांचेंच अज्ञान एवढें आहे कीं त्यामुळें अनेक प्रदेश आणि समाज यांच्या अस्ति-त्वाचें सुद्धां आपल्याला भान राहिलेले नाही.

हिमालयांतल्या मानववंशाची, संस्कृतीची आणि भाषांची माहिती करून घेण्याचीं साधनें वाढत आहेत. पण अजूनही बरेंच काम बाकी आहे. चिनी आक्र-मणामुळें या साधनांचें ज्ञान मिळवायला चालना मिळालेली आहे. अशा सुमाराला ही व्याख्यानमाला योजून या संस्थेच्या चालकांनीं जें औचित्य प्रकट केलें आहे तें अभिनंदनीय आहे. आतां झोंपून चालणार नाही इतकी जाणीव होण्यापुरता जरी या व्याख्यानमालेचा परिणाम झाला तरी त्यामुळें एक फार मोठा राष्ट्रीय उद्देश अंशतः तरी सिद्धीला गेल्याचें श्रेय त्यांना मिळेल. तें मिळावें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र.

११

# नेफा विभागांतील संस्कृति

डॉ. म. मं. पाटकर

जगाच्या निरनिराळ्या भागाप्रमाणें हिंदुस्थानांतहि अनेक भागांतून रानटी जमाती किंवा ज्यांना आपण आदिवासी असें म्हणतो अशा जातीचे आणि जमातींचे लोक दिसून येतात. हिंदुस्थानच्या इतर भागांत रहाणाऱ्या आदिवासी लोकांमध्यें आणि नेफा विभागांत रहाणाऱ्या आदिवासी जनतेत एक अतिशय महत्त्वाचा फरक दिसून येतो. इतर ठिकाणी रहाणाऱ्या जमाती बहुधा सपाट प्रदेशांतील जंगलांत रहात असल्यामुळें त्यांची माहिती मिळविणें फारसें कठिण नाहीं. शिवाय या रानटी जमातींचा शेजारच्या प्रांताशीं किंवा शहरी जीवनाशीं संबंध येत गेल्या कारणानें त्या जमातींच्या मूळ संस्कृति व परंपरागत रूढि व आचार हळूंहळूं कमी होऊं लागले असून पुष्कळ अंशीं इतर शहरी जीवनांतील बऱ्याच गोष्टी त्यांनीं उचलल्या आहेत.

या उलट नेफा विभागातील आदिवासी लोकांच्या संस्कृतींच्या विचार करतांना सर्वस्वीं भिन्न अशी परिस्थिति आपणांस दिसून येते. हिंदुस्थानच्या ईशान्य सरहद्दीवर आसाम प्रांतापलिकडे अनेक नद्यांच्या खोऱ्यांत आणि पहाडांत रहाणारे लोक अतिशय

रानटी असून ते युद्ध–पिपासू आहेत. सामान्य लोकांना सहजा सहजीं प्रवेश करण्यास अशक्य अशा हिमालयाच्या दाट खोऱ्यांतून व पहाडांवरहि या लोकांची वसती विखुरलेली आहे. त्यांचें स्वतःचें असें वेगळालेंच जग आहे. हे लोक हिमालयाच्या परिसरांत आहेत एवढ्या पुरताच त्यांचा तिबेट व हिंदुस्थान या दोन देशांशीं संबंध आहे.

जवळच्या प्रांतांतील संस्कृतीचा किंवा आचार–विचारांचा आपल्या सामाजिक जीवनावर कांहींहि परिणाम होऊं न देतां आपलें आर्थिक व सामाजिक जीवन व त्याचप्रमाणें धार्मिक समजुती आणि अनंत काल चालत आलेल्या रुढीहि त्या लोकांनी कायम राखल्या आहेत. त्याचप्रमाणें अजस्र पहाडासारख्या नैसर्गिक तटबंदीमुळें निरनिराळ्या भागांत रहाणाऱ्या जमातींचा एकमेकांशीं फारसा संबंध न आल्यामुळें त्यांच्यांतीलहि परस्पर भिन्न असे संप्रदाय व रूढी–परंपरा मोठ्या विलक्षण फरकानें आपणास नेफा विभागांतच पहावयास सांपडतात. याच संदर्भात नागा संस्कृतीहि आपणांसमोर येते.

कारण नागालँड या नांवानें ओळखला जाणारा प्रांत वेगळा असला तरी पूर्वी तो नेफाचाच एक भाग होता. या नेफा प्रदेशाची अंतर्गत व्याप्ति सुमारें ३०,००० चौरस मैल आहे. स्वातंत्र्यापूर्वी या विभागांत सरकारी अंमल किंवा शासकीय नियंत्रण फारच थोडें होतें परंतु १९४७ सालापासून या प्रदेशाकडे हिंदुस्थान सरकारनें विशेष लक्ष पुरविलें आहे. भारताच्या अध्यक्षांच्या ( राष्ट्रपति ) वतीनें आसाम प्रांताचे राज्यपाल या प्रदेशाचा कारभार पहात असत. या राज्यपालांना मदत करण्याकरतां एका सल्लागाराची निवड करण्यांत येते. ३१ मार्च, १९६० पर्यंत सल्लागारच नेफा विभागांतील प्रत्यक्ष व्यवहार पहात असे. परंतु त्यानंतर नेफा विभागाचा कारभार एका कमिशनरमार्फत पाहिला जात असून नेफा प्रांत आतां राज्यकारभाराच्या व अंमल बजावणीच्या दृष्टीनें आसाम प्रांतापासून अलग करण्यांत आला आहे. शासनाच्या दृष्टिनें नेफा विभागाचे खालीलप्रमाणें भाग करण्यांत आले असून त्या प्रत्येक भागाचे स्वतंत्र ठाणें आहे. ते विभाग असे :

| विभाग | | ठाणें |
|---|---|---|
| ( १ ) कॉमेंग सरहद्द विभाग | ... | बोमडिला |
| ( २ ) सुबानसेरी | ... | झिरो |
| ( ३ ) सियाँग | ... | अलोंग |
| ( ४ ) लोहित | ... | तेसू |
| ( ५ ) तिरप | ... | खोन्सा |

आसाम प्रांताच्या बाजूला नेफाचा सपाट प्रदेश असून या सर्व भागांत पुष्कळ नद्या आहेत. महानदी ब्रह्मपुत्रा हिची एक शाखा नेफाच्या सियांग विभागांतून वहाते. नेफा विभागातील दुसऱ्या महत्त्वाच्या नद्या – ( १ ) सुब्रानसिरी व ( २ ) कामिंग आहेत.

सुब्रानसिरी ही हिमालयाच्या मुख्य प्रदेशातून वहात जाऊन तिबेटच्या पठारावरून पुढें जाते. त्याचप्रमाणें लोहित नांवाची नदी देखील ब्रह्मपुत्रेचीच एक दुसरी शाखा असून ती धियाँग नांवाच्या नदीला मिळते. व तेथून पुढें दिब्रुगड येथें जाऊन सियाँग नदीला मिळते. या नद्यांच्या कांठीं विखुरलेल्या आदिवासी जनतेच्या सुमारें ५० बोलभाषा आहेत. नेफा विभागाची पश्चिम सरहद्द भूतान व तिबेट यांनीं व्यापली असून या भागांतून वहाणाऱ्या कॉमिंग नदीच्या नांवावरून या भागास कॉमेंग सरहद्द विभाग असें नांव देण्यांत आलें आहे. अगदीं पश्चिमेस समुद्रसपाटीपासून सुमारें दहा हजार फूट उंचीवर असणाऱ्या एका सपाट भागावर तवांग नांवाचें गांव असून तें सुमारें साडेतीनशें वर्षापूर्वी वसलें गेलें असावे. हा भाग मोनपा नांवाच्या जमातीच्या वसतीचा असून तेथील लोक गालिचे, घोडे, याक व मेंढ्या यांच्या आवडीविषयीं प्रसिद्ध आहेत. स्वभावानें शांत, उद्योगी व प्रेमळ असणाऱ्या मोनपा जमातीवर बौद्ध धर्माची छाप पडलेली दिसते. यांच्या घरांचें बांधकाम दगडी व लाकडाचें असून आंतील जमीनहि लांकडी फळ्यांची असते. घरें बहुधा एक मजली पण क्वचित् दोन मजलीहि दिसून घेतात. खिडक्यांवर आणि दरवाज्यावर नक्षीकाम केलेलें आढळून येतें. पोशाख साधाच पण तो उबदार असून त्यांतहि त्यांची कलात्मकता दिसून येते. मोनपा लोक जात्याच निसर्गाचे आणि सौंदर्याचे भोक्ते असून त्यांना संगीत व नृत्य या कलांची अतिशय आवड आहे. बौद्ध धर्माप्रमाणेंच मोनपा लोकांनीं भूतानमधील बौद्ध धर्मियांचे पुष्कळसे आचार-चालीरीति त्यांचीं वस्त्रे-पोषाख, दागिने, वास्तुपद्धति, फार काय अंत्यसंस्कारहि घेतले आहेत.

दक्षिणेच्या बाजूस शेरडुकपेन नांवाची एक लहानशी बौद्धधर्मी जमात आहे. दर वर्षी व्यापार करण्याचे निमित्तानें व कडक हिंवाळा टाळण्याकरतां कित्येक महिने हे लोक सपाट प्रदेशांत ' ये जा ' करीत असतात. पूर्वेस बुगुन व अकस नांवाच्या जमाती रहात असून उत्तरेस मिजिस नांवाची जमात रहाते. हे लोक स्वतः बुद्धानुयायी नाहींत. तथापि त्यांच्या रुढी व आचार-विचार यावर त्यांच्या शेजाऱ्यांची छाप पडलेलीं दिसते. बुगुन ही जमात अतिशय लहान असून पिढ्यान्‌पिढ्या शेजारच्या टोळ्या त्यांना उपद्रव देत असल्याचें दिसून येतें. अकस जमातीचा पुढारी तगी यानें गेल्या शतकांत कित्येकदां शेजारच्या सपाट प्रदेशावर स्वाऱ्या केल्याचा उल्लेख इतिहासांत आढळतो. या लहान लहान जमातींतहि चांगले व्यापारी आहेत. त्यांच्यांत

गुलामगिरीची पद्धत आढळून येते. कॉमेंग विभागाच्या पश्चिमेस रहाणारे आदिवासी सांस्कृतिक दृष्ट्या पुढारलेले व शांतताप्रिय आहेत; तर त्याच विभागाच्या पूर्वेस रहाणारे आदिवासी वंगनीस आणि डाफला या दोन जमाती अतिशय मागासलेल्या पण युद्धखोर आहेत. वंगनीस व डाफला या दोन जमातींची संख्या सुमारें आठ हजार आहे. यांची वसाहत शेजारच्या सुबानसिरी विभागापर्यंत पसरलेली आहे. त्यांची घरें अतिशय लांबट असून त्यांत कित्येक मोठमोठीं कुटुंबें आपले गुलाम व नोकर यांसह रहात असतात. परंतु त्यांच्यांत एकोपा असा आढळून येत नाहीं. ते (कधींहि एके) ठिकाणीं रहात नाहींत. रहाण्याची जागा वारंवार बदलणें हें या जमातींचें एक वैशिष्ट्य मानावें लागेल. वंगनीस व डाफला या जमाती अतिशय गरीब असून कला, उद्योगधंदे, व्यापार, या बाबतींत फार मागासलेल्या आहेत. विणकाम, सुतारकाम व कुंभारकाम यांची त्यांना प्राथमिक माहिती आहे. परंतु वेतकाम करण्यांत ते अतिशय प्रवीण समजले जातात. हे लोक वृत्तीनें अतिशय रानटी असून पिढ्यान् पिढ्या वैर धरण्याची त्यांची संवय दिसून येते. वंगनीस व डाफला याखेरीज सुलुंग नांवाची आणखी एक जमात या भागांत आहे. कदाचित् तीच सर्वांत प्राचीन जमात असावी. सुलुंग लोक शिकारी असून लोहारकाम व पितळकाम करण्याची त्यांना माहिती आहे. अलिकडे त्यांनी शेती करण्यासहि सुरुवात केली आहे. या जमातींतील बरेच लोक डाफलांचे गुलाम आहेत.

आतां आपण कामेंगच्या पूर्वेस असलेल्या सुबानसिरी या खोऱ्याकडे वळूं. इ. स. १८९० पर्यंत हा भाग कोणास फारसा माहीत नव्हता. १८९० सालीं क्रोवे नांवाच्या एका चहाच्या मळेवाल्यानें आपला नाताळचा सण आपातानी नांवानें ओळखल्या जाणाऱ्या एका पठारावर साजरा करण्याचें ठरविलें. त्यांच्याबरोबर फारसा लवाजमा नव्हता. थोडेसे डाफला लोक बरोबर घेऊन तो त्या ठिकाणीं आला. त्या वेळीं त्याला तेथील जमातीची म्हणजे आपातानी टोळ्यांची जवळून माहिती झाली व तो आश्चर्यचकितहि झाला. कारण नेफा विभागांतील अत्यंत संघटित रीतीनें रहाणारी व रानटी जमातीशीं विसंगत असणारी अशी एक जमात त्याच्या दृष्टीस पडली. हे लोक अतिशय उद्योगी असून त्यांनीं इरिगेशन पद्धतीनें शेती करण्याची एक स्वतंत्र पद्धत अंमलांत आणलेली आहे. नांगराचा उपयोग न करतां फावड्याच्या सहाय्यानें वर्षांतून दोन पिकें काढतात. त्यांचा बाह्य जगाशीं बिलकूल संबंध येत नसे. डाफला लोक त्यांना शेजारच्या सपाट प्रदेशांत व्यापार करण्याकरतां जाऊं देत नसत. नेफा विभागाच्या अंतरभागांत हे लोक सुखासमाधानानें रहात आहेत.

आपातानी गांवांची रचना साधारणपणें पहाडांच्या उंच भागावर केलेली दिसून येते. प्रत्येक गांवांत शेकडों घरें असतात. हीं घरें बांबू व गवत यांचीं बनविलेलीं असून ती एकमेकाला लागून असतात. सर्वसाधारणपणें श्रीमंत माणसाचे

घर गांवाचे मध्यभागीं असून कनिष्ठ वर्गांतील लोकांचीं घरें बाजूला आणि गल्ल्यांतून असतात. घरांची रचना मात्र जवळजवळ सारखीच असते. उंची साधारपणें दहा फुटापेक्षां जास्त नसून घर वाढवावयाचे झाल्यास वर मजला न बांधतां ते बाजूनेंच वाढविलें जातें. घराच्यापुढें व्हरांड्याप्रमाणें मोकळी जागा असून त्यांतून खोलींत जातां येते. आपातानी कुटुंब साधारणपणें एकेकाच खोलींत रहात असून त्याच ठिकाणीं स्वयंपाक व झोंपण्याची व्यवस्था असते.

**आपातानी–समाजरचना :**

समाजरचना व व्यवस्था यांच्या बाबतींत त्याच विभागांत राहणाऱ्या डाफला किंवा मिरी या जमातींपासून आपातानी जमात अतिशय भिन्न आहे. त्यांची भाषा, त्यांचे पोशाख व त्यांची राहणी या बाबतींत दोन जमातींत पुष्कळच फरक आढळतो. आपातानी समाजांत जास्त स्थैर्य दिसून येतें. ही जमात सहसा आपलें ठिकाण सोडून दुसरीकडे क्वचितच जाते. याच्या उलट डाफला किंवा मिरी जमात एके ठिकाणीं फार काळ कधींच रहात नाहीं. आपातानी मनुष्य हा वर्षानुवर्ष एकाच ठिकाणीं राहून शेतीच्या व्यवसायाकडेच लक्ष पुरवित असल्यामुळें त्या जमाती शेतकीच्या बाबतींत बरीच प्रगति झाली आहे. जातीजातींत कितीहि भांडणें झालीं तरी तीं विकोपाला न नेतां आपातानी लोक तीं सामोपचारानें मिटविण्याचा प्रयत्न करतात आणि त्यांच्यातील एकोपाहि वाखाण्यासारखा असतो. धार्मिक उत्सव, सामाजिक सभारंभ इत्यादि प्रसंगीं सर्व गांवांतील लोक जमून उत्सव साजरा करतात.

आपातानी समाजांत व्यक्तीला स्वतंत्र स्थान असल्यामुळें सर्व जमातीवर हुकुमत चालविणारी अशी पंचायतीसारखी संस्था त्यांच्यांत नाहीं. परंतु गांवचा कारभार जमातींच्या प्रतिनिधि मंडळामार्फत होत असतो. हे प्रतिनिधि सामान्यतः अशा व्यक्तींमधून निवडले जातात. प्रतिनिधींचे तीन प्रकार असतात. पहिल्या प्रकारांत म्हणजे ज्याला आरवा बुलिआंग म्हणतात त्यांत बहुत करून वृद्ध सभासद असतात. आणि ते जरी प्रत्यक्ष भाग घेऊं शकले नाहींत तरी प्रत्यक्ष महत्त्वाच्या बाबतींत त्याचा सल्ला घेतला जातो. दुसऱ्या प्रकारांतील प्रतिनिधि मध्यम वयाचे असून त्यांना Yapa Buliang अशी संज्ञा आहे. ते गांवाच्या दैनंदिन कारभारांत प्रत्यक्ष भाग घेऊन गांवांतील तंटे-बखेडे मिटवितात व वेळोंवेळीं गांवच्या कारभाराची माहिती आखा बुलिआंग यांना देत असतात. तिसरा प्रकार म्हणजे Ajang Buliang यांतील प्रतिनिधि तरुण पुरुष असून ते गांवच्या तरुणांचे पुढारी व प्रतिनिधि असतात. हे वरील दोन प्रकारच्या प्रतिनिधींचे म्हणजे आखा बुलिआंग व यापा बुलिआंग यांचे मदतनीस म्हणून काम करतात.

वर सांगितलेल्या प्रतिनिधींमार्फत जरी आपातानी समाजाचे व्यवहार होत असले तरी आपल्याकडील पोलीस-पाटील किंवा पंचायतीप्रमाणें त्यांना सत्ता नसते. त्याची भूमिका न्यायाधीशाची नसून लवादाची असते.

आपातानी समाजांत दुसरी एक जात आहे ती म्हणजे गुलामांची. हिला मुरा असें नांव आहे. गुलामाची स्वतंत्र जात आपातानी समाजांत कशी आली तें सांगतां येत नाहीं. कदाचित दुसऱ्या जमातींतील लोक त्यांच्यांत रहावयास आल्यामुळें किंवा लढाईत धरून आणलेले कैदी त्यांच्यांत आल्यामुळें गुलामगिरीचा उगम आपातानी समाजांत झाला- असावा. त्यांत स्त्री व पुरुष या दोहोंचाहि समावेश होत असून आपल्या धन्याच्या कुटुंबांत राहणाऱ्या या गुलामांना कोणत्याहि प्रकारचे हक्क नसतात. त्यांची वाटेल तेव्हां विक्री केली जाते किंवा त्यांच्याकडून कांहीं अपराध झाल्यास त्यांचा धनी त्यांस ठार मारूं शकतो. परंतु सर्वसाधारणपणें त्याची खाण्यापिण्याची व्यवस्था चांगली असते व करमणुकीच्या वगैरे कार्यक्रमांत तो धन्याच्या बरोबरीनें भाग घेऊं शकतो. त्याचप्रमाणें आपातानी कुटुंबांतील गुलामाला स्वतंत्र स्त्रीशीं लग्न लावण्याची परवानगी असते हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आपातानी लोकांप्रमाणें डाफला जमातींतहि गुलामाची चाल आहे. परंतु डाफला जमातींत राहिलेला गुलाम कालांतरानें स्वतंत्र होऊं शकतो. तो हक्क आपातानी समाजांतील गुलामाला नाहीं.

## आपातानी कुटुंबव्यवस्था :

सुबानसिरी खोऱ्यांत राहणाऱ्या आपातानी जमातींची कुटुंबव्यवस्था ही त्याच खोऱ्यांतील इतर जमातींच्या कुटुंबपद्धतीहून थोडीशी निराळी आहे. आपातानी कुटुंबांत फक्त एका लहानशा कुटुंबाचीच राहण्याची सोय केलेली असते. एकाच कुटुंबांतील दोन विवाहित जोडपीं एकत्र रहात नाहींत. त्यांच्या कुटुंबांत नवरा-बायको व अविवाहित संतति एवढ्यांचाच समावेश होतो. डाफला जमातींत कित्येकदां ७–८ बायका करण्याची वहिवाट असून लग्न झालेलीं मुलें वगैरे सर्व मंडळी एकाच घरांत राहतात आणि त्या दृष्टीनें त्यांच्या घरांची रचनाहि तशीच लांबलचक असते. व कधीं कधीं अशा प्रकारच्या घरांत एकाच कुटुंबांतील ७०–८० व्यक्ति राहतात. याच्या अगदीं उलट आपातानी समाजांत विभक्त कुटुंबपद्धति असल्यामुळें प्रत्येक कुटुंबांत मोजकींच माणसें असतात व त्या दृष्टीनें त्यांची घरेंहि अतिशय लहान असतात. डाफला जमातीला इतर जमातींचा वारंवार उपद्रव होत असल्यामुळें प्रसंगविशेषीं सर्वांना हल्ल्याचा प्रतिकार करतां यावा म्हणून व सुरक्षिततेच्या दृष्टीनें डाफला लोकांच्या घरांची रचना करण्यांत आली असावी. आपातानी समाज हा भर वस्तींत रहात

असल्यामुळें डाफला लोकांप्रमाणें परक्या जमातीकडून त्यांच्यावर हल्ला होण्याची भीति नव्हती. त्यामुळें ते स्वतंत्र रीतीनें राहूं शकत.

आपातानी व डाफला या दोन जमातींच्या विवाहपद्धतींतहि फरक आहे आपातानी समाजांत वधूवरांना आपापली निवड करण्याची पूर्ण मुभा असून वडील मंडळी व इतर नातेवाईक त्यांत ढवळाढवळ करीत नाहींत; याच्या उलट डाफला समाजांत वरपक्षाकडून शुल्क म्हणून रक्कम घेण्याचा प्रघात असल्यामुळें वधूवरांचे विवाह पुष्कळ अंशीं वडील मंडळीवरच अवलंबून असतात. आपातानी कुटुंबांत या रकमेला फारसें महत्त्व नाहीं. वाङ्निश्चय किंवा विवाह विधीचीसुद्धां त्यांना जरूर भासत नाहीं. एखाद्या पुरुषानें व स्त्रीनें, नवरा-बायको या नात्यानें रहावयाचें ठरविल्या-नंतर कोणत्याहि धार्मिक विधीशिवाय दोघेहि विवाहित समजलीं जातात व वधू आपल्या नवऱ्याच्या घरीं जाऊं शकते. कांहीं कारणानें त्यांचें एकमेकांशीं पटेनासें झाल्यास तें एकमेकां पासून तितक्याच सहज रीतीनें विभक्त होऊं शकतात. विभक्त झाल्यानंतर जर त्यांना संतति झाली तर मुलगा बापाच्या घरीं जातो व मुलगी असल्यास ती आईच्या घरीं राहते. आपातानी समाजांत अनेक बायका करण्यास प्रत्यवाय नाहीं; परंतु फारच थोड्या लोकांना एकापेक्षां जास्त बायका असतात. पहिल्या बायकोला मूल होण्याचा संभव नसेल किंवा संतति होऊनहि त्या फक्त मुलीच असतील तर किंवा अशाच कांहीं कारणांकरितां अनेक बायका करण्याचा आपातानी समाजांत प्रघात आहे. पण सर्व साधारणपणें एकच बायको करण्याकडे या जमातीची प्रवृत्ति दिसते. ज्यांची परिस्थिति गरीबीची आहे, ते तर जास्त बायका करण्यास मुळींच धजत नाहीत. कारण आपण दुसऱ्या स्त्रीशीं विवाह केल्यास पहिल्या बायकोचे नातेवाईक तो त्यांचा अपमान समजून आपला सूड घेतील ही भीति नेहमीं त्यांच्या मनांत असते.

**शिथिल नीतिमत्ता :**

नीतीच्या बाबतींत आपातानी लोक साधारणपणें शिथिलच आहेत. पत्नीचा व्यभिचार व नवऱ्यानें बायकोला टाकणें या गोष्टीला आपातानी समाजांत थोडेसें महत्त्व असलें, तरी एकंदरीनें विचार करतां या समाजांत शिथिल नीतिमत्ता ( अर्थात् आपल्या दृष्टीनें ) आहे असेंच मानावें लागेल. विवाहित पुरुष व अविवाहित स्त्री यांच्या संभोग संबंधाविषयीं ते विशेष तीव्रतेनें विचार करीत नाहींत. बायकोच्या गरोदरपणांत पुरुष अगदीं उघड उघड अविवाहित स्त्रियांशीं संबंध ठेवतात. व यांत कोणालाच कांहीं गैर वाटत नाहीं. नवरा-बायको यांच्या संभोगाच्या बाबतींत विशिष्ट बंधनें नाहींत मात्र बाळंतपणांत पहिले तेरा दिवस त्यांना संभोगाचें स्वातंत्र्य नसून दहा दिवसपर्यंत दोघेहि अस्पर्श समजलीं जातात.

सर्व साधारणपणें आपातानी कुटुंब समाधानी वृत्तीनें राहते व लग्नानंतर सुरवातीस होणारीं सास्वा-सुनांचीं भांडणें कांहीं कालानंतर थांबतात. आपातानी स्त्री अतिशय कष्टाळू असून शांतताप्रिय असते त्यामुळें कांहीं किरकोळ बाबी सोडल्यास आपातानी कुटुंबांत भांडणाचे किंवा संसार मोडले जाण्याचे प्रकार फारसे दृष्टीस पडत नाहींत.

शेजारच्याच डाफला जमातींत मात्र अगदीं विरुद्ध परिस्थिति दिसून येते. त्यांच्यांत बायकोकरितां कांहींना कांहीं रक्कम द्यावी लागत असल्यामुळें बायको ही आपली मालकी हक्काची एक वस्तू आहे असें ते मानतात. त्यांच्या नीतिविषयक कल्पना कडक आहेत. आपातानी समाजांत आढळून येणारे स्वातंत्र्य डाफला स्त्री किंवा पुरुष यांना नसून विवाहित स्त्रिया व अविवाहित मुली यांच्या बाबतींत आपातानी जमातीइतकें स्वातंत्र्य डाफला जमातींत नाहीं.

आपातानी समाजांत विवाहाबाबत संपूर्ण स्वातंत्र्य असतें हें आपण पाहिलें. लग्नाच्या बाबतींत वडील मंडळी ढवळाढवळ करीत नाहींत परंतु लग्नानंतर मात्र वधू-वरांना त्यांच्याकडून संपूर्ण सहकार्य मिळतें. व त्यांना स्वतंत्र बिऱ्हाड स्थापून देतांना बरीच काळजी वडील मंडळींकडून घेतली जाते. जसजशीं मुलांचीं लग्नें होत जातात तसतशी श्रीमंत मनुष्याच्या संपत्तीची वाटणी होत जाते. बाप फक्त आपला हिस्सा ठेवतो आणि हा हिस्सा देखील शेवटीं सर्वांत धाकट्या मुलाला मिळतो. मुलीला वारसा हक्क नसून तिला फक्त दागदागिने, वस्त्र वगैरे दिलें जाते. परंतु मुलीच्या सासरची परिस्थिति गरीबीची असेल तर सासरा जांवयाला मदत करतो. व जमीन, जनावरें इत्यादि वस्तूंचे बक्षीसपत्र जावयाच्या नांवानें करून देतो. मात्र पुरुषसंतति नसल्यामुळें मुलींना वारसा मिळाल्याचें उदाहरण आपातानी समाजांत आढळत नाहीं.

### शेतकी व लागवड :

आपातानी लोकांचा मुख्य व्यवसाय शेती करणें हा असून मुख्य पीक भाताचें असतें. याशिवाय मिलेटचें पीक वर्षातून दोनदां काढण्यांत येत असून तें काम मुख्यत्वें स्त्रिया करतात. मिलेटचा उपयोग दारु बनविण्याच्या कामीं केला जातो परंतु कित्येक वेळां त्याच्या पिठापासून एक प्रकारचा पाव बनविण्यांत येतो. आपातानी लोक दुसऱ्या जमातीला मिलेट विकत नाहींत, उलट शेजारच्या डाफला लोकांकडून तेच पुष्कळ वेळां मिलेट विकत घेतात. याशिवाय आपातानी लोक आणखी एक प्रकारचें पीक काढतात. तें म्हणजे मका. याच्या तीन जाती असून त्याचें पीक बहुतकरून मोठ्या बागांतून काढण्यांत येतें. बागायतीपासून काढण्यांत येणारीं दुसरीं पिकें म्हटलीं म्हणजे घेवडा ( bean ), मिरच्या, तंबाखू, काकडी, हीं होत. कापड विणण्याचा धंदा आपातानी

लोक मोठ्या प्रमाणांत करीत असले तरी कापूस मात्र तेथें पिकत नाहीं. आर्थिकदृष्ट्या कापसाची लागवड परवडणारी नसल्यामुळें ते डाफला लोकांपासून कापूस खरेदी करतात आणि कापूस पिंजून झाल्यावर राहिलेलें बीं ते परत डाफला लोकांना उपयोगांत आणण्याकरितां देतात. शेतकीखेरीज बांबू, पाईन व फळझाडें यांचींही मोठमोठीं बनें या प्रदेशांत आढळून येतात.

**कायदा व व्यवस्था :**

एकंदरीनें विचार करतां आपातानी जमात शेतकीप्रधान व शांतताप्रिय असल्यामुळें त्यांच्यांत मारामारी किंवा लढाईसारखे प्रसंग क्वचितच येतात. शेजारच्या इतर जमातींत अगदीं उलट परिस्थिति असते. याचा अर्थ त्यांच्यांत भांडणें किंवा बेबनाव बिलकुल होत नाहींत असें मात्र नाहीं. परंतु असे प्रसंग उद्भवले तरी ते सामोपचारानें सोडविण्याची त्यांची प्रवृत्ति असल्यामुळें ते विकोपाला जात नाहींत. भांडणें सोडविण्याच्या कामीं ते वर सांगितलेल्या प्रतिनिधींची मदत घेतात. व्यक्तिव्यक्तींत किंवा गांवागांवांत भांडणें झाल्यास ती मिटवून ते एकमेकांबरोबर सलोख्यानें राहण्याचा करार करतात व तो अत्यंत कसोशीनें पाळतातही. या कराराला दापो असें नांव आहे.

**व्यापार व विनिमय :**

भाजीपाला व धान्य या बाबतींत आपातानी लोक दुसऱ्यांवर अवलंबून नाहींत. परंतु कत्तल करण्याकरितां लागणारे प्राणी, त्याचप्रमाणें उद्योगधंद्याकरितां लागणारा कच्चा माल यांकरितां त्यांना शेजारच्या जमातीवर व क्वचित् आसाम प्रांतावर अवलंबून रहावें लागतें. त्यांचें भाताचें पीक विपुल असल्यामुळें आपली गरज भागवून तांदळाची निर्यात करणें त्यांस जड जात नाहीं. तांदळाच्या बदलांत आपातानी मनुष्य आपल्याला लागणाऱ्या निरनिराळ्या वस्तू ते खरेदी करूं शकतो. या दृष्टीनें सुसंस्कृत आपातानी लोक व असंस्कृत आणि रानटी डाफला व मिरी जमाती यांच्यांत फरक आहे. देवघेवीच्या बाबतींत या दोन विरुद्ध संस्कृतीच्या जमाती एकमेकांवर अवलंबून राहतात हें नमूद करण्यासारखें आहे व या बाबतींत आपातानी लोकांची परिस्थिति इतर दोन जमातीपेक्षां जास्त चांगली आहे. एकाच ठिकाणीं पिढ्यात्पिढ्या राहिल्यामुळें आपातानी जमातीला एक प्रकारचें स्थैर्य प्राप्त झालें असून डाफला किंवा मिरी लोकांना स्थैर्याच्या अभावीं धान्याकरितां आपातानी समाजावर अवलंबून रहावें लागतें. अर्थात् या दोन जमातीमधील व्यापार म्हणजे एकमेकांना पूरक अशी देवघेव आहे. आपातानी लोक हे मुख्यत्वें शेतकी पेशाचे असल्यामुळें

त्यांना शेतीकडे विशेष लक्ष द्यावें लागतें. त्यामुळें जनावरांची जोपासना किंवा पैदास करणें त्यांना जमत नाहीं. यांच्या उलट डाफला लोक शेतकीच्या व्यवसायांत पूर्णपणें अनभिज्ञ आहेत. दाट जंगलें व पर्वतावरील उतरता भाग यांवर त्यांचीं वस्ती असल्यामुळें मायथन, बैल, बकरीं, डुकरें इत्यादि प्राण्यांची जोपासना व वाढ ते चांगल्या रीतीनें करूं शकतात. अशा कारणांमुळें आपातानी व डाफला यांच्यांत होणारी ही देवघेव दोघांनाही फायदेशीर होतें. या देवघेवीचा एक विशिष्ट प्रकार म्हणजे वस्तू खरेदी करणाऱ्या माणसानें विक्रेत्याला जेवण द्यावयाचें असतें. शेजाऱ्याबरोबर व्यापार करतांना आपातानी लोकांना आसाम प्रांताशींही व्यापार करावा लागतो. लोखंड, मीठ, आउतें इत्यादि वस्तू त्यांना आसाममधून खरेदी कराव्या लागतात.

## डाफला समाजाची रचना :

आपातानी समाजाच्या अगदीं उलट डाफला जमातीची राहाणी असते. डाफलाच्या एका कुटुंबांत सुमारें ७०–८० व्यक्ति असूं शकतात. त्या लांबलचक अशा घरांत एकत्र राहातात. त्यांचें घर म्हणजे एक स्वतंत्र पद्धतीचें कुटुंब असून प्रत्येक कुटुंब स्वतंत्र असतें. त्यांच्यांत गांवचा पुढारी असा कोणी नसतो. एका शाखेंतील लोकदेखील एकोप्यानें राहात नाहींत व त्यांच्यांत व्यक्तिगत आणि कौटुंबिक भांडणें नेहमीं होत असतात.

## डाफला जमातींमधील गुलामगिरी :

डाफला जमातींत वंशपरंपरागत वर्णभेद नसले तरी त्यांच्यांत स्वतंत्र मनुष्य व गुलाम असे दोन महत्त्वाचे भेद आहेत. दुसऱ्या जमातीबरोबर लढाई झाल्यामुळें त्यांत धरून आणलेले लोक किंवा कैदी त्यांच्या मालकीचे समजले जातात व ते त्यांना दुसऱ्या लोकांस विकूं शकतात. अशा रीतीनें विकले गेलेले लोक गुलाम समजले जातात. मात्र इतरत्र असणाऱ्या गुलामाप्रमाणें त्यांची स्थिति नसून ते आश्रित ( dependents ) म्हणून समजले जातात. त्यामुळें ते कांहीं कालानंतर आपलें व्यक्तिस्वातंत्र्य मिळवूं शकतात. एवढेंच नव्हे तर डाफला समाजांत त्याला सन्मानानें राहतां येते. डाफला जमातींत कायमचा गुलाम असा कोणी राहूं शकत नाहीं.

## डाफला, मिरी व आपातानी यांच्यांतील साम्यभेद :

याच विभागांत राहणाऱ्या मिरी जमातीची राहणी देखील डाफला लोकांप्रमाणें आहे. हे लोक स्वतःला गोगू म्हणवितात. डाफला जमातीच्या तीन मुख्य शाखा

ज्यांच्यापासून अस्तित्वांत आल्या त्यांच्या भावाचे आपण वंशज आहोंत असें ते मानतात. डाफला लोकांप्रमाणेंच यांचे देखील Dopum, Dodum व डाल असे भेद असून त्या सर्वांत विवाह वगैरे व्यवहार होऊं शकतात. त्यांच्या भाषेंत फरक असला तरी बोली-भाषेंत फारसा फरक नसल्यानें ते एकमेकांशीं व्यवहार करतात. त्यांना भाषेची अडचण भासत नाहीं. भाषा व रीतीरिवाज याबाबतींत मिरी जमातीचें डाफला जमातीशीं बरेंच साम्य असून या दोन्ही जमाती त्याच विभागांत राहाणाऱ्या आपातानी जमातीपासून अगदीं भिन्न वाटतात, आणि आपातानी जमातीच्या आजूबाजूस या दोन्ही जमाती असूनदेखील त्यांची संस्कृती अगदीं निराळी आहे. वंशदृष्ट्या मात्र आपातानी, डाफला व मिरी या तिन्ही जमातींत पुष्कळ साम्य आढळतें. आपातानी लोकांनीं बरीच सुधारणा करून घेतली आहे. परंतु डाफला लोक मात्र पिढ्यान्‌पिढ्या रानटी अवस्थेंतच रहात आले आहेत. नेहमीं भटकत राहिल्यामुळें त्या जमातीला कधींच स्थैर्य आलें नाहीं.

**डाफला वसाहत :**

एक एका गांवांत ३–४ घरांपासून ते ३० घरांपर्यंत डाफला जमातीची वस्ती असते. पुष्कळशीं घरें लांबलचक असून, अशा प्रत्येक घरांत कित्येकदां १०–१२ चुली असतात; कधीं कधीं तेवढीं कुटुंबेंही असतात. याप्रमाणें १० घरांत मिळून जवळजवळ ३०० पर्यंत डाफला लोक राहूं शकतात. हीं घरें डोंगरावर असून तीं उतरणीवर बांधलेलीं असतात. वैमनस्य केवळ गांवा-गांवामध्येंच नसून कुटुंबा-कुटुंबामध्येंही दिसून येतें. गांव म्हणजे एक घटक असें डाफला लोक कधींच मानत नसल्यामुळें त्यांचीं कुटुंबें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जात येत असतात. एकोप्याचा तर त्यांच्यांत पूर्ण अभाव आहे. त्यामुळें कित्येकदां गांवांतील इतर घरांवर कोणी हल्ला केल्यास आजूबाजूच्या घरांतील लोक स्वस्थ राहून शेजाऱ्यांच्या मदतीला न गेल्याचीं उदाहरणें कित्येकदां दृष्टीस पडतात.

**डाफला जमातीची आर्थिक स्थिति :**

डाफला जमातीच्या आर्थिक व्यवस्थेंत शेतकी व पशुपालन यांना जास्त महत्त्व आहे. Slass and pash या पद्धतीनें जमिनीची लागवड करावी लागल्यामुळें जमीन नेहमीं बदलावी लागते. मुख्य पीक तांदूळ ( dry rice ), मिलेट आणि मका यांचें असून पशुपालन हाही दुसरा महत्त्वाचा धंदा ते करतात. मायथून, डुक्कर, बकरें व कोंबड्या हे प्राणी डाफला लोक पाळतात. परंतु ज्यांचा आसामशीं संबंध आलेला आहे ते लोक बैलही पाळतात.

**पदम्–मिओंग संस्कृति :**

सिआंग सरहद्द या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशांत बऱ्याच आदिवासियांच्या वसाहती असून त्यांत पदम्–मिओंग व मिरी या जमाती मुख्य आहेत. सिआंग विभाग हा मुख्य आणि आकर्षक असा नेफा प्रदेशाचा भाग असून तेथील लोक सुंदर, आदरातिथ्यशील व अत्यंत उत्साही आहेत असें वर्णन सुप्रसिद्ध मानववंशशास्त्रज्ञ Verir Blinim यांनीं केलें आहे. हा प्रदेश म्हणजे आदिवासियांच्या संस्कृतीचा उत्कृष्ट नमुना म्हणून प्रसिद्ध आहे.

या विभागांतील आदिवासियांची सर्व वस्ती खेडेगांवांतच असून शहरी जीवनाशीं त्यांचा क्वचित्च संपर्क होतो. पदम्–मिआंग व मिरी या जमातींचीं गांवें सिआंग, यामेन व सियोम या तीन नद्या व त्यांच्या उपनद्या यांच्या कांठावर विखुरलेलीं असून ते आपातानी लोकांप्रमाणें एके ठिकाणीं राहाणारे असावेत असें दिसतें. त्यांची वस्ती नदीकांठच्या प्रदेशापेक्षां डोंगराळ भागांत व उतरणीवर आढळते. बहुतेक घरें चांगल्या रीतीनें बांधलेलीं असून गांवाच्या मध्यभागीं एक मठी ( जिला इंग्रजींत Dormitory म्हणतात. ) असते. या मठींत बहुशः अविवाहित लोकच राहतात. ही मठी गांवाच्या मध्यभागीं असल्यामुळें तेथून सबंध गांवाची पहाणी करतां येतें. अविवाहीत स्त्रियांच्या उपयोगाकरतांही कांहीं ठिकाणीं अशा प्रकारची इमारत असते. मुख्य गांवापासून थोड्या अंतरावर गांवाच्या टोंकाला धान्य सांठविण्याची जागा असते. गांवांत आग लागण्याचा वगैरे संभव असल्यामुळें सुरक्षिततेच्या दृष्टीनें ही धान्य सांठविण्याची जागा एकीकडे असावी असें दिसतें. याखेरीज पूर्वींच्या काळीं धोक्यापासून संरक्षण करतां यावें म्हणून प्रत्येक गांवांत एक स्वतंत्र इमारत असे. आतां तशीं फारशीं घरें आढळत नाहींत.

घरें बहुतेक लांकडीच असतात व त्याकरितां मुख्यतः बांबूचा उपयोग जास्त प्रमाणांत होतो. छपरें गवताचीं असतात. प्रत्येक घर म्हणजे एक लांबलचक खोली असून त्यांत खोल्या किंवा स्वतंत्र भाग असे कांहींच नसतात. घरांतील सामान, उपकरणीं वगैरे बहुतेक बांबूपासून किंवा लांकडापासून किंवा भोपळ्यापासून बनविलेलीं असतात. स्वयंपाकाकरितां मात्र मातीचीं भांडीं वापरलीं जातात. आदिवासींच्या घरांत तांबें, पितळ इत्यादि धातूंचीं भांडीं सहसा आढळणार नाहींत. असलींच तर ती केवळ शोभेकरितां किंवा देवघेवीचे साधन म्हणून वापरण्यांत येतात.

**गलोंग समाजरचना :**

सांस्कृतिक व भाषिक दृष्टया इतर जमातीहून सर्वस्वीं भिन्न अशी ही जमात, सियांग सरहद्दीवर आढळते. ही उत्तर व दक्षिण सियांग अशा दोन भागांत विभागली

गेली असून, दक्षिण सियांगमधील गलांग लोकांचा शेजारच्या सपाट प्रदेशाशीं बराच संबंध आल्यामुळें त्यांच्या आचार-विचारांत सुधारलेल्या भागाची छाप दिसून येते. विशेषतः पोशाख, अन्न इत्यादि बाबतींत हे लोक उत्तर सियांगमधील जमातीपेक्षां जास्त पुढारलेले आढळतात. वरच्या भागांतील गलोंग जमातीवर शहरी जीवनाचा फारसा परिणाम झाला नसला तरी त्याच विभागांतील इतर जमातीइतके ते मागासलेले नाहींत. गलोंग जमात आसामी संस्कृतीशीं व शेजारच्या मियांग लोकांच्या संस्कृतीला जास्त जवळची असल्यामुळें इतर शहरी संस्कृतीचा त्यांच्यावर झालेला परिणाम ठळक रीतीनें दिसून येतो. उदा० मुली दुकानांतून विकत आणलेलें कापड वापरतात. परंतु पदम् व मिओंग या जमाती पोषाखाच्या बाबतींत जास्त जुन्या वळणाच्या आहेत. गलोंग लोकांच्या शरिराची ठेवणही मिओंग व पदम् जातीहून निराळी आहे. मिओंग व पदम् जातीचे पुरुष व स्त्रिया आपले केस कापून आखूड ठेवतात. यांच्या उलट गलोंग पुरुष लांब केस राखतात. मिओंग जमातीप्रमाणें हजामत करीत नाहींत. स्त्रिया हिंदू स्त्रियांप्रमाणें लांब केस राखतात. त्याचप्रमाणें गलोंग जमात मिओंग लोकांप्रमाणें पान, चुना किंवा तंबाखू यांचें सेवन करीत नाहींत.

## गलोंग जमातीचें जीवन :

अबोर खोऱ्यांतील सर्व जमातींचा म्हणजे गलोंग, पदम् व मियोंग यांचा जीवन-क्रम जवळ जवळ सारखाच आहे. जगण्याची धडपड हेंच त्यांचें जीवनाचें सूत्र. खोऱ्याच्या वरच्या भागांतील पदम् आणि मियोंग यांना पैशाची विशेष हांव नाहीं. याच्या उलट गलोंग लोकांना पैशाचें महत्त्व कळल्यामुळें त्यांची नेहमी जास्त पैसा मिळविण्याकरितां धडपड चाललेली असते. मियोंग जमातीची भाषा हीच सर्वत्र वापरली जाते आणि गलोंग स्त्री व पुरुष यांना ती भाषा अवगत असल्यामुळें मियोंग जमातीशीं व्यवहार करतांना ते मियोंग भाषेचाच उपयोग करतात. गलोंग लोकांची भाषा सर्वस्वीं निराळी असल्यामुळें व मियोंग लोकांशीं व्यवहार करतांना ते मियोंग भाषेचाच उपयोग करीत असल्यामुळें गलोंग भाषा व्यवहारांत फारशी वापरली जात नाहीं.

## गलोंग विवाह-पद्धति :

गलोंग जमातीची विवाह पद्धती मात्र विशेषशी चांगली नसून त्याबद्दल त्या समाजांत हळू हळू जागृति होत चालली आहे. या जमातींत मुलींची लग्नें ४–५ वर्षांच्या मुलाबरोबर लावलीं जातात. कित्येकदां मुलगे जन्माला येण्यापूर्वीच त्यांचें विवाह ठर-विले जातात आणि हे विवाह ठरतांनाच मुलाच्या कुटुंबांत मुलगी दिली जाते व हुंड्याची रक्कमहि त्याच वेळीं पोचती करण्यांत येते. अशा पद्धतींत मुलींचीं लग्नें जरी

कुटुंबांतील नवऱ्याचे भाऊ वगैरे पुरुषांशीं झाली नसलीं तरी नवरा मुलगा वयांत येईपर्यंत वस्तुतः त्या मुली त्या नवऱ्या मुलाच्या भावाच्याच बायका मानल्या जातात. ही पद्धत पदम् व मियोंग या जमातींत आढळत नाहीं. गलोंग जमातीखेरीज इतर जमातींत मुलें व मुली आपापला जोडीदार निवडतात आणि नंतर वडील मंडळींची संमति मिळवितात. त्यामुळें त्यांच्यांत हुंड्याचा व देण्याघेण्याचा प्रश्न कधींच उद्भवत नाहीं. उलट गलोंग जमातींत हुंड्याबाबत बरीच मोठी रक्कम द्यावी लागत असल्यामुळें त्यांच्यांत विवाह जमविण्याच्या बाबतींत बऱ्याच अडचणी येतात. त्याप्रमाणें नवरा मुलगा वयांत येण्याच्या सुमारास आपली बायको तरुण स्त्री न राहतां २–४ मुलांची आई झालेली त्याच्या दृष्टीस पडते. याचा परिणाम असा होतो कीं वयांत आलेले नवरे मुलगे आपल्या पूर्वीच्या बायकांना सोडून दुसऱ्या तरुण स्त्रियांशीं लग्न करण्याची संधी पहात असतात. त्यांच्या पूर्वीच्या बायकांना मग घरांत राहून शेतीचें काम व घरकाम एवढेंच करावें लागतें. शिवाय २–४ मुलांच्या आया झालेल्या स्त्रिया नुकत्याच वयांत आलेल्या आपल्या यजमानाशीं समरस होऊं शकत नाहींत. या सर्व कारणांमुळें तरुण पिढींत अशा पद्धतीच्या लग्नाला वाढता विरोध होत असून त्यांना मियोंग व पदम् या जमातींत रूढ असलेली विवाहाची पद्धत जास्त पसंत पडत चालली आहे.

## गलोंग जमातींतील आर्थिक पद्धति :

गलोंग लोक एस्सो, डुक्कर, गायी, बकरी इत्यादि अनेक प्रकारचे प्राणी पाळतात. क्वचित् प्रसंगीं या पाळलेल्या प्राण्यांची संख्या ५०–६० पर्यंत असतें. याच्या उलट मिओंग किंवा पदम् या जमातींत यांच्या $\frac{1}{5}$ सुद्धां प्राणि श्रीमंतांतल्या श्रीमंत माणसाकडेही आढळणार नाहींत. ज्या वेळीं तांदुळाचा सांठा एक वर्षभर पुरण्याइतका नसेल त्या वेळीं यांतील कांहीं प्राण्यांची विक्री केली जाते. आर्थिकदृष्ट्या गलोंग जमातीची परिस्थिति मिंयोग किंवा पदम् यांच्यापेक्षां जास्त सुस्थितीची आहे. आणि कदाचित् याच कारणामुळें ते विणण्याच्या धंद्याकडे लक्ष देत नसल्यामुळें त्यांना दुकानांतून किंवा शेजारच्या जमातीकडून आपल्या गरजा भागवणें भाग पडतें.

## गलोंग–नृत्य व संगीत :

गलोंग जमात थोडीशी पुढारलेली असली तरी त्यांच्या संगीताचें व नृत्याचें चारच प्रकार आहेत. नाचाचा व संगीताचा कार्यक्रम साधारपणें तासभरच चालतो. परंतु मियोंग जमातींत नाच व गाणें यांचें विविध प्रकार असल्यामुळें त्यांचे कार्यक्रम

तासन्तास चालतात. गलोंग मुलींनीं मियोंग पद्धतीच्या नाचाचे व गाण्याचे प्रकार अवगत करून घेतलें असून कित्येकदां त्यांचे प्रयोग मियोंग मुलींच्या प्रयोगापेक्षांही सरस वठतात असा तेथें जाऊन आलेल्या लोकांचा अनुभव आहे.

## गलोंग – रोग व उपचार :

रोगांच्या उपचाराच्या बाबतींत एकच व्यक्ति सर्व जमातींना उपचार करते तिला मिरी अशी संज्ञा आहे. दुष्टयोनींतील पिशाचादिकांचा कोप झाल्यामुळें आजार उद्भवतो अशी त्यांची समजूत असल्यामुळें औषधापेक्षां अंगारे-धुपारे, नाच इत्यादिकांवर त्यांचा भर असतो. मियोंग-मिरी हा एक प्रकारें शांत अशा वातावरणांत आपले प्रयोग करून भुताखेतांना घालविण्याचा प्रयत्न करतो तर याच्या उलट गलोंग मिरी हा आरडाओरड करून रोग्याचा आजार बरा करूं पाहतो व तो त्या मानानें पैसेही बरेच मिळवितो. तथापि मियोंग-मिरी हा धार्मिक वृत्तीचा व दैवी शक्ति असलेला असा मानला जात असल्यामुळें त्याला जास्त मान दिला जातो व जमातीचें सर्व धार्मिक विधि त्याच्याच नेतृत्वाखालीं पार पाडले जातात.

## टांगसा जमात :

तिरप व नामन्चिक नांवानें ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशांत टांगसा नांवाची एक जमात राहाते. उत्तरेस पतकोई पर्वताची रांग व दक्षिणेस आसामची सरहद्द इतकी तिरप विभागाची व्याप्ति असून यांत टांगस, मोसांग, खेमसिंग, लुंग्री व योग्लो इत्यादि जमाती राहतात. या जमाती नामन्चिक पासून इंडो-बर्मा सीमेपर्यंत पसरल्या आहेत. या सर्व जमातींत टांगस ही जमात प्रमुख असून इतर जमाती दुय्यम स्वरूपाच्या आहेत. टांगसा याचा अर्थ त्यांच्या भाषेंत टांग – म्हणजे टेंकडी व सा म्हणजे लोक; म्हणजे टांगसा याचा अर्थ टेंकडीवरील जमात असा असला तरी टेंकडीवरील इतर जमातीला ते टांगस हें नांव द्यावयास तयार नाहींत. या जमातीची उत्पत्ति पूर्व बर्मा येथील मसोई सिन्रापुम् या टेकडीच्या भागांत असावी असें ते मानतात. याच विभागांतील लुंग्री लोक असें मानतात कीं मसोई सिन्रापुम् येथें एक मोठें झाड असून त्या झाडापासून एक स्त्री व पुरुष उत्पन्न होऊन त्या दोघांपासून सर्व सृष्टि उत्पन्न झाली. हें झाड म्हणजेच परमात्मा अशी त्यांची समजूत आहे. खेमसिंग या जमातीचीही समजूत अशीच आहे. एकंदरीनें विचार करतां टांगसा ही जमात मसोई सिन्रापुम् या भागांतून सध्यांच्या नेफा विभागांत आली असावी असें समजण्यास हरकत नाहीं. परंतु ही जमात या विभागांत कशी आली तें समजत नाहीं. बहुतेक भटक्या जमातींप्रमाणें अन्न मिळविण्याकरितां व शेती-भाती करण्याकरितां हे लोक

नेफा विभागांत आले असावेत. या जमातींच्या भ्रमणाविषयीं बऱ्याच कथा प्रचलित आहेत.

या समाजांत गांव हा एक प्रमुख घटक मानला जातो व त्यांच्या सार्वजनिक व सामाजिक व्यवहारांत गांवाला जास्त महत्त्व असतें. गांवें टेंकडीच्या उतारावर असून तीं बसवितांना पाण्याची विपुलता व शेतीकरतां लागणारी जमीन या दोन गोष्टी प्रामुख्यानें विचारांत घेतल्या जातात. शेतीला योग्य अशी जमीन मिळावी म्हणून हे लोक अनेकदां एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जातात. ही एक भटकी जमात असल्यामुळें त्यांच्यांत पद्धतशीर रीतीनें गांव बसविण्याची कल्पना नसते. प्रत्येक खेड्यांत थोडीशीं घरें असून ती अतिशय जवळ जवळ असतात. राहण्याच्या घरांखेरीज धान्य साठविण्याकरितां व ज्याला Dormitories म्हणतात, अशीं कांहीं घरें असतात. घरांची रचना चौकोनी पद्धतीची असून छपरें उतरतीं असतात. प्रत्येक घराचे तीन भाग असतात. पुढचा म्हणजे दर्शनी भाग हा सर्वांकरितां खुला असतो. मधला भाग वापर करण्याकरितां असून मागील भाग धान्य कांडण्याकरितां वगैरे उपयोगांत आणला जातो.

## टांगसा जमात – व्यापार

या जमातीचा आंतर-ग्रामीण व्यापार सर्रास चालू असून पतकोई पर्वतांच्या रांगांतील खिंडी यांमधून बर्मी लोकांशीहि त्यांचा व्यापार चालू असतो. व्यापाराकरितां मुख्यत्वें हातमागापासून तयार झालेलें कापड, चहाचीं पानें, मीठ व मणि या वस्तू उपयोगांत आणल्या जातात. व त्यांच्या बदला बर्मामधून ते मासे पकडण्याचीं जाळीं, भाले, सुऱ्या, अफू इत्यादि मालाची आयात करतात. ही देववेव कधी पैशानें होतें तर कधीं इतर वस्तूंच्यां बदलांत होतें. देवघेवीचें साधन ठरलेलें नाहीं. परंतु सर्वसाधारण चहाच्या पत्तीनें भरलेली एक बांबूची कांडी हें विनिमयाचें प्रमाण धरलें जातें. उदा० मासे पकडण्याच्या एका जाळ्याला चहाच्या पत्तीनें भरलेल्या आठ बांबूच्या कांड्याएवढी किंमत द्यावी लागते. वरील वस्तूंखेरीज शेतकीपासून तयार झालेल्या वस्तु, हातमागाचीं वस्त्रें, बकरी, कोंबडीं इत्यादिकांची विक्री आजूबाजूच्या सपाट प्रदेशांतून केली जाते. याबद्दल ते रोख रक्कम घेतात व त्या पैशांतून मीठ, सूत, मणि, वस्त्रें इत्यादि जरूरीच्या वस्तू खरेदी करतात.

## टांगसा जमात कुटुंबपद्धति :

टांगसा समाज पितृसत्ताक असून त्यांच्यांत अविभक्त कुटुंब पद्धत आहे. प्रत्येक कुटुंबांत आईबाप, विवाहित पुरुष आणि अविवाहीत मुली यांचा सर्वसाधारणपणें

समावेश होतो. कुटुंबांतील सर्व मंडळी एकाच घरांत राहतात आणि प्रमुख व्यक्तीच्या ह्मणजे बापाच्या मृत्यूनंतर देखील विभक्त होत नाहींत. एकाच कुटुंबांत कधींकधीं २० हून जास्त लोक असतात. अगदीं अपवाद ह्मणून कित्येक वेळां घरांतील मुलगे वेगळे होऊन निराळें घर करतात. टांगसा कुटुंबांत लग्न झालेल्या प्रत्येक जोडप्याला स्वतंत्र एक खण जागा देण्यांत येतें. घरांतील सर्व स्त्री-पुरुष उपजीविकेचें साधन मिळविण्या-करितां हातभार लावतात व सर्वांच्या स्वयंपाकाची व जेवण्याची व्यवस्था एकत्रच केली जाते.

बहुतेक आदिवासी जमातीप्रमाणें टांगसा जमातींतहि Dormitory ही संस्था आढळतें. त्यांचा उपयोग मुख्यत्वें अविवाहित पुरुषांना क्लबाप्रमाणें करतां येतो. त्याचप्रमाणें गांवावर एखादे वेळीं हल्ला झाल्यास म्हातारी मंडळी, स्त्रिया व मुलें यांना सुरक्षितपणें ठेवण्याकरितांहि या Dormitories चा उपयोग होतो. पूर्वीच्या काळीं अशा प्रकारची जरूरी भासली तरी अलीकडे त्यांचा फारसा उपयोग नसतो. पुरुषांप्रमाणें गांवातील अविवाहित तरुण मुलींसाठीं अशा प्रकारचीं घरें असतात व त्यांचा उपयोग त्यांना करमणुकीकरितां व झोंपण्याकरितां होतो.

### सरकारी धोरण :

स्वातंत्र्यानंतर नेफा विभागांतील जमातींची उन्नति करण्याच्या दृष्टीनें सरकारी प्रयत्न करण्यांत येत असून सरकारनें या जमातींच्या बाबतींत केलेल्या प्रयोगांचा उल्लेख या ठिकाणीं करणें अप्रस्तुत होणार नाहीं. नेफा विभागांतील बहुतेक जमातींचें शेतकी हेंच उपजीविकेचें साधन आहे; परंतु झुम पद्धतीनें शेतकी करून येणारें उत्पन्न पुरेंसें नसल्यानें आतां लागवड पद्धतीनें शेती करण्याचें महत्त्व त्यांना पटलें असून जुन्या झुम पद्धतीबरोबरच नवीन पद्धतीनें त्यांनीं शेती करण्यास सुरुवात केली आहे. त्यांना खालील प्रमाणें सरकारी मदत मिळतें.

### प्रकार १ :

जमीन खरेदी करण्यास, कालवे खोदण्यास, हत्यारें विकत घेण्यास त्याचप्रमाणें बी-बियाणें, नांगर, बैल इत्यादि शेतकीविषयक गरज भागविण्यासाठीं मदत मिळूं शकतें.

### प्रकार २ :

शेतकी तज्ञांचे मार्गदर्शन, पिकांचे रक्षण वगैरे करण्याबद्दल, विक्रीप्रदर्शन, मालाचा उठाव, पशुपालन इत्यादि बाबतींत मार्गदर्शन केलें जातें.

नेफा विभागांत Land Settlement पद्धत नसून जमिनीची मालकी निरनिराळ्या प्रकारची असते. मालकीचे मुख्य प्रकार म्हणजे (१) व्यक्तिगत मालकी. (२) जमातीची

सामायिक मालकी. (३) सर्व गांवाची मालकी असे तीन प्रकार आहेत. मालकी संबंधींचे कायदे Zum law Regulation या नांवानें ओळखले जात असून या कायद्यान्वयें एखादी जमीन किंवा झुम पद्धतीनें मशागत केलेली जमीन जर वहिवाटीनें करण्यांत आली तर जंगल तोडण्याचा किंवा गुरांना चरण्याकरितां त्यांचा उपयोग करण्याचा हक्क एखाद्या व्यक्तीला किंवा जमातीला प्राप्त होतो. मात्र प्रत्यक्षांत जे रीतीरिवाज असतील तेच सरकारी नियमापेक्षां जास्त पाळले जातात.

शिक्षणाच्या बाबतींत व उद्योगधंदे यांच्या बाबतींत सरकारनें बरीच सुधारणा केली असून बेसिक [ Basic ] शिक्षणपद्धति, कला व शेतकी यांच्या शिक्षणाकरितां जवळजवळ १०० शाळा सुरू करण्यांत आल्या आहेत. प्रायमरीपर्यंत मातृभाषेंतून शिक्षण देण्याची व्यवस्था असून १ ल्या इयत्तेपर्यंत जमातीच्या भाषेंतून पुस्तकें छापलीं आहेत. चवथ्या इयत्तेपासून आसामी भाषा व प्रायमरी करितांदेखील ती भाषा सुरू करण्याचें प्रयत्न चालू आहेत. फारच थोड्या भाषांकरितां लिपी आहे. त्यामुळें देवनागरी लीपीचा प्रसार करण्याचा सरकारचा विचार आहे. तिसऱ्या व चौथ्या इयत्तेला हिंदी व इंग्रजी ठेवण्यांत आलें आहे. १९४७ पर्यंत सबंध नेफा विभागांत फक्त दोन प्राथमिक शाळा होत्या, आतां त्यांची संख्या जवळजवळ १५० पर्यंत असून त्यांची विभागणी खालीलप्रमाणें आहे.

लोअर प्रायमरी १२९, मिड्ल इंग्लिश १४, हायस्कूल्स् ५, धंदेशिक्षणसंस्था ३ या सर्व संस्थांतून शिक्षकांची संख्या ३२८ असून विद्यार्थ्यांची संख्या सुमारें ७००० इतकी आहे.

**घरगुती धंदे :**

नेफा विभागांतील लोकांची हरहुन्नरी म्हणून बरीच प्रसिद्धि आहे. त्यांच्या मूळच्या कलेंत फारसा फेरबदल न करतां त्यांना जास्त जास्त उत्तेजन देऊन त्यांच्या राहणीचें मान वाढविण्याचा व त्यांना जास्त कार्यक्षम बनविण्याचा नेफा एजन्सीचा प्रयत्न आहे. निरनिराळ्या प्रकारचे धंदेशिक्षण देण्याकरितां सुमारें दहा ठाणीं उघडण्यांत आलीं असून त्यांत खालील धंद्याबाबत शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. १ विणकाम ( weaving ), २ सूतकताई ( spinning ), ३ शिंपीकाम ४ गालीचे तयार करणें, ५ सुतार काम, ६ कोरीव काम. ७ बांबू व वेतकाम, ८ कोंबड्या पाळणें, ९ साबण करणें इत्यादि. त्याचप्रमाणें रेशीम कामाविषयीं माहिती देणारीं १–२ केंद्रें आहेत.

नेफा विभागांतील लोकांत बहुधा फुप्फुसाचे रोग, मलेरिया, अमांश, पोटाचे व आंतड्याचे विकार यांसारख्या रोगांचे प्रमाण फार असून त्याहि बाबतींत त्यांना मदत करण्याचे सरकारी प्रयत्न चालू आहेत.

**सहकारी चळवळ :**

नेफा विभागांतील बहुतेक जमातींना मुळांतच सहकारी तत्त्वाची महती कळलेली दिसते. कारण प्रत्येक गांवचा व्यवहार सहकारी तत्त्वावरच चाललेला आढळतो. या विभागांत पहिली सहकारी संस्था १९५५ सालीं स्थापन करण्यांत आली असून त्या ठिकाणीं आतां सुमारें २५ प्राथमिक सहकारी संस्था अस्तित्वांत आहेत. या शिवाय एक सहकारी औद्योगिक संस्था व एक को-ऑपरेटिव्ह डेअरी फार्म याहि संस्था आहेत. सहकारी पद्धतीनें काम करण्याची पद्धत नेफा विभागांतील जमातींच्या अंगी मूळचीच असल्यानें सामुदायिक पद्धतीनें शेती व इतर उद्योग करणें हे या नेफा जमातींचें वैशिष्ठ्य मानावें लागेल.

नेफा विभागाची सर्वांगीण उन्नति करण्याकरितां मध्यवर्ती सरकारचे प्रयत्न चालू असून योजना समितीनें या कार्याकरितां दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ९५० कोटी रूपयांची रक्कम मंजूर केली होती. परंतु नंतर कामाचे व्यावहारिक स्वरूप व तातडीचीं कामें लक्षांत घेतलीं जाऊन या रकमेंत दुरुस्ती करण्यांत आली. दळणवळणाची सोय करण्याकरितां व रस्तेबांधणीकरितां ३४४ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत योजना समितीनें या कार्याकरितां सुमारें ७ कोटी ९ लक्ष रुपयांची तरतूद केली आहे.

**संदर्भ ग्रंथ व इतर साहित्य :**


(1) *Furer Haimendorf* : The Naked Nagas. Thacker Spink & Co., Pvt. Ltd., Calcutta, 2nd renewed edition 1962.

(2) *Furer* : The Ape Tanis and their Neighbours, Routledge & Kigen Paul, London 1962.

(3) *B. K. Shuklar* : The Daftas of the Subansiri Region, North East Frontier Agency, Shillong 1959.

(4) *Parul Datta* : The Tangsas of the Namchik and Tirap villages, North East Frontier Agency, Shillong 1959.

(5) *Sachin Roy* : Aspects of Padam Miyong Culture, North East Frontier Agency, Shillong 1960.

(6) *E. T. Dalton* : Descriptive Ethnology of Bengal, 1960.

(7) Eastern Anthropologist, different volumes.

(8) The Times of India Directory.

(9) *Verrier Elwin* : A Philosophy for Nefa, Shillong 1959.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 34660 वि: मिवांध्
क्रमांक 2551 नों दि 6/2/65

१२

# हिमालयांतील परतंत्र देश : तिबेट

**श्री. त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर**

**म**ध्य आशियाच्या एका सपाट पठारावर तिबेट वसलेलें आहे. त्यास 'जगाचें पठार' असेंही दुसरें नांव आहे. त्याचें क्षेत्र ५ लक्ष चौरस मैल आहे. समुद्रसपाटीपासून तो सरासरी १०,००० फुटांवर आहे. उत्तरेकडील त्याची उंची १६,००० फूट आहे. 'जगाचें छप्पर' असेंही तिबेटला संबोधण्यांत येतें. तिबेटच्या पूर्वेस चीनचें राज्य आहे. पश्चिमेला काश्मीर हें नंदनवन वसलें आहे तर दक्षिणेला नेपाळ, भूतान व सिक्कीम आहेत. उत्तरेला चिनी तुर्कस्थान आहे. ह्या पठाराच्या आजूबाजूला पर्वतांच्या रांगा आहेत. काराकोरम पर्वताची रांग म्हणजेच टांगला रांग व तीच तिबेटमध्यें आहे. भौगोलिक दृष्ट्या तिबेटचें तीन विभाग पडतात. ( १ ) उत्तरेकडचा—त्याला चांग-टांग म्हणतात. दऱ्या-खोऱ्यांनीं हा भाग व्यापलेला आहे. ह्या प्रदेशांत झाडांचा अभाव आहे. ( २ ) दक्षिण तिबेटमध्यें ब्रह्मपुत्रा ( सांगपो ), सिंधु व सतलज या मोठ्या नद्यांची खोरी आहेत. हा भाग फार सुपीक असून याच भागांत महत्त्वाचीं शहरें वसलेलीं आहेत. ल्हासा हें राजधानीचें शहर

आहे. तसेंच ग्यान्त्से, सिंगत्से हीं मुख्य शहरें याच भागांत आहेत. जालंग या जिल्ह्यांत सोन्याच्या खाणी आहेत.

याक नांवाच्या रानटी जनावरांचे कळप उत्तरेकडील भागांत सांपडतात. तसेंच कस्तूरीमृग, मानस सरोवरांतील हंस, पाश्मिम जातीची लोकर देणाऱ्या मेंढया व इतर पशुपक्षी येथें आढळतात.

तिबेटची हवा अत्यंत थंड आहे. पण उन्हाळ्यांत कांहीं भागांत १०५ अंश उष्णतामान चढतें. पावसाचें प्रमाण मात्र एकंदरींत कमीच आहे. पूर्व व दक्षिण भागांत बार्ली, बकव्हीट, जर्दाळू, अक्रोड, पिअर्स, पिचेस, सफरचंद वगैरे फळें होतात. तिबेटला नद्या व सरोवरें यांचा प्रदेश म्हणण्यांत येतें. चीनमधील मोठमोठ्या नद्यांचा उगम तिबेटांतूनच होतो. यँगसी, साल्वीन, मेकांग ही त्या नद्यांचीं नांवें. जगांतील सर्वांत मोठें म्हणजे ११,००० चौ. मैलांचें सरोवर तिबेटमध्येंच आहे. राक्षस सरोवर व राकस ( राक्षस ) ताल हीं पवित्र सरोवरें सतलजच्या उगमापाशीं आहेत.

तिबेटमधील खनिज संपत्तीचें संशोधन व उत्खनन अद्याप झालेलें नाहीं. पूर्व तिबेटमध्यें सोनें, रुपे, तांबें, लोखंड, कथील यांच्या खाणी आहेत. पश्चिममेच्या नद्यांच्या खोऱ्यांत सुवर्णाचे कण सांपडतात.

तिबेटमधील दळणवळाचे मार्ग अगदींच तुटपुंजे आहेत. चीननें १९५० नंतर आपल्या बाजूनें तिबेटला जोडणारे दोन नवे रस्ते बांधले. त्यांतील एक १४१३ मैल लांब आहे. त्यापूर्वी चीनला हिंदुस्थानमार्गें तिबेटला जावें लागे. तिबेटची खानेसुमारी अद्याप झालेली नाहीं. पण तेथील लोकसंख्या १९५० पूर्वी ३० ते ४० लाख होती. ही वस्ती वाड्या-पाड्यांतून वसलेली आहे. तिबेटमधील बुद्धाच्या अनेक मूर्ति शुद्ध सोन्याच्या आहेत.

तिबेटी जनतेचे चार वर्ग करण्यांत येतात. पहिलाः श्रीमंताचा, दुसराः व्यापाऱ्यांचा, तिसराः शेतकऱ्यांचा व चौथाः मेंढपाळांचा. श्रीमंत वर्गांत जमीनदार, धनिक व स्वतःला श्रेष्ठ म्हणविणारे आहेत. तिबेटमधील प्रत्येक माणूस हा जन्मतःच व्यापारी वृत्तीचा असतो. मठांतील लामा व सरदार, जमीनदार हेंहि व्यापार करीत असतात. त्यांना व्यापारासाठीं दूरदूर प्रवास करावा लागतो. पुरुष बाहेर गांवीं गेल्यानंतर दुकानें स्त्रियाच चालवितात. येथील स्त्रिया अत्यंत पुढारलेल्या व व्यवहार-चतुर आहेत.

तिबेट हा एक ओसाड, उजाड, निर्जन देश आहे, असा एक समज आहे पण तो भ्रम आहे. तेथें सुपीक जमीन विपुल आहे. पण जमीन करण्यास पुरेशी मनुष्यशक्ती तेथें नाहीं. कारण बहुसंख्य लोक मठांत रहातात व स्वतःस धर्मकार्यास

वाहून घेतात. ह्या धार्मिक प्रवृत्तीचा अनिष्ट परिणाम म्हणजे तेथील लोकसंख्या घटत आहे. मठांतील लामांची नीतिमत्ता चांगली असतें. त्यामुळें अनाचार, व्यभिचार वगैरे प्रकार होत नाहींत. एखादा लामा अनाचारी निघाल्यास त्याचें लग्न लावून देण्यांत येतें. हीच त्यांची शिक्षा.

मेंढपाळ उत्तरेकडील डोंगरांच्या आश्रयानें रहातात. ते भटके आहेत. वर्षांतून एकदां सपाटीवर येतात. त्यांच्याजवळ पीठ, मीठ, लोणी ह्या खाण्याच्या जिनसा असतात त्या विकून ते धान्य, चहा, लोकरी कापड वगैरे गोष्टी खरेदी करतात. तिबेटमध्यें गोडें तेल अजिबात नाहीं. मात्र लोणी पुष्कळ आहे. गरीब लोक मेंढ्या-बकऱ्यांच्या दुधाचें लोणी करतात व श्रीमंत लोक ड्राय (याक)चें लोणी वापरतात. घरांत वर्षानुवर्षे लोणी सांठलेलें असते. घराघरांतून बुद्धांच्या मूर्ति असतात व त्यापुढें लोण्याचा अखंड दिवा तेवत असतो. तांदूळ मिळणें म्हणजे एखादी लक्झुरी मिळाल्याप्रमाणें त्यांना आनंद होतो. चहाच्या पानांच्या विटकरीसारख्या विटा असतात. त्या कापून त्यांत लोणी मिसळतात व त्यांत मीठ व सोडा टाकून खूप घुसळायचे व तो चहा प्यायचा. लोकांचीं घरें इतकीं अस्वच्छ असतात कीं सगळीकडे डांस, चिलटें यांचें साम्राज्य पसरलेलें असतें. पण घरांतलें देवघर व देऊळ इतकें स्वच्छ असतें कीं त्यास सबंध जगांत तोड नाहीं. देवळास व देवळांतील मूर्तीस ते अत्यंत जपतात. लामा हा पंथ मुख्य पंथ मानला जातो. येथें लामांचे ३०० मठ असून प्रत्येक मठांत २५०० लामा राहतात. परमेश्वरावर भक्ति, त्याचें अहोरात्र चिंतन करणें, जग अस्तित्वांत नाहीं असे समजून परमेश्वराचें ध्यान करणें हा त्यांचा मुख्य व्यवसाय. तेथील मठांत अगणित संपत्ति आहे. तेथील $\frac{1}{3}$ जमीन मठांनीं व्यापलेली आहे. तीन लाख लोक मठांतून रहात असल्यानें स्त्रियांशीं लग्न कोणी करायचें हा गंभीर प्रश्न आहे.

तिबेटच्या सामाजिक जीवनांत स्त्रियांचा दर्जा फार श्रेष्ठ आहे. त्या स्वतंत्रपणें हिंडतात, फिरतात, घर सांभाळतात; व्यापार उद्योगहि करतात. शेती, गुरें राखणें, लोकरीचें सूत काढणें, हातमागावर विणकाम करणें वगैरे कामें त्या करतात. त्या पुरुषापेक्षां अधिक व्यवहारदक्ष असतात. त्या अशिक्षित आहेत. त्यांच्या अंगावर भाराभर दागिने असतात. त्यांच्यांतील विवाहपद्धत आपल्याकडील पुरातन पद्धतीप्रमाणेंच असून बाप वधू निवडतो. मुलाच्या अनुमतीनें लग्न ठरते. मुलीला मात्र पसंती-नापसंतीचा हक्क नाहीं. एकमेकांच्या पत्रिका जुळल्या तरच लग्न होते. लग्नानंतर मुलीच्या बापाला रक्कम देण्यांत येते. तिबेटमध्यें बहुपत्नीकत्व, बहुपतिकत्व आहे. बहुपतित्वाची चाल भटक्या जमातींत आहे. भावाभावांत एक समाईक बायको असते. पण ती स्त्री वडील दिराशीं लग्न करीत नाहीं. तिला होणाऱ्या सर्व मुलांचा बाप पहिला पति समजला जातो.

तिबेटी लोक मांस निषिद्ध मानीत नाहींत. पशूंची हत्त्या करणारे समाजबाह्य मानले जातात. बार्ली हें त्यांचें मुख्य अन्न. तिबेटी लोकांचीं घरें बहुतेक चौकोनी असतात. घराला एकच प्रवेशद्वार असतें. घराचीं छपरें सपाट असतात. तिबेट हा धार्मिक लोकांचा देश आहे. त्यामुळें तेथें सण-वार, उत्सव, जयंत्या, पुण्यतिथी यांची गर्दी असतें. दर महिन्याचा आठवा, दहावा, पंचविसावा व तिसावा दिवस पवित्र मानतात. पौर्णिमा व प्रतिपदा हीहि पवित्र मानतात. तिबेटमध्यें सर्वांत मोठा सण नव्या वर्षाच्या पहिल्या दिवसाचा. ल्हासामध्यें तो प्रचंड प्रमाणावर साजरा होतो. तो अनेक दिवस चालतो. तिबेटी माणूस हा स्वभावतः आनंदी व सुखाभिलाषी आहे. धर्मानें त्याचे जीवन घडलेलें आहे. धार्मिक भावना त्याच्या जीवनावर परिणाम करतात.

तिबेटी भाषेचें ब्रह्मी भाषेशीं साम्य आहे. तिबेटांत अनेक बोलभाषा आहेत. पण मुख्य भाषांचे तीनच गट पडतात. ल्हासा व आसपासची भाषा. लडाख, लाहुल, बाल्टिस्तान व पुरँगच्या दुसऱ्या भाषा व पूर्वेकडील खामच्या तिसऱ्या भाषा. ल्हासाची भाषा सर्वांना समजते. तिबेटचे सर्व वाङ्मय धार्मिक वाङ्मय आहे. ७ व्या शतकाच्या मध्याला देवनागरीं लिपीवरून तिबेटनें आपली लिपी बनविली. तिबेटी धर्मग्रंथ हे दोन प्रकारचे आहेत. कँगयुर किंवा बुद्धधर्मीय कायद्यांचा संग्रह व टेंगयुर म्हणजे कायद्यावरील टीका. कँगयुर १०८ ग्रंथ आहेत व टेंगयुर २२५ आहेत.

दलाई लामा कधीं मरत नसतो, अशी लामांची समजूत आहे. तो देहत्याग करून कोणाच्या ना कोणाच्या शरिरांत प्रवेश करतो. बापाची गादी मुलगा चालवेल अशी इथें प्रथा नाहीं. दलाईलामा व पंचनलामा असें मुख्य दोन भेद. पंचनलामास राजकीय अधिकार नसतात. व्रतांचा अंगिकार करतांना त्यांची मते फार प्रखर आहेत. अशी २५३ व्रतें असून ८४,००० मानवी विकार जिंकावे लागतात अशी त्यांची भावना आहे. त्यासाठीं १५ मार्गांचा अवलंब करावा लागतो.

तिबेट हा चीनचें अधिपत्त्याखालीं नव्हताच असें दलाईलामा शेवटपर्यंत सांगत होता. पहिल्या हजार वर्षांत सेंपो टोळीनें राज्य स्थापले. त्यावेळीं बोम धर्म अस्तित्वात होता. हे बोम भुता-खेतास मानणारे होते. बोम हा बुद्ध मिश्रीत पंथ पिवळ्या टोप्या घालीत. पांढरी टोपीवाले व मिश्र टोपीवाले असे भेद पडले. बुद्ध व बोम लोकांचा समन्वय बनून निर्माण झालेले लोक व्यभिचारी, व्यसनी निपजले.

इ. स. १८९० त हिंदुस्थानांत इंग्रजांचे राज्य आले. त्या वेळेस सिक्कीमचा प्रश्न उपस्थित झाला. हिक्कीमवर इंग्रज हक्क सांगतात म्हणजे त्यांच्या मनांत पाप उभे राहिले हे उघड होते. १८९० पर्यंत चीन-तिबेट संबंध आला नव्हता. इंग्रजांनी ट्रेड ॲग्रीमेंटस् घडवून आणले पण तिबेटला ते मान्य झालें नाहीं. कारण चीन ब्रिटिशांना मदत करावयास तयार नव्हता. आणि याच गडबडींत चीनचे तिबेटशीं संबंध

जडलें गेलें. लॉर्ड कर्झननें यंग हसबंड मिशन पाठविलें. हे तिबेटी जनतेला सहन झालें नाहीं. ती खवळली. आणि त्या पीसफूल मिशनचे मिलिटरी मिशनमध्यें रूपांतर झालें. मिशननें आपला अवतार उग्र करण्यास सुरुवात केली. गोळीबार, सुरू झाला. अनेक तिबेटी मिशनने ठार केलें. त्यामुळें दलाई लामा जो पळाला तो चीनच्या आश्रयास जाऊन राहिला, इतर मध्यस्थींनीं आपापसांत करार करण्यासंबंधीं सूचना केली. १९०४ सालीं तिबेट व ब्रिटन यांच्यांत करार झाला. पण त्यांत अधिकाऱ्यांचा उल्लेख नाहीं. हा करार लंडन येथें झाला व त्यास आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालें. १९०६ चा करार ब्रिटीश व चीनमध्यें झाला. १९०७ सालीं ब्रिटिशांनीं रशियाशीं असा करार केला कीं, तिबेट चीनच्या सुझेटीखालीं आहे. त्यामुळें दुसऱ्याच वर्षी चीनच्या फौजा तिबेटमध्यें येऊन दाखल झाल्या. त्यांनीं तिबेटीयांचा अमानुष छळ करण्यास सुरुवात केली. १९१० साली पहिलि स्वारी केली. दलाई लामा व त्यांचे मंत्री ब्रिटिशांच्या मुलखांत दार्जिलिंगला पळून गेले. १९१२ सालीं मॅंच्युरिया घराण्याची सत्ता गेली. तेथें क्रांती झाली. तिबेटमधील चिनी सैन्यानें आपल्या अधिकाऱ्याविरुद्ध बंड पुकारलें. त्या संधीचा तिबेटनें पुरेपूर फायदा घेतला व त्यांना हद्दपार केलें. १९१२ सालीं तिबेटनें स्वातंत्र्य पुकारलें. १९१३ सालीं कॉन्फरन्स भरून ब्रिटीश व चीन यांचा एक एक प्रतिनिधी तिबेटांत येऊन दाखल झाला. ब्रिटिशांतर्फे मि. मॅक्महोन, चीनतर्फे इव्हॅनचेन व तिबेटतर्फे लेनचेन शामा असे तीन प्रतिनिधी एकत्र आले. १९१४ सालीं तिघांनीं करारावर स्वाक्षऱ्या केल्या. चीन सरकारनें करारावर आपल्या प्रतिनिधीची स्वाक्षरी असतांना करार मंजूर केला नाहीं.

१ ऑगस्ट १९५० रोजीं चीनमध्यें ३ ऱ्या रिपब्लिकनची स्थापना झाली. 'नेहरु म्हणजे ब्रिटिशांचे मागें धावणारा कुत्रा' असें चीननें म्हटलें. 'काश्मीर पाककडूनच भारताला मिळाला' तर परराष्ट्रीय धोरणासाठीं आम्ही फार मोठी किंमत दिली आहे – आम्ही तिबेट मुक्त करणार –' इति माओ! १९५०-५१ सालीं तिबेटच्या पूर्व भागांत चीनचें सैन्य घुसलें. त्यानें तिबेटचें स्वातंत्र्य हरण केलें. चीननें जे दोन मोठे रस्ते बांधले त्या कामीं त्यानें तिबेटियांना गुरासारखे राबवून घेतले. पैशाची व संपत्तीची लुटालूट केली. १९५१ सालीं पेकिंग-ल्हासा रस्ता तयार झाला. हा रस्ता तयार झाला नसता तर तिबेटवर स्वारी करणें शक्य झालें नसते. १९५१ सालीं दलाई लामाचें प्रतिनिधित्व काढून घेण्यांत आले व त्याच्यावर १० करारांच्या अटी लादण्यांत आल्या. दलाई लामा याटुंग मार्गें हिंदुस्थानांत पळून आला. येतांना बरोबर जडजवाहीर आणून ते सिक्कीम येथें ठेवलें. १९५४ मध्यें त्यास पेकिंगचें अमंत्रण आलें. पण लोकांनीं त्यास अडवून धरलें. अशा परिस्थितींतहि या ला पेकिंगला जाणे भाग होते आणि तो गेलाहि.

**तिबेटचा शेवट :**

तिबेट हा आतां स्वतंत्र म्हणून नकाशावरून पुसून निघालेला देश आहे. त्याचें स्वातंत्र्य संपलें व चीनच्या अधिराज्याचा अर्थ चीनचें राज्य असा झाला. दलाई लामानें ह्या दुर्दैवाच्या कहाणीचा हृदयद्रावक शेवट कसा झाला याचें निवेदन केलें आहे.

मोनलॅम नांवाचा सण बुद्ध धर्मांत फार मोठ्या प्रमाणावर व फार मोठ्या उत्साहानें साजरा करतात. फेब्रुवारी, मार्च १९५९ च्या सुरवातीची त्या सणाची हकीकत आहे. दलाई लामा त्या उत्सवाच्या तयारींत असतां, त्यांना दोन चिनी लष्करी अधिकारी भेटावयास आले. जनरल टान कुआनसॅननें आपणांस पाठविलें असल्याचें त्यांनीं सांगितलें. चिनी लष्करी छावणींत एक नाटक होणार होतें व त्या नाटकाला हजर राहण्यास दलाई लामांना केव्हां सवड आहे असें जनरल साहेबांनीं विचारलें होतें. दलाई लामांना त्या नाटकाची व आमंत्रणाची पूर्वींच कुणकुण लागली होती. त्यांनीं त्या चिनी लष्करी अधिकाऱ्यांना सांगितलें कीं, मोनलॅमचा सण दहा दिवसांत संपेल व त्यानंतर मी तारीख कळवीन. ते अधिकारी वर्दळीवर आहे व म्हणूं लागले कीं, तारीख आतांच्या आतां सांगितली पाहिजे. पण दलाई लामानें तितक्याच निग्रहानें पुढील तारीख सांगण्याचें नाकारलें. वास्तविकपणें दलाई लामांना आमंत्रण पाठविण्याची एक विशिष्ट सन्मानाची पद्धत असे. ती पद्धत दलाई लामांचा अपमान करण्याकरितांच सोडून देण्यांत आली. लोक अस्वस्थ झाले. दलाई लामांना नाटका-करितां बोलावून चिनी अधिकारी एकतर त्यांना ठार करतील किंवा कैद करतील अशी शंका त्यांना आली. चीनचीं आमंत्रणें नाकारणें हें त्या वेळीं अशक्यप्राय होतें. तीं आमंत्रणें नाकारणें याचा अर्थ मृत्यूला व रक्तपाताला आमंत्रण देण्याइतकें धाडसाचें होतें.

५ मार्च १९५९ रोजीं दलाई लामानें जोखँग देवालय सोडलें व ते नोरबु-लिंकाच्या उन्हाळी दिवसांतल्या वास्तव्याच्या राजवाड्यांत आले. त्या वर्षीच्या समारंभांत चीननें अगोदरच्या वर्षाप्रमाणें भाग घेतला नाहीं. त्यामुळें शंका वाढत चालल्या. ७ मार्चला परत तारखेबद्दल विचारणा झाली व दलाई लामानें १० मार्च आपल्याला सोईस्कर असल्याचें कळविलें.

९ तारखेपर्यंत दलाई लामा कसे जातील, त्यांच्याबरोबर कोण असतील वगैरे कांहींच ठरलें नव्हतें. त्या दिवशीं सकाळीं आठ वाजतां चिनी लष्करी अधिकारी आले व त्यांनीं तिबेटी लष्करी अधिकाऱ्यांना कळविलें कीं, दलाई लामाबरोबर नेहमींचे सशस्त्र सैनिक असणार नाहींत, दलाई लामांना पाहिजेच असेल तर त्यांनीं दोन निःशस्त्र शरीररक्षक बरोबर घ्यावेत.

चीनची लष्करी छावणी ही 'स्टोन ब्रिज' (दगडी पूल) पासून सुरू होत होती व ती छावणी नोरुबुलिंकाच्या पासून दोन मैलांच्या आंत होती. लोक त्या छावणी कडे पाहून दांत ओठ चावीत. त्यांच्या पारतंत्र्याची ती छावणी द्योतक होती. पण ते काय करूं शकत होते? चिनी अधिकाऱ्यांना आमंत्रणाचा काय प्रकार आहे असें विचारलें तेव्हां ते म्हणाले, जर दलाई लामावर कोणी पिस्तुल झाडलें तर त्याची जबाबदारी कोणावर राहील? आम्हीहि आमच्या शिपायांचीं शस्त्रें काढून घेणार आहोंत. तुमच्या हद्दींत तुम्ही नेहमींचा लवाजमा ठेवा; पण तो स्टोंन ब्रिजपर्यंत! ही सर्व हकीगत अत्यंत गुप्त ठेवा असाहि हुकूम तिबेटच्या लष्करी मुख्याला देण्यांत आला.

दलाई लामा हे नाटकाला अशा अशा अटीवर जाणार आहेत, ही बातमी गुप्त कशी राहणार? दलाई लामा केव्हांहि बाहेर पडले म्हणजे शेंकडों लोक दुतर्फा त्यांच्या दर्शनाकरतां उभे रहात. मोनलॅमचा सण संपला होता व बरेच लामा आपापल्या मठांत परतले होते; तथापि मागें राहिलेल्यांची संख्याहि कमी नव्हती. खम्पा निर्वासितांनीं ल्हासाला गर्दी केली होती. एकूण एक लाख लोक तरी त्या वेळीं ल्हासाला होते. त्यांच्यापासून ही बातमी कशी लपली जाणार?

तथापि चिनी अधिकाऱ्यांनीं सवलत दिल्याप्रमाणें १० मार्चला स्टोन ब्रिजपर्यंत तिबेटचें रक्षकदल उभें करण्यांत येणार होतें. चिनी अधिकाऱ्यांना हें कळतांच त्यांनीं तिबेटी अधिकाऱ्यांना सांगितलें कीं, दहा तारखेला त्या रस्त्यावर कोणी जमूं नये असा लोकांना हुकूम काढा. स्टोन ब्रिज ओलांडून त्यांनीं चिनी लष्करी छावणींत शिरतां कामा नये असाहि दुसरा हुकूम काढण्यास त्यांना सांगण्यांत आलें.

ह्या सर्व हुकमांचा चीनच्या दृष्टीनें विपरीत परिणाम झाला. साऱ्या ल्हासाभर बातमी पसरली कीं, दलाई लामांना चिनी अधिकारी पळवून नेणार आहेत. ता. ९ ची संध्याकाळ व रात्र ल्हासाच्या इतिहासांत अत्यंत गडबडीची व चिंतेची होती. लोकक्षोभाला भरती येत होती. त्यांचा आवडता नेता व धर्माचा मुख्य हा पळवून नेला जाणार ह्या कल्पनेनें लोक अस्वस्थ झाले व हें आम्ही होऊं देणार नाहीं असें बोलूं लागले. दहा तारीख उजाडली व लोकांचे थवेचे थवे राजवाड्याकडे लोटूं लागले. आम्ही दलाई लामांना राजवाड्याबाहेर येऊंच देणार नाहीं असें लोक म्हणूं लागले. पूर्वेकडील चार लामांना चिनी अधिकाऱ्यांनीं अशींच बोलावणीं केली होतीं व त्यांना ठार मारण्यांत आलें होतें हें लोकांना ठाऊक होतें. त्यामुळें दलाई लामांना बाहेर पडूं द्यावयाचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें.

दलाई लामांच्या मंत्रिमंडळामध्यें रात्रभर पुढें काय करावें याची चर्चा चालू होती. सर्वजण चिंताग्रस्त होते. तिबेटच्या स्वातंत्र्याची होळी १० मार्चला दुपारीं

पेटणार होती व त्या होळींत तिबेटचा, तिबेटच्या स्वातंत्र्याचा व ह्या सर्वांपेक्षांहि त्यांच्या पवित्र धर्माचा नाश होणार होता. मंत्रिमंडळानें ठरविलें कीं चीनचे हुकूम कांहींहि असोत आपण दलाई लामांबरोबर नाटकाला जाणार व आपल्या डोळ्यांदेखत जें जें काय होईल तें पाहणार.

दलाई लामांनाहि त्या रात्रीं झोंप आली नाहीं. सकाळ झाली. त्यांनीं पूजा-अर्चा, ध्यानधारणा नेहमींप्रमाणें केली. त्यांना सृष्टि प्रसन्न व प्रफुल्ल दिसली. नुकताच सुरू झालेला वसंत ऋतु मोठा मोहक होता. पुष्करणीत कमलें उमलत होतीं आणि नव्या पालवीनें वृक्षराजी नटल्या होत्या. दलाई लामांच्या आयुष्यांत तो एक मानसिक शांतीचा मौल्यवान क्षण होता. ते बागेंत फिरत होते, इतक्यांत त्यांनीं बाहेर घोषणा, आरडाओरड ऐकली. त्यांच्या सेवकांनीं सांगितलें कीं लोकांनीं वाड्याला गराडा घातला आहे व ते तुम्हांला बाहेर पडूं देणार नाहींत.

तासातासांनीं जसें पुराचें पाणी चढावें, त्याप्रमाणें गर्दी वाढत होती. कमींत कमी ३०,००० लोक तरी तेथें जमले असावेत. राजवाड्यांतहि एकच गडबड उडाली. निरोपावर निरोप, बातम्यांवर बातम्या धडाडूं लागल्या. राजवाड्यांत संकटनिवारणार्थ अनुष्ठानें बरेच दिवसांपासून सुरूच होती.

सुमारें नऊ वाजतां दलाई लामाच्या मंत्रिमंडळांतील दोन मंत्री चिनी ड्रायव्हर्स हाकत असलेल्या चीनी जीपमधून राजवाड्यांत आले. चीनी ड्रायव्हर व चीनची जीप पाहून लोक खवळले; पण तिबेटी मंत्र्यांना वाड्यांत जावयास अडचण आली नाहीं. त्यानंतर दुसरा एक मंत्री चिनी अधिकाऱ्याबरोबर वाड्यांत येऊं लागला. त्या मंत्र्याचें नांव सामडुप फोड्रँग होते व त्यांची मंत्री म्हणून नुकतीच नेमणूक झाली होती. लोक त्यांना ओळखत नव्हते. त्यांनीं तिबेटी पोशाख केला होता तरी लोकांना वाटलें ते दलाई लामांना नेण्याकरितांच आले आहेत. त्यांच्या जीपवर दगडांचा वर्षाव झाला. फोड्रँगना एक दगड बसला व ते बेशुद्ध झाले. अखेरीस लोकांनीं त्यांना ओळखलें व हिंदी वकिलायतीच्या इस्पितळांत त्यांना नेऊन सोडलें. त्यानंतर आलेल्या दुसऱ्या एका मंत्र्याला असेंच अडवण्यांत आलें.

एकंदर परिस्थिति लक्षांत घेतां, तिबेटी अधिकाऱ्यांना वाटलें, कीं लोकांना जर आवरलें नाहीं, तर ते बेफाम होऊन चीनच्या लष्करी मुख्य ठाण्यावर हल्ला चढवतील व बाका प्रसंग निर्माण होईल. दलाई लामांना लोकांच्या निर्धाराची कल्पना देण्यांत आली व त्यांनीं चीनच्या नाटकाला जाऊं नये, असा सल्ला देण्यांत आला. दलाई लामानें तो सल्ला ऐकला व चिनी अधिकाऱ्यांना कळविलें कीं क्षुब्ध झालेल्या जनसंमर्दाला झुगारून मी नाटकाला येऊं शकणार नाहीं. लोकांनीं एका चिनी धार्जिण्या लामालाहि त्या वेळीं दगडानें ठेचून ठार केलें होतें.

लोकांना दलाई लामा नाटकाला जात नाहींत, असें जेव्हां कर्णा लावून कळविलें तेव्हां त्यांचा आनंद गगनांत मावेना. दलाई लामांनीं स्वतः येऊन हें सांगेपर्यंत लोक त्यावर विश्वास ठेवीनात. पण दलाई लामांनी जरी त्यांना, यापुढें केव्हांहि चीनच्या नाटकाला न जाण्याचें निवेदन केलें तरी लोक वेढा उठवीतना. त्यांचे पुढारी निघून गेले; पण आम जनता तशीच बसून राहिली.

दलाई लामानें चीन जनरलकडे आपले मंत्री पाठविले. जनरलला सर्व परिस्थिति कळविण्याकरतां ते जेव्हां बाहेर पडले तेव्हां लोकांनीं त्यांच्या गाड्यांची झडती घेतली. दलाई लामांना आंत लपविलें असेल ही त्यांना शंका वाटत होती.

चीनचे जनरल साहेब ह्या मंत्र्यांना पाहतांच रागाने लाल झाले. ते थरथर कांपत होते. चिनी भाषेंत ज्या शिव्या अत्यंत गलिच्छ म्हणून समजण्यांत येतात त्याहि त्यांनीं दिल्या. आरोप तर अनेक केले. शेवटीं धमक्याहि देण्यांत आल्या. आम्ही इतके दिवस तुमच्या गमजा चालूं दिल्या, आतां एक क्षण गय न करतां आम्ही तुमचा चांगला समाचार घेऊं; व्हा आतां तयार. तिबेटी मंत्र्यांनीं, आम्ही माजलेलें अराजक मोडूं, लोकांना शांत करूं वगैरे अभिवचनें दिलीं; पण जनरल साहेब तीं थोडीच मानतात ! मंत्र्यांना त्यांनीं परत जाऊं दिले हीच मोठी कृपा.

मंत्री राजवाड्यांत परतले ते विमनस्क स्थितींत. आतां काय होणार ही त्यांच्यापुढें चिंता होती; दलाई लामाला पळविलें कीं, तिबेट संपला हें त्यांना पुरेपूर ठाऊक होतें. आणि जनता ? तो जनसंमर्द गांवांत गेला. तेथें प्रचंड सभा झाली. १७ कलमी करार चीननेंच मोडला, तो आम्ही मानीत नाहीं; चीननें तिबेट सोडावें, वगैरे ठराव त्यांनीं केले. तिबेटी कुसुंग रेजिमेंट हें चीनच्या अधिकाराखालीं वागत असे. त्या रेजिमेंटनें चिनी युनिफॉर्म फेकून दिले व तिबेटी पोषाखांत ते वावरूं लागले. लोक इतके बेफाम झाले होते कीं, त्यांनीं दलाई लामांचाहि सल्ला व संदेश मानला नाहीं.

जनरस टॅन क्युअन सनला दलाई लामा न आल्यामुळें आपली नाचक्की झाली असें वाटलें. त्यांची प्रतिष्ठा गेली व चीनचे पुढचे बेतहि ढासळले. त्यांचीं एकामागून एक अशीं तीन पत्रें दलाई लामांना आलीं. तीं पत्रें मित्रत्वानें व प्रेमानें ओथंबलेलीं होतीं. पण तें प्रेम सारें बनावट होतें. त्यांचा झालेला तिळपापड जर दलाई लामांना ठाऊक नसता तर त्या पत्रांनीं त्यांना भुरळ पाडली असती. जनरल साहेब पत्रांत म्हणाले, "आम्हांला तुमच्या प्राणाबद्दल चिंता वाटते, म्हणून आम्ही तुम्हांला छावणींत आश्रयाला बोलावलें." चीनला जवाहरलालजींची चिंता, दलाई लामांची चिंता आणि इतर स्वातंत्र्यसंरक्षकांची चिंता वाटत होती ! तिबेटी लोक दलाई लामांना कशाकरितां मारणार होते ? आपल्या पूज्य व्यक्तीला कोणी मारीत नसतात. उलट चीनलाच दलाई लामांचा कांटा काढावयाचा होता, म्हणून सारीं कारस्थानें

चाललीं होतीं. दलाई लामांचीं उत्तरें चीनी जनरलला शांत करण्याकरितां होती. जनतेच्या कृत्यांचें समर्थन त्यांत नव्हतें.

पण दलाई लामांनीं फारच मवाळ धोरण स्वीकारलें. ते म्हणतात, ' आपल्याला हिंसा टाळावयाची होती. ' तिबेट आतां स्वतंत्र राहात नाहीं हें त्यांना कळून चुकलें होतें. त्या परिस्थितींत जितके अधिकार व सवलती पदरांत पडतील तितक्या पाडून घ्याव्यात ही त्यांची दृष्टि होती. पण चीनचे अधिकारी दलाई लामांच्या मानानें फारच कसलेले होते. दलाई लामांना आंतून जरी आपल्या लोकांची प्रतिकारी वृत्ति पसंत होती तरी ते लोकांच्या भावना संयमित करीत होते. ते म्हणतात मी लोकांना केलेला उपदेश जरी प्रामाणिकपणाचा होता, आणि जरी मी माझे खरे उद्देश पत्रोत्तरांत लपवून ठेवले होते तरी ते उद्देश न्याय्य होते, असें मला वाटलें व अजूनहि वाटतें; ' दलाई लामाच्या या धोरणावर टीका करणें सोपें आहे. एर्वीतेवी तिबेट परतंत्र होणार होताच, मग त्यांनीं अशी तडजोडीचीं पत्रें कां पाठवावीं व लोकांचा उद्रेक कां थांबवावा ? आपण दलाई लामांना फक्त राजकीय पुढारी मानतां कामा नये. त्यांच्यावर धर्माचें अंतर्बाह्य संस्कार झाले होते व त्यामुळेंच ते संहार टाळीत होते.

लोकांना दलाई लामांनीं जरी निघून जाण्यास सांगितलें तरी त्यांनीं तेथेंच ठाण मांडलें होतें. कदाचित् ते गेलेहि असते; पण चिनी अधिकाऱ्यांनीं त्यांना ल्हासा-भोंवतीं केलेली तटबंदी काढून टाकण्यास सांगितलें. त्यामुळें लोक अधिकच भडकले. तुमच्या तटबंदी तुम्ही कां काढीत नाहीं असा त्यांनीं चीनला प्रतिप्रश्न विचारला. दलाई लामांना त्यांच्या चिनी छावणींत असलेल्या मंत्र्यानें गुप्तपणें कळविलें कीं, चिनी अधिकारी त्यांना हलवून, पोटाला राजवाडा, ल्हासा जाळून टाकणार आहेत व लोकांच्या प्रेतांचे खच पाडणार आहेत. जर दलाई लामा चिनी छावणींत गेले नाहींत तर त्यांचाहि बळी घेण्यास चिनी कमी करणार नाहींत असेंहि त्यांच्या विश्वासांतील त्या मंत्र्यानें कळविलें. लोकांनाहि त्या बातम्या कळत. ल्हासांतील व बाहेरील तिबेटी जनता, लाठ्या, काठ्या, कुऱ्हाडी, तलवारी, बंदुका वगैरे जीं साधनें उपलब्ध झालीं, त्यांसह राजवाड्याभोंवतीं बसून होतीं. एक तिबेटी माणूस बारा चिन्यांना लोळवण्या-इतका भारी होता; पण चिनी लष्करापुढें त्यांचें शारीरिक बळ कुचकामी होतें.

१६ मार्च १९५९ रोजीं अशी बातमी आली कीं, चिनी फौज दलाई लामा राहात असलेला राजवाडा उध्वस्त करण्याकरितां सज्ज झाली आहे. चिनी शिपाई, चिनी डोंगरी तोफा, भारी मशिनगन्स राजवाड्याकडे लोटत असल्याच्या बातम्या येऊं लागल्या. त्या बातम्या खऱ्या होत्या. चिनी अधिकारी राजवाड्यावर कोठून तोफा डागतां येतील याचीं मोजमापें घेऊं लागले. पोटाला राजवाड्यावरून चिनी शिपायांनीं

भरलेल्या नव्या शंभर ट्रक्स चीनच्या छावणीकडे गेल्या. तिबेटी लोकांना तोफखान्याची कांहींहि माहिती नव्हती. पण त्यांना आतां हाहाकार उडणार याची कल्पना आली. चीनहून विमानांतून सैनिक आणले व उतरवले आहेत हीहि बातमी लवकरच पसरली. १६ मार्चला रात्रीं कोणाच्याहि मनांत राजवाडा उध्वस्त होणार व लोकांची कत्तल होणार याबद्दल शंका उरली नाहीं. त्या रात्रीं ल्हासांत लोकांना झोप आली नाहीं. १७ ची सकाळ उजाडली. चिनी सैन्य चाल करून येणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. हानि टाळण्याचा शेवटचा प्रयत्न करावा म्हणून मंत्रिमंडळाची सभा झाली. सभेंत एकच विचार झाला. हजारों लोकांची कत्तल कशी टाळतां येईल व राजवाड्याचा नाश कसा थांबवितां येईल ? पुनः एकदां जनरल साहेबांना कळविण्याचें ठरलें कीं, आम्ही लोक हटवतों, तुम्ही तोपर्यंत कांहीं हालचाल करूं नका. दलाई लामानें चिनी छावणींत जाण्याचेंहि कबूल केलें. पण मोठ्या हिकमतीनें लोकांना चुकवून पाठविलेल्या त्या पत्राचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

१७ तारखेला दुपारीं चार वाजतां चिनी छावणींतून दोन उखळी तोफांतून सुटलेल्या गोळ्यांचा आवाज ऐकूं आला. उत्तरेकडील दरवाजाबाहेर दलदलींत गोळे पडल्याचा धडाकाहि झाला. ती विध्वंसाची सुरुवात होती. दलाई लामा म्हणतात, ' मला या पार्थिव देहाची पर्वा नव्हती. ' आपण केव्हांहि मरावयास तयार आहोंत इतकी त्यांची धार्मिक संस्कारामुळें जीवनासंबंधीं बृत्ति बनली होती. पण लोकांना त्यांचा देह लाख मोलाचा वाटत होता. ते त्यांना मरूं देणार नव्हते.

राजवाड्यांत सर्वजण शेवटच्या क्षणाची वाट पहात होते. इतक्यांत मंत्रिमंडळानें ठरविलें कीं, दलाई लामा शत्रूंच्या हातीं लागतां कामा नयेत. त्यांनीं दलाई लामांना एकदम राजवाडा सोडण्याचा व ल्हासाबाहेर जाण्याचा सल्ला दिला. पण दलाई लामांचें बाहेर पडणें काय सोपें होतें ? एकीकडे चिनी लष्कर त्यांना वेढून होतें व दुसरीकडे जनता. दलाई लामा म्हणतात माझें तिबेटबाहेर जाणें म्हणजे तिबेटवर पाणी सोडणें होतें. त्यांनीं विचार केला, मार्गदर्शनाकरितां प्रार्थना केली व त्यांना ' तूं जा ' असा संदेश मिळाला.

दलाई लामाबरोबर त्या महायात्रेंत त्यांची आईबहीण, त्यांचे मंत्री, त्यांचे शिक्षक, शरीररक्षक व सैनिक यांचा मोठा काफलाच जाणार होता. जाणाऱ्यांच्या तीन तुकड्या केल्या. पहिल्या तुकडींत आईबहीण, दुसऱ्या तुकडींत स्वतः दलाई लामा व तिसऱ्या तुकडींत इतर असें ठरलें. लोकांनीं गडबड उडवूं नये म्हणून त्यांच्या नेत्यांना विश्वासांत घेऊन तो बेत कळविला. संध्याकाळच्या वेळीं एका तिबेटी तुकडीची व चिनी तुकडीची गांठ पडली; पण तिबेटी तुकडी मोठी आहे असें पाहून चिनी तुकडी आपल्या छावणींत परतली व तें महान् संकट टळलें. त्यांच्या आई व बहिणीला

खम्पा शिपायांचा पोषाख करावयास लावलें होतें व खुद्द दलाई लामांनींहि सैनिकाचा पोषाख केला होता. लोकांनीं ओळखूं नये म्हणून आपला चष्माहि त्यांनीं काढून घेतला. बाहेर जाणें व चिन्यांना त्याचा सुगावा न लागतां जाणें कठीण होतें. दलाई लामानें ता. १७ रोजीं रात्रीं दहा वाजतां राजवाडा सोडला. कोट्यवधि रुपयांचें सोनें, हिरे, माणकांपैकीं त्यांनीं कांहीं बरोबर घेतलें नाहीं. राजवाडा कायमचाच सुटणार होता. तेथील देवांच्या मूर्तींना त्यांनीं अभिवादन केलें. धर्मग्रंथांतील कांहीं भागांचें पठण केलें. त्यांच्या भावना लुप्त झाल्या होत्या.

भावनांच्या पलीकडे त्यांची मनोवृत्ति गेली. जनतेचा संहार टाळण्याकरितां हें दिव्य त्यांना करावें लागलें होतें.

चिनी लष्कर उत्तरेला छावणींत होतें. दलाई लामा दक्षिणेकडून बाहेर पडले. त्यांचा प्रवास डोंगर, दऱ्या, पर्वत, नद्या, बर्फ, उत्तुंग शिखरें, उजाड मुलूख वगैरेंतून झाला. अत्यंत कष्टाचा तो प्रवास होता. वाटेंत त्यांचें प्रेमानें स्वागत होई, पण लोकांच्या डोळ्यांत स्वागत करतांना पाणी येई. त्यांच्या मनांत सतत भीति होती, ती चिनी सैनिक केव्हां आपल्याला गांठतील याची. वर हवेंत घरघर आवाज झाला म्हणजे चीनचीं विमानें आलीं कीं काय याची त्यांना भीति वाटे. पण एकदांच चीनचें विमान त्यांना दिसलें व तें निघूनहि गेलें. तिबेटी जनतेंत जर एखादा फितुर असता तर ही दलाई लामांची यात्रा संपलीच असती. तिबेटी लोक जसे शूर, तसे प्रामाणिक, देशप्रेमी व धर्मप्रेमी आहेत. दलाई लामा कोठें गेले आहेत, याची गंधवार्ताहि चिन्यांना लागली नाहीं. ही एकच गोष्ट तिबेट किती एकवटला होता व प्रामाणिक होता याची साक्ष देते.

ह्या यात्रेकरूंनीं कोठें जावयाचें हें सुरुवातीला ठरविलें नव्हतें. दलाई लामांना वाटत होतें आपण तिबेटमध्येंच राहावें, तेथें राजधानी स्थापावी व पुनः तडजोडीचीं बोलणीं करावींत. पण तो बेत त्यांनीं सोडून दिला. हिंदुस्थानांत आश्रयाकरितां जाण्याचे अखेर त्यांनीं निश्चित केलें. हिंदी सरहद्दीवर पोहोंचण्याचे आधीं पांच-सहा दिवस त्यांनीं आपल्या प्रतिनिधीमार्फत हिंदचे पंतप्रधान नेहरू यांचेकडे आश्रय मागितला. त्यांचे प्रतिनिधि पुढें सरहद्दीवर गेले. तेथील अधिकाऱ्यांना आपली विनंती निवेदन केली. ती विनंती तारांच्या द्वारा मान्य झाली. ते प्रतिनिधि सरहद्दीवर दलाई लामांची वाट पहात राहिले. दलाई लामांना ती शुभ वार्ता कळविली. दलाई लामा ३१ मार्च १९५९ रोजीं रात्रीं १० वाजतां हिंदी हद्दींत प्रविष्ट झाले.

दलाई लामांना ल्हासाला काय झालें याची चिंता होती. त्याच्या प्रवासांतच त्यांना ल्हासाचा नाश झालेला व असंख्य लोकांच्या कत्तली झाल्याच्या बातम्या समजल्या. त्यांना ल्हासा सोडल्यापासून पांच-सहा दिवसांत ल्हासाहून पत्रहि आलें. त्या पत्रांत

भयंकर बातम्या होत्या. २० मार्चला पहाटे २ वाजतां चिन्यांनीं ल्हासावर तोफा डागल्या. त्यांना दलाई लामा राजवाड्यांतून बाहेर गेले, हें ठाऊक नव्हतें. राजवाडा उध्वस्त केला म्हणजे दलाई लामाहि मरेल, असें त्यांना वाटलें. त्यांच्या तोफखान्यांनीं नोरबुलिंगकाचा राजवाडा, ल्हासा शहर, पोटाला राजवाडा, देवळें, मठ, शाळा, विद्यालयें, लोकांचीं घरें यांवर तोफा डागल्या व ल्हासाचीपवित्र भूमि स्मशानभूमि केली. साऱ्या शहरांतून आगी लागल्या होत्या व धुराचे लोट निघत होते. एकहि महत्त्वाची वस्तु चिन्यांनीं आपल्या राक्षसी अत्याचारांतून सोडली नव्हती. अनेक शतकांचें तिबेटचें वैभव, तिबेटची स्थावर संपत्ति व तिबेटचे इतिहासप्रसिद्ध मठ, देवळें व राजवाडे त्यांनीं एका दिवसांत उध्वस्त केले. किती लोक ठार मारले असतील याचा हिशेब अंदाजानेंच सांगतां येईल. एक लाख शूर तिबेटी लोक बंडाच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत चिन्यांनीं ठार केले. एका दिवसांत ल्हासामध्यें कमींत कमी ५०,००० लोक तरी त्यांनीं मारले असावेत. त्याशिवाय जखमी, हातपाय तोडलेले किती असतील कोण सांगणार ?

हिंदुस्थानच्या हद्दींत जेव्हां दलाई लामा आले तेव्हां त्यांच्या बरोबर निवडक माणसें होतीं. बाकीच्यांना त्यांनीं परत पाठविलें. हिंदुस्थानच्या भूमींत पाऊल ठेवतांच त्यांना आपण सुरक्षित आहोंत असें वाटलें. हिंदुस्थाननेंहि त्यांचें सन्मानपूर्वक स्वागत केलें.

१३

# हिमालयाची भौगोलिक मांडणी

म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव

अनेक पर्वतांच्या भिंतींनीं, अनंत दऱ्या-खोऱ्यांनीं, अगणित नदी-नाल्यांनीं आणि बर्फाच्छादित शिखरांनीं बनलेला हिमालय पर्वत १६०० मैल लांब असून १५० ते २०० मैल रुंद आहे. त्यांच्या कडेवरील नद्या आणि मस्तकावरील शिखरें मोजण्याचा, आजमावण्याचा, अनेकांनीं प्रयत्न केला. पण त्यांत त्यांना फारशी फलप्राप्ती झालेली नाहीं. पूर्वी असें मानण्यांत येत होतें कीं, ब्रह्मपुत्रा व सिंधु या दोन नद्यांचे मध्यभागी उभा असलेला गौरीगुरू हाच हिमालय. पण ही समजूत चुकीची आहे. कारण हिमालयाच्या शाखा आणि उपशाखा पूर्व व पश्चिम भागांतहि पसरलेल्या असून कांहीं रांगा तर समुद्रापर्यंत जाऊन भिडल्या आहेत. कालिदासानें केलेलें हिमालयाचें वर्णन यथार्थ आहे.[1]

---

१. अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः ।
पूर्वापरौ तोयनिधी वगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदण्डः ॥ कुमार १–१

वास्तविक पाहतां पर्वत हा केव्हांच आणि कुठेंच अखंड नसतो. त्यांत कडे, कपाऱ्या असणारच. नदी, नाले बारमास वाहणारच. लहानमोठीं शिखरें असणारच. हिमालयाविषयीं वर्णन करतांना प्राचीन वाङ्मयांत असाहि उल्लेख सापडतो कीं, हिमालय हा मुख्य पर्वत नसून मेरु हा मुख्य पर्वत होय. व हिमालय हा भारभूत पर्वत आहे. म्हणून हिमालयाला मेरु पर्वताचा मदतनीस किंवा पूरक पर्वत असें मानतात. मेरु पर्वत हा पामीरच्या पठारांत आहे. हे पठार जगांतील सर्वांत उंच पठार असून त्यास जगाचें छप्पर असें मानण्यांत येतें. तसेंच तें विस्तृत पठार असून तें जगाच्या मध्यभागीं येतें. आणि त्याच्या भोंवतीं असणारी पृथ्वी गोल किंवा अंडाकृति आहे, असें भौगोलिक वर्णन आढळते. त्यांत भारताची उत्तर मर्यादा म्हणजे हिमालय ही पुराणांतरांतली माहिती असली तरी त्यांत पुष्कळच वस्तुस्थिति-निदर्शन आहे.

पामीरच्या पठाराला एका बाजूनें रशिया, दुसऱ्या बाजूनें चीन व खालीं भारत अशा सीमा चिकटल्या आहेत. मेरु पर्वताचा प्रदेश बर्फमय मानण्यांत येतो. ही मूळची किरगीज लोकांची भूमि. आतां येथें बहुसंख्य मुसलमान वास्तव्य करून आहेत. त्यांना सहा महिने पर्वतावर तर सहा महिने खालीं रहावें लागतें. खालीं दऱ्या-खोऱ्यांमुळें हा प्रदेश सुपीक, उबदार व म्हणून लागवडीस अत्यंत उपयोगी आहे. बर्फमय प्रदेशांतहि लोकांची वसाहत आढळते. या भागांत यति या हिममानवाचा कसून शोध चालू आहे. त्याचे बर्फावर उमटलेले पायाचे ठसे दिसतात. पण तो स्वतः दिसत नाहीं.

हिंदुस्थानांत प्रवेश करण्याचा दरवाजा म्हणजे खैबर खिंड होय. यवन, ग्रीक, परशु, शक, शण वगैरे पामीरच्या पलीकडील खैबर खिंडींतूनच हिंदुस्थानात आले. कांहीं दिल्लीपर्यंत पोहोचले व कांहींनीं पश्चिम भारतांत जम बसविला, पण त्यांना सरळ हिमालयांतून मार्ग काढतां आला नाहीं. हिमालयाला वळसा घालून भारताच्या पश्चिमेकडूनच त्यांना भारतात प्रवेश मिळवावा लागला.

प्रत्यक्ष हिमालयाच्या उत्तरेकडून, हिमालय ओलांडून अनेक मोठे डोंगराळ मार्ग आहेत. काश्मीर, जालंदर, नेपाळ, वगैरे भागांतून उत्तरेकडे व्यापारी व इतर लोकांची रहदारी चालू असते. पण त्या भागांतून भारतावर स्वारी झाल्याचा निर्देश आढळत नाहीं. किरकोळ हल्ले झाल्याचे दाखले आहेत. पण त्याला संघटित स्वरूप नव्हते. हर्षाच्या वेळेला चीनशीं त्याचें चांगलेंच दळणवळण होतें व राजकीय व्यवहारहि चालत. ते याच मार्गानें चालत असावेत असें वाटते. पण मुसलमानी आक्रमणानंतर, हा मार्ग बंद पडला.

हिंदुस्थानांतून दिल्लीच्या एका बादशहानें—वेड्या महंमदाने—ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यांतून तिबेट, चीनवर स्वारी करण्याचा प्रयत्न केला. पण प्रवासांतील अडचणींनीं

व कडक थंडीनें त्याचे बहुतेक सैन्य नष्ट झालें. आणि त्याला अपयश प्राप्त झालें. म्हणजे ब्रह्मपुत्रेचें खोरें हा एक आक्रमणाचा मार्ग आहे एवढें ठरतें. भारताच्या उत्तरेकडील भाग उंचवट्याचा प्रदेश असल्यानें व भारताकडील भाग खोलगट असल्यानें लढाईच्या दृष्टीनें उत्तरेकडील लोकांना तो प्रदेश सोईचा आहे; तिकडच्या लोकांना भौगोलिक अनुकूलतेचा फायदा होणार हें स्वाभाविक आहे. भौगोलिक अनुकूलतेला आज विज्ञानाची जोड मिळाली ही अधिक महत्त्वाची गोष्ट आहे; आजच्या विज्ञानाच्या प्रगतीनें समुद्राची खोली आणि पर्वताची उंची लक्षांत घेण्याचें कारण नाहीं, अशी परिस्थिति निर्माण झाली आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळें एवढा अवाढव्य व उंच हिमालय आतां अगम्य, दुर्गम्य राहिलेला नाहीं. ईश्वरदत्त भौतिक संरक्षणें आतां पूर्वीसारखी अभेद्य समजतां येणार नाहींत.

## हिमालयाचें सामान्य वर्णन --

**दक्षिण भाग** – सिंधु व ब्रह्मपुत्रा यांच्यामधील १६०० मैल लांबी व १५०ते२०० मैल रुंदी. तीन प्रमुख रांगा.

(१) काश्मीर (अमरनाथ मन्दीर, मार्तण्ड मन्दीर, शंकराचार्य, वराह, वितस्ता-झेलम)

(२) कांगडा – कुलूत – रावी-व्यास नद्या – त्रिगर्त – किन्नर, जालंदर ज्वालामुखी तिबेट.

(३) कूर्मांचल – गढवाल – बद्रीनारायण – गंगोत्री – जम्नोत्री.

(४) नेपाळ, सिक्कीम, भूतान, पशुपतिनाथ, मुक्तिनाथ.

(५) आसाम-कमरूप-कामाख्य.

**उत्तर भाग** – सिकियांग, चीन, रशिया, तिबेट.

**पश्चिम भाग** – ऱ्हाला-मकरान, पारा, सुलेमान, (बलुचीस्थान, अफगणीस्थान) हा भाग सिंधुमुळें अलग झालेला आहे.

**पूर्व भाग** – हिमालयाचा पूर्वविभाग ब्रह्मपुत्रेनें तुटलेला आहे. आराकान टेंकड्या, कृष्णपर्वत, तोमरपर्वत, पूर्व समुद्र, लोहितार्णव.

१४

# हिमाचल प्रदेश : आर्थिक जीवन और समस्या

**श्री. मंत्रिणीप्रसाद**

हिमाचल प्रदेश पंजाब के उत्तरपूर्व में एक छोटासा पहाडी राज्य है। २१ के लगभग शिमला के आसपास की पहाडी रियास्तों को (Simla Hill State) एक मिलाकर इसका निर्माण किया गया हैं। इन रियास्तों में चम्बा, मंडी, सुकेत, बिलासपुर आदि मुख्य थीं। अब इन सब को विलीन कर छः जिले बनाए गए है यथा चम्बा, मंडी, बिलासपुर, सरमोर, महासू और किन्नौर। कुल आबादी लगभग १२ लाख हैं।

चम्बा और मंडी के बीच में पंजाब राज्य के जिला कांगडा का भाग आता है। राजनैतिक दृष्टि से भौगोलिक हिमाचल के भाग 'कांगडा और कुल्लू' पंजाब के अन्तर्गत आते हैं। किन्नौर जिला अभी हालमेंही नया बना है। मंगोलियन जाति के कनौरे लोग यहां आबाद हैं। इसी प्रकार कुल्लू के उत्तर पूर्व भाग में मंगोलियन जाति के 'लाहुले' लोग जिनके नामसे उनके प्रदेश 'लाहोल' की संज्ञा पडी है, आबाद हैं।

कांगडा से लेकर भारत तिब्बत सीमा तक का यह प्रदेश सारा का सारा पहाडी हैं ! सभी मुख्य नगर पहाडों के बीच की घाटी में बसे हुए है। शिमला हिमाचल प्रदेश की राजधानी हैं और समुद्रतलसे ६००० फीट की ऊंचाई पर बसा हुआ है। समुद्र तल से ऊंचाई की दृष्टि से २००० फीट से लेकर १८००० फीट की ऊंचाई तक अबादी मिलती है।

हिमाचल में ऊंचे ऊंचे पहाड है, गहरी गहरी नदियां है। घने घने जंगल हैं और बडी २ झीले हैं। आने जाने के रास्ते बीहड और दुर्गम हैं। सामान्य जन-जीवन श्रमसाध्य है।

घाटियों में अथवा नगरों में रहने वाले नागरिकों और पहाडों में रहने वाले 'पहाडी जनों' के जीवन में काफी अन्तर है। यह अन्तर भाषा में, रहनसहन में, वैचारिक मान्यताओं में और भी गहरा होता चला गया है।

आर्थिक दृष्टि से समृद्ध और शहरों में रहने वाले, खत्री लोग हैं, (कांगड़े के) सूद हैं और कुछ महाजन (बोहरे) परिवार रहे हैं। खत्री और महाजन ये तीनों जातियां छोटा मोठा व्यापार, साहूकारा और जागीर-दारी करती रही हैं। राजाओं और रजवाड़ों के शासनकाल में उनका काफ़ी बोलबाला रहा है। ब्राह्मण और राजपूत लोंगो के पास अपने वंशाभिमान की सम्पत्ति रही है। राजाओं की ओर से इन दोनों जातियों को जागीरें प्राप्त थीं। इनमें ब्राह्मण प्रायः संस्कृत अध्यायन के उपरान्त पौरोहित्य कर्म करते रहे हैं तथा राजपूत लोग सेना अथवा पोलिस में भरती होते रहे हैं।

नगरों मे रहने वाले ये लोग सुसंस्कृत और बड़े प्रियदर्शन हैं। अपने आप को अभिजात वर्ग (aristocrates) में गिनते रहे हैं। इनमें राजनैतिक चेतना हमेशा रही है तथा वर्णाश्रम धर्मव्यवस्था का यथासंभव संरक्षण करते रहे हैं। जब वर्तमान हिमाचल का ये लोक निर्माण हुआ तो सबसे बड़ा आघात नगरों में रहने वाले इस अभिजात वर्ग को पहुंचा। हिमाचल सरकारने सदियों से चले आ रहे नागरिक लोगों के भू-स्वामित्व को लगभग समाप्त कर दिया। भूमि उसे मिलनी चाहिये जो स्वयं खेती करे। इस सिद्धान्त के अन्तर्गत कृषकों (बसणु) का बडा उपकार हुआ, यतः वे लोग अपने भू-स्वामियों (वज्झिए) की भूमि जोता करते थे तथा उन्हें घर बैठे फसल का आधा भाग पहुंचाया करते थे। इस परिवर्तन के विरुद्ध काफी आवाज उठी आन्दोलन चला परंतु पलड़ा कृषक वर्ग का ही भारीं रहा।

परन्तु प्रबुद्ध नागरिक वर्ग बहुत जल्दी संभल गया और शिक्षा के बल पर सरकारी नौकरियों पर छा गया। यद्यपि इससे उनकी आर्थिक स्थिति पहले की सी समृद्धि तक तो नहीं पहुंच पाई फिर भी समाज में अपना सम्मान और स्थिति

सुरक्षित करने में ये लोग सफल हो गए। खेद की बात है कि हिमाचल प्रशासन में प्रान्तीय प्रशासन परीक्षा के लिए कोई गुंजाइश नहीं। हां केन्द्रीय प्रशासन परीक्षाओं के लिए हिमाचल के लोगों को एक विशेष नामांकन पिछडा वर्ग ( backward classes ) प्राप्त हो गया है।

हिमाचल के इस प्रबुद्ध नागरिक वर्ग की स्थिति आय की दृष्टि से मध्यम वित्तीय परिवार की ही है। कुछ परिवार निम्न-मध्य-वित्तीय स्थिति में आते हैं। सुसपन्न पुंजीपति पराम्परा से रहने वाले परिवारों में नहीं है। अतः सरकार की सहायता के बिना इन परिवारों को अपने लडके लडकियो को उच्च शिक्षा देना बड़ा कठिन रहता है।

साधारण परिवार अपने पुश्तैनी घरो में रहते हुए जैसे कैसे सामाजिक मर्यादाओं को निबाहते हुए गुजारा करते हैं। मुख्य भोजन प्रातःकाल चावल और उडद की दाल तथा उबाली हुई लस्सी ( झोळ ) रहती है। रात को गेहूं की रोटी और एक सब्जी हुआ करती है। कलेवे के लिए चाए का रिवाज चल पड़ा है। देशी घी का मोह बहुत है अतः दाल छौंकने के लिय इसका होना अनिवार्य है। तनिक समृद्ध परिवार हुआ तो उसकी समृद्धि भोजन की अपेक्षा पहने हुए कपडों में ही प्रतिलक्षित होगी। नागरिक लोगों के जीवन में एक कुटीर उद्योग का विशेष महत्त्व था। वह था पशमीनी चादरों के बनाने का उद्योग। व्यापारी लोग (लाहुले) तिब्बत से पशम 'एक उत्कृष्ट प्रकार की ऊन' लाया करते थे तथा जिससे हर घर में महिलाएं सर्दी के दिनों दो या तीन चादरें जिन्हें हम शॉल कह सकते हैं बना दिया करती थीं। एक अच्छी चादर १०० से कम में नहीं आया करती थी। भारत चीन सीमा विवाद से सारे व्यापारिक संबंध समाप्त हो गए तथा इस उद्योग का बडा धक्का पहुंचा है।

आजकल बड़े शहरों में लोक पंजाब से आए शरणार्थियों अथवा स्थानान्तरित सरकारी नौकरों के आवास के लिए अपने मकान का एक हीस्सा सुरक्षित रख देते हैं। और उसने उपलब्ध मकान का किराया उनके लिए एक अतिरिक्त आय का साधन हो गया है।

बड़े उद्योगों में इमारती लकड़ी का उद्योग मुख्य है। जंगलों से लकड़ियाँ काट कर उन्हें शहतीर का आकार देकर बरसात में छोटे २ नदी नालों के माध्यम से बडी नदियों तक पहुंचाया जाता है। उन उद्योगों में अधिक लाभ पंजाब के उद्योगपति ले जाते हैं! तथा हिमाचल के पहाड़ी लोगों को कुछ मिलता है तो वह मात्र मजदूरी! गाँवों में रहने वाले कृषक परिवारों की स्थिति पहले की अपेक्षा अब कुछ सुधरी हुई मालूम देती हैं। सामाजिक सम्मान प्राप्त करने के लिए सभी कनैत अब राजपूतों की श्रेणी में आ गए हैं! तथा ऊंचे वर्ग के लोगों ने इस परिवर्तन को स्वीकार भी

कर लिया है। हाँ गाँवों के हरिजनों को यह अधिकार उतनी सुगमता से नही मिल पाया है। गाँव के लोग खेती करते हैं। जहां जहां खड्डे हैं वहां बढिया किसम का चावल उग आता है। अन्यथा गेहूं, मक्की, कोदों की फसल अधिकता से होती है। आलुओं की फसल अधिक लाभकारी सिद्ध हुई है। हिमाचल से बढिया आलू दूर २ तक भेजा जाता है। हिमाचल राज्य ने सरकारी–संस्थाओं ( Co-operative socities ) को अच्छा बढावा दिया है। लोग गाय भैंसे पालते जरूर हैं परन्तु पंजाब के गाँव के लोगों की तरह, घी दूध नहीं खाते हैं उसी तरह चावल का प्रयोग भी वे नहीं करते। ये सब चीजें शहर में बेचने के लिए ले जाते हैं।

ऊँचे पहाडों का जीवन कष्टसाध्य अवश्य है परन्तु लोगों के जीवन में सन्तोष की अधिकता के कारण नागरिक जीवन की सुविद्याओं का अभाव उन्हें खटकता नहीं। लोग वहां भी खेती करते हैं। इसके अतिरिक्त वे भेड बकरियाँ भी पालते हैं। जो लोग रेवड के रेवड मेड बकरियों के लेकर यायावरों का सा जीवन बिताते हैं उन्हें गद्दी कहते हैं। अधिक सर्दी पड़ने पर ये लोग नीचे चरागाहों की तलाश में नीचे उतर आते हैं। आस पास के शहरों में अक्सर 'नमक' लेने के लिए आया करते हैं। एक 'गद्दी' अपनी सहचारिणी सहिता ऊन के कपडे पहने हुए, ऊन पहने हुए कपडों की तहों में एक नवजात बकरी के छौने को लिए हुए अपनी जीभ और दान्तों के सहयोग से सीटी बजाता हुआ, भेडों के रेवड सहित सर्दी के दिनों में अक्सर देखने को मिलता है। ये लोग प्रकृति से बडे सरल और निष्कपट हुआ करते हैं। ऊँचे पहाडो में रहने वाले लोगों को शहर के लोग 'पहाडी' कहते है। इस संबोधन में उपेक्षा, अज्ञता और पिछडेपन की भावना निहित है। 'पहाडी' वह है जो त्रिकोणाकार बास के बने टोकरे में ( किरड्ड ) सामान भरकर, पीठ पर लादे हुए, पहाड़ से आता है। 'पहाडी' अपने यहां की अनुपम चीज यथा छाछ, अखरोट, दाडिम या घर पोतने के लिए चूने के प्रकार की मिट्टी ( मकोळ ) शहर लाया करता है। उसकी मामी ( प्रेयसी ) भी एक काला ढाठू ( सिर बांधने का बड़ा सा रुमाल ) बांधे एक किरड्ड पीठ पर उठाए साथ होती है। 'पहाडी' बडा भोलाभाला किन्तु स्वाभिमानी व्यक्ति है। श्रम से वह कभी नहीं घबराता, वह एक उत्कट प्रेमी भी है, अपनी प्रेयसी की मांग पूरी करने के लिए ही शायद उसे शहर आना पड़ता है। नहीं तो अपने सीधे सरल जीवन में किस चीज की कमी है उसे !

ऊंचे पहाड पर जहाँ भयंकर हिमपात होता है उधर उसका घर है। पहाडों की ढलवान में उसने छोटे दो खेत बनाए होते हैं। अपने 'देव' पर उसे पूरा विश्वास है उसके लिए वह साल दो साल में बकरा बलि देता है। तो देव ( local deity ) भी उसके खेत में ठीक समय पर बारिश करता है।

खेतों में अनाज के साथ, तम्बाकू भी बोया होता है। मामी की अगर हुक्का गुडगुडानें की तबीयत कर गई तो फिर तम्बाकू काम आएगा। आंगन में अखरोट क दरख्त यह है उसके, और भला हो इन नए छोकरे छोकरियों का जो ग्रामसेवक या सेविका बनकर आए और उसे सेब के दरख्त लगाने के लिए उकसा गए। सेब का शौक मामी को लग गया तो फिर मामी भी सेब की तरह लाल हो जाएगी। लेकिन 'पहाडी' पढा लिखा नहीं है। उसके पूर्वज भी निरक्षर भट्टाचार्य थे। इसीलिए तो शहर के खत्री उसे ठग लेते तथा उसके ५ सेर देसी घी के तोल में ५ सेर नमक उसके सिर मढ देते पर यह बात तो बहुत पुरानी है। उसे अभी यह पता नहीं लगा है कि मंडी के राजा का राज खतम हो गया है या हिमाचल सरकार बन गई है। कि चीन ने हिमाचल के 'शेपकिला' पर अधिकार जताया है।

हिमाचल प्रदेश के पहाड़ी प्रदेश में बहुपतिविवाह तथा बहुपत्नीविवाह की प्रथा के पीछे आर्थिक कारण दिया जाता रहा है। कहीं कहीं एक ही स्थान में ये दोनों प्रथांए विद्यामान मिल जाती हैं। बहुत से भाइयों की एक ही पत्नी से निभ जाती हैं। दूसरी ओर काम काज़ का विस्तार अधिक हुआ तो हर दोघरे में (खेत के पास का घर, अथवा 'दूसरा घर') पहाडी की प्रेमिका, मालकिन बनी बैठी होती है जो हल जोतने के अतिरिक्त खेती का सारा काम करती है। अपने और बच्चों के कपडों के लिए ऊन कातती है। सर्दी के दिनों के लिए लकडियाँ काट कर रखती है। मील दो मील से पानी लाती है। और 'पहाडी' जवान सिर्फ हुक्का गुड़गुड़ाता रहेगा। या फिर मेले का मौका हुआ तो कलगी लगी टोपी पहन कर, लोक गीत की तान गुनगुनाता हुआ नाचने दौड पडेगा।

हिमाचल प्रदेश के लोगों का जीवन सारांश में अभाव पीडित नहीं। उनके जीवन में बम्बई तथा कलकत्ता के नगरों में पनपने वाली विषमता 'कहीं तो करोडपति सेठ का महल और कहीं झुग्गियों में बिलबिल करता मानव जीवन' एवं उस विषमता के कारण शोषित नारी वर्ग (वेश्या) का नितान्त अभाव हैं। नागरिक चेतना और जागृति का काम अवश्य पीछे है। उसके लिए सबसे बड़ी आवश्यकता सड़कों के जाल की है। बाहर की दुनिया से सम्पर्क स्थापित करने की है। हां यह अवश्य ध्यान में रखना होगा कि बाहर के संसार से सम्पर्क की अवस्था में हिमाचल के लोग जीवन के कठोर संघर्ष तथा होड में तबाह न हो जाएँ। उन्हें पग पग पर संरक्षण देने की आवश्यकता रहेगी। यह संरक्षण व्यापार में, नौकरी में, शिक्षा में, सभी स्थानों में अपेक्षित है।

[ **टीप :** हिमाचल प्रदेशांतील व त्यावरून सर्वसामान्यपणें सर्वच हिमालयांतील सामान्य जीवनाची व विशेषतः आर्थिक जीवनाची स्थूलमानानें कल्पना यावी याच उद्देशानें हा लेख येथें देण्यांत आला आहे. —संपादक ]

१५

# जनतेतील एकात्मभाव : संरक्षणाचा एक आधार

हरी मोरेश्वर जोशी

आपल्या समाजांतील भिन्न भिन्न घटकांच्या सामाजिक जीवनाचा आस्थेने व गुणग्राहणाच्या वृत्तीनें विचार केलेले प्रसंग थोडेच असतील. उलट आपल्यापेक्षां भिन्न आचारविचारांच्या लोकांचा उपहास, विडंबन करण्यांत आम्ही संकोच मानीत नाहीं. परिणामतः एक थोर परंपरेचा वारसा सांगणारा हा विशाल भारतीय समाज विस्खलित किंवा खंडित अशा अवस्थेंत शेकडों वर्षे पडलेला आहे. धार्मिक, भाषिक किंवा प्रादेशिक भेदाभेदाचीं वैरें पिढ्यान्‌पिढें आपण जोपासली आहेत. आमच्या या सामाजिक भेदामुळें हजारों वर्षें आपण दुर्बल राहिलेले आहोंत. हे भेदभाव विचारपूर्वक दूर करून सर्व समाज एकात्म भावनेनें बांधला जात नाहीं तोपर्यंत आपण खंबीर किंव अजिंक्य होवूं शकणार नाहीं.

### केवळ शस्त्रबळानें राष्ट्र समर्थ होवूं शकत नाहीं :

हिमाचल प्रदेशांतील मागस, डोंगराळ व अनेक दृष्टीनें वेगळ्या अशा लोकांच्या जीवन पद्धतीबद्दल आपल्यास आज आस्था कशासाठीं वाटतें ? आपल्या देशावरील

ओढवलेल्या किती संकटांशीं त्याचा संबंध आहे. आपल्या घराला आग लागल्यावेळीं ज्या शेजाऱ्याशीं काल भांडण झालेलें असतें, त्याच्याकडेही मदतीसाठीं आशाळभूतपणें आपण पहात असतों. संकट कल्पनेंतून होणारें सहकार्य हें खरें किंवा टिकावू ठरूं शकत नाहीं. हिमाचल प्रदेशांतील जनतेचें देवधर्म कोणते, त्यांचें खाणेपिणें काय आहे किंवा गाणें नाचणें कसें असतें, असली माहिती आपणास अभिप्रेत नाहीं. तेथील ग्रामीण जनता आत्मसंरक्षणास कितपत खंबीर आहे ? सीमेशीं ती निकट असल्यानें चीनची तिला कितपत भीती वाटत असेल ? भारताच्या संरक्षणार्थ ती खंबीरपणें उभी राहूं शकेल ना ? ही आपली खरी चिंता आहे ! तेथील जनतेचें दारिद्र्य किती आहे ? तिची दुःखें काय आहेत हें आपण समजून घेणें अत्यंत जरूरीचे आहे. देशांत झपाट्यानें शस्त्र निर्मिती करावी; ती तयार होईपर्यंत कोठूनही कशीहि मिळ-वावी. कोणाच्या तरी खांद्यावर ती द्यावी व त्यायोगें आपल्या सीमेचें रक्षण होईल अशी सर्वसामान्य कल्पना असते. पण केवळ प्रभावी व भरपूर शस्त्रें असली म्हणजे संरक्षण कार्य यशस्वी होतें, हा समज बरोबर नाहीं. याचा आपण प्रत्यक्ष अनुभव नेफा विभागांत घेतलाच आहे. याच्या उलट निर्धारानें लढणाऱ्या आपल्या मूठभर जवानांनीं अनेक पटीनें बलाढ्य अशा शत्रूला चिशूल विभागांत दीर्घ काळ दाद दिली नाहीं, हेंहि आपण पाहिलें.

सीमेवरील प्रदेशांतील जनता जर खरी एकात्मभावनेची होईल तर चीन किंवा कोणाचीच डर रहाणार नाहीं. सेनेच्या मागील जनता खंबीर असली पाहिजे. शस्त्रांचा पराभव होवूं शकतो पण निर्धाराला पराभव नसतो. याच दृष्टीनें विनोबाजी आपल्या भूदान कार्याला ‘ डिफेन्स-मेझर ’ देश संरक्षणाचें एक शस्त्र असें गेलीं सहा वर्षें संबोधत आलें. पण अद्यापही आपण त्याचा नीट अर्थ समजून घेत नाहीं. जनतेचा प्रतिकाराचा निर्धार हा शस्त्र बलाप्रमाणेंच अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. हा निर्धार एकात्मतेंतूनच निर्माण होतो. शस्त्रबलाची महती आजच्यासारख्या अणू-शास्त्रांनीं भारावलेल्या कालांत वेगळ्या शब्दांनीं पटविण्याची जरूरी नाहीं. पण ज्यांच्या कोठारांत हे अणुशक्तिचे साठे अमाप आहेत तेच जगांत अधिक भीतीग्रस्त झालेले आहेत. रशिया आणि अमेरिका यांची ही शस्त्रपरिपूर्णता हीच त्या दोघांना शहाणे करूं शकली, असें कोणी म्हटल्यास त्यांतील तथ्यांशहि स्वीकारलाच पाहिजे.

पण केवळ हा राक्षसी शस्त्रसंभार आपला हट्ट पार पाडण्यास पुरा पडत नाहीं, हेंही त्यामुळें स्पष्ट झालें आहे. शिवाय अमेरिका किंवा रशिया यांचेप्रमाणें भारत अगणित संपत्ती उभी करूं शकतो कां ? त्याचा परिणाम काय ? या सर्वांची उत्तरेंही आपण स्वतःच्या मनाशीं दिलीं पाहिजेत. त्याचप्रमाणें शस्त्रें असणारा अगर नसणारा निर्धारी सैनिक प्रभावी शस्त्रबळ कसें लुळे पाडूं शकतो याचेंही थोडेसें दर्शन गढवाली जवानांनीं १९३० मध्यें घडविले होतें.

**सामाजिक वैषम्य दूर करा :**

हिमालयाच्या संरक्षणाची आपली सर्वांची चिंता व त्यासाठीं शक्यतो किंमत देण्याची आपली सिद्धता ही भारताच्या आपल्या उज्ज्वल भवितव्याची साक्ष आहे. पण बदलत्या काळाचा लोंढा न ओळखल्यास आपण आपलें स्वातंत्र्य व रक्त सांभाळू शकणार नाहीं. लोकशाहीचा फक्त शाब्दिक सांगाडा आम्ही स्वीकारलेला आहे. सर्वांना समान लेखणें, परस्परांच्या प्रतिष्ठेचा व अधिकाराचा सन्मान राखणें, आर्थिक वैषम्य नष्ट करणें, वगैरे बाबी लोकशाहीचा प्राण आहेत. त्या आम्ही मनोभावें स्वीकारलेल्या नाहींत. वैषम्यानें भ्रष्ट झालेल्या जीवनावर लोकशाहीचा गाडा आम्ही उभारूं व चालवूं पाहात आहोंत. तें केव्हांच साधणार नाहीं. साऱ्या सामाजिक वैषम्याला गाडल्या-वाचून आमचें स्वातंत्र्य सार्थ किंवा समर्थ होऊंच शकणार नाहीं. हें ओळखून आम्ही आमच्या संरक्षणाच्या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे.

साधनांचे नुसते डोंगर अुभारून किंवा लाखों जवानांचीं केवळ दलें उभारून अशा आक्रमणाच्या कटकटी मिटणार नाहींत ! जवानांच्या खड्या सेना व त्यांच्या खांद्या-वरील अद्यावत शस्त्रें यांची जरूरी प्रत्येक राष्ट्रास मान्यच करावी लागेल. पण सामा-जिक एकात्मभावनेवाचून नुसते शस्त्रसामर्थ्य प्रभावी किंवा पूर्ण ठरूं शकणार नाहीं.

मातृभूमीबद्दल वाटणारें प्रेम हें या देशांतील जनतेच्या संदर्भांत असलें पाहिजे; हीच राष्ट्रीय एकात्मशक्ती होय. या शक्तीचा पराभव कोणी करूं शकणार नाहीं. शस्त्राची खरी शक्ति तें पेलणाऱ्या व्यक्तीच्या चातुर्यामध्यें असतें. त्याचप्रमाणें सेना-शक्तीचे सामर्थ्य सामाजिक एकात्म वृत्तीवर अवलंबून असते. निदान लोकशास-नाचे तत्त्वावर स्वीकारलेल्या राष्ट्रांनीं याचा विचार दक्षतेनें केला पाहिजे.

**एकात्मतेच्या अभावाचीं कारणें :**

भारतांतील फुटीर वृत्ती किंवा सामाजिक अलगपणा हा जसा भारताला नाश-कारी झालेला आहे, त्याचप्रमाणें जगांतील सर्वच देश-विदेशांमध्यें परस्परांबद्दल जो दुजाभाव किंवा विरोधाभाव, द्वेषभाव नांदत आहे त्यामुळें सर्व मानवजात नेहमींच संकटाच्या तोंडाशीं वावरत राहिलेली आहे. आणि हें सर्व चुकीच्या संस्कारामुळें किंवा व्यापक स्वहित दृष्टी नसल्यामुळें घडत आलें आहे. भारतांतील जातिभेद, पंथ-भेद यामुळें वाढलेली विषमभावना किंवा दूरभाव हा चुकीच्या संस्काराचा परिणाम आहे हें थोड्याशा विचारांती कोणालाही पटतें परंतु प्रभावी संस्काराच्या प्रभावाखालीं वाढलेलें मन हे भेदभाव उखडून टाकण्यास असमर्थ झालेले आहेत. अगदीं कर्मनिष्ठ सनातनीही आत्मरक्षणार्थ मद्यार्काचें औषध किंवा लिव्हर-सूप घेण्यास तयार होतो. त्याला व्यापक आणि खरें स्वहित कळलेलें असतें. तेथें तो बदल करतो.

सामाजिक हिताकडे आपण तशा व्यापक दृष्टीनें पहातच नाहीं. म्हणून खोट्या कल्पनांना चिकटून बसतो व त्यामुळें समाजनाश व त्याबरोबर आत्मनाशही करून घेतो. मनुष्याला खरें स्वहित न कळल्यानें तो असाच आत्मनाश करून घेत राहतो. फुटलेल्या नौकेंतून एकेकटा आपला जीव वाचविण्याचा प्रयत्न करूं लागला म्हणजे तो स्वतःही बुडतोच पण इतर सर्वांनाही डुबविण्यास कारणीभूत होतो. सर्व समाजहिताशीं स्वहित निगडित आहे व आपल्याप्रमाणेंच समाजाचें हित झालें पाहिजे, आपण सर्व मानव हे एक आहोंत व त्या सर्वांचें सुख-दुःख हें एकच आहे ही विचारसरणी हा एकात्मतेचा प्राणाधार होय. हा एकात्मविचार आमच्या तत्त्वज्ञानांत ओतप्रोत भरलेला आहे. पण आमचा प्रत्यक्ष आचार त्यापासून फार दूर आहे. याचें कारण आमचे संस्कार ! याचे कारण आमचें जातिभेद ! याचें कारण स्वतःपुरतें पहाण्याची आमची संकुचित स्वार्थी दृष्टी !

हे सर्व दोष आमच्या एकात्मतेचे शत्रू आहेत. ते नष्ट केल्यावाचून एकात्मभाव साधणें शक्य होणार नाहीं. ओश्वराची किंवा एखाद्या विश्वव्यापी शक्तीची सत्ता स्वीकारून तिची लेकरें असणाऱ्यांनी एकमेकाला नाडणें, फसवणें, पराभूत करणें हें भावंडांतील युद्धच होय. हा धर्मविचार स्वीकारला पाहिजे किंवा आधुनिक नागरिकांचीं कर्तव्यें, जबाबदाऱ्या ओळखून त्यांतील सर्वांची मूलभूत समानता स्वीकारली पाहिजे. या समंजस परिवर्तनावाचून सामाजिक स्वास्थ्य व मानसिक विकास होणार नाहीं. ही एकात्मता सक्तीनें लादली गेली तर मात्र त्यांतून वैफल्यच निर्माण होओील !

खरी एकात्मता निर्माण होण्यानें समाज बलवान होईल व तोच समाज अध्यात्मनिष्ट असला म्हणजे त्याचें बळ स्वतःप्रमाणेंच इतरांनाही तारकच ठरेल. ही एकात्मता विचारांत न घेतां केवळ बाह्य साधनांनीं आत्मरक्षण किंवा देशरक्षण साधणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 36680 वि:
क्रमांक 1551 नों. दि.


१६

## हिमालयांतील सौंदर्यभूमि : काश्मीर

**अ. पु. रासने**

ज्या भूमीच्या दर्शनानें मन निर्मळ बनतें, डोळ्याचें पारणें फिटतें, देहाचें सार्थक झाल्याचें समाधान लाभतें, त्या दर्शनांतूनच स्वर्गीय सुखाची अनुभूति होत असते. तुम्ही आम्ही नंदनवन किंवा पृथ्वीवरील स्वर्ग हे नामाभिधान देऊन ज्या भूमीचा गौरव करतो ती पवित्र भूमि सर्वांच्या परिचयाची झाली असून काश्मीर हे तिचें 'शुभ नाम' आणि श्रीनगर हें त्या स्वर्गभूमीचें प्रवेशद्वार आहे !

काश्मीर हे नंदनवन एका खिंडीच्या पायथ्याशीं असून ती खिंड नऊ हजार फूट उंच आहे; व तिचें नांव बनहाल असें आहे. पठाणकोट पासून १५ मैलांवर लखनपुर या ठिकाणीं रावी नदीवर प्रचंड पूल आहे. हा पूल पूर्व पंजाब व जम्मू-काश्मीरला सांधणारा दुवा समजला जातो. भर उन्हाळ्यांतहि रावी नदी दुथडी भरून वहात असते. तिच्या सभोंवतालचा प्रदेश तिनें हिरवागार ठेवला आहे. वातावरणांत किंचित्सा गारवा खेळत असतो. आसमंत प्रसन्नतेनें न्हाऊन निघत असतें. सुवासिक



मैल
३० २० १० ०
गिलगिट
हुंजी
नंगा पर्वत
बुरझील
गुरेझ
हंदवारा
टिथवाल
मुझफराबाद
सोपूर
बारामुला
श्रीनगर
चाकोथी
उरी
बाग
पूंच
पालंद्री
मेंधार
कोटली
राजोरी
मिरपूर
नौशेरा
भिंबार
अखनूर
रियासी
जम्मू
उधमपूर
रामबन
कुलगाम
अनंतनाग
पालगाम
किस्तवार
कारगिल
कलास्ते
खालसार
लेह
उपशी
गिया
पद्म
राघोकबा
पूर्व पंजाब
हिंदुस्थान


हि. ७-८

तांदळासाठीं प्रसिद्ध असलेलें रणवीरसिंगपुरा येथून अवघ्या हांकेवर रहातें. येथील तांदळाची लांबी अर्धा इंचापर्यंत असते व तें शेवयाप्रमाणें दिसतात. जम्मू या शहारास 'मंदिराचें नगर' असें म्हटलें आहे. येथील रघुनाथ मंदिर फार प्राचीन व प्रसिद्ध आहे. जम्मू ही काश्मीरची हिंवाळी राजधानी असल्यानें त्यांस विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे.

श्रीनगरला येतांना वाटेंत उद्यमपुर व कुद् ही निसर्गरम्य ठिकाणें लागतात. रस्त्याचे दुतर्फा सफेदा, सुरू इत्यादि वृक्ष अहोरात्र डोलत असतांना दिसतात. जिकडे तिकडे निरव शांतता पसरलेली असते. शीळ घातली कीं सबंध खोऱ्यांतून नादब्रह्माच्या लहरी निनादू लागतात. बनहाल हें गांव बनहाल या खिंडीच्या पायथ्याचशीं वसलेलें आहे. हें ठिकाण आरोग्यदायक असून स्वच्छ हवेसाठीं प्रसिद्ध आहे. डोंगरमाथ्यावर टप्प्याटप्प्यांनी बनविण्यांत आलेलीं खांचरें, विस्तीर्ण कुराणांत चरणारीं मेंढरें, निविड वृक्षराजी, कड्यांवरून मनमुराद उड्या घेणारे निर्झर व त्यांच्याहि पलीकडे असलेल्या उत्तुंग हिमराशी पाहून माणसाचे शरीर, जे असंख्य रोगजंतुचें वसतिस्थान बनलेलें आहे, त्याची व्याधि कुठल्याकुठें पळून जाते आणि शरीर पुन्हां ताजेतवानें बनतें. मन प्रफुल्लित होतें. गगनाला गवसणी घालणारा उत्साह द्विगुणित होतो. शंकराच्या गळ्यांभोंवतीं नाग विळखा घालून बसतो त्याप्रमाणें तेथील रस्त्यानें त्या नगाधिराजाला वेढलेलें आहे. कांहीं वळणांवरूत तीन-चार मोटारी एकावर एक अशा चढतांना दिसतात. परंतु त्या दोहींतील किमान अंतर एक ते दोन मैल असते. बनहाल खिंडीचा लांब बोगदा ओलांडून पलिकडे गेले कीं भर उन्हाळ्यांतहि गगनचुंबी हिमनगाचें दर्शन घडतें. पीरपंजाळ या उत्तुंग पर्वतराजाचे हिममुकूट उन्हाळ्यांतहि चमकत असलेले पाहून मन बुचकळ्यांत पडतें.

अपरसुंडा ते खानबल हें २५ मैलांचें अंतर संपल्यावर खऱ्या नंदनवनाचें स्वरूप प्रगट होतें. रस्त्यांतच वेरीनाग हें झेलम नदीचें उगमस्थान लागतें. जहांगीर बादशहानें झेलमच्या प्रवाहांत ५० फूट लांब व रुंद अशी पुष्करिणी बांधलेली आहे. तिच्या तीरावर एक मोंगल उद्यानहि आहे.

जाई, जुई, मोगरा, तगर, रातराणी, गुलाब, अनेक जातींचीं कमळें त्याचप्रमाणें हजारों रंगांचीं–हजारों आकारांचीं – वासांचीं फुलें तेथें दिसतात. पाण्यातल्या कमळाप्रमाणें जमिनीवर देखील कमळें उगवलेलीं दिसतात! त्यांस 'थल कमल' म्हणतात. हे कमळ दिसतेंहि सुंदर व त्याचा वासहि तितकाच सुमधुर येतो. नरगीसचे अतिनाजुक सुमन अति मोहक. श्वेतवसना ही येथील प्रमुख जाति असून त्याकडे कुठूनहि पाहिलें तरी तें आपल्याकडेच पहातें आहे असें दिसतें. नद्या, कालवे यांच्या किनाऱ्यावर बदामाचीं अनेक झाडें आहेत. ह्या झाडांना मोहोर आला म्हणजे

त्यांची शोभा कांहीं न्यारीच दिसतें. दानलिहर, गुलदपुहार, कमवय, चरिसलज, कलविठू, शेरदाहन, राजपोशी, गुलाचीनी वगैरे असंख्य नांवांचीं अपरिमित फुलें सर्वत्र दिसतात. एवढेंच नाहीं तर कॉसमॉस, डॅफोडिल, गोडेशिया, टयुलिप्स, विंड-फ्लॉवर यांसारखीं इंग्रजी जातीचीं फुलेंहि या ठिकाणीं आढळतात. डोंगरमाथ्यावर तर रंगीबेरंगी रानटी फुलांशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं. फुलांप्रमाणें अनेकविध पानेंहि पाहणाराचें मन आकर्षून घेतात. या नैसर्गिक बागामुळेंच काश्मीरमधील स्थळांना गुल्मर्ग, सोनमर्ग अशीं नांवें दिलेली असावीत. मर्ग याचा अर्थ उद्यान असा केला जातो. फुलें मे-जून या महिन्यांत फुलतात तर फळांचा बहर सप्टेंबर-ऑक्टोबरमध्यें येतो.

हिमालयांतील डोंगर विचित्र तर खरेच. कारण समोर दिसणारा गगनचुंबी पर्वत पाहून आपल्याला वाटतें कीं एवढा डोंगर चढून गेलें कीं, झालें. पुढें सगळा उतारच ! त्या उमेदींत आपण तें चढण चढून टोंकावर पोहोचतों तर काय ? अबब ! पुन्हां त्याहिपेक्षां भयंकर डोंगर ज्याच्या आपण पायथ्याशीं उभें असतों, तो आपल्या छातीवर येऊन उभा रहातो !

खेड्यांतील जीवन फुलांनीं फुललेलें असतें. येणारा फुलांचा बहर त्या त्या ऋतूंच्या, महिन्याच्या आगमनाची वर्दी देत असतो. एवढी भयंकर क्रांति फुलांनीं तेथील लोकांत केली आहे. सूर्योदयाबरोबरच मेंढ्या आणि कोंबड्या दिवस उजाड-ल्याची जाणीव करून देतात. त्याबरोबर मशिदींतून ' अल्लाहो-अकबर 'च्या नांवाचा जल्लोष सुरू होतो. काश्मीरी गुस्त ( शेतकरी ), पहैल ( धनगर किंवा मेंढपाळ ), हातो ( कामगार ), आपापल्या कामाला लागतात. पावसाळ्यांत शेगडी पेटवून बसावें लागतें. पुरुषांचा बराचसा वेळ हुक्का ओढण्यांत व स्त्रियांचा वेणी-फणी करण्यांत व नटण्या-मुरडण्यांत, विणकाम करण्यांत, घोंगड्या, नमदे वगैरे वस्तु विणण्यांत जातो.

घरें बांधतांना वर्फापासून संरक्षण करणें हा त्यांचा मुख्य उद्देश असतो. तसेंच पाऊस, थंडी, वारा या संकटांपासून बचाव करण्याचाहि त्यांची अव्याहत धडपड चालू असतें. आणि हें झाल्यानंतर त्याची ( घराची ) शोभा, नकशी वगैरे गोष्टींचा समावेश करतात. त्यांच्या घराचा बहुतेक भाग लांकडीच असतो. विटांच्या रचनेंत कलात्मकता व आकर्षकता दिसून येतें. खिडक्या, भिंती, दरवाजे, सज्जे, यांवर तसेंच गोल, चौकोनी, षटकोनी खांबावरहि नक्शी काम केलेलें असतें. घरांचीं छपरें त्रिकोणी असतात. खेड्यांपाड्यांतून विटा, चुना, लोखंड याऐवजीं माती व लांकूड यांचा अधिक उपयोग करतात.

काश्मीरी लोक नक्शी कामाचे अत्यंत भोक्ते आहेत. त्यांच्या कपड्यावर बेल-बुट्टीदार नक्शी व भरतकाम केलेलें असतें. स्त्रियांना दागिन्यांची भारी हौस. पाया-

पासून ते डोक्यापर्यंत त्या दागिन्यांनीं मढलेल्या असतात. दगडी डुल व मणि हे त्यांच्या आवडीचे दागिने आहेत. तसेंच हातांत बंगल, गुणस, बाऊट, बंगर हे बांगड्यांचे प्रकार दिसून येतात. गळ्यांत एक बंद बकरवाल, तीलर, नाकांत चमकी, डोक्यावरील तरंगास चांदीच्या नकशीदार सुया, डोक्यांत बिंदीप्रमाणें टीका किंवा चांद, डुल, कनवजी, अल्काहेर इत्यादि नाना तऱ्हेचीं कर्णभूषणें, लोलक लावलेल्या अंगठ्या वगैरे अलंकार काश्मीरी स्त्रियांचे अंगावर आढळतात. प्रत्येक स्त्री दोन वेण्या घालून त्या पाठीवर सोडते. त्या वेण्यांना शेवटीं चांदीचे गोंडे असतात. याशिवाय फुलेंहि असतात. हें विसरून चालणार नाहीं! काश्मीरी स्त्रियांसारख्या शृंगार करणाऱ्या स्त्रिया इतरत्र क्वचित्च असाव्यात. हिंदु स्त्रियांच्या मंगळसूत्र ह्या सौभाग्य अलंकाराप्रमाणें त्या दिजगरू हा दागिना घालतात. त्यांच्या संसारांत तांबें, पितळ, चांदीं या धातूंचीं भांडीं असतात. तसेंच पेपरमाचीप्रमाणें मातीचीं सुबक भांडीं देखील ते वापरतात. शिवाय कुंभारानें बनवलेली वाडगी, खुजे, रांजण, तंबकनारी, ( हें वाद्य आहे ) वगैरे वस्तुहि त्यांच्या घरांत दिसून येतात. या प्रत्येक भांड्यावर दिलखेचक असें नकशी काम असते. साध्या टोपल्या, पेट्या, करंडे, पेटारे, वेताच्या छड्या, काठ्या, चटया, पडदे इत्यादि वस्तु ते बनवितात. प्रत्येक वस्तु बनविण्यामागें कलात्मकता हा त्यांचा मुख्य दृष्टिकोन असतो.

काश्मीरचा बहुतेक प्रदेश नदी, नाले, सरोंवरें यांनींच व्यापलेला आहे. आणि हिवाळ्यांत बर्फ पडत असल्यानें शेतीला उपयुक्त अशी जमीन या प्रदेशांत फारच कमी आहे. असें असूनहि शेती हा येथील मुख्य व्यवसाय समजला जातो. प्रत्येक घराभोंवतीं छोटासा बगीचा असतोच. त्यांत भाजीपाला व फुलांचीं झाडें लावलेलीं असतात.

काश्मीरमध्यें एकहि कारखाना नाहीं. श्रीनगर येथें रेशमाची गिरणी आहे व एक लांकडी वस्तुंचा कारखाना आहे. बारामुला व राजबाग येथेंहि रेशमाच्या गिरण्या आहेत.

बर्फ पडूं लागतांच पक्षांनीं ज्याप्रमाणें स्थलांतर करून दूरच्या ठिकाणीं वास्तव्य करावें त्याप्रमाणें येथील सर्व व्यवहार थांबतात व काश्मीरी लोक पोट भरण्यासाठीं अन्यत्र निघून जातात. येथील शाळा कॉलेजांना उन्हाळ्याची सुट्टी नसते. त्यांना हिवाळ्यांत सुटी दिली जाते. सर्वच दृष्टीनें परीपूर्ण असणाऱ्या निसर्ग सान्निध्यामुळें येथील लोक सदा उत्साही दिसतात. त्याप्रमाणें आत्मसंतुष्ट व नेहमीं प्रसन्नचित्त असणे हा त्याच्यांतील दुसरा प्रमुख गुण मानला जातो. काश्मीरमध्यें हिवाळ्यांत जरी बर्फ पडत असला तरी उन्हाळ्यांत कडक थंडी नसते त्यामुळें सर्व सृष्टी सौंदर्यानें नटलेली दिसते. नित्य नवनवा सौंदर्याचा आविष्कार होणें, नवनवा साक्षात्कार होणें हेंच जर खऱ्या सुंदर वस्तुचें लक्षण असेल तर काश्मीर भूमि नितांत सुंदर आहे, ह्यांत संशय नाहीं. एखाद्या डोंगरमाथ्यावरून किंवा खोऱ्यावरून नजर फिरवावी तो काय आश्चर्य

चारी बाजूंस पांढऱ्या शुभ्र हिमाच्छादित पर्वतांनीं वेढलेला भूभाग पाचूसमान भासतो आणि नवलाची गोष्ट अशी कीं तो देखावा क्षणाक्षणाला बदलत असतो. काश्मीरची सकाळ जितकी रम्य त्याहून दुपार अधिक सुंदर, दुपार जितकी सुंदर त्यापेक्षां संध्याकाळ अधिक उत्साही आणि त्याहिपेक्षां रात्र अधिक प्रशांत, विलोभनीय आणि सुरेख असतें. प्रत्येकानें आपापल्या सौंदर्याचा वाटा स्वतंत्रपणें उचललेला दिसतो. अशा चिरंतन निसर्गसौंदर्याच्या सान्निध्यांत आपणहि सौंदर्यमय होतो; स्वतःला विसरून जातो.

ह्या प्रदेशांतील पीरपंजाळ ही पर्वतराजी म्हणजे एक अगम्य असें ठिकाण आहे. सूर्यप्रकाशांत, चंद्रप्रकाशांत आणि संधिप्रकाशांत हा हिमनग मोठा चमत्कृतीपूर्ण दिसतो. सकाळची व सायंकाळची कोंवळी व कलतीं किरणें जणूं बर्फावरून सोनेरी मुलामा चढवीत असतात. गिरीशिखरांच्या अग्रभागीं कोणी तरी गुलाल उधळावा असें तें दृश्य दिसतें. सूर्य मावळल्यानंतरहि बर्फाची लकाकी बराच वेळ कायम राहते. पर्वत शिखरांच्या उंचीमुळें क्षितीजाचे पलीकडे गेलेली सूर्याची किरणें ते घेऊं शकतात. आणि तशा संधिप्रकाशानंतरहि हा हिमप्रदेश वातावरणांत स्वतःची प्रभा फाकवीत स्वतःचा प्रकाश पसरवीत असतो. या शिखरांमुळें पहांटे साडेपांच वाजल्या-पासून ते रात्रीं आठ वाजेपर्यंत त्या प्रकाशाचें अस्तित्व टिकून असतें व म्हणून दिवस बराच मोठा वाटूं लागतो.

आकाशांत घिरट्या मारणारे पांढरे शुभ्र ढग एकत्रित झाले म्हणजे दृष्टिक्षेपांत येणारे ढग खरोखरीच ढग आहेत कीं बर्फ आहे, असा प्रश्न पडतो. लहान लहान असंख्य ढग तर गिरीराजाचे अंगाखांद्यावर नित्य पहुडलेले असतात. चांदण्या रात्रीं ही हिमनगांची मैफल क्षितीजावर आकाश गंगेप्रमाणें भासतें. पीरपंजाळची चम-चमणारी रेषा म्हणजे श्वेतवसना रजनीचा कमरपट्टाच वाटतो. पीरपंजाळच्या बहुतेक शिखरांचे मुकुट भर उन्हाळ्यांतहि शाबूत असतात. पूर्वेकडील महादेव पर्वतराजी मात्र सूर्य शलाकांनीं घायाळ झालेली असते. महादेवाच्या शिखरावरील बर्फ म्हणजे ऋषिमुनींच्या पिंजारलेल्या जटांप्रमाणें वाटतें. हरमुखगंगा या शिखरावर उन्हाळ्यांतहि बर्फ पडत असतें. अशा प्रदेशांतील हिमशिखरांचें दर्शन झाल्यावर मनःसागराला जी भरती येते, जें उधाण चढतें, दुथडे भरून भरून वाहूं लागतें, तें कुठल्याहि दृश्यानें होत नाहीं. अंतरजागतिक कीर्तिचा किताब मिळविलेला आणि शहाजहान बादशहाचे स्वप्न बनून राहिलेला ताजमहाल कितीहि सुंदर असला तरी त्याचे सौंदर्य निसर्गनिर्मित सौंदर्यापुढें फीके पडेल, यांत शंका नाहीं. निसर्गनिर्मित ताजमहाल इतका विशाल अन् उन्मादक आहे कीं त्याचे शब्दांनीं किंवा रंगकुंचल्यांनीं चित्रण करण्याचें धाडस करणें म्हणजे त्याचें पावित्र्याची, त्याच्या निर्मळ सौंदर्याची, त्याच्या नित्य नवनवीन-तेची विटंबणा करण्यासारखे होईल.

काश्मीरमधील गुलमर्ग, खिलनमर्ग, सोनमर्ग, पहलगांव, अमरनाथ इत्यादि ठिकाणीं धवलगिरींचें उदात्त दर्शन घडते. क्षितीजाचे कडेवर एक लांबच लांब रेषा दिसते. कमी सूर्यप्रकाशांत ही रेषा अत्युच्च पर्वतराजींची इंद्रनील शिखरें आहेत हें चट-कन् लक्षांत येते. हा गगचुंबी खडतर नंगापर्वत ह्या नांवानेंहि ओळखला जातो. हा पर्वत खिलनमर्गहून ९० मैलांवर असून काश्मीरी लोक त्यास ' देवमीर ' (देवाचें धाम ) असें म्हणतात.

जेझिला ही खिंड १३,००० फूट ऊंच असून या ठिकाणीं नेहमीं हिमवादळें होतात. कर्णकटु आवाजही वातावरणांत झिंगत असतात म्हणून त्या प्रदेशास जेझिल हे नांव पडलें, अशी त्याची कथा सांगतात.

काश्मीरमधील मोंगल उद्यानांचा सुगंध सर्वत्र दरवळत असतो. हीं उद्यानें पहाण्यासाठीं कित्येक प्रवासी रोज येत असतात. अकबर, जहांगीर, शहाजहान ह्या मोंगल बादशहांनीं काश्मीरच्या निसर्गसौंदर्यावर आपल्या संस्कृतीचें व संस्कारांचें तोरण बांधलें आहे. श्रीनगरच्या दल सरोवराभोंवतीं हीं उद्यानें आहेत. शालीमार ही या मोंगल उद्यानाची राणी मानली जाते. शालीमारचा अर्थ प्रेम-निधान असा आहे. निशात ही दलच्या किनाऱ्यावरील दुसरी सुंदर बाग होय. निशातमध्यें आनंद, आल्हाद व शालीमारमध्यें प्रेम, शृंगार हा भाव प्रधान आहे. जहांगीर व शहाजहान बादशहांनीं आपल्या प्रकृतींतील हा फरक त्यांनीं निर्मिलेल्या दोन उद्यानांत प्रामुख्यानें प्रतिबिंबित झाला आहे. नस्सिम ही बाग देखील एके काळीं बहरलेली होती. परंतु तिचें वैभव आतां कमी कमी होऊं लागलें आहे. नूरजहाननें या बागेंत १२,०० चिनार वृक्ष लावले होते, असें म्हणतात. चष्मशाही, अच्छाबल, कोकरनाग, वोरिनाग, वगैरे ठिकाणीं जलप्रवाह आढळल्यानें मोंगल बादशहांनीं ही उद्यानें बनविलीं.

ज्यांना काश्मीरचें खरेखुरें दर्शन घ्यावयाचे असेल त्यांना तट्टावरून लांब लांब रपेट मारावी लागेल. डोंगर माथ्यावर मेंढ्यांच्या कळपामागून मनमुराद धांवावें लागेल. शेतकऱ्याच्या झोंपड्यांतून शिरून नद्रुची ( कमळाचें देठ ) भाजी, मरवईची भाकरी व चाय नमकीन यांचा आस्वाद घ्यावा लागेल.

गुलमर्ग हे खोरें पीरपंजाळच्या कुशींत वसलेलें आहे. येथून श्रीनगर अवघे २९ मैलांवर राहते. हें प्रवाशांचे आवडीचें ठिकाण असून त्याची ऊंची ८,७०० फूट आहे. आशियांतील सर्वांत मोठें गल्फ मैदान याच ठिकाणीं आहे. क्लब, नृत्यगृहें, हिमगिरी, शिकार करण्याचीं ठिकाणें इत्यादींनीं युक्त आहे. त्याचे सभोंवतालच्या प्रदक्षिणा घात-लेला रस्ता ऊंच ऊंच पाईन वृक्षांनीं झाकलेला आहे. तसेंच काळसर हिरव्या रंगाचे देवदार, गगनचुंबी सफेदा, आक्रोड, बदाम, सफरचंद, डाळींब, तुती, अळुबुखार, अड्डू, खुरमणी ( जर्दाळू ), चेरी इत्यादि अनेक झाडें या भागांत आहेत. बर्फावरील

घसरगुंडीचा खेळ हा येथील लोकप्रिय खेळ होय. शिकारीची खरी गंमत हिवाळ्यांत अनुभवता येते.

अमरनाथचे यात्रेस जातांना पहिला मुक्काम गुल्मर्गलाच पडतो. दाट अरण्यें, वनपुष्पांचे दाट ताटवे, कडेकपाऱ्यांतून हंसणारे, नृत्य करणारे निर्झर, लखलखणारी हिमशिखरें इत्यादि नाना आकर्षणांनीं पहलगांव हें खोरें सुशोभित असें बनलेलें आहे. कडेस लिदार वहाते. तिच्या प्रवाहाला वेग फार व खळखळाटहि तितकाच असतो. लांकडाचे मोठमोठाले ढोफळे प्रवाहाबरोबर चिपाडासारखे गटांगळ्या खात वहात जातात. पहलगांवच्या पर्वतांच्या रचनेस बोटांतल्या अंगठीची उपमा देतात. कोंदणाचा शिरोभाग म्हणजे बोईसरण टेंकडी व बाजूनें गोल कड्याप्रमाणें शरिराचा तीन चतुर्थांश भाग पाईनचें कडबोळें व डोक्यावर हिमशिरस्त्राण असा त्याचा एकंदरींत थाट आहे. पहलगांवाहून ३ मैलांची चढण चढून गेल्यावर बोईसरण हें शिखर, लागतें. हें शिखर माथ्यावर सपाट असून रस्त्यानें दुतर्फा निबिड अरण्यें आहेत. पहलगांवापासून ७ मैलांवर अरु नांवाचें एका सुंदर ठिकाण आहे. त्याची उंची ९.००० फूट असून एकांत व नैसर्गिक सुंदरता या अलंकारांनी नटलेलें अरुला अधिक महत्त्व आलें आहे.

काश्मीर खोऱ्याची लांबी ८० मैल व रुंदी २५ मैल आहे. काश्मीरी लोक उंच बांध्याचे, लाल गौर वर्णाचे, रेखीव अवयवांचे व मोठ्या डोळ्यांचे असून त्यांचे केस लांब असतात. प्रत्येक गोष्टींत कलात्मकता हा विशेष गुण त्यांचे ठिकाणीं सर्रास दिसून येतो. या खोऱ्याची लोकवसति २० लक्ष असून, २ लक्ष हिंदु व कांहीं बौद्ध आहेत. या ठिकाणीं बारमाही पाऊस पडत असूनहि पावसाची सरासरी २५ इंचापेक्षां अधिक नसते.

काश्मीरची सांप्रतची राजधानी श्रीनगर शहर अशोकानें किंवा दुसऱ्या प्रवरसेनानें वसविलें असावें. जहांगीर बादशहाच्या कारकीर्दीत श्रीनगर खरोखरचे 'श्री' नगर होतें. त्यानें त्या शहराभोंवतीं उद्यानें बनविलीं, सराई बांधल्या, कलाकौशल्य यास उत्तेजन दिलें.

पहलगांवाहून अमरनाथ ३८ फूट रहाते. श्रावण महिन्यांत बर्फाच्छादित रस्ता संपूर्ण खुला होतो. श्रावणी पौर्णिमेस अमरनाथची मोठी यात्रा भरते. याच ठिकाणीं वराह अवताराचा जन्म झाला. भक्तिभाव सोडून केवळ सौंदर्य, केवळ आनंद, केवळ गिर्यारोहणाचें साहस करण्याचे दृष्टिनें ही यात्रा महत्त्वाची मानली जाते. चंदनवाडी ते शेषनाग हें अंतर केवळ सात मैल असलें तरी तें तुडवीत जाण्यास तब्बल सात तास लागतात. लिदरच्या किनाऱ्यानें अर्धा मैल वर चढून गेल्यानें पिसूघाटी नावाचे चढण लागतें. हें चढण चढणाऱ्यास पिसून काढते.

शेषनाग या सरोवराचें दर्शन होतांच डोळे दिपून जातात. एक मैल लांब व पाव मैल रुंद असलेलें १२,००० फूट उंचीवरील हे प्रशांत तळें पांचूसारखें चमकत असतें. येथें एक हस्तिदंतासारखा पूल लागतो. तो ओलांडल्यावर आपण शेषनाग या विस्तीर्ण मैदानांत प्रवेश करतो. त्रिमूर्तिप्रमाणें दिसणाऱ्या शिखरांच्या व विस्तीर्ण हिमराशींच्या पार्श्वभूमीवर हा जलाशय पाहून तो सृष्टिचा एक चमत्कार असावा असें वाटल्यावाचून रहात नाहीं. कारण तेथें पोहोंचणारा प्रत्येक नास्तिक हा आस्तिक बनूनच परतला पाहिजे अशी या सरोवराची ख्याती आहे. त्याचे विषयीच्या अनेक अशा दंतकथा काश्मीरमध्यें सांगितल्या जातात. काश्मीर प्रांतांत शेषनागासारखीच वेरिनाग, कोकरनाग, अनंतनाग अशी अनेक नांवें आढळतात. नाग याचा अर्थ जलाशय असा करतात.

पंचतरणी येथें गंगेच्या पांच प्रवाहांचें मीलन होतें. त्यावरून त्यास पंचतरणी नांव पडलें आहे. या प्रवाहांत स्नान करणें शुभ मानलें जातें. पण येथें येणारा प्रत्येक भक्त येथील ओंजळभर पाण्यांतच स्वतःचें समाधान करून घेतो. कारण पंचतरणींत उडी घेणें म्हणजे बर्फरूपी मृत्युला हांक मारण्यासारखेंच असते. या ठिकाणची थंडी इतकी भयंकर असते कीं त्या थंडीनें प्रत्यक्ष सूर्य देखील काकडून निस्तेज बनतो.

तीन मैलांची चढण चढून गेल्यावर उजव्या हातास उतरणीवरून खालीं आलें असतां पर्वताच्या दोन शृंगात अमरनाथाची विस्तीर्ण गुंफा लागते. ती गुंफा तोंडाजवळ १२० फूट रुंद असून ७० फूट उंच आहे. तसेंच आंतहि तितकीच खोल आहे. गुंफेच्या डोईवरून अमरावती झुळझुळ वहात असते. गिरीगव्हरांत प्रवेश करतांना पायातलीं पादत्राणें काढून लोकरीचें कापड बांधावें लागतें. अमरनाथाचें लिंग घडीव दगडाचें नाहीं किंवा त्याला नीट आकारहि नाहीं. शिरोभागांत तें किंचित वाकलें आहे. बर्फाचा रंग पांढरा असून देखील हे लिंग हिरवट दिसते. हिवाळ्यांत हा प्रदेश संपूर्ण बर्फानें झांकला जातो. आणि उन्हाळ्यांतहि या ठिकाणीं फार तर एखादा महिनाच रहातां येते. त्यानंतर मात्र पुजाऱ्यांसह सर्वजण चंबुगबाळ बखोटीस मारून इतरत्र निघून जातात. पण ते शिवलिंग मात्र तेथेंच रहाते—अगदीं एकटें ! भोंवतालचें बर्फ वितळत असतांना हें लिंग कां वितळू नये ? हें न उकलणारें गूढ आहे. अमरनाथचें हें शिवलिंग शुक्ल पक्षांत वाढतें व कृष्ण पक्षांत कमी कमी होतें; आणि असें होत होत आमावस्येस तें कोठें निघून जातें कोण जाणें ! अमरनाथच्या पांच फूट उंचीच्या शिवलिंगाच्या उजव्या बाजूस सहा फूट उंच व साडेतीन फूट रुंद अशी बर्फाची शिळा दिसते. ती श्रीगणेशाची मूर्ति. लिंगाच्या डाव्या बाजूस लहानशी हिमराशी आहे, ती पार्वती माता होय. हे तिन्ही देवगण अमावस्येस नाहीसें होतात !


# १७

## देवतात्मा हिमालयः

पं. वसन्त अ. गाडगीळ

धर्मक्षेत्रे भारतवर्षे नैकविधानि तीर्थक्षेत्राणि विराजन्ते आसेतु हिमाचलम् । परं तत्रापि विशिष्य हिमालयस्य तपोभूमित्वं देवतात्मत्वात् । किं केवलं कविकुलगुरोर्कालिदासस्य कुमारगतेन माङ्गलिक-श्लोकेन एव ( अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा ) स्वीकर्तव्या देवतात्मता हिमालयस्य ? उताहो 'स्थावराणां हिमालयः' इति भगवद् गीतां महात्मताम् आदृत्य ? ये केचन नास्तिकमतयः ( यथार्थ-वक्तारम् आप्तम् अनादृत्य ) शब्दप्रामाण्यं स्वीकर्तुं नोत्सहन्ते तेषां विषये कथं देवतात्मता हिमालयस्य संमता स्यादिति स्वाभाविके प्रश्ने समुत्पन्ने ब्रूमः । किं नाम देवतात्मत्वम् । 'सत्यम्-शिवम्-सुन्दरम्' इति त्रयी ( समुदिता, न तु व्यस्ता ) यत्र प्रतिभाति प्रकर्षेण तत्र देवतात्मता निःशङ्कं स्वीक्रियताम् । किं हिमाचले सत्यस्य शिवस्य, सौन्दर्यस्य च साक्षात्कारः न अनुभूयते केनचित् कदाचित् कुत्रचित् ।

हिमालयस्य सत्यतां न्यक्कर्तुं को नाम पारयेत् । हिमालयस्थं माङ्गल्यम् आदृत्यैव यथा प्राचीने तथा आधुनिके भारते अपि देवर्षिभिः साधुसज्जनैः तपोभूमित्वेन तत्रैव गत्वा कठोरं तपः तप्यते !





**पाणिनीयं व्याकरणम्**

पठ्यताम्–तृतीया–पङ्क्तिः — ( अन्ते ) पाणिनि

चतुर्थी–पङ्क्तिः — ( प्रारम्भे ) व्याकरणसूत्र

पञ्चमी पङ्क्तिः — अ इ उ ण् । ऋ ऌ क् । ए ओ ङ् । ऐ औ च् । ह य व र् ।




**अमरकोषः**

प्रथमा–पङ्क्तिः — ( अन्ते ) अमरकोषनाम

सौंदर्यवादिनस्तु हिमाचलपरिसरस्थानि मुक्ताचयचाकचक्यचमत्कृतिसंपन्नानि दिव्योत्तुङ्गसानूनि दर्शं दर्शं पुनश्च निखिले जन्मनि तानि स्मारं स्मारं हृत्पटले प्रतिबिम्बितं, चित्रितम्, अक्षरीभूतं तत्रगतं सत्यं शिवं सुन्दरं च निसर्गश्रीविभवं ध्यायं ध्यायं स्वात्मानं स्वीयां नास्तिक्यधियम् अपि विस्मरन्ति ।

देवतात्मना हिमालयेन यथा भारतं राष्ट्रं संरक्षणेन तथा त्रिविष्टपमण्डलम् अपि कथं सनाथीकृतं तद् वृत्तं यथा मनोज्ञं तथा बोधकम् अपि ।

सप्तमे शतके त्रिविष्टपाधिपतिना स्त्रोङ् चाङ्गाम्पो 'इत्यनेन' 'थोम्पि सम्भोट' नामा षोडश-पण्डित-परिवारयुतः पण्डितश्रेष्ठः भारतं प्रेषितः भारतीयलिपिविद्याधिगमार्थम् । अनेन ब्राह्मणलिपिदत्त तथा 'देववित्सिंहपण्डित' इत्यनयोः सविधे भारतीयविद्याभ्यासः कृतः । आत्मसात्कृता तेन भारतस्थिता लिपिः देवनागरी । ६४७ खिस्ताब्देत्रिविष्टपं गतेन तेन त्रिविष्टपराष्टे नूत्ना लिपिः प्रचारिता । सेयं लिपिः देवनागरी-कन्या एव । त्रिविष्टपप्रजाजनानां कृते यथा धर्मदानं, विद्यादानं तथा लिपिदानम् अपि भारतेन एव कृतम् इति न कदापि विस्मर्तव्यम् । अद्यावधि तदेव प्राक्कालीन-देवनागरीलिपिसदृशं लिपिस्वरूपं त्रिवष्टपस्थग्रन्थेषु साक्षात्कर्तुं शक्यते ।

"पं. थोम्मि सम्भोट" इत्यनेन एव सर्वप्रथमं संस्कृत 'कारण्डव्यूह' ग्रन्थस्य 'भोट' भाषायाम् अनुवादः कृतः । ततश्च संस्कृत-व्याकरणाधारेण सर्वप्रथमं 'भोट'-व्याकरणमपि ग्रथितम् । राज्ञा 'स्त्रोङ् चाङ् गम्पो' इत्यनेन वर्षचतुष्टयं तद् अधीतम् । तदानीं तेन राज्ञा तत्र बौद्धधर्मस्य कृता प्राणप्रतिष्ठा अद्य यावत् तत्र अविच्छिन्नतया विराजिता आसीत् । 'स्त्रोङ् चाङ् गम्पो'-राज्ञः समये 'कुमार-शंकरब्राह्मण-शीलमञ्जु' प्रभृतयः सुप्रसिद्धाः प्रकाण्डपण्डिताः भारतीयाचार्याः तत्र तैः सादरं निमन्त्रिताः स्वपदस्पर्शेन ज्ञानवितरेण च तां भूमिं पावयामासुः । ६५० खिस्ताब्दे स्वर्गतः विद्याव्रती राजा स्त्रोङ् चाङ् गम्पो ।

७४७ खिस्ताब्दे नालन्दाविश्वविद्यालयस्य तान्त्रिकयोगाचार्यः पद्मसंभवः राज्ञः निमन्त्रणानुसारं भोटदेशं प्राप्तः । राज्ञा बहुमानितेन पद्मसंभवेन तान्त्रिक-बौद्ध (महायान)-धर्मस्य स्थापनां कृत्वा ७४९ खिस्ताब्दे 'साम्ये' संज्ञकः प्रथमः विहारः स्थापितः । अत्रैव शुभारम्भः 'लामा'-परम्परायाः । खिस्तशकस्य ७७५ तमे संवत्सरे त्रिविष्टपाधिपतिना '**टी स्रोङ् दो सेन**' इत्यनेन निमन्त्रितौ भारतीय-चीनीय-धर्मज्ञौ प्रार्थितौ च स्वं स्वं धर्मं संस्कृतिं च परिचाययितुम् । भारतीयधर्मज्ञेन श्रीकमलशीलपण्डितेन तथा चीन-पण्डितेन व्हाशाङ् इत्यनेन – उभाभ्यामपि युक्तिवचोभिः विविधैः प्रमाणैः स्वस्वधर्मसंस्कृतिमाहात्म्यं प्रतिपादितम् । अन्ततो गत्वा जितं पण्डितेन कमलशीलेन । पराजितः पं. ह्वा शाङ् महोदयः । ततः प्रभृति कृतनिश्चयः राजा 'टी स्रोङ् दो सेन्' धृतव्रतः भारतीय-धर्मसंस्कृति-विद्या-परंपरा परिपालने । 'इतःपरं त्रिविष्टपस्य सांस्कृतिकः, धार्मिकः विद्या-

विषयकश्च संपर्कः केवलं भारतेनैव न पुनः लेशतोऽपि कस्मिन्नपि विषये चीन राष्ट्रेण सह' इति तेन निरणायि। सोयं पराभवः कथं विस्मर्तुं शक्यते चीनीयैः। तदानीं लग्नस्य पराभूतिपङ्कस्य प्रक्षालनार्थं चिरं प्रतीक्षमाणैस्तैः त्रिविष्टपं प्रविश्य, तत्रत्यं धर्मराज्यं स्मृतिमात्रशेषं संपाद्य संप्रति प्रधर्ष्यते 'देवतात्मा हिमालयः'।

पं. कमलशीलः स्वतंत्रमाध्यमिक संप्रदायस्य आचार्यवरः। अस्मिन्नेव यद्यपि आचार्यधर्मकीर्तिः–जिनमित्रः-दानशीलः आनन्द-विमल-मित्र-बुद्धगुह्य-शान्तिगर्भ-विशुद्धिसिंह-इत्येतादृशैः विरचितेष्वपि विविधग्रन्थेषु वरीवर्ति सर्वेषु तेषु कमलशीलः यस्य नैके महत्त्वपूर्णाः ग्रन्थाः भोटभाषायां लिखिताः 'तज्जूरे' सुरक्षिताः सन्ति। अस्मिन्नेव युगे महाव्युत्पत्ति-नामकः संस्कृत भोटकोषः जनिं लेभे।

त्रिविष्टपस्थाः सर्वा अपि भारतीय-संस्कृतिप्रतिबिम्बिताः धर्म-विद्या-परम्पराः समूलम् उन्मूलयितुं प्रयतनशीलास्ते नीचमतयः। KoKo (नील blue) nor (lake) इत्याख्यस्य नीलसरोवरस्य, Ching-hai' इति चीननामान्तरं कृत्वा संप्रति नीलसरोवरविषयः तैः चीनराष्ट्राङ्गभूतः इति विनिवेद्यते। 'माँ गङ्गा' इति ख्याता गङ्गामाता तैः Mekong इति नाम्ना हॉङ्कॉङ्गवत् चीनीकृता त्रिविष्टपेषु। इत्थमेव सर्वत्र तैः प्रकृतेः विकृतिः संपादिता दरीदृश्यते।

सम्राट् छिंगिसखाँ (चेंगीजखाँ) इत्यनेन 'भोट' देशः १२०६ ख्रिस्ताब्दे तदुत्तराधिकारिणा 'सम्राट् कुबलइखाँ' इत्यनेन बौद्ध-यवन-ख्रिस्तादि-विविधधर्मप्रतिनिधीनां परिषद् एका निमन्त्रिता। "स्वस्य धर्मस्य सर्वश्रेष्ठताम् अनितरसाधारणतां च साक्षात्कारयितुम् अनुष्ठीयतां कश्चन प्रयोगः" इति प्रार्थिताः तेन तत्रोपस्थिताः ते सर्वे विविध-धर्म-प्रमुखाः। परं बौद्धानुयायिनः विना न केऽपि तत्र समर्थाः। बौद्धैः (लामा) तदानीं तत्र सम्राजः पुरतः स्थितं मदिरापात्रम् अदृश्यमनोबलेन विना स्पर्शं तन्मुखपर्यन्तं स्वयमेव प्रापितम्। जितं बौद्धैः। सम्राट् 'कुबलइखाँ' इत्यनेन स्वीकृतः बौद्धधर्मः। साचापण्डितः भोटाधिपत्ये अभिषिक्तः तेन। मोंगलदेशे नैके विहाराः तेन विरचिताः येषु अन्यतमः पेकिङ्ग-नगरे व्यराजत।

इत्थं न केवलं विहाराः (विहार) भोटदेशः वा विहारभूमिः परं चीनराजधानी पेकिङ्गनगरी अपि विहारभूमितां प्रापिता तदानीं 'कुबलइखाँ'–इत्यनेन।

एतावता भारतीयां संस्कृतिं सुदूरेषु प्रदेशेषु विस्तारयन् देवतात्मा हिमालयः सर्वस्वत्यागेन सर्वप्रथमं संरक्षणीयः भारतीयैः। इयमेव नीतिः। अयमेव राष्ट्रधर्मः सांप्रतिकः। जयतु देवतात्मा हिमालयः।

१८

# हिमालय, उत्तरकुरु आणि भारताची उत्तरसीमा

पं. वेंकटेशशास्त्री जोशी

अनेक शतकांत नव्हती अशी आपत्ति भारताच्या उत्तर सीमेवर पहारा करणाऱ्या हिमालयावर आज येऊन ठेपली आहे. आजपर्यंत हिमालयावर आणि हिमालयाला वळसा घालून भारतावर अनेक आक्रमणें झाल्याचीं उदाहरणें आहेत. प्रत्यक्ष हिमालयांतूनहि कांहीं प्रयत्न झाल्याचे त्रोटक उल्लेख सापडतात. पण पूर्वीच्या आक्रमणांत आणि चीननें गेल्या वर्षी उघडपणें सुरूं केलेल्या आक्रमणांत फार मोठा फरक आहे.

सध्यां भारताशीं सुरुं असलेला चीनचा लढा म्हणजे केवळ एकाद्या तात्कालिक संघर्षांतून, मतभेदाच्या वावटळींतून किंवा आर्थिक प्रश्नांतून उत्पन्न झालेली नेहमी-सारखी लढाई नव्हे. तो एक मूलतः भिन्न असलेल्या मानवी जीवनविषयक दोन तत्त्वज्ञानांतील लढा आहे. जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा धरून बाहेर पडलेल्या म्हणजेच नेहमीच्या आलंकारिक भाषेंत "पददलित राष्ट्रांतील जनतेला मुक्त करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे" असें मानणाऱ्या साम्यवादी चीनचा भारताच्या व

इतर स्वतंत्र राष्ट्रांच्या लोकशाही तत्वज्ञानाविरुद्ध उभारलेला व दीर्घकाल चालणारा हा लढा आहे.

## इति क्रमात् प्रयुञ्जानो राजनीतिं चतुर्विधाम् :

चीन व इतर साम्यवादी राष्ट्रं यांचा भारताविषयीं अंततः हेतु एकच असणार. भारत साम्यवादी शासन पद्धतीखालीं ज्या रीतीनें लौकर येईल ती पद्धत भारताबाबत स्वीकारावी अशी त्यांची विचारधारा! सध्याची जागतिक परिस्थिति लक्षांत घेऊन कांहीं राष्ट्रांनीं साम आणि दान यांचा प्रयोग भारताशीं चालू केला आहे तर चीननें 'संक्रमण काळांत रक्तरंजित क्रांति अपरिहार्यच असते' या मार्क्सच्या सिद्धान्तानुसार भारताबाबत दण्डनीतीचाच प्रत्यक्ष अवलंब केलेला आहे. राज्यशास्त्रांतील या चारही नीती परस्परांना पूरकच आहेत, असें राजनीतितत्त्वज्ञांचें मत आहे.

शिवाय कडवे धर्मवेडे पाकिस्तान व कट्टर धर्मद्वेष्टे चीन राष्ट्र यांची भारताविरुद्ध मैत्री विचित्र तर खरीच पण त्यांतही मूलतः विचारसरणींत फरक आहे. पाकिस्तानला भारताचे कांहीं लचके तोडावयाचे आहेत तर चीनला सर्वच भारत गिळंकृत करावयाचें आहे.

तसेंच आज सकृद्दर्शनीं भिन्न दिशेनें वहाणाऱ्या चीनच्या दंडनीतीचा व इतर साम्यवादी राष्ट्रांच्या सामदानांचा संगम कोठें आणि कसा होणार हें सांगणें कठीण आहे. तथापि त्यांची हातमिळविणी योग्य वेळीं होणार हें निश्चित आहे. आणि मग आपण मात्र पुनः एकदां स्वप्नांतून जागे झाल्याप्रमाणें जागे होणार आहोंत!

## द्वादशराजमण्डलांतील विजिगीषु राजा :

चाणक्याच्या कुटिलनीतीमध्यें अशा परिस्थितींत एक महत्त्वाचा सिद्धान्त मांडलेला दिसून येतो. द्वादशराजमण्डलामध्यें ज्यावेळीं एका राष्ट्राच्या दोन बाजूंना असलेल्या अनेक राष्ट्रांना तें मध्यंतरीचें राष्ट्र गिळंकृत करून टाकावयाचें असतें त्यावेळीं सर्वच राष्ट्रांनीं एकदम हल्ला करूं नये असें आर्य चाणक्य म्हणतो. एकानें उघडपणें हल्ला करून त्या राष्ट्राला युद्धांत गुंतवून ठेवावें व इतर राष्ट्रांनीं तह करारनामे करून त्या राष्ट्राच्या अंतर्गत व्यवहारांत प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न करावा आणि विजिगीषु राष्ट्रानें तेथें साम, दान यांचे शांतिपाठपूर्वक प्रयोग करीत समयाची वाट पहात बसावें. आतां युद्ध अगदीं निकरावर आलें आहे व पूर्वीच्या तहानुसार शत्रु अगतिकपणें आपल्या सहाय्याची वाट पहात आहे अशा वेळेस मात्र विजिगीषु राष्ट्रानेंहि विश्वासघात करून त्याच्यावर अचानकपणें हल्ला करावा. या नीतीचा अवलंब केला असतां शत्रु-राज्यांतील स्थावरजंगमसम्पत्ति सर्वस्वी नष्ट न होतां आपल्या


हातीं लागते व उभयपक्षीं मनुष्यहानिही कमी होते. प्रत्यक्ष युद्ध करून विजय मिळविल्यास मनुष्यहानि तर होतेच परंतु त्या राज्यांतील सुव्यवस्था मूलतः नष्ट होते, स्थावर-जङ्गम सम्पत्ति उध्वस्त होते आणि सर्वच नागरी जीवनाची घडी विसकटून गेलेली असते. शिवाय बोलून चालून युद्धच तें! डाव कोणावरहि उलटण्याचा संभव असतो. म्हणून सध्यां भारतावर कोसळलेल्या आपत्तीमध्यें अशा प्रकारच्या राजनीतीचा अवलंब केला असणें अशक्य नाहीं.

### अन्तश्छिद्राणि भूयांसि कण्टका बहवो बहिः.

वस्तुस्थिति अशी आहे कीं अनेक शत्रुराष्ट्रांनीं भारताची उत्तर सीमा आंतून व बाहेरून पोखरण्यास केव्हांपासूनच सुरवात केलेली आहे. कांहीं राष्ट्रांनीं आपल्या कारवायांना धार्मिक प्रश्नांचें अधिष्ठान दिलेलें आहे. कांहींनीं आपलें आक्रमण भौगोलिक सीमावादावर उभें केलें आहे तर कांहीं राष्ट्रें आपल्या तरल तत्त्वज्ञानाच्या मायाजालांतच भारत अडकला जावा यासाठीं आंतून व बाहेरूनहि प्रयत्न चालवीत असून त्यांनीं उत्तर सीमेवरच नव्हे तर भारतांत सर्वत्र आपलें जाळें पसरविलें आहे. हजार वर्षांत नव्हती अशी आपत्ति भारतावर आंतून व बाहेरून कोसळलेली आहे. संपूर्ण उत्तर सीमाच आजवरच्या पहाडी पहारेकऱ्यासह अनेक राष्ट्रांच्या कचाट्यांत सापडलेली आहे. गेल्या शेंकडों वर्षांतील अनुभवानें झालेल्या चुकांची पुनरावृत्ति आतां होणार नाहीं याबाबत दक्षता घेतली गेली पाहिजे. भारतांतील अंतर्गत भांडणांचा, असंघटितपणाचा, आणि राजकीय अदूरदर्शीपणाचा फायदा घेऊन परकीयांनी उत्तर भारतांतील धार्मिक व सांस्कृतिक मानचिन्हें नष्ट केली, स्थावर-जंगम संपत्ति पार उध्वस्त करून टाकली, संपन्न भाषा व साहित्य नाहीसें करून त्या जागीं अविकसित परकी भाषा लादली. इतकेंच नव्हे तर पर्वतांचीं, नद्यांचीं, प्रदेशांचीं, गांवांचीं नांवें बदलण्यापासून भारतीय संस्कृतीची नांवनिशाणीहि उखडून टाकण्याचे पद्धतशीर प्रयत्न केलेले येथें दिसून येतात. त्यामुळेंच आज उत्तर भारतांत कांहीं ठिकाणीं धार्मिक व वांशिक प्रश्न उपस्थित करून भारताचें एकराष्ट्रीयत्व पोखरून टाकलें जात आहे.

### एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति : विशाल भारतीयत्व :

वस्तुतः भारतांत जवळ जवळ सर्व प्रकारचे धर्म, मानववंश व संस्कृति अस्तित्वांत आहेत. या भिन्न भिन्न मानववंशांचें, परंपरांचें आणि संस्कृतींचें मिळून भारतीयत्व येथें निर्माण झालेलें आहे. या भारतीयत्वामध्यें प्राचीन सांस्कृतिक वैभवांच्या आणि आध्यात्मिक परंपरांच्या विश्वव्यापी विजिगीषु प्रेरणा आहेत आणि नव्या युगांतील समतेचे व वैज्ञानिक क्रांतीचे स्फूर्तिस्फुल्लिङ्गहि पसरविण्याचें सामर्थ्य येथें दिसून येतें.


रशिया
ओटर मंगोलिया
सिकियांग
पेकिंग
कोरिया
द. कोरिया
टोकियो
जपान
इराण
अफगाणिस्तान
काश्मीर
पश्चिम पाकिस्तान
त्सिंघाय
तिबेट
चीन
नवी दिल्ली
नेपाळ
भूतान
ल्हासा
तावांग
कराची
सिक्किम
कालिम्पांग
पू. पाक
हिन्द
लाओस
ब्रह्मदेश
फॉर्मोसा
पॅसिफिक महासागर
उत्तर व्हिएटनाम
दक्षिण व्हिएटनाम
सयाम
कंबोडिया
फिलिपाईन्स
अरबी समुद्र
बंगालचा उपसागर
तटस्थ राष्ट्रे
कम्युनिस्ट गट
पाश्चिमात्य गटातील राष्ट्रे
सिलोन
ब्रिटिश नॉर्थ बोर्निओ
सारावाक
मलाया
इंडोनेशिया
स्केल मैल
० ५००
हिन्दी महासागर

या विशाल व्यापक नि उदार भारतीयत्वामध्यें मंगोलियन मानव वंश किंवा सिनो-तिबेटी भाषावंश समाविष्ट न होण्याचें काय कारण ? मद्रास व पंजाब प्रांतांतील मानववंश किंवा केरळ आणि काश्मीर मधील लोक यांच्यांत वांशिकदृष्ट्या एकत्व थोडेंच आहे ! भारतांत भाषावंश व धर्मपंथहि अनेक अस्तित्वांत आहेत. जैन धर्मसंप्रदायालाहि थोडी अधिक अनुकूलता लाभती तर बुद्धाच्या अर्हतांप्रमाणेंच महावीराच्या उपासकांनीही जगभर फैलाव करण्यास कमी केलें नसतें. म्हणून विशाल भारतीयत्वाच्या रूपानें भिन्नभिन्न वर्णांनी, निरनिराळ्या रूपांनीं लहानमोठ्या आकारांनीं अतिप्राचीन तशाच अतिआधुनिक सभ्यतांनीं व्यापून टाकलेलें, एकसंधी तेजस्वी व वीजिगीषु राष्ट्रीयत्व निर्माण करण्याचा प्रयत्न गेलीं दोन हजार वर्षें येथें चालू आहे. प्रांताभिमान, पंथसंप्रदायाभिनिवेश, इत्यादि संकुचित विचारांनीं अधून मधून तें झाकळलेलेंहि दिसून येतें. पण आज तें पुनः एकवार उदयोन्मुख व विजिगीषु म्हणून जगाच्या प्रांगणांत निर्धारानें ठाण मांडून उभे राहिलेलें आहे आणि पुढेंहि रहाणार आहे.

## शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्रचिन्ता प्रवर्तते : राष्ट्रभक्तांचा महामंत्र :

तेव्हां अशा अति पुरातन पण तेजस्वी, शांतताप्रेमी पण स्वाभिमानी, बाह्यतः विस्कळित पण एकराष्ट्रीयत्वाचें अंतःसूत्र जेथें अनुस्यूतपणें दिसून येतें अशा भारताची उत्तरसीमा कोणती ? असा येथें प्रश्न आहे. त्याचें व्यावहारिक उत्तर म्हणजे " यूनोमध्यें सर्व राष्ट्रांनीं मान्य केलेली मॅक्‌महोनरेषा व इतर सर्व ठिकाणीं हिमालयाचा उत्तरेचा पायथा होय. " आणि येथें मतभेदास सुरवात होतें. उभयपक्षीं आपापल्या बाजूंनीं प्राचीन, प्राचीनतर, प्राचीनतम उपलब्ध ऐतिहासिक पुरावे दाखविले जातात. चीननें खोटे नाटे पुरावे मांडून जें वादंग मांडलें आहे, त्या वादंगाचें खरें उत्तर शेवटीं रणांगणावर शस्त्रास्त्रांनींच दिलें जाणार आहे. मुत्सद्देगिरी आणि शस्त्रसामर्थ्य यांनींच हे प्रश्न सुटले जातात. महाभारतांत दुसऱ्या एका संदर्भात म्हटलें आहे तें राष्ट्रभक्तांनीं अंतःकरणांत नेहमीच कोरून ठेवणें जरूर आहे.

" शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्रचिन्ता प्रवर्तते । "

या ठिकाणीं शास्त्र शब्दाचा अर्थ केवळ शास्त्रें, पुराणें, विद्या असा अर्थ नसून उद्योगधंदे, व्यापार, शेती इत्यादि, देशांतील सर्व व्यवहार हा अर्थ विवक्षित आहे. कारण राष्ट्राच्या रक्षणाशिवाय इतर कोणताहि उद्योगधंदा, व्यवहार, ज्ञानविज्ञान विकसित वा वृद्धिंगत होणें शक्य नाहीं असें या ठिकाणीं व्यासांना अभिप्रेत आहे.

चीननें युद्धांतीलच एक डावपेच म्हणून मध्यंतरीच्या काळांत वाटाघाटीचा व चर्चेचा देखावा मांडला आहे. त्याला उत्तर देण्याकरितां संस्कृत पाली वाङ्मयांतील

या संबंधांतील वर्णन, निर्देश अतिशय महत्त्वाचे आहेत. त्यांचा येथें थोडक्यांत विचार करावयाचा आहे.

संस्कृत वाङ्मयांत भारताच्या सीमा सांगतांना किंवा भारताचें वर्णनात्मक लक्षण करतांना ‘ उत्तरेस हिमालय व दक्षिणेस महासागर ’ असेंच प्रायः सर्वत्र केलेलें दिसून येते. उदाहरणार्थ --

“ उत्तरं यत्समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम् ।
वर्षं तद् भारतं नाम भारती यत्र सन्ततिः । ”

असें विष्णुपुराणांत म्हटलें आहे.

“ योजनानां सहस्रं तु द्वीपोऽयं दक्षिणोत्तरम् ।
आयतो ह्याकुमारिक्यादागङ्गाप्रभवाच्च वै ॥ ”

असें वायुपुराणांत वर्णन आहे.

“ आर्यावर्तः पुण्यभूमिर्मध्यं विन्ध्यहिमालयोः । ”

असें अमर म्हणतो.

“ दक्षिणेन हिमवन्तम्......... ”

असेंच भारताचें वर्णन बहुतेक धर्मसूत्रकारांनीं केलेलें आहे. या सर्व वचनांचें तात्पर्य हेंच आहे कीं हिमालयाच्या दक्षिणेला भारतवर्ष आहे. त्यावरून सर्व हिमालय पर्वत भारताच्या कक्षेंत येत होताच असें सांगतां येत नाहीं. अर्थात् हिमालय भारताच्या अन्तर्गत नव्हताच असेंहि म्हणतां येणार नाहीं. त्यासाठीं इतर संदर्भात कांहीं मिळतें कां हें पहाणें आवश्यक आहे.

**कोशेनाश्रयणीयत्वमिति तस्यार्थसङ्ग्रहः**

महाभारतांत सभापर्वांतील अर्जुन दिग्विजय या संदर्भात फार महत्त्वाचा आहे. सर्व राज्यव्यवस्था शेवटीं तिजोरीवर अवलंबून असते हें जाणून राजा युधिष्ठिराचा कोषभाग समृद्ध करण्याच्या हेतूनें अर्जुन उत्तर दिग्विजयार्थ स्वारीवर निघाला. स्वारीवर निघतांना अर्जुन धर्मराजास म्हणतो —

तत्र कृत्यमहं मन्ये कोशस्यास्य विवर्धनम् ।
करमाहारयिष्यामि राज्ञः सर्वान् नृपोत्तम ॥ मभा. सभा. २३, ३-४

म्हणजे कर, खण्डणी वसूल करून खजिना भरण्याकरितां अर्जुन उत्तरदिग्विजयार्थ बाहेर पडला. अर्जुनाप्रमाणेंच भीम पूर्वदिग्विजयासाठीं, सहदेव दक्षिणदिग्विजयासाठीं, व नकुल पश्चिमदिग्विजयासाठीं असे चारहि पांडव स्वारीवर निघाले.

भीमसेनस्तथा प्राचीं सहदेवस्तु दक्षिणाम् ।
प्रतीचीं नकुलो राजन् दिशं व्यजयदस्त्रवित् ।। मभा. सभा. २३, ९-१०

या स्वारीमध्यें अर्जुनानें उत्तरेचीं छोटीमोठीं राज्यें जिंकून तीं युधिष्ठिराच्या आधिपत्याखालीं आणलीं. त्यांच्याकडून करसंभार घेतले, मोठी खंडणी वसूल केली व त्यांना कायमचे मांडलीक बनविले.

## उत्तरदिग्विजय व युद्धमार्ग :

या साठीं हिमालयाच्या पश्चिमेला, दक्षिणेला व उत्तरेला अर्जुनानें कित्येक लढाया केल्याचें वर्णन आहे. सद्यःस्थितींत भौगोलिकदृष्ट्या या वर्णनाचा अतिशय सूक्ष्म दृष्टीनें विचार केल्यास तें फार उपयुक्त ठरणार आहे. युद्धशास्त्राच्या दृष्टीनें तें किती महत्त्वाचें आहे हें युद्धनीतिविशारदच ठरवितील. परंतु राजकीय भूगोलच्या दृष्टीनें मात्र अर्जुनाचें उत्तरदिग्विजय-वर्णन फार महत्त्वाचें आहे हें निश्चित. परंतु त्यांत निर्दिष्ट केलेलीं राजे लोकांचीं नावें व प्रदेशांचीं नांवें यांवरून आजचे कोणते प्रदेश याचा निश्चित बोध होऊं शकत नाहीं. किंबहुना अर्जुनाच्या दिग्विजयाच्या मार्गाला निश्चित आराखडा किंवा क्रम लावण्याचें आपण ठरवूं लागलों तर अधिकाधिकच गोंधळ उत्पन्न होतो व अर्जुन कोणत्या मार्गानें दिग्विजय करीत गेला हें कांहीं सांगतां येत नाहीं. तथापि त्या वर्णनांतील कांहीं प्रदेश व राजघराणीं यांचीं नांवें आजहि आपणांस निश्चित माहीत असल्यानें त्यावरून स्थूलमानानें व अनुमान धवक्यानें दिग्विजयाच्या मार्गाची सामान्य कल्पना करता येते. कांहीं वर्णनांतील शब्द तर आजच्या परिस्थितींत विशेषच सूचक वाटतात. उदाहरणार्थ —


" स किरातैश्च चीनैश्च वृतः प्राग्ज्योतिषोऽभवत् " मभा. सभा. २३-१९

येथील किरात म्हणजे भिल्ल, गिरिजन किंवा आदिवासी. पण ' चीन ' या शब्दानें निश्चित चिनी सैनिक असा अर्थ करणें कठीण आहे. पण चीनशी संबंधित असा अर्थ संभवनीय आहे हेंहि खरें !

त्याचप्रमाणें प्राग्ज्योतिष प्रदेश जिंकल्यावर अर्जुन अगदी पर्वतश्रेणींच्या मध्यभागीं शिरला असें वर्णन आहे :

तं विजित्य महाबाहुः कुन्तीपुत्रो धनञ्जयः ।
प्रययावुत्तरां तस्माद्दिशं धनदपालिताम् ।। १ ।।
अन्तर्गिरिं च कौन्तेयस्तथैव च बहिर्गिरिम् ।
तथोपरिगिरिं चैव विजिग्ये पुरुषर्षभः ।। २ ।।
विजित्य पर्वतान् सर्वान् ये च तत्र नराधिपाः ।
तान् वशे स्थापयित्वा स रत्नान्यादाय सर्वशः ।। ३ ।।

मभा. सभा. अ. २४


रशिया
सिंकियांग
चित्राळ
गिलगिट
काबूल
काश्मीर
लडाख
अफगाणिस्तान
श्रीनगर
इराण
तिबेट
कंदाहार
पश्चिम पाकिस्तान
मानस सरोवर
ल्हासा
ड्युरंड रेषा
ब्रम्हपुत्रा नदी
नेफा प्रदेश
बलुचिस्तान
सिंधु नदी
दिल्ली
नेपाळ
काठमांडू
सिक्कीम
भूतान
चीन
आसाम
ग्वाडार
कराची
पूर्व पाकिस्तान
कलकत्ता
ब्रह्मदेश
दीव
दमण
मुंबई
अरबी समुद्र
हैदराबाद
बंगालचा उपसागर
सयाम
गोवा
मद्रास
अंदमान
लखदीव बेटे
सिलोन
मालदीव बेटे
कोलंबो

"त्यानंतर अर्जुनानें, कुबेरानें रक्षण केलेल्या उत्तर दिशेवर स्वारी केली. आणि कुबेराच्या राज्यांतील अन्तर्गिरि, बहिर्गिरि व उपरिगिरि यांच्यावर विजय मिळविला. त्याचप्रमाणें इतर सर्व पर्वत जिंकून तेथील राजे लोकांना आपले मांडलीक बनवून त्यांच्याकडून पुष्कळ जडजवाहिर वसूल केलें."

वरील वर्णनांतील अंतर्गिरि, बहिर्गिरि व उपरिगिरि म्हणजे आजच्या हिमालयांतील कोणते भाग किंवा कोणत्या उपपर्वतांना हीं नांवें होतीं हें आज निश्चितपणें सांगणें कठीण आहे. तथापि अगदी हिमालयाच्या मध्यांत शिरून त्यांतही जो उत्तरेचा भाग होता, तेथेंहि जाऊन त्या प्रदेशावर अर्जुनानें विजय संपादन केला होता, असें या वर्णनावरून स्पष्ट होतें.

यानंतर

'स दिवःप्रस्थमासाद्य सेनाबिन्दोः पुरं महत्' मभा. सभा २४·१२

यांतील 'दिवःप्रस्थ' या स्थानाचा निर्देशही महत्त्वाचा आहे. यावरून अर्जुन हिमालयाच्या अगदी उंच उंच भागावर रहाणाऱ्या टोळ्यांवर चालून गेला होता असें दिसते. त्या ठिकाणींही टोळीवाल्यांचे संघ होते असे पुढील वर्णनावरून कळून येतें :

'विजित्य चाहवे शूरान् **पार्वतीयान्** महारथान्' मभा. सभा. २४·१४
'पौरवं तु विनिर्जित्य दस्यून् **पर्वतवासिनः**' मभा. सभा. २४·१५

## उत्तरदिग्विजयांत काश्मीरः

वरील वर्णनांतील 'पार्वतीय' किंवा 'पर्वतवासिन्' या शब्दांनीं हिमालयाच्या कोणत्या भागांतील हें वर्णन आहे याचा नीट उलगडा होत नाहीं. परंतु याखालील श्लोकांत आलेल्या 'काश्मीरक' शब्दानें येथील सर्व प्रकरणावर चांगला प्रकाश पडतो.

तें वर्णन असें :

"ततः **काश्मीरकान्** वीरान् क्षत्रियान् क्षत्रियर्षभः ।
व्यजयत् **लोहितं** चैव मण्डलैर्दशभिः सह ॥" मभा. सभा. २४·१६

"त्याच क्रमानें पुढें सरकून अर्जुनानें काश्मीर देशच्या राजांवर विजय मिळविला आणि दहा मंडलांसह लोहित प्रदेशहि जिंकून घेतला."

या नंतर प्रसिद्ध 'त्रिगर्त' या देशाचा उल्लेख येथें आढळतो. सुह्म, चोल, बाह्लीक, दरद, कम्बोज, इत्यादि प्रसिद्ध देशांचें वर्णन केलें आहे. त्यावरून स्थूलमानानें असें म्हणतां येतें कीं अर्जुनानें पंजाब, काश्मीर, वायव्य सरहद्द प्रांत व अफगाणिस्तान या प्रदेशांतील बराचसा मुलख जिंकून घेतला व नंतर तो ईशान्येकडून पूर्वेकडे सरकला. आजच्या परिस्थितींत युद्धशास्त्रविशारद व प्रत्यक्ष रणांगणावर डावपेंच खेळण्यामध्यें तरबेज असलेल्या लोकांना हा विषय अतिशय महत्वाचा वाटेल यांत शंका नाहीं.

**आणि शेवटीं उत्तरकुरु :**

यानंतर ' हिमवत् ' किंवा ' हिमवंत ' पर्वत जिंकून घेऊन अर्जुनानें श्वेतपर्वतावर आपलं ठाणं मांडलं. त्यानंतर श्वेतपर्वत ओलांडून अर्जुनानें किंनर लोकांचें राज्य जिंकून घेतलें व त्याच्या पलीकडील हाटक देशहि साम-प्रयोगानेच आपल्या ताब्यांत घेतला. हाटक देशाच्या सभोंवतीं असलेलीं अनेक सरोवरें व ऋषींच्याकरितां मुद्दाम तयार केलेले पाण्याचे पाट पाहिल्यानंतर अर्जुनानें मानस सरोवराचें दर्शन घेतलें ( मभा. सभा. अध्याय २५; श्लोक १ ते ५ ) मानस सरोवराच्या दर्शनानंतर अर्जुनानें गंधर्वांच्यावर विजय मिळविला व त्यांच्याकडून पुष्कळ खण्डणी वसूल केली. ( मभा. सभा. २५; ५-६ ) यानंतर अर्जुनानें जी धडक मारली ती एकदम उत्तर कुरूंवर. हरिवर्षांत येऊन उत्तर कुरूंशीं युद्ध करण्याची व त्यांना जिंकण्याची अर्जुनाची मनीषा उत्तर कुरूंच्या सीमा रक्षकांना जेव्हां समजली तेव्हां उत्तरकुरूंचे सीमेवरचे रक्षक द्वारपाल अर्जुनास म्हणतात --

" उत्तराः कुरवो ह्येते नात्र युद्धं प्रवर्तते "

" हें ' उत्तरकुरु ' नांवाचें राज्य आहे. येथें युद्ध होत नसतं. " मभा. सभा. २५-११.

या वेळीं उत्तर कुरूंच्या द्वारपालांनी कांहीं वेळां अर्जुनाची स्तुति करून तर कांहीं वेळां अर्जुनाला दम देऊन तर कांहीं वेळां वाटेल तेवढी खंडणी देण्याचे मान्य करून अर्जुनाला आपल्या राज्यांत--उत्तरकुरुंच्या प्रदेशांत--येऊं दिलें नाहीं. आणि शेवटीं मनुष्य देहानें येथें प्रवेश केला असतां कांहीं दिसणारहि नाहीं असें सांगितल्यानंतर अर्जुनानें प्रत्यक्ष युद्ध करण्याचा विचार सोडला व उत्तरकुरूंकडून धर्मराजाचें सार्वभौमत्व मान्य करून घेतलें; त्याच प्रमाणें उत्तरकुरूंकडून फार मोठी खंडणी, सोनें जडजवाहिर वसूल करून नेलें आणि तेथून तो परत फिरला. पहा :

" पार्थिवत्वं चिकीर्षामि धर्मराजस्य धीमतः " मभा. सभा. २५.१४.

" युधिष्ठिराय यत् किञ्चित्करवन्नः प्रदीयताम् " मभा. सभा. २५.१४.

" राजा धर्मराजाचें आधिराज्य येथें तुम्ही मान्य करावं अशी माझी इच्छा आहे. "

" राजा युधिष्ठिराला कांहीं खण्डणी--कर म्हणून तुम्ही दिली पाहिजे. "

वरील श्लोक संपूर्ण संस्कृत वाङ्मयामध्यें प्राचीन भारतीयांच्या साम्राज्यविस्ताराच्या दृष्टीनें फार महत्त्वाचे आहेत. या ठिकाणीं अर्जुनाच्या उत्तरदिग्विजयाची पार्श्वभूमि नीट समजावी व ' उत्तरकुरू ' हे कोठें आहेत हें समजावें या करितां युद्धाचें सविस्तर वर्णन केलें आहे व त्यांत उल्लेखिलेल्या स्थळांचे निर्देश येथें दिले आहेत. त्यांचें भौगोलिक स्थान अगदी अचूक दाखविणें कठीण आहे. तथापि वरील

पार्श्वभूमीवर प्राचीन काळांतील भारतीयांची सुरक्षित आणि स्वयंपूर्ण अशी आपल्या साम्राज्याची कल्पना उत्तरकुरूच्या अन्तर्भावाशिवाय परिपूर्ण होत नसे हें यावरून स्पष्ट होते.

**उत्तरकुरूंचें सविस्तर वर्णन :**

उत्तरकुरूंचें विस्तृत असें वर्णन महाभारत भीष्मपर्व अध्याय ७ मध्यें आलें आहे. तें असें —

दक्षिणेन तु नीलस्य मेरोः पार्श्वे तथोत्तरे ।
उत्तराः कुरवो राजन् पुण्याः सिद्धनिषेविताः ।
तत्र वृक्षा मधुफला नित्यपुष्पफलोपमाः ।
पुष्पाणि च सुगन्धीनि रसवंति फलानि च ।
सर्वकामफलास्तत्र केचिद् वृक्षा जनाधिप ।
सर्वा मणिमयी भूमिः सूक्ष्मकाञ्चनवालुका ।
मणिरत्नर्निभं रम्यं वज्रवैडूर्यसन्निभम् ।
भूभागं दृश्यते तत्र पद्मरागसमप्रभम् ।
सर्वर्तुसुखसंस्पर्शा निष्पङ्का (:) च जनाधिप ॥
पुष्करिण्यः शुभास्तत्र सुखस्पर्शा मनोहराः ।
देवलोकच्युताः सर्वे जायन्ते नच मानवाः ।
शुक्लाभिजनसम्पन्नाः सर्वे सुप्रियदर्शनाः ।
मिथुनानि च जायन्ते स्त्रियश्चाप्सरसोपमाः ।
तेषान्ते क्षीरिणां क्षीरं पिबन्त्यमृतसन्निभम् ।
... ... ...
उत्तराः कुरवो राजन् व्याख्यातास्ते समासतः ।

मभा. भीष्म. अध्याय ७, श्लोक २ ते १४

**उत्तरकुरु म्हणजे तिबेट :**

वरील वर्णनांतील उत्तरकुरूंचीं बहुतेक सर्व विशेषणें आजच्या तिबेटला लागू शकतात असें विद्वानांचें मत आहे. येथील झाडें, फळें, फुलें यांचें वर्णन कदाचित् अन्यत्रहि सापडूं शकेल. पण

'सर्वा मणिमयी भूमिः सूक्ष्मकाञ्चनवालुका'

म्हणजे "तेथील जमीन रत्नखचित असल्याप्रमाणें दिसते व नदीच्या प्रवाहांतील वाळूंतहि सोन्याचे कण सापडतात," हें वर्णन आजच्या तिबेटालाच लागूं पडेल असें आहे. (याच पुस्तकांतील श्री. देवगिरीकर यांचा तिबेटवरील लेख पहा.

पान ७२) त्याचप्रमाणें तिबेट म्हणजे छोट्या मोठ्या सरोवरांचा प्रदेश असें मानलें जातें. त्या सरोवरांतून व तळ्यांतून चिखल नसतो असें तिबेटचें वर्णन करतांना लिहितात. तेंहि महाभारताच्या येथील वर्णनांत पहावयास मिळतें.

सर्वर्तुसुखसंस्पर्शा निष्पङ्काश्च जनाधिप।
पुष्करिण्यः शुभास्तत्र सुखस्पर्शा मनोहराः।

"सर्व ऋतूंमध्यें आल्हाद देणारीं, चिखल नसलेलीं अनेक मनोहर सरोवरें येथें पहावयास सापडतात."

हें वर्णनहि तिबेटलाच विशेष रीतीनें लागू पडतें. किन्नरलोक, गंधर्वलोक ओलांडून गेल्यानंतर हा प्रदेश लागतो असें महाभारतकारांनीं पूर्वी सांगितलें आहेच. या वर्णनांतहि महाभारतकार म्हणतात कीं --

तेथील लोक गोरे, देखणे व आचारसम्पन्न आहेत. तेथील स्त्रियाहि अप्सरांप्रमाणें सुंदर आहेत."

या वर्णनांत स्त्रियांना अप्सरांप्रमाणें सुंदर म्हटलें आहे. प्रत्यक्ष अप्सरा असें म्हटलें नाहीं. कारण किंनरलोक व गंधर्वलोक यांच्या वर्णनाचे वेळीं म्हणजे अगदीं हिमालयाच्या मध्यभागांतील लोकांचें वर्णन करतांना अप्सरांचें वर्णन येऊन गेलेलें आहे. आतां हिमालय उतरून गेल्यानंतर जो प्रदेश लागतो त्याचें म्हणजे उत्तरकुरूचें वर्णन चाललें आहे. यावरूनहि महाभारतकारांना उत्तरकुरू म्हणजे आजचा तिबेटच अभिप्रेत आहे असें दिसतें.

## भारतीयांचा साम्राज्यविस्तार :

प्राचीन भारताच्या उत्तर सीमेचा विचार करतांना उत्तरकुरूंचें महत्त्व फार आहे हें मान्य करावें लागतें. 'उत्तरकुरू' शब्दाचे निर्देश संस्कृतपाली वाङ्मयांत बऱ्याच ठिकाणीं आले आहेत. ललितविस्तार, दीपवंस, बोधिसत्त्वावदानकल्पलता इत्यादि पालिवाङ्मयाप्रमाणें बहुतेक पुराणांतूनहि याचे निर्देश उपलब्ध होतात ![1] महाकवि भारवीनेहि वर्णन केलें आहे.

'विजित्य यः प्राज्यमयच्छदुत्तरान् कुरूनकुप्यं वसु वासवोपमः'

किरात. १-२५

'अर्जुनानें उत्तरकुरूंना जिंकून पुष्कळ जडजवाहिर आणि सोनें आणलें आणि तें धर्मराजाला अर्पण केलें.' असें येथें भारवि म्हणतो. महाभारतामध्येंहि अतिशय संपन्न असा हा प्रदेश होता असें वर्णन केलेलें आपण वर पाहिलेंच आहे. त्या दृष्टीनें उत्तरकुरूंचें महत्त्व फार असून त्याचा आपण नीट छडा लावला पाहिजे.

१. पहा. *Historical Geography of Ancient India,* by B. C. Law.

**उत्तरकुरु : ऐतिहासिक सत्य :**

सर्व उल्लेखांमध्यें अति प्राचीन आणि विश्वसनीय म्हणून ऐतरेय ब्राह्मणापर्यंत मागे सरकत जावे लागेल. कारण उत्तरकुरूंच्या संबंधांतील वरील सर्व माहिती पौराणिक ( mythical ) असल्यामुळे तितकीशी विश्वसनीय नसावी असें पाश्चात्य विद्वानांचें मत आहे. डॉ. मॅक्डोनल आणि डॉ. कीथ आपल्या प्रसिद्ध *Vedic Index* या ग्रंथामध्यें म्हणतात :— " The Uttara-kurus, who play a mythical part in the Epic and later literature, are still a historical people in the *Aitareya Brahmana,* where they are located beyond the Himalayas. " ( See Uttara kuru in *Vedic Index.* Vol. I )

" पुराण वाङ्मयांत आणि नंतरच्या संस्कृत-पाली वाङ्मयांत उत्तरकुरूंच्या संबंधांत जे उल्लेख आले आहेत ते ऐतिहासिक सत्य या स्वरूपांत घेता येणार नाहींत. परंतु ऐतरेय ब्राह्मणांत मात्र जे उल्लेख आले आहेत ते ऐतिहासिक सत्य म्हणून स्वीकारण्यास हरकत नाहीं. ऐतरेय ब्राह्मणांत उत्तरकुरूंचें ठिकाण हिमालयापलीकडे असें सांगण्यांत आलें आहे. " असे डॉ. मॅक्डोनल व कीथ यांचें म्हणणें आहे. त्यांचें हें विधान डॉ. त्सिमर यांच्या एका लेखावर आधारित आहे. ज्या ऐतरेय ब्राह्मणासंबंधीं इतके महत्त्वाचे उद्गार काढले जात आहेत तें ऐतरेय ब्राह्मण असें —

" तस्मादेतस्यामुदीच्यां दिशि ये केचन **परेण हिमवन्तं जनपदा उत्तरकुरवः,** उत्तरमद्राः इति वैराज्यायैव तेऽभिषिच्यन्ते । विराळित्येतानभिषिक्तानाचक्षते । "

ऐब्रा. ८–१४

अर्थ :— याच्या उत्तरेला हिमालयाच्या पलीकडच्या बाजूस जे उत्तरकुरू व उत्तरमद्रनामक लोक रहातात त्यांच्या राजे लोकांना वैराज्यनामक शासनपद्धतींत सांगितलेल्या विधीप्रमाणें राज्यभिषेक होतो म्हणून त्यांना राज्यभिषेक केल्यानंतर ' विराज ' असें म्हणतात.

वरील ऐतरेय ब्राह्मणाचे इंग्रजी भाषांतर करतांना डॉ. मार्टिन हाउग व डॉ. कीथ या दोघांनींहि ' परेण हिमवन्तम् ' याचें beyond the Himalayas असेंच भाषांतर केलें आहे.

दुसराहि असा एक उतारा आहे —

" एतं ह वा ऐन्द्रं महाभिषेकं वासिष्ठः सात्यहव्योऽत्यरातये जानन्तपये प्रोवाच । तस्माद् वाऽत्यरातिर्जानन्तपिरराजा सन् विद्यया समन्तं सर्वतः पृथिवीं जयन् परीयाय । स होवाच वासिष्ठः सात्यहव्यः, अजैषीर्वै समन्तं सर्वतः पृथिवीं महन्मा गमयेति । स होवाचात्यरातिर्जानन्तपिः, **यदा ब्राह्मण उत्तरकुरून् जयेयम्,** अथ त्वमु हैव पृथिव्यै राजा स्याः, सेनापतिरेव तेऽहं स्याम् ॥ "

ऐब्रा. ८–२३

याचा अर्थ थोडक्यांत असा आहे कीं :— इंद्राला ज्या विधीनें राज्याभिषेक केला तोच विधि वसिष्ठ गोत्रांत उत्पन्न झालेल्या सात्यहव्य ऋषीनें जनंतपपुत्र अत्यराति यास सांगितला. अत्यराति हा मूळचा राजा नव्हता. परंतु महाभिषेक विधीच्या सामर्थ्यानें त्याने चारी दिशांना संचार करून सर्वत्र विजय मिळविला आणि समुद्र-वलयांकित पृथ्वीचें राज्य संपादित केलें. त्यावेळीं अत्यरातीचे गुरु आपल्या शिष्यास म्हणाले "राजा अत्यराते! मी दिलेल्या विद्येच्या सामर्थ्यानेंच तूं समुद्रवलयाङ्कित पृथ्वीचें राज्य संपादन केलें आहेस. तेव्हां आतां आपल्या गुरूचें महत्त्व वाढविणें हें तुझें शिष्य म्हणून कर्तव्य आहे." त्यावर राजा अत्यरातीनें सात्यहव्य गुरूंना उत्तर दिलें :— "गुरुवर्य! मी उत्तरकुरू नामक देश जिंकीन आणि मग आपण सर्व पृथ्वीचे राजे व्हाल व मी आपला सेनापति होईन." या ठिकाणींहि इंग्रजी भाषांतर करतांना मार्टिन हाउग आणि कीथ यांनीं उत्तरकुरू या शब्दावर टीप दिली असून 'हिमाल्यापलीकडील देश' असेंच म्हटलें आहे.

**प्राचीन भारतीयांच्या विविध शासनसंस्था :**

वरील संदर्भातील माहिती भौगोलिक, ऐतिहासिक व राजकीय दृष्ट्याहि अत्यंत महत्त्वाची आहे. या प्रकरणांत तत्कालीन शासन संस्थांचे विविध प्रकार जसे पहा-वयास सापडतात तसेच भौगोलिक वर्णनहि तत्कालीन भारतीय सीमावर अगदीं स्वच्छ स्पष्ट प्रकाश पाडतें. राजकीय शासनपद्धती संबंधीं एवढ्या विस्तृत प्रमाणांत विचार ऐन्द्र महाभिषेक प्रकरणाव्यतिरिक्त वैदिक वाङ्मयांत क्वचितच पहावयास सांपडेल. स्वाराज्य, वैराज्य, माहाराज्य, आधिराज्य, साम्राज्य, भौज्य, इत्यादि पारिभाषिक शब्दांचा व्यवस्थितपणें केलेला उपयोग व त्यांचें सविस्तर स्पष्टीकरण यामुळें महा-भिषेक प्रकरणास विशेषच महत्त्व प्राप्त झालेलें आहे. या प्रकरणांत उत्तरकुरूंचा स्पष्ट उल्लेख आहे आणि ते उत्तरकुरू हिमाल्यापलीकडे आहेत असें स्पष्ट सांगितलें आहे. त्या उत्तरकुरूंशीं भारताचे प्राचीन काळापासून अखंड संबंध आहेत इतकेंच नव्हें तर कांहीं वेळा तो प्रदेश भारतीय साम्राज्यांतच अंतर्भूत होता तर कांहीं वेळा भारतीय सत्ता तेथपर्यंत पोंहोचली होती असें वरील उताऱ्यांवरून स्पष्ट दिसते.

भारताच्या उत्तरसीमेबाबत आज परकीयांनी जें एक वादंग माजविलें आहे आणि त्या वादांतील एक भाग म्हणून हिमाल्याच्या परिसरांत चीनची अधिसत्ता होती हें दाखविण्यासाठीं चीनच्या बाजूनें अनेक ऐतिहासिक पुरावे दाखल केले जात आहेत, त्या दृष्टीनें विचार करतां भारताची अधिसत्ता हिमालयावर तर होतीच होती पण त्याही पलीकडे जाऊन तिबेटच्या पठारावरील कांहीं भागांत सुद्धां भारताची अधिसत्ता होती हें दाखविणारा सर्वांत प्राचीन व विश्वसनीय असा हा उपलब्ध पुरावा आहे. वर विस्तृतपणें केलेल्या विवेचनावरून हें स्पष्ट होईल कीं, प्रकृत

ऐतरेय ब्राह्मण म्हणजे केवळ कपोलकल्पित अतिशयोक्तिपूर्ण वर्णनाचा भाग, भावरम्य तरल कल्पनांचा विलास वा प्रतिभाशक्तीचा आविष्कार नसून तें एक ऐतिहासिक सत्य असावें आणि त्यास तत्कालीन राजकीय परिस्थितीचें सूक्ष्म अनुशीलन व भौगोलिक परिस्थितीचें वास्तव निरूपण हे त्याचे आधार असावेत असें वाटतें. आणि म्हणूनच मार्टिन हाऊग, त्सिमेर, मॅकडोनल, कीथ इत्यादि सर्व पाश्चात्य पंडितांनीं वरील वर्णनास ऐतिहासिक सत्य असेंच संबोधलें आहे.

**पाश्चात्य विद्वान् म्हणतात उत्तरकुरु म्हणजे काश्मीर :**

परंतु डॉ. त्सिमर यांनीं प्रस्तुत उताऱ्यांतील ‘ हिमवत् ’ शब्दानें ‘ काराकोरम ’ पर्वत घ्यावा व त्या पलीकडील देश उत्तरकुरु म्हणजे ‘काश्मीर ’ प्रदेश समजावा असें प्रतिपादन केलें आहे. डॉ. मॅकडोनल, कीथ यांनींही वरील डॉ. त्सिमर यांच्या तर्कास पुष्टिच दिलेली आहे. ऐतरेय ब्राह्मणाच्या काळांत म्हणजे सुमारें इ.पू. एकहजार ते आठशे या काळांत भारतीयांना हिमालयाच्या उत्तरेचा भाग माहीत नसावा, वायव्येच्या बाजूनें आल्यानंतर तेथीलच आसमंतांतील प्रदेशास म्हणजे काश्मीर भागास उत्तरकुरू हा शब्द त्याकाळीं रूढ झाला असावा असा त्यांचा तर्क दिसतो. पण त्यांचा हा तर्क बरोबर दिसत नाहीं. कारण :

( १ ) काश्मीर शब्द रूढ असतांना उत्तरकुरु हा शब्द या प्रदेशास लावण्याचें कारण नाहीं.

( २ ) काश्मीर व उत्तरकुरू हे दोनही शब्द एकाच वेळीं भिन्न प्रदेशांना लावले असल्यामुळें ( मभा. सभा. अ. २४ पहा ) ते पर्याय शब्द होऊं शकत नाहींत.

( ३ ) या व्यतिरिक्त कोठेहि ‘ उत्तरकुरु ’ या शब्दाने काश्मीर हा अर्थ घेतलेला नाहीं म्हणजेच काश्मीर या अर्थी उत्तरकुरु शब्द वापरलेला नाहीं.

( ४ ) “ हिमवत् ” हा शब्द हिमालय पर्वताला, त्याच्या मानस सरोवराकडील भागाला लावलेला आहे. कांहीं विद्वानानीं ‘ हिमवन्त ’ म्हणून स्वतंत्र पर्वत तेथेंच मानलेला आहे. त्याचाहि विचार करणें शक्य होईल. पण ‘ हिमवत् ’ याचा अर्थ काराकोरम पर्वत असा मात्र होणें वरील संदर्भाचा विचार करता अशक्य वाटतें.

वरील सर्व विवेचनावरून आपणांस असें मानण्यास हरकत नाहीं कीं, उत्तर-कुरू म्हणजे काश्मीर नसून हिमालयापलीकडील तिबेटच्या पठाराचाच कांहीं प्रदेश होय. आणि म्हणून भारताची उत्तरसीमा हिमालयाच्या उत्तरेच्या पायथ्यापर्यंत नेल्यास तें योग्यच होईल. तिबेटच्या दक्षिण सीमाहि हिमालयाच्या उत्तरेच्या

पायथ्यापर्यंतच ठरविल्या जातील. अर्थात् नेफाकडील भागांत मात्र ब्रह्मपुत्रा नदी हीच भारताची उत्तरसीमा मानली जावी.

## इक्ष्वाकूणामियं भूमिः सशैलवनकानना :

आतां शेवटीं येथें आणखी एका व्यावहारिक प्रश्नाचा विचार करावयाचा आहे. केवळ व्यवहारी अर्थशास्त्रावर ज्यांचें पुरोगामी राज्यशास्त्र अवलंबून आहे असे कांहीं विद्वान्, "हिमालयांतील बऱ्याचशा डोंगराळ, निर्मनुष्य प्रदेशाचा भारतास कांहीच फायदा नाहीं, उलट त्या सरहद्दीवर सतत सैन्य सज्ज ठेवणें भाग पडेल व त्यामुळें भारताच्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर बराच ताण पडेल, व भारतासारख्या अविकसित देशाला तें परवडण्यासारखें नाहीं. त्यामुळें नवभारताच्या अर्थशास्त्राचा मूलतः पायाच उखडून टाकला जाईल. त्यापेक्षां ओसाड, निरुपयोगी, डोंगराळ प्रदेश देऊन जर चीन संतुष्ट होत असेल तर तो भारभूत प्रदेश चीनला देऊन टाकावा व भारतानें आपला आर्थिक विकास साधावा" असा भ्रान्त युक्तिवाद केला जातो. किंवा प्रामाणिक पण भोळसट व भेकड कल्पना मांडल्या जातात. परंतु या सर्व कल्पना भ्रांत तत्त्वज्ञानाच्या आहारी गेलेल्या नाठाळ प्रचारकांकडून असतात किंवा भेकड क्षुद्र स्वार्थी लोकांचा तो एक करंटेपणा असतो. कारण अनेक प्रकारच्या खनिज-संपत्ति, औषधि, वनस्पति हिमालयाच्या परिसरांत विपुल आहेत. आधुनिक विज्ञानाच्या प्रगतीसहि त्यांचा उपयोग होईल असें शास्त्रज्ञांचें मत आहे. त्यांचा उपयोग करून घेणें किंवा न घेणें हें आपल्या हातीं आहे. परंतु आपल्या दुर्बलतेवर आपण व्यावहारिक चातुर्याचें पांघरूण घालून निसर्गाने दिलेल्या व शेंकडों वर्षें अखंड चालत आलेल्या सीमांत अंशतःहि बदल करणें न्याय्य होणार नाहीं. आपणांस तसा अधिकारहि नाहीं.

## अर्थशास्त्रज्ञ लक्ष्मण व राष्ट्रभक्त श्रीरामचन्द्र :

वस्तुतः या भूमीचा किंवा या भूमींतील उजाड डोंगर, नाले, दुर्गम अरण्यें यांचा उपयोग आहे किंवा नाहीं हा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. राष्ट्राच्या एकाद्या भागाचा अधिक उपयोग होतो, व एकाद्या भागाचा कमी उपयोग होतो किंवा एखाद्या भागाचा बिलकूल उपयोग होत नाहीं म्हणून त्या भागातील प्रेमात, राष्ट्रभक्तींत किंवा स्वामित्वाच्या कल्पनेंत तरतम भाव दाखविणें हें अदूरदृष्टीचें, आणि राष्ट्रद्रोहाचेंच लक्षण आहे. असें म्हणतात कीं, लंकेंत रावणवध करून श्रीरामचंद्रांनीं बिभीषणाला रावणाच्या जागीं राज्याभिषेक करण्याचें ठरविल्यानंतर लक्ष्मण आजच्या व्यवहारी अर्थशास्त्रज्ञाची भूमिका घेऊन प्रभु रामचंद्रास म्हणतो :

"महाराज, आपणांस अयोध्या सोडून चौदा वर्षें झालीं. राजा भरत तेथें चांगल्या रीतीने राज्य करीत आहे. प्रजाहि त्याच्यावर अनुरक्त आहेतच. आपण ही

सोन्यासारखी नव्हे सोन्याचीच लंका स्वपराक्रमाने जिंकली असून आपणच या समृद्ध आणि संपन्न राज्याचा उपभोग घेणे योग्य होईल." त्यावर श्रीरामचंद्र लक्ष्मणास म्हणतात :

"अपि स्वर्णमयी लंका न मे लक्ष्मण रोचते ।
जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ॥"

"लक्ष्मणा ! सोन्यानें मढविलेली सुद्धा ही लंका नगरी मला प्रिय नाहीं. माता आणि मातृभूमि प्रत्यक्ष स्वर्गापेक्षांहि श्रेष्ठ आहेत."

अशाच दुसऱ्या एका संदर्भात प्रभु रामचंद्र म्हणतात कीं :

"इक्ष्वाकूणामियं भूमिः सशैलवनकानना"

ही भूमि इक्ष्वाकुकुलांतील राजे लोकांची आहे असें आम्ही म्हणतों तेव्हां या भूमींतील सुपीक, समृद्ध, संपन्न भाग तेवढा आमचा असा अर्थ नसून या देशांतील डोंगर, जंगल, अरण्य या सर्वांसह ही भूमि हा देश आमचा आहे, असें आम्ही मानतों.

आजच्या परिस्थितींत हिमालयाचें आणि उत्तर सीमेचें रक्षण करीत असतांना आपणाला श्रीरामचंद्रांच्या वरील वचनांचें सतत स्मरण ठेवणें अत्यंत आवश्यक आहे.

# १९

## व्याख्यानमालेचा समारोप

**श्री. गं. शि. आडकर**

वैदिक व्याख्यानमालेतील हिमालय दर्शन या विषयावरील ज्ञानसत्र तेरा व्याख्यानांनीं पूर्ण झालें आहे. श्री. पां. ज. चिन्मुळगुंद यांचें भाषण व्याख्यानमालेच्या उद्घाटनाचें असलें तरी तें हिमालयदर्शन व्याख्यानमालेतील एक स्वतंत्र व्याख्यानच समजावें इतकी नवीन व साधार माहिती श्री चिन्मुळगुंद यांनीं आपल्या उद्घाटनाच्या भाषणांत सांगितलीं आहे. सर्वच वक्त्यांनी प्रयत्नपूर्वक नवीन माहिती जमवून या ठिकाणीं श्रोत्यांच्या पुढें मांडली. त्यामुळें प्रतिदिनीं उपस्थित असणाऱ्या बहुसंख्य श्रोत्यांना आपल्या ज्ञानांत नवीन भरच पडली असे वाटल्यावाचून राहिले नाहीं.

या व्याख्यानामधील काहीं व्याख्यानें सरस व काहीं नीरस झालीं किंवा काहीं उत्तम आणि काहीं कनिष्ठ झालीं असा तरतमभाव करण्यापलीकडचीं हीं सर्व व्याख्यानें झालीं, एवढेंच मला या ठिकाणीं सांगावयाचें आहे. त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

या व्याख्यानमालेंत स्वीकारलेल्या विषयाप्रमाणेंच आणखीही कांहीं विषय यावेंत अशी आमची सर्वांचीच इच्छा होती. उदाहरणार्थ हिमालयांतील उद्योग-धंदे, हिमालयांतील आर्थिक जीवन इत्यादि. पण काळाचें बंधन हें सर्वांनाच मान्य करावें लागतें. दर वर्षी आम्ही फक्त दहा दिवस ही व्याख्यानमाला चालवितो. यंदाचे वर्षी उद्घाटन आणि समारोप धरून पंधरा दिवस ही व्याख्यानमाला आम्ही चालविली. त्यामुळें आवश्यकता व इच्छा असूनही या व्याख्यानमालेच्या वेळीं इतर महत्त्वाच्या विभागांचा आणि प्रश्नांचा समावेश येथें करूं शकलो नाहीं. पण आम्हांला संधि मिळतांच गणेशोत्सवातील व्याख्यानांच्या प्रसंगीं आम्ही एक दोन विषय हाताळण्याचा प्रयत्न केला.

श्री मंत्रिणीप्रसाद हे खुद्द हिमाचल प्रदेशांतील रहाणारे असून हिमाचल प्रदेशांतील व त्याच्या अनुषंगानें सर्वच हिमालयातील आर्थिक जीवनासंबंधी त्यांनीं स्वानुभवाचे बोल आम्हांस ऐकविले. त्यांची मातृभाषा हिंदी असल्यामुळें त्यांनीं आपले विचार हिंदीमध्येंच मांडले, ते आम्ही त्यांच्याच शब्दांत ह्या ठिकाणीं ग्रथित केले आहेत. त्यांच्या व्याख्यानामुळें एक महत्त्वाचा विषय त्या प्रदेशांत रहाणाऱ्या व्यक्तीकडून येथें आपणांस उपलब्ध होत आहे, ही महत्त्वाची गोष्ट आहे.


त्याच व्याख्यानाचें प्रसंगीं ज्यांनीं अध्यक्षस्थान भूषविलें होतें ते श्री. ह. मो. जोशी हे एक ध्येयवादी कार्यकर्ते म्हणून महाराष्ट्रांत सुपरिचित आहेत. त्यांनीं अध्यक्ष स्थानावरून जे बहुमोल विचार मांडले तें सर्वांनाच मननीय असे त्या वेळेंस वाटलें. आणि हिमालय दर्शन या व्याख्यानाच्या विषयांत वरील विषयाचाहि समावेश केला गेला तर तें अधिक उपयुक्त ठरेल असें वाटल्यावरून आम्हीं त्यांचेहि विचार वाचकांच्यापुढें ठेविलें आहेत. आमच्या पुस्तकाच्या संपादन कार्यांत अगदीं प्रारंभापासून ज्यांनी मोठ्या आत्मीयतेनें लक्ष घातलें ते आमचे एक सहाय्यक श्री. अ. पु. रासने यांना आम्हीं एका महत्त्वाच्या विषयावर लिहिण्याची विनंती केली. तो विषय म्हणजे हिमालयांतील निसर्ग सौंदर्य. हिमालयाचें वर्णन सर्व बाजूनीं करावें पण त्या वर्णनांत निसर्गसौंदर्य येऊं नये त्याची रुखरुख सर्वांनाच वाटली असती. आम्हीं सुचविल्याप्रमाणें श्री. रासने यांनीं उत्तम लेख लिहिला व वैदिक व्याख्यानमालेंतील उणीव भरून काढली.

परिशिष्ट एकमध्यें हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यापासून १९६२ अखेरपर्यंतच्या महत्त्वाच्या घटना आम्ही तारीखवार दिल्या असून, परिशिष्ट दोनमध्यें धार्मिक लोकांना व चिकित्सक लोकांनाहि आकर्षक वाटतील असे तीर्थक्षेत्रांतील संकल्पविधि संकलित केलें आहेत.

अगदीं सुरवातीसच न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद यांचा 'अध्यात्माची गंगोत्री – हिमालय' या विषयावर एक लेख दिला आहे. या लेखाद्वारें न्यायरत्न


विनोद यांनीं हिमालयांतील आपली तपःसाधना अक्षर वाङ्मयांत अक्षर सन्निविष्ट करून या ग्रंथाचे महत्त्व तर वाढविलेंच पण त्याचबरोबर आध्यात्म-विद्या व मंत्र-विद्या यांतील गूढगुंजन शक्य तितक्या सोप्या भाषेंत लोकांच्यापुढें ठेवून अखिल मराठी भाषिकांवर अनंत उपकार केलें आहेत व मराठी भाषेलाही एक लहानसं लेणंच चढविलं आहे; असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

हिमालयासंबंधीं सर्वांगीण माहिती एकत्रित स्वरूपांत येणें अत्यंत आवश्यक होतें. व्याख्यानमालेच्या सुरवातीपासूनच पं. वेंकटेशशास्त्री जोशी यांनीं ही योजना आपल्या मनांत आखली होती असें दिसतें. अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीनें त्यांनीं व्याख्यानमाला तर घडवून आणलीच पण त्यानंतरहि या पुस्तकाचें संपादनहि अगदीं वैशिष्ट्यपूर्ण असेंच केलें आहे. अगदीं थोड्या जागेंत गंभीर विषयावरील विविध व विपुल माहिती कशी संकलित व संपादित करावी याचा एक उत्कृष्ट नमुनाच या पुस्तकाच्या रूपानें आपणांसमोर येत आहे एवढेंच मी या ठिकाणीं सांगूं इच्छितो.





नेफा विभागांतील संस्कृति :

( पृ. ५३ पहा. )




नेफा विभागांतील संस्कृति : ( पृ. ५३ पहा. )




नेफा विभागांतील संस्कृति :

( पृ. ५४ पहा. )

# परिशिष्ट १

भारत स्वतंत्र झाल्यापासून चीनच्या संबंधांत ज्या ऐतिहासिक घडामोडी झाल्या त्यांतील अत्यंत महत्त्वाच्या घटना आपल्याला माहीत असाव्यात व आपल्या जवळ त्या कायम संग्रहांत रहाव्यात म्हणून त्या येथें देत आहोंत. यांतील माहिती सरकारी परिपत्रकांतील असल्यामुळें ती अधिकृत आहे. —संपादक

**१९४७- १५ ऑगस्ट.** भारत स्वतंत्र झाला व पहिल्या स्वतंत्र सरकारने ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून अधिकारसूत्रें घेतलीं.

नवीन सरकारला वारसाहक्कानें तिबेटमध्यें कांहीं विशेष प्रादेशिक हक्क प्राप्त झाले होते. ब्रिटिश नागरिक व स्थानिक लोक ह्यांच्यामधील तंटे, तिबेटीयन अधिकाऱ्यांशी बोलणी करून, इंडियन ट्रेड एजंटांनीं, शांततेने सोडविले. ज्या वेळीं मतभेद निर्माण होत, त्या वेळीं प्रतिवादाच्या मायभूमींत अंमलांत असलेल्या कायद्यानुसार निर्णय घेतला जात असे. अशा वेळीं चौकशी मंडळाचें अध्यक्षपदीं प्रतिवादीच्या राष्ट्रीयत्वाच्या अधिकाऱ्याची नियुक्ति केली जात असे. ब्रिटिश लोकांच्या हक्का-संबंधीचे सर्व प्रश्न, ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हुकमतीखालीं येत असत. ब्रिटिश नाकरिकांनीं कांहीं गुंन्हा केल्यास त्यांच्यावर ट्रेड एजंट खटले भरीत असत, व भारतीय कायद्यानुसार त्यांना शिक्षा केली जात असे.

स्वतःच्या संरक्षणासाठीं व ब्रिटिश नागरिकांच्या संरक्षणासाठीं, लष्करी पहारेकरी ठेवण्याचा अधिकार ट्रेड एजंटांना दिला होता. त्याचप्रमाणें गॅमटॉकपासून याटुंग व ग्यान्टसे पर्यंत टेलिफोन व टेलिग्राफची व्यवस्थाहि ह्या एजंटांनी केली होती. याटुंग, फारी व ग्यान्टसे येथें पोस्ट व टेलिग्राफ ऑफिसेस होतीं. तिबेटमध्यें भारत सरकारच्या मालकीचे ११ डाकबंगले होते.

**१९४९. १ ऑक्टोबर.** चीनच्या लोकसत्ताक राज्याची घोषणा झाली.

**३० डिसेंबर.** चीनच्या लोकसत्ताक राज्याला भारत सरकारने अधिकृत मान्यता दिली. एवढेच नव्हें तर अधिकृत मान्यता जाहीर करणाऱ्या पहिल्या कांहीं देशांपैकी भारत एक होता. ह्यावेळीं असें सांगण्यांत आले होते कीं, ह्यापुढें भारत व चीन ह्या दोन देशांमधील पूर्वापार चालत आलेले मैत्रीचे संबंध अधिक बळकट होतील व त्यामुळें आशिया खंडांत स्थैर्य निर्माण होऊन जागतिक शांतता टिकविण्यासाठीं सुद्धां ही मैत्री उपयोगी पडेल.

**१९५०. १३ ऑगस्ट.** भारताच्या सीमेवरील अस्थिर परिस्थितीमुळें एक प्रकारची चिंता निर्माण झाली आहे, असे भारत सरकारने चीनला कळविलें व चीन-तिबेट संबंध शांततेच्या मार्गाने सोडविले जावेत, असें आग्रहपूर्ण निवेदन केलें.

**२१ ऑगस्ट.** चीन सरकारने असे जाहीर केलें की तिबेटचा प्रश्न शांततेच्या मार्गाने व मित्रत्वाने सोडवून, चीन-भारत सीमा स्थिर करण्याची चीनची इच्छा आहे.

**२४ ऑगस्ट.** तिबेटबाबत चीनच्या ह्या धोरणाबद्दल भारताने समाधान व्यक्त केलें. त्यानंतर भारताने असे सुचविले कीं भारत-तिबेट ह्या दोन देशांतील पारस्पारिक सीमेचें उल्लंघन केलें जाऊं नये.

**१९ सप्टेंबर.** संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेंत भारतीय प्रतिनिधींनी अशी मागणी केली कीं, संयुक्त राष्ट्र मंडळांत, चीनचें प्रतिनिधित्व लोकसत्ताक चीन सरकारने करावें.

**७ ऑक्टोबर.** चीनी लष्कराने तिबेटमध्यें प्रवेश केला.

**२१ ऑक्टोबर.** चीनने केलेल्या लष्करी कारवाईच्या दुष्परिणामाकडे चीन सरकारचें लक्ष वेधून, भारत सरकारने असें निवेदन केलें कीं, ह्यामुळें एक तर लोकसत्ताक चीनला संयुक्त राष्ट्रांत प्रवेश मिळण्याचें काम लांबणीवर पडेल व दुसरे म्हणजे भारतीय सीमेवर अस्थिर व तंग वातावरण चालूच राहील.

**३० ऑक्टोबर.** तिबेटमधील चीनशी शत्रुत्व असलेल्या परकीय सत्तेचा भारताच्या विचारसरणीवर पगडा पडला आहे, अशा प्रकारची टीका करण्यास चीनने सुरूवात केली.

**१ नोव्हेंबर.** चीनने केलेल्या वरील आरोपाबद्दल भारत सरकारने आश्चर्य व्यक्त करून, हा प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविला जावा एवढीच आपली इच्छा असल्याचे प्रतिपादन केलें.

**१९५१. १ फेब्रुवारी.** कोरियांत लोकसत्ताक चीनने आक्रमण केलें अशा अर्थाचा संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत ठराव आला होता. भारताने ह्या ठरावाविरुद्ध आपलें मत दिलें.

**८ सप्टेंबर.** सॅनफ्रॅन्सिस्को येथें ४९ राष्ट्रांनी जपानबरोबरच्या मैत्रीच्या तहावर सह्या केल्या. चीनला ह्या बैठकीस निमंत्रण नव्हतें एवढ्यासाठीं व इतर कांहीं कारणांकरितां, भारतानें ह्या बैठकीस उपस्थित राहाण्याचे नाकारले.

**१४ नोव्हेंबर.** संयुक्त राष्ट्रांत लोकसत्ताक चीनला प्रतिनिधित्व मिळावें अशी भारताने पुन्हा एकदां मागणी केली.

**१९५२. २५ ऑक्टोबर.** भारताने फिरून एकदां जाहीर केलें कीं संयुक्त राष्ट्रमंडळामध्यें चीनचें प्रतिनिधित्व करण्यास फक्त लोकसत्ताक चीन सरकारच योग्य आहे.

**१९५३. १५ मे.** कोरियामधील लढाईतील युद्धकैद्यांच्या प्रश्नासंबंधीं चीनचा दृष्टिकोन काय आहे हें सांगण्याच्या हेतूने संयुक्त राष्ट्रमंडळांत कोरियाबद्दलचा ठराव भारताने मांडला होता असे पंतप्रधान श्री. नेहरूंनी ,जाहीर केले. हा ठराव प्रचंड बहुमताने पास झाला होता.

**८ जून.** राष्ट्रसंघाचा हा ठराव अमलांत आणण्यासाठीं व युद्धकैद्यांना स्वदेशी पाठविण्यासाठीं, तटस्थ राष्ट्राचें एक मंडळ ( न्युट्रल नेशन्स रिपॅट्रिएशन कमिशन ) स्थापन करण्यांत आलें. ह्या मंडळांचें अध्यक्षस्थान भारताने स्वीकारलें होतें.

**२८ सप्टेंबर.** चीनला संयुक्तराष्ट्रांत प्रवेश मिळण्याबद्दलचा प्रश्न भारताने पुन्हां एकदां धसास लावला.

**३१ डिसेंबर.** भारत सरकारने पुढाकार घेऊन भारत-तिबेट संबंधाबाबत पेकिंग येथें बोलणी सुरू केली. पूर्वापार चालत आलेले महत्त्वाचे प्रश्न सोडवून ह्या दोन देशांतील मैत्रीचे व सहयोगाचे संबंध अधिक बळकट व्हावेत, हा ह्या उपाययोजनेमागील हेतु होता.

**१९५४. २९ एप्रिल.** तिबेट व भारत ह्या दोन देशांतील व्यापार व दळवळणासंबंधीं करार झाला. भारताने तिबेट मधील आपले विशेष प्रादेशिक हक्क व सवलती सोडून दिल्या, व तिबेट हा चीनचा भाग आहे, ह्या गोष्टींना मान्यता दिली. ह्या करारामध्यें .व्यापारी संस्था नमूद करून व्यापाराचे व यात्रांचे मार्गहि निश्चित् करण्यांत आले होते. ह्या दोन देशांतील सामाइक सीमेवरून व्यापार करण्यासाठीं व दळणवळणासाठीं नियम घालून देण्यांत आले होते. हा करारनामा आठ वर्षांपुरता होता. करारनाम्याच्या] प्रस्तावनेंत पंचशील तत्त्वांचें पालन करण्याचे दोन्हीं देशांनी कबूल केले होते. पंचशील तत्त्वांत अंतर्भाव होणारीं तत्त्वें अशीं आहेत :— उभय देशांनी एकमेकाची प्रादेशिक एकता व अधिपत्य यांस मान्यता देणे; एकमेकांवर आक्रमण न करणें; एकमेकाच्या अंतर्गत व्यवहारांत ढवळाढवळ न

करणें; एकमेकांस बरोबरीच्या नात्याने वागवून एकमेकांचें हित साधणें; शांततेचें सहजीवन जगणें. ह्या करारामुळें, अर्थातच असे गृहित धरले गेलें कीं आतां उभय देशांत मतभेदाचे प्रश्न शिल्लक राहिले नाहींत, व समजा असें प्रश्न जर पुढे निर्माण झाले तर ते एकमेकाला हितावह होतील, अशाच तऱ्हेने सोडविले जातील.

याटुंग व ग्यान्ट्से येथील भारतीय संरक्षक दल काढून घेण्याबद्दल व भारत सरकारच्या मालकीची तिबेटमधील पोस्ट, टेलीग्राफ व टेलिफोन व्यवस्था आणि डाकबंगले, चीन सरकारच्या स्वाधीन करण्याच्या प्रश्नाबाबत उभय देशांत पत्रव्यवहार झाला.

**२५ जून.** श्री. चौ एन-लाय ह्यांनी दिल्लीला सरकारीरीत्या भेट दिली.

**२८ जून.** दोन्हीं देशांच्या पंतप्रधानांनी ह्या भेटीनंतर एक संयुक्त पत्रक काढलें होतें. पत्रकाच्या सुरुवातीला पंचशीलतत्त्वांवरचा विश्वास प्रदर्शित करून नंतर असे जाहीर केलें होतें कीं "आंतर्देशीय संबंधांप्रमाणेंच, आंतरराष्ट्रीय संबंधांच्या बाबतींत सुद्धां, पंचशील तत्त्वांचा वापर केला तर जगांत शांतता व सुव्यवस्था निर्माण होण्यास मदत होऊन, आज जगांत सर्वत्र जें भीतीचें व संशयाचें वातावरण पसरलें आहे तें नष्ट करून, लोकांच्यांत एक प्रकारचा विश्वास निर्माण होईल...... दोन्हीं पंतप्रधानांनी भारत-चीन मैत्रीबद्दव विश्वास व्यक्त करून, असें प्रतिपादन केलें कीं ह्या मैत्रीचा दोन्हीं देशांचा शांततेच्या मार्गाने विकास होण्यास, आशिया खंडांतील इतर देशांचा विकास होण्यास व जागतिक शांततेच्या दृष्टीनें खूपच उपयोग होईल.

**१७ जुलै.** उत्तर प्रदेशांतील बाराहोती ( चीननें 'युजे' असे म्हटले होते ) तेथें भारतीय लष्कर असल्याबद्दल चीनने तक्रार केली. भारतीय प्रदेशांतील टापूवर चीनने आपला हक्क सांगितल्याची ही पहिली वेळ होती. भारताची पारस्परिक सीमा कोणती आहे, ह्याबद्दल कधींहि शंका निर्माण झाली नव्हती; व ह्या सरहद्दी चीन सरकारला पूर्णपणें माहिती होत्या ह्या सीमांच्या अगदीं शेवटच्या भागापर्यंत सर्वप्रदेशावर भारतीय प्रशासन चालू आहे. भारतीय संविधानांत ह्यापैकीं बऱ्याच प्रदेशांचा मुद्दाम उल्लेख केला आहे. त्याशिवाय भारताच्या पंतप्रधानांनी १९५० सालीं भारताच्या सीमा अधिकृतरीत्या जाहीर केल्या होत्या. १९५४ सालीं चीन सरकारने, भारतीय प्रदेशाच्या कोणत्याहि टापूवर हक्क तर सांगितला नव्हताच, उलट भारतीय प्रदेशाची एकता व आधिपत्य ह्यांचा मान राखण्याचे मनःपूर्वक आश्वासन दिलें होतें. तेव्हां चीनने बाराहोतीवर सांगितलेला हक्क केवळ अज्ञानामुळें, विशेषतः बाराहोती निश्चित कोठें आहे वगैरे माहित नसल्यामुळें केला असावा, अशी भारत सरकारने समजूत करून घेतली.

**२७ ऑगस्ट.** भारतीय लष्कर तिबेटमध्यें घुसल्याचा चीननें भारतावर केलेला आरोप खोटा असल्याचे, भारत सरकाने चीनला कळविले व चिनी अधिकाऱ्यांनीं बाराहोतींत घुसल्याचा प्रयत्न केला, ह्याबद्दल चीनकडे निषेध नोंदविला. खलित्यांत पुढे म्हटले होते कीं बाराहोती हें ठिकाण निती खिंडीच्या दक्षिणेला असून तो प्रदेश पारंपरिक भारतीय प्रदेश आहे.

**२१ सप्टेंबर.** संयुक्त राष्ट्रसंघात भारतीय प्रतिनिधींनी पुन्हां एकदां प्रस्ताव आणला कीं, चीनचें प्रतिनिधित्व लोकसत्ताक चीन सरकारला मिळावे.

**१४ ऑक्टोबर.** दोन्हीं देशांत एक व्यापारी करार झाला.

**१८ ऑक्टोबर.** उभय देशांतील मैत्रीचे संबंध कायम राहून ते अधिक बळकट व्हावेत ह्या हेतूने श्री. नेहरूंनी चीनला भेट दिली. ह्या वेळीं चीनमध्यें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या कांहीं नकाशांकडे श्री. नेहरूंनी चिनी नेत्यांचें लक्ष वेधलें. ह्या नकाशांत उभय देशांतील सीमा चुकीची दाखविली गेली होती व भारतीय प्रदेशाचा सुमारें ५० हजार चौरस मैलाचा टापू चीनच्या हद्दींत दाखविला होता. श्री नेहरूंनीं पुढे असें सांगितले कीं कदाचित् हें चुकीने झाले असेल: परंतु कांहीं असले तरी भारताला त्याबद्दल विचार करण्याचें मुळींच कारण नाहीं ; कारण भारताच्या सीमा अत्यंत स्पष्ट असून, त्या सर्वांच्या परिचयाच्या आहेत त्याबद्दल शंका येण्याचे कांहींच कारण नाहीं. श्री. नेहरूंज्या ह्या प्रश्नाला उत्तर देतांना श्री. चौ-एन-लाय ह्यांनी त्या चिनी नकाशांना विशेष महत्त्व नसल्याचे दर्शवून पुढे असें सांगितलें कीं तें नकाशे म्हणजे पूर्वीच्या कौमिंटँग राज्यातील नकाशांच्या हुबेहुब नकला आहेत. कारण, लोकसत्ताक चीन सरकारला त्यातींल दोष काढून पुन्हां छापण्यास वेळच मिळाला नाहीं.

**१९५५. १८ एप्रिल.** ब्रह्मदेश, सिलोन, भारत, इंडोनेशिया व पाकिस्तान ह्या देशांनी पुढाकार घेऊन आशियाई-आफ्रिकन देशांची जी बैठक बोलाविली होती, त्यांत चीनने भाग घेतला होता. चीनचें प्रतिनिधित्व करण्याचा हक्क लोकसत्ताक चीन सरकारलाच आहे ह्या मुद्याला श्री. नेहरूंनी पाठिंबा दिला व इतर आशियन्-आफ्रिकन देशांतील नेत्यांशी संबंध वाढविण्यासाठीं, श्री. चौ-एन-लय ह्यांना मदत केली.

**११ मे.** फॉर्मोसा पेंचप्रसंग सोडविण्याचा प्रयत्न करण्याकरता चीन सरकारच्या विनंतीवरून श्री. कृष्णमेनन ह्यांनी पेकिंगला भेट दिली,

**२८ जून.** बाराहोती येथें चीनच्या तुकडीने बेकायदेशीरपणे तळ ठोकल्याबद्दल भारत सरकारने चीन सरकारकडे निषेध नोंदविला.

**१५ सप्टेंबर.** उत्तर प्रदेशांत डामझान येथें भारतीय हद्दींत १० मैल आंत चिनी सैनिकांची एक तुकडी घुसली.

**२० सप्टेंबर.** लोकसत्ताक चीनला संयुक्त राष्ट्रांत प्रवेश मिळावा असा पुन्हां एकदां भारताने प्रस्ताव मांडला.

**५ नोव्हेंबर.** डामझानमध्यें चिनी सैन्य घुसल्याबद्दल भारत सरकारने चीन सरकारकडे निषेध नोंदविला.

**१९५६. २८ एप्रिल.** उत्तर प्रदेशांतील निलांग ह्या ठिकाणच्या अर्धा मैल पूर्वेला हत्यारी चिनी तुकडीनें तळ ठोकला.

**२ मे.** निलांग विभागांत चीनने आक्रमण केल्याबद्दल भारत सरकारने चीन-कडे निषेध खलिता पाठविला.

**२६ जुलै.** बाराहोती हा चीनचा प्रदेश आहे असें चीन सरकारने घोषित केले व तुनजुनला ही सीमेवरील खिंड असल्याचें अमान्य केलें.

**१ सप्टबर.** शिपकी खिंड ओलांडून चिनी सैनिकांनी भारतीय हद्दींत प्रवेश केला.

**८ सप्टेंबर.** चिनी सैनिकानी शिपकी खिंड ओलांडल्याबद्दल भारत सरकारने चीन सरकाररडे निषेध नोंदविला.

**१० सप्टेंबर.** आणखी एकदां चिनी तुकडी शिपकी खिंड ओलांडून भारतीय हद्दींत घुसली.

**२० सप्टेंबर.** शिपकी खिंड ओलांडून एक चिनी टेहळणी तुकडी हपसांग खुडपर्यंत आली. भारतीय टेहळणी तुकडी व ह्या तुकडीची भेट होतांच चिनी तुकडीने गोळीबार करण्याचा धाक दाखविला.

**२४ सप्टेंबर.** शिपकी खिंड ओलांडल्या बद्दल व हुपसांग खुड येथें चिनी सैन्याने तळ ठोकल्याबद्द भारत सरकारने चीन सरकारकडे निषेध खलिता पाठविला.

**१० नोव्हेंबर.** संयुक्त राष्ट्रांच्या आम सभेंत चीनच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न घ्यावा असें भारतानें सुचविलें.

**२८ नोव्हेंबर.** श्री. चौ-एन-लाय ह्यांनी भारताला भेट दिली. श्री. नेहरूंशी त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय प्रश्नांची व भारत-चीन सीमा प्रश्नांची चर्चा केली त्यावेळीं असे ठरले कीं सीमेबद्दल कांहीं तंटाच नव्हता, परंतु कांहीं लहानसहान प्रश्न होते. दोन्ही देशाच्या प्रतिनिधींनी परस्पर तडजोडीनें हे प्रश्न सोडवावेत. श्री. चौ एन-लाय ह्यांनी आणखी असे सांगितले कीं चीन सरकारनें ब्रह्मदेशाच्या बाबतींत, १९१४ सालीं ठरलेली ( मॅकमोहन सीमा रेषा ) सीमा मान्य केली आहे व भारताच्या बाबतींत सुद्धां हीच रेषा मान्य करावी असे सुचविले आहे. ही सीमा रेषा भारताच्या पूर्वेकडील सरहद्दीबद्दल होती. तिबेटच्या अधिकाऱ्यांशीं ह्याबद्दल बोलणी करण्याचे श्री. चौ एन-लाय ह्यांनी आश्वास दिलें.

**१९५७. ५ जून.** भारतीय ट्रेड एजन्सीच्या ताब्यांतील विभाग सोडून भारत सरकारच्या ताब्यांत असलेली, याटुंग येथील सर्व जमीन, भारताने चीन सरकारच्या स्वाधीन केली.

**१३ सप्टेंबर.** संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने चीनच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न हातीं घ्यावा असे भारताने सुचविले.

**ऑक्टोबर.** भारताच्या ईशान्य सरहद्दीवरील लोहीत विभागांतील वालाँग ह्या ठिकाणीं चिनी सैन्याने प्रवेश केला.

**१९५८. एप्रिल-मे.** भारताने पुढाकर घेऊन बाराहोतीच्या प्रश्नाबाबत दोन्ही देशाच्या प्रतिनिधींमध्यें बोलणी सुरू केली. भारताने असे सुचविले कीं ह्या प्रश्नाचा निकाल लोगपर्यंत, उभय पक्षांनी ह्या विभागांत लष्करी इसमांना पाठवूं नये. ही गोष्ट चीनला मान्य होती. परंतु बिनलष्करी लोकांवर बंदी घालण्याचे चीननें नाकारले. अधिकाऱ्यांच्या ह्या बोलण्यांतून आणखी एक गोष्ट स्पष्ट झाली कीं चीन सरकार ज्या विभागांवर आपला हक्क सांगत होते, त्या भागाबद्दल निश्चित अशी कांहींच माहिती चीनसरकारला नव्हती.

**२ जुलै.** लडाख विभागांतील खुर्नाक फोर्ट हें ठिकाण चिनी सैनिकांनी ताब्यांत घेतल्याबद्दल भारत सरकारने चीन सरकारकडे निषेध नोंदविला.

**१४ जुलै.** संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने चीनच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न हातीं घ्यावा, असे भारताने पुन्हां एकदां सुचविले.

**७ सप्टेंबर.** किनाऱ्यालगतच्या बेटावरील चीनच्या हक्काला भारताने पाठिंबा दिला होता असे श्री. नेहरूंनी निवेदन केलें.

**सप्टेंबर.** अकसाई चीनच्या उत्तरेकडील भागांत गस्त घालणारी भारतीय तुकडी आपलें नित्याचें कार्य करीत असतांना, चिनी सैन्याने त्यांना कैद करून जवळ जवळ ५ आठवडेपर्यंत डांबून ठेवले. भारतीय तुकडींतील लोकांना चिनी सैनिकांनी अत्यंत वाईट तऱ्हेने वागविले.

**सप्टेंबर.** इमारती बांधण्यास उपयोगी पडेल असे सामान बरोबर घेऊन एक मोठी चिनी तुकडी बाराहोतीत शिरली. अर्थात त्या ठिकाणीं कायम स्वरूपाचें किंवा अर्धकायम स्वरूपाचें बांधकाम करण्याच्या दृष्टीनेच हें सामान त्यांनी बरोबर आणलें होतें.

**२७ सप्टेंबर.** चिनी सैन्याची एक तुकडी प्रथम लोहीत सरहद्द विभाग ओलांडून आंत आली व नंतर ती तुकडी ब्रह्मदेशांत गेली.

**१८ ऑक्टोबर.** लडाखमधील अकसाई चीन विभागांतून मोटार रस्ता बांधण्याबद्दल भारत सरकारने चीन सरकारकडे निषेध नोंदविला.

**ऑक्टोबर.** उत्तर प्रदेशांत लापथाल व संगचामाला येथें चिनी सैन्यानीं ठाणीं स्थापन केलीं.

**२७ ऑक्टोबर.** तिबेटच्या बाजूने येणाऱ्या एका विमानाने स्पीटी व्हॅली ( पंजाब ) व हिमाचल प्रदेश ह्या भागांवरून उड्डाण केलें.

**२९ ऑक्टोबर ते नोव्हेंबर.** तिबेटाच्या बाजूने येणाऱ्या एका विमानाने चीनी ( हिमाचल प्रदेश ) ह्या ठिकाणावरून उड्डाण केलें.

**८ नोव्हेंबर.** लडाखमधील, अकसाई चीन प्रदेशावर आपला हक्क सांगितल्याबद्दल, व भारतीय टेहळणी तुकडींतील लोकांना वाईट रीतीने वागविल्याबद्दल भारत सरकारने चीन सरकारकडे निषेध व्यक्त केला.

**१० डिसेंबर.** बाराहोती, लापथाल, व संगचामाला येथून आपलें लष्कर ताबडतोब काढून घेण्याबद्दल भारत सरकारने चीन सरकारला फर्माविले.

**१४ डिसेंबर.** एका अधिकृत चिनी पत्रकांत चीन-भारत सीमा चुकीची दाखविली गेली असल्याचे श्री. नेहरूंनी श्री. चौ एन-लाय ह्यांना पत्र लिहून त्यांच्या निदर्शनास आणलें. श्री. नेहरूंनी आपल्या पत्रांत पुढे म्हटलें होतें कीं अशा तऱ्हेच्या एक सारख्या चुकीच्या प्रसिद्ध होणाऱ्या नकाशांमुळे मोठी चमत्कारिक परिस्थिति शक्य तो लवकर दूर केली पाहिजे.

**१७ डिसेंबर.** चिनी विमानाने केलेल्या उल्लंघनांकडे चीन सरकारचे लक्ष वेधून, भारत सरकारने चीन सरकारला अशी विनंती केली कीं ह्यापुढे अशा प्रकारची उल्लंघनें होणार नाहींत, अशी तजवीज करावी.

**१९५९. १७ जानेवारी.** ऑक्टोबर १९५७ मध्यें वालॉंगवर केलेल्या आक्रमणाबद्दल व १९५८ च्या सप्टेंबर महिन्यांत लोहित सरहद्द विभागामध्यें आक्रमण केल्याबद्दल भारत सरकारने निषेध नोंदविला.

**२३ जानेवारी.** श्री. चौ एन-लाय ह्यांनी श्री. नेहरूंना लिहिलेल्या उत्तरांत असा युक्तिवाद केला होता कीं चीन-भारत सीमा कधींच आंखली गेली नव्हती व ह्या प्रश्नाबाबत दोन्हीं देशांत कांहीं मतभेद आहेत. पत्रांत पुढे म्हटले होतें कीं १९५४ सालीं हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने योग्य ती परिस्थिति निर्माण झाली नव्हती म्हणून त्या वेळीं चीन सरकारने हा प्रश्न उपस्थित केला नव्हता.

'मॅक्मोहन रेषा' चीन सरकारने कधींच मान्य केली नव्हती, असे नमूद करून चिनी नकाशांच्या बाबतींत श्री. चौ एन-लाय यांनी असे म्हटले होतें कीं पूर्वीचे नकाशे व नवीन नकाशे ह्या दोहोंमध्यें सीमा रेषेसंबंधी कांहींहि फरक नव्हता.

ह्याचाच अर्थ असा कीं, आज सीमा रेषा चीन सरकारने अधिकृतपणें मान्य असलेली परंपरागत चालत आलेली भारत-चीन सीमा रेषा चीन सरकारने अधिकृत-

पणें धुडकावून लावली. १९५४ सालीं झालेल्या करारनाम्याचा भंग करून व आतां-पर्यंत दिलेलीं सर्व आश्वासनें धाब्यावर बसवून चीनने भारताच्या सुमारे ५० हजार चौरस मैल प्रदेशावर आपला हक्क सांगण्यास सुरूवात केली.

**३१ मार्च.** दलाई लामा भारतांत आले व त्यांना राजकीय आश्रय देण्यांत आला. परंतु त्याचवेळीं त्यांना असे बजावण्यांत आले होते कीं भारतांत असे पर्यंत त्यांनी कोणत्याहि प्रकारच्या राजकीय आंदोलनांत भाग घेऊं नये.

**२६ एप्रिल.** भारताने दलाई लामांना राजकीय आश्रय दिल्याबद्दल चीन-मधील अत्यंत जबाबदार मंडळींनी भारतावर आग पाखडून जी अत्यंत गलिच्छ व निराधार टीका करण्यास सुरूवात केली होती, त्याबद्दल भारत सरकारने चीन सरकारकडे निषेध नोंदविला.

**१६ मे.** भारताच्या 'दुटप्पी' धोरणाद्दल चीनने भारताला जाणीव करून दिली व असेहि नमूद केलें कीं ह्यापुढें पंचशील तत्त्वांचा उपयोग चीनच्या सोयीप्रमाणें केला जाईल.

**२३ मे.** चीन सरकारच्या ह्या धोरणाबद्दल भारत सरकारने खेद व्यक्त करून असे जाहीर केलें कीं पंचशील तत्त्वांशी एकनिष्ट असणें, ही भारत सरकारची मूलभूत नीति आहे; केवळ संधीसाधुपणाकरतां ह्या तत्त्वांना चिकटून राहाणें ही भारताची नीति नाहीं.

**११ जुलै.** भारतीय ठाण्याच्या कामकाजांत व भारतीय व्यापारी, यात्रेकरू आणि तिबेटी लोक ह्यांच्या हालचालींत ज्या अनेक अडचणी निर्माण केल्या होत्या त्याकडे भारत सरकारने चीन सरकारचे लक्ष वेधलें.

**१४ जुलै.** संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने चीनच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न हातीं घ्यावा असे भारताने पुन्हा एकदां सुचविले.

**२८ जुलै.** लडाखमधील पॅनगॉन लेकच्या विभागांत एक चिनी हत्यारी तुकडी घुसली व ६ भारतीय शिपायांना अटक केली. शिवाय स्पँग्गुर येथें त्यांनी एक ठाणें स्थापन केलें.

**३० जुलै.** चीनच्या ह्या आक्रमणांबद्दल भारत सरकारनें निषेध व्यक्त केला.

**७ ऑगस्ट.** पूर्व विभागांतील खिनझेमन ह्या ठिकानीं एक हत्यारी चिनी टेहळणी पथकाला तेथून मागे हटविले.

**११ ऑगस्ट.** खिनझेमन ह्या ठिकाणीं भारतीय सीमेचें उल्लंघन केल्याबद्दल भारत सरकारनें चीन सरकारकडे निषेध खलिता पाठविला.

**२५ ऑगस्ट.** भारताच्या ईशान्य सरहद्दीवरील सुबानसिरी ह्या विभागांत एक मोठी चिनी तुकडी सरहद्द ओलांडून आंत घुसली, व भारताच्या लॉंगजु ह्या

सीमेवरील ठाण्यावर गोळीबार केला. तेथें असलेल्या थोड्याशा भारतीय सैनिकांना पिटाळून लावले व ठाण्याचा ताबा घेतला.

**२८ ऑगस्ट.** भारताच्या लँगजु ह्या ठाण्यावर हल्ला केल्याबद्दल भारताने चीनकडे निषेध खलिता पाठविला.

**२० ऑक्टोबर.** दक्षिण लडाखच्या चँग चेनमो खोऱ्यांत, भारतीय प्रदेशांत, ४० मैल आंत चिनी लष्करी तुकडी घुसली. कॉंगका खिंडीपाशीं ह्या भारतीय टेहळणी पथकाशी चकमक उडाली. चिनी सैनिकांनी गोळीबार केला. त्यामुळें ९ भारतीय मृत्युमुखी पडले. बाकीच्या सैनिकांना कैद करून अत्यंत वाईट व अमानुष वागणूक दिली व नंतर त्यांना सोडून दिले.

**२३ ऑक्टोबर.** भारतीय टेहळणी पथकावर चीनने केलेल्या हल्ल्याबद्दल भारताने चीनकडे निषेध नोंदविला. पकडलेल्या लोकांची मुक्तता करण्याबद्दल मागणी केली.

**१६ नोव्हेंबर.** हा प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवावा अशी भारताची अजून सुद्धां इच्छा असल्यामुळें भारत सरकारने एक तात्पुरता उपाय म्हणून असें सुचविले कीं लडाखमध्यें, चीन सरकार ज्या रेषेपर्यंत त्यांची सीमा असल्याचा दावा करीत आहे, त्या रेषेपर्यंत भारताने आपलें सैन्य मागे घ्यावें व उलटपक्षी भारताच्या पथकावर जी परंपरागत सीमा रेषा दाखविण्यांत आली, त्या रेषेच्या पलिकडे चीनने आपलें सैन्य न्यावें. सरहद्दीवर चकमकी उडूं नयेत एवढ्यासाठीं हा उपाय सुचविला होता.

**५ डिसेंबर.** गेल्या दोन महिन्यांच्या अवधींत तिबेटच्या दिशेकडून येणाऱ्या अनेक अज्ञात विमानांनी भारतीय प्रदेशावरून उड्डाण केलें, ह्या गोष्टीकडे भारताने चीन सरकारचे लक्ष वेधलें.

**१७ डिसेंबर.** पश्चिम विभागांमध्यें उभय देशांनीं आपआपलें सैन्य मागे घ्यावें ही भारताने केलेली सूचना चीनने धुडकावून लावली, एवढेच नव्हे तर उलट-पक्षी चिनी सैन्य अकसाई चीन विभागाच्या पश्चिमेला व पूर्वेला आणखी पुढे घुसले व त्या विभागांत रस्ते तयार केलें.

**१९६०. ५ फेब्रुवारी** शांततेच्या मार्गांनी हा प्रश्न सोडविण्यासाठीं निर-निराळ्या उपाययोजनावर विचारविनिमय करण्यासाठीं श्री. नेहरूंनी श्री. चौ एन-लाय ह्यांना दिल्लीला भेट देण्याचें निमंत्रण पाठविलें.

**४ एप्रिल** भारत सरकारने चीन सरकारच्या निदर्शनास पुन्हां एकदां ही गोष्ट आणून दिली कीं गेल्या तीन महिन्यांत तिबेटाच्या दिशेकडून येणाऱ्या अनेक अज्ञात विमानांनी भारतीय प्रदेशावरून उड्डाण केले.

**एप्रिल.** भारतीय प्रदेशांतील सराहा विभागाची चिनी लष्करी तुकड्यांनी टेहळणी केली.

**१९ एप्रिल.** श्री. चौ एन-लाय दिल्लीला आले व सहा दिवस त्यांनी श्री. नेहरूंशी बोलणी केली, ही बोलणी संपल्यानंतर दोन्हीं पंतप्रधानांनी असे जाहीर केले कीं उभय देशांतील मतभेद ते मिटवूं शकले नाहींत. तेव्हां असे ठरविण्यांत आले कीं सीमेबाबत सर्व कागदपत्रांची पहाणी करण्यासाठीं दोन्हीं देशातील अधिकाऱ्यांची बैठक व्हावी व त्यांनी अहवाल प्रसिद्ध करावा. दरम्यानच्या काळांत सीमा विभागांत संघर्ष व चकमकी टाळण्यासाठीं योग्य ती उपाय योजना करावी.

**३ जून.** भारताच्या ईशान्य सरहद्दीवरील कामेंग विभागांत भारतीय प्रदेशांत सुमारें ५ मैल आंत असलेल्या टाकटसँग गोंपा येथें एका मोठ्या चिनी तुकडीने आक्रमण केलें.

**२५ जून.** चिनी टेहळणी पथकानें सुरांहा भागाची टेहळणी केली.

**२९ जुलै** टाकटसँग गोंपा वरील आक्रमणाविरूद्ध भारताने चीनला खलिता पाठविला.

**२२ ऑगस्ट.** तिबेटच्या दिशेकडून येणाऱ्या विमानांनीं मार्च १९६० पासून आजपर्यंत ५२ वेळा भारतीय आकाशमार्गावरून उल्लंघन केलें ही गोष्ट भारत सरकारने चीनच्या निदर्शनास आणून दिली.

**२२ सप्टेंबर.** जेलेप्ला खिंडीजवळ चिनी हत्यारी टेहळणी पथक सिक्कीमच्या हद्दींत घुसलें.

**२७ सप्टेंबर.** सिक्किमवरील आक्रमणाबद्दल भारताने चीनकडे निषेध नोंदविला.

**१३ ऑक्टोबर.** पश्चिम विभागांतील हॉट स्प्रिंग्ज ह्या ठिकाणाच्या जवळपासच्या भागाची चिनी हत्यारी तुकडीने टेहळणी केली.

**१९६१. १४ फेब्रुवारी.** सीमा प्रश्नाबाबतचा दोन्हीं देशांच्या अधिकाऱ्यांचा अहवाल भारत सरकारने प्रसिद्ध केला. भरपूर पुराव्यांच्या अधारे ह्या अहवालांत असे सिद्ध करण्यांत आलें होतें कीं, भारतीय नकाशांत दाखविलेली परंपरागत चालत आलेली सीमा रेषा हीच खरी दोन्हीं देशांतील सीमा आहे व चीनने भारताच्या सुमारें ५० हजार चौरस मैलावर सांगितलेला हक्क अनधिकृत असून, त्यापैकीं सुमारें १२ हजार चौरस मैलांचा टापू चीन बेकायदेशीरपणें बळकावून बसला आहे. कित्येक दिवसपर्यंत चीन सरकारनें ह्या अहवालाची दखल सुद्धां घेतली नाहीं. शेवटी १९६२ च्या मे महिन्यांत चीननें वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा एक जुजबी अहवाल प्रसिद्ध केला.

**२० एप्रिल.** जेलेप्ला खिंडीजवळ चिनी सैनिक सिक्कीम मध्यें घुसले.

**मे.** पश्चिमी विभागांतील चुशुल ह्या ठिकाणाजवळ चिनी सैनिकांनी भारतीय प्रदेशांत आक्रमण केलें.

**१३ जुलै.** मंगोलियाहून दिल्लीला परत येत असतांना भारताच्या विदेश मंत्रालयाचे जनरल सेक्रेटरी श्री. आर. के. नेहरू पेकिंगला थांबले. दोन्हीं देशांच्या अधिकाऱ्यांनी प्रसिद्ध केलेल्या अहवालाच्या आधारे सीमा प्रश्नाबाबत कांहीं प्रगति होण्याची शक्यता आहे कां, ह्याविषयीं त्यांनी चिनी अधिकाऱ्यांशी बोलणी केली.

**जुलै.** कामेंग सरहद्द विभागांतील, चेंमोकारपोला ह्या ठिकाणाच्या सुमारें ४ मैल पश्चिमेला भारतीय सरहद्दीच्या पूर्व विभागांत चिनी टेहळणी पथकाने आक्रमण केलें

**ऑगस्ट.** लडाख येथें ७८° १२′ पूर्व व ३५° १९′ उत्तर, ह्या अंशावरील ठिकाणीं व डामबुगुरू जवळ न्यागझु येथें अशा ३ ठिकाणीं चिनी सैन्याने नवीं ठाणी स्थापन करून ह्या ठाण्यांना पिछाडीच्या तळाशी जोडणारे रस्ते तयार केले.

**१२ सप्टेंबर.** चिनी सैनिक जेलेप्ला खिंडीतून सिक्कीममध्यें घुसले.

**३१ ऑक्टोबर.** चिनी सैन्याने आतांपर्यंत केलेली सीमेवरील अनेक आक्रमणें भारतीय प्रदेशाचा बराच मोठा भाग बेकायदेशीरपणे बळकावून बसणें, व नवीन रस्ते आणि ठाणीं बांधणें ह्या गोष्टींकडे भारत सरकारनें चीन सरकारचें लक्ष वेधलें. भारतीय प्रदेशांतून चीननें आपलें सैन्य काढून घ्यावे व आक्रमक चालचाली थांबवाव्यात अशा प्रकारची मागणी भारताने चीनकडे केली.

**१९६२. १४ जानेवारी** ७८° १२° पूर्व; ३९°, १७° उत्तर ह्या ठिकाणांपासून १२ मैल आणखी पुढें चिनी टेहळणी पथकांनी आगेकुच केलें.

**जानेवारी.** भारताच्या पूर्व विभागांतील लाँगजु ह्या ठिकाणाजवळ, कांहीं लष्करी व बिन लष्करी चिनी अधिकाऱ्यांनी भारतीय हद्द ओलांडली व भारतीय प्रदेशांत अर्धा मैल आंत येऊन रोई ह्या खेडेगावांकडे ते गेले.

**२२ फेब्रुवारी.** लडाख मधील पुढेपुढे सरकत असलेल्या चिनी टेहळणी कार्याबद्दल भारत सरकारने चीनकडे निषेध नोंदविला.

**१५ एप्रिल.** लडाखमध्यें सुमडो ह्या ठिकाणाच्या ६ मैल पश्चिमेला लष्करी ठाणें स्थापन केल्याबद्दल भारताने चीनकडे निषेध खलिता पाठविला.

**१८ एप्रिल.** पूर्व विभागांतील रोई ह्या खेडेगांवांत आक्रमण केल्याबद्दल भारतानें चीनकडे निषेध खलिता पाठविला.

**एप्रिल-मे.** लडाखमधील चिपचॅप विभागांत चिनी टेहळणी पथकें सारखीं पुढे पुढे प्रदेशावरून सरकत होती.

**३० एप्रिल** चीन सरकारने असे जाहीर केले कीं काराकोरम खिंडीपासून ाँगका खिंडीपर्यंत सबंध विभागांत गस्त घालण्याबाबत चिनी पथकांना हुकूम देण्यांत आला आहे. चीनच्या प्रदेशांत येणारी दोन ठाणीं, भारताने ताबडतोब हलवावीत अशी मागणीहि चीन सरकारकडे केली. ह्या निवेदनांत पुढे असेहि म्हटलें होते कीं, वर सांगितल्याप्रमाणें भारत सरकारने जर आपलीं ठाणीं हासविलीं नाहींत तर चीन संबंध सीमेवर गस्त घालण्यास पुन्हां सुरुवात करील.

**३ मे.** पाकिस्तान व चीन ह्यांच्यांत करार झाला. ह्या करारान्वयें भारत–चीन सीमेवरील काराकोरम खिंडीच्या पश्चिमेला, सध्या पाकिस्तान बेकायदेशीरपणे बळकावून बसलेल्या भागांबद्दल उभय देशांत बोलणी सुरू व्हावींत असे ठरले.

**१० मे.** संपूर्ण जम्मु-काश्मीर प्रांत भारताचे अधिपत्याखाली येतो, ही गोष्ट भारत सरकारने चीनच्या नजरेस आणून असे स्पष्ट केलें किं काश्मीर प्रदेशाच्या सरहद्दीच्या कोणत्याहि भागाबद्दल चीनने पाकिस्तानशी केलेला कोणताहि करार कायदेशीर होऊं शकत नाहीं.

**मे.** स्पॅनग्गुरच्या आग्नेयेस सुमारे १० मैलावर भारतीय प्रदेशांत चिनी सैन्याने केलेल्या हल्ल्याबाबत भारत सरकारने चीनकडे चिनकडे निषेध खलिता पाठविला व पश्चिम विभागांतून उभय देशांनी आपआपलें सैन्य सीमा रेषांच्या मागे हलवावें, ही पूर्वी केलेली सूचना पुन्हां एकदां केली; एवढेच नव्हे तर सर्व गोष्टी शांततेच्या मार्गाने सोडवाव्यात ह्या उद्देशानें, अक्साई चीन रस्ता चीनला बिगर लष्करी वाहतुकीकरतां वापरू देण्याची इच्छा असल्याचे भारत सरकारने जाहीर केले.

**२१ मे.** स्पॅनग्गुर जवळ नवीन लष्करी ठाणें स्थापन केल्याबद्दल भारताने चीन सरकारकडे निषेध नोदविला.

**२ जून.** १९५४ सालच्या भारत-चीन कराराची मुदत संपली. वास्तविक पहातां हा करार केव्हांच धाब्यावर बसविला होता. शिवाय प्रत्यक्ष कृतीत सुद्धां भारतीय यात्रेकरू, व्यापारी व तिबेटी लोक यांना नाना प्रकारे छळून व भारतीय प्रदेशांवर हल्लेकरून चीनने हा करार मोडला होता.

**१६ जून.** चिनी सैनिकांनी एक नवीन रस्ता बांधला हा रस्ता ७८° ३५' पूर्व ३५° ०' ३३" उत्तर ह्या ठिकाणापासून आग्नेय दिशेला जाऊन, ७९° १०' पूर्व, ३४° ४३' उत्तर ह्या ठिकाणच्या पश्चिम दिशेला जात होता व तेथून पुढे ७९° ८' पूर्व; ३४° ३३' उत्तर ह्या ठिकाणच्या दक्षिणेस जात होता. ह्या शिवाय ७९° ८' पूर्व, ३४° ३३' उत्तर ह्या ठिकाणीं एक नवीन ठाणें स्थापन केलें होतें वरील दोन्हीं गोष्टीबद्दल भारत सरकारने चीन सरकारकडे निषेध खलिता पाठविला.

**२८ जून.** चिपचॅप नदीजवळ ७८° १२′ पूर्व; ३५° १९′ उत्तर ह्या ठिकाणीं चिनी सैनिकांनीं बेकायदेशीरपणें एक ठाणें स्थापन केलें होतें. ह्या ठाण्याच्या आग्नेय दिशेला ६ मैलावर ७८° १५″ पूर्व; ३५° १५′ ३०″ उत्तर ह्या ठिकाणीं चिनी सैनिकांनीं एक नवीन ठाणें स्थापन केलें. ह्या गोष्टींबद्दल भारत सरकारने चीनकडे निषेध नोंदविला.

**१० जुलै.** गलवान नदीवरील, ७८° ३८′ पूर्व; ३४° ३९′ ४५″ उत्तर, ह्या ठिकाणीं असलेल्या भारतीय ठाण्याला चिनी सैनिकांनीं वेढा दिल्याबद्दल भारताने चीन सरकारला निषेध खलिता पाठविला.

**१२ जुलै.** चिपचॅप, चँग चेंनमो आणि पॅनगांग विभागांत चीनने नवीन ठाणीं स्थापन केल्याबद्दल भारत सरकारने चीन सरकारकडे निषेध खलिता पाठविला.

**२६–२७ ऑक्टोबर.** श्री. नेहरूंनी सरकार प्रमुखांना पत्र पाठविलें ( इमर्जन्सी ) भारतांत आणीबाणीची परिस्थिती सुरु.

**२७ ऑक्टोबर.** श्री. नेहरूंनी चौ एन-लाय यांना पत्र पाठविले. ८ सप्टेंबर १९६२ च्या पूर्वी चीनचें सैन्य ज्या ठिकाणीं होतें त्या ठिकाणीं गेलें पाहिजे.

**१४ नोव्हेंबर.** श्री. नेहरूंनी चौ एन-लाय यांच्या तीन कलमी योजनेचा ( २४ ऑक्टोंबर, १९६२ च्या ) विचार करणारें पत्र.

**१ डिसेंबर.** २८ नोहेंबरच्या चौ एन-लाय यांच्या पत्रास उत्तर.

# परिशिष्ट २

### तीर्थ-क्षेत्रांतील धार्मिक विधींचे संकल्प :

हिमालयांतील निरनिराळ्या तीर्थक्षेत्रांमधून म्हटले जाणारे संकल्प या ठिकाणीं मिळाले तितके एकत्र करून खालीं देण्यात येत आहेत. धार्मिक विधींकरितां जितकी त्यांची उपयुक्तता आहे तितकीच आजच्या स्थितींत राजकीय व भौगोलिक ज्ञानाच्या दृष्टीनें व भारतीय एकात्मता दृढ करण्याच्या दृष्टीनेंहि त्यांची उपयुक्तता पटण्यासारखी आहे.

सर्व तीर्थ-क्षेत्रांमधून म्हटले जाणारे संकल्प सारखे नसले तरी बहुतेक ठिकाणीं 'आर्यावर्तान्तर्गत–हिमालयप्रदेशे' असें म्हटलें जातें हें महत्वाचें आहे.

सर्व संकल्प पूर्ण मिळाले नाहींत. मिळाले तेहि शुद्ध नव्हते, कांहीं ठिकाणीं निरर्थक वाटत होते. यावच्छक्य अर्थवाही व शुद्ध ठेविले आहेत. अर्थात् हे संकल्प वाचून तेथील केल्या जाणाऱ्या धार्मिक विधींत हेच संकल्प सोडले जातील अशी संभावनाच नाहीं. शिवाय यात्रेकरितां गेलेल्या लोकांच्याकडून हे संकल्प मिळविले आहेत. त्यामुळें फक्त स्थूलमानानें तेथील संकल्पविधींची कल्पना यावी, हाच हेतु संकल्प संकलित करण्यांतील आहे. त्यामुळें हिमालयाशीं असलेल्या आपल्या अखंड प्राचीन परंपरेची जाणीव व्हावी, आचारधर्मांतील अनुस्यूतता समजावी व भारताची एकरूपता दृढ व्हावी व ती होईल अशी खात्री आहे. —संपादक.

### केदारनाथाचा संकल्प.

श्रीमद्भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया प्रवर्तमानस्य अद्य ब्रह्मणो द्वितीये परार्धे विष्णुपदे श्रीश्वेतवाराहकल्पे वैवस्वतमन्वन्तरे कलियुगे प्रथमचरणे अष्टाविंशतितमे युगे––

आर्यावर्तान्तर्गतहिमपर्वतैकदेशे केदारक्षेत्रे श्रीमन्दाकिनीक्षीरङ्गा–महोदधि–स्वर्गद्वारे सरस्वती–पञ्चगङ्गाः स्मरेन्नित्यं महापातकनाशनम्.

**गरुडगंगेचा संकल्प.**

श्रीमद्भगवतो.........

“सुमेरुदक्षिणपार्श्वे हिमपर्वतैकदेशे केदारखण्डान्तर्गतसूक्ष्मबदरिकाश्रमे गरुडगङ्गाया निकटे......अलकनन्दामन्दाकिन्योः वामतटे”

**गंगोत्रीचा संकल्प.**

श्रीमद्भगवतो महापुरुषस्य......

“जम्बूद्वीपे आर्यावर्तान्तर्गतहिमालयैकदेशे सुमेरुदक्षिणपार्श्वे केदारखण्डे बदरिकाश्रमे श्रीगङ्गोत्रीतीर्थे सूर्यकुण्डक्षेत्रे आद्यषष्टिसंवत्सराणां मध्ये”

**जम्नोत्रीचा संकल्प.**

श्रीमद्भगवतो महापुरुषस्य......

“अद्य पर्वणि द्वितीये परार्धे कल्पमंत्रे जंबुद्वीपे भारतखण्डे भारतवर्षे आर्जोबदाम (आर्याम्बा यमुना) क्षेत्रे...केदारखण्डे बदरिकाश्रमे पारसोर्यां गङ्गायमुना निकटे.

**देवप्रयागचा संकल्प.**

श्रीमद्भगवतो महापुरुषस्य.........

“आर्यावर्तान्तर्गतहिमपर्वतैकदेशे कैलासखण्डे श्रीरामचन्द्रचरणारविन्दसन्निधौ देवप्रयागसुदर्शनक्षेत्रे अलकनन्दाभागीरथ्योः मध्ये सरस्वती–गुप्तरूप–त्रिवेणी–सङ्गमे ब्रह्मकुण्डवसिष्ठकुण्डयोर्मध्ये नन्दननामसंवत्सरे”

**बद्रीनाथाचा संकल्प.**

“ॐ विष्णुः हरिर्हरिः श्रीमद्भगवतः श्वेतवाराहकल्पे वैवस्वतमन्वन्तरे आर्यावर्तान्तर्गतहिमपर्वतैकदेशे केदारखण्डे भारतवर्षे श्रीबौद्धावतारे षष्ठीशुम्भस्त्राणामध्ये, अधय उत्तरायणे ग्रीष्मऋतौ......श्रीबदरिकाश्रमे नरनारायणपर्वतयोर्मध्ये पञ्चशीलामध्ये वह्निक्षेत्रे”......

**हरिद्वारचा संकल्प.**

श्रीमद्भगवतो.........

आर्यावर्तान्तर्गतहिमालयदेशे बदरिकारण्ये वालखिल्याश्रमे दक्षप्रजापतिक्षेत्रे मायापुरीमण्डले केदारखण्डे.

**हृषीकेशाचा संकल्प.**

श्रीमद्भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया प्रवर्तमानस्य अद्य चरणे अष्टाविंशतितमे युगे बौद्धावतारे धर्मक्षेत्रे कुब्जामृके केदारखण्डे.

# जय जय भारतदेश

जय जय भारतदेश जय त्वं जय जय भारतदेश


उत्तिष्ठत जाग्रत सङ्गच्छध्वम् सन्नह्यध्वम्
भारतवीराः पराक्रमध्वम्
शूरा यूयं रणधीरा दुष्टान् शत्रून् विमर्दयध्वम्
जय जय भारतदेश जय त्वम्
नत्वा रुद्रं कैलासेशम् ताण्डवकर्तारम्
ध्यात्वा रामं धनुर्धारिणम् रावणहन्तारम्
स्मृत्वा कृष्णं चक्रधारिणम् कंसच्छेत्तारम्
प्रणम्य सर्वान् पराक्रमध्वम् घोषयध्वम् घोषयध्वम्
जय जय भारतदेश जय त्वम् ॥ १ ॥

जयतु हनूमान् लंकां दग्ध्वा द्रोणाचलधारी
जयतु प्रतापो राणा वीरो गिरिकन्दरवासी
जयतु छत्रपति शिवाजी राजा देवी रणचण्डी
भवानी देवी रणचण्डी
प्रणम्य सर्वान् पराक्रमध्वम् घोषयध्वम् घोषयध्वम्
जय जय भारतदेश जय त्वम् ॥ २ ॥

गङ्गायमुनाब्रह्मपुत्रनदगण्डकपावनवारि
कृष्णा गोदा सिन्धुनर्मदा सा शरयूकावेरी
सह्यसातपुटविन्ध्यहिमाचल उन्नतशृङ्गविहारी
प्रणम्य सर्वान् पराक्रमध्वम् घोषयध्वम् घोषयध्वम्
जय जय भारतदेश जय त्वम् ॥ ३ ॥

[ पुणें आकाशवाणीच्या सौजन्याने ] —वेंकटेशशास्त्री जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 13732




| क्रमांक | विभाग. | चीनने आक्रमण केल्याची तारीख. | भारताने निषेध नोंदविल्याची तारीख |
|---|---|---|---|
| १. | बाराहोती. | जून १९५५ | २८ जून १९५५ |
| २. | डमझन. | १५ सप्टेंबर १९५५ | ५ नोव्हेंबर १९५५. |
| ३ | नेलांग | २८ एप्रिल १९५६ | २ मे १९५६. |
| ४ | शिपकी ला | १ आणि २० सप्टेंबर १९५६ | ८ आणि २४ सप्टेंबर १९५६. |
| ५ | वालांग | आक्टोबर १९५७. | १७ जानेवारी १९५९ |
| ६ | खुर्नाक फोर्ट. | जून १९५८. | २ जुलै १९५८ |
| ७ | अकसाई चीन विभाग | सप्टेंबर आक्टो. १९५८. | १८ आक्टो. ८ नोव्हें. १९५८. |
| ८ | लोहित सरहद्द विभाग | २७-२८ सप्टेंबर १९५८. | १७ जानेवारी १९५९. |
| ९ | संगाचा माला. | आक्टोबर १९५८. | १० डिसेंबर १९५८. |
| १० | लापथाल. | आक्टोबर १९५८. | १० डिसेंबर १९५८. |
| ११ | पश्चिम पॅनगांग लेक. | २८ जुलै १९५९. | ३० जुलै १९५९. |
| १२ | खिनजमाने. | ७ आगष्ट १९५९. | ११ आगष्ट १९५९. |
| १३ | लांगजु. | २५ आगष्ट १९५९. | २८ आगष्ट १९५९. |
| १४ | कांगका ला. | २० आक्टोबर १९५९ | २२ आक्टोबर १९५९ |
| १५ | टाकटा सँग गोपा. | ३ जून १९६०. | २९ जुलै १९६०. |
| १६ | जेलेप ला | २२ सप्टेंबर १९६० | २७ सप्टेंबर १९६०. |
| १७ | हॉट स्प्रिंग: | आक्टोबर १९६०. | ३१ आक्टोबर १९६१. |
| १८. | चुशुल. | मे १९६१. | ३१ आक्टोबर १९६१. |
| १९. | चेमोकार पोला. | जुलै १९६१. | ३१ आक्टोबर १९६१. |
| २०. | न्यागझु. | आगष्ट १९६१. | ३१. आक्टोबर १९६१. |
| २१. | डांमबु गुरु. | आगष्ट १९६१. | ३१. आक्टोबर १९६१ |
| २२. | ७८° १२' हे ठिकाण ३५° १९' उत्तर | | |

| क्र. | ठि. | ता. |
|---|---|---|
| २६. | स्पनगुर | मे १९६२ |
| २७. | ७८° ३५' पूर्व ३४° ३२ उत्तर या ठिकाणापासून ७९° ८' पूर्व ३४° ३२ उत्तर या ठिकाणापर्यंतचा रस्ता. | जून १९६२. |
| २८. | ७८° १५' पूर्व ३५° २०' उत्तर हे ठिकाण. | जून १९६२. |
| २९ | गलवान खोरे | २० जुलै ६२ |
| ३० | चिपचॅप चँग चेमो व पॅन्गांग विभाग | जून जुलै १९६२ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 36860 वि. निबंध
क्रमांक 9559 नों. दि. [illegible]

REFBK-0013133